# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूर शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

स्पेशल पेपर–९ (ब)

# नागर समाजशास्त्र
**(Urban Sociology)**

स्पेशल पेपर–१४ (ब)

# भारतातील नागर समाजशास्त्र
**(Urban Sociology in India)**

सेमिस्टर–५ व ६ करिता

(शैक्षणिक वर्ष २०१५–१६ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (९ (ब) व १४ (ब)) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-81-8486-638-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
मा. कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
मा. कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
मा. प्र-कुलगुरू,
इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. अनिल गवळी**
अधिष्ठाता, कला व ललितकला विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील**
अधिष्ठाता, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे**
अधिष्ठाता, विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. आर. जी. फडतरे**
अधिष्ठाता, वाणिज्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य डी. आर. मोरे**
संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
परीक्षा नियंत्रक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एन. व्ही. कोंगळे**
वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**कॅ. डॉ. एन. पी. सोनजे** (सदस्य सचिव)
प्रभारी संचालक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : समाजशास्त्र ■

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) आर. बी. पाटील**
विभागप्रमुख, समाजशास्त्र व मानव्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

- **डॉ. मच्छिंद्र ज्ञानू सकटे**
  मंगल रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज,
  ता. कराड, जि. सातारा

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–९ (ब) नागर समाजशास्त्र**
**पेपर–१४ (ब) भारतातील नागर समाजशास्त्र**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

## अभ्यास घटकांचे लेखक

| **लेखन सहभाग** | **सत्र–५ घटक क्रमांक** | **सत्र–६ घटक क्रमांक** |
|---|---|---|
| **श्री. चंद्रकांत खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली | १, २, ३, ४ | १, २, ३, ४ |

■ **संपादक** ■

**श्री. चंद्रकांत खंडागळे**
विभागप्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय,
सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागांतर्गत बी. ए. पदवी अभ्यासक्रमासाठी समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थी मित्रांचे मी हार्दिक स्वागत करतो. या पदवीसाठी तुम्ही समाजशास्त्राचे सत्रपद्धतीनुसार एकूण दहा पेपर्स अभ्यासणार आहात. त्यापैकी सत्र ५ साठी पेपर क्रमांक ९ (ब) नागर समाजशास्त्र व सत्र ६ साठी पेपर १४ (ब) भारतातील नागर समाजशास्त्र असे दोन पेपर्स आहेत. या दोन पेपर्समध्ये एकूण आठ अध्ययन घटक समाविष्ट असून त्यांचे लेखन अत्यंत सुलभपणे व पद्धतशीरपणे केलेले आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना नागर समाजाचे यथार्थ आकलन होईल याची मला खात्री आहे.

सदर पुस्तक लेखनात सहकार्य केलेले सहलेखक श्री. बी. बी. यादव यांना मनःपूर्वक धन्यवाद. दूर शिक्षण केंद्राचे संचालक आणि केंद्रातील सर्व कर्मचारी या सर्वांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार.


**प्रा. चंद्रकांत खंडागळे**
संपादक
विभागप्रमुख, समाजशास्त्र
(पदवी आणि पदव्युत्तर)
श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय,
सांगली.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–९ (ब)** | |
| १. | नागर समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र | १ |
| २. | नागरीकरणाची प्रक्रिया | १३ |
| ३. | नागर समाजशास्त्रातील प्रमुख संकल्पना | २५ |
| ४. | नगरांची वाढ | ४१ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१४ (ब)** | |
| १. | नागरी सामाजिक संरचना | ५१ |
| २. | नागरी सामाजिक समस्या | ६६ |
| ३. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | ९९ |
| ४. | नगर नियोजन | १२४ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक : १

# नागर समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र

## (Field of Urban Sociology)

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

    १.३.१ नागर समाजशास्त्राची व्याख्या व अभ्यासविषय

    १.३.२ नागर समाजशास्त्राचे स्वरूप

    १.३.३ नागर समाजशास्त्राचे महत्त्व

१.४ स्वयंः अध्ययनासाठी प्रश्न

१.५ सारांश

१.६ स्वयंःअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ स्वाध्याय/गृहपाठ

१.८ चिंतन आणि कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना (Introduction)

समाजशास्त्र हे अगदी अलिकडील काळात म्हणजे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटच्या टप्प्यात उदयास आलेले सामाजिक शास्त्र (Social Science) आहे. मानव समाजाचा सर्वांगिण व पद्धतशीर अभ्यास समाजशास्त्र करते. अखिल मानव समाजाचे ग्रामीण समाज (Rural Society) आणि नागर (शहरी) समाज (Urban Society) असे दोन प्रकार पडतात. या दोन्ही समाजांचा परस्परसंबंध येत असला तरी त्यांच्यामध्ये अनेक बाबतीत भिन्नता आहे. तसेच त्यांच्या समस्याही भिन्न आहेत. त्यामुळे या दोन्ही समाजांचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे योग्य ठरेल असे समाजशास्त्रज्ञांना वाटू लागले. त्यातूनच ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारे ते ग्रामीण समाजशास्त्र (Urban Sociology) आणि नागर समाजाचा अभ्यास करणारे ते नागर समाजशास्त्र. अशा समाजशास्त्राच्या दोन शाखा उदयास आल्या आहेत. आज या दोन्ही शाखांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला असून कांही अभ्यासक त्यांना स्वतंत्र विज्ञानाचा दर्जा देताना दिसतात. प्रस्तुत ग्रंथात तुम्ही नागर समाजशास्त्र या शास्त्राचा अभ्यास करणार आहात.

## १.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला –

- नागर समाजशास्त्राची व्याख्या सांगता येईल.
- नागर समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती स्पष्ट करता येईल.
- नागर समाजशास्त्राचे स्वरूप व महत्त्व समजावून घेता येईल.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या पहिल्या अध्ययन घटकात तुम्ही नागर समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र समजावून घेणार आहात. अभ्यासाच्या सोयीसाठी हा घटक तीन विभागात विभागलेला आहे. पहिल्या विभागात नागर समाजशास्त्र म्हणजे काय हे समजण्यासाठी कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी नागर समाजशास्त्राच्या दिलेल्या व्याख्या नमूद केल्या आहेत. तसेच या शास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती ही स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या विभागात नागर समाजशास्त्राचे स्वरूप आणि तिसऱ्या विभागात त्याचे महत्त्व विशद केलेले आहे.

### १.३.१ नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय आणि व्याप्ती

(Definition and Subject matter of Urban Sociology)

**व्याख्या :** नागर समाजशास्त्र म्हणजे काय हे समजण्यासाठी कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी नागर समाजशास्त्राच्या केलेल्या पुढील व्याख्या तुम्ही अभ्यासणार आहात.

१. नागर समाजाचा म्हणजेच नागरी सामाजिक संबंधांचा आणि त्या संबंधातून उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारी समाजशास्त्राची एक शाखा म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **प्रा. चंद्रकांत खंडागळे.**

२. नागर समाजशास्त्र हे सामाजिक क्रिया, सामाजिक संबंध सामाजिक संस्था या सर्वांवर पडणाऱ्या नागरी जीवन पद्धतीच्या प्रभावाचा आणि नागरी जीवन पद्धतीवर आधारित आणि तिच्याद्वारे विकसित होणाऱ्या सभ्यतेचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. – **ई. ई. बर्गेल**

३. नागरी सामाजिक जीवन आणि नागरी समस्या यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **ए. टी. हॉबहाऊस**

४. नगर किंवा नागर समुदायाबरोबर नागरीकरण आणि नगरवाद यांची चर्चा करणारी समाजशास्त्राची शाखा म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **जे. ए. क्विन्न**

५. नागरी सामाजिक जीवन आणि संघटन यांच्या अभ्यासाशी एकनिष्ठ असलेले किंवा वाहिलेले समाजशास्त्रातील एक स्वतंत्र क्षेत्र म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **विल्यम पी. स्कॉट**

६. नागर समाजशास्त्र हे शहरात आणि नगरात राहणाऱ्या व्यक्तींचे जीवन आणि समाज यांच्याशी संबंधित आहे. – **नेल्स एण्डरसन**

७. नागरी पर्यावरणातील व्यक्तींबरोबरच नागरी समूहांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **लॉरी नेल्सन**

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की नागर समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे. या शाखेत नागर समाजातील म्हणजेच शहर (Town) आणि नगर (City) यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या परस्परसंबंधांचा, सामाजिक जीवनाचा, सामाजिक संघटनांचा व सामाजिक समस्यांचा अभ्यास होतो.

**अभ्यास विषय:** वरील विविध व्याख्यांवरून नागर समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाची व व्याप्तीची सर्वसाधारण कल्पना येते. नागर समाजशास्त्राचा अभ्यास विषय व व्याप्ती यांची सविस्तर कल्पना येण्यासाठी कांही मान्यवर अभ्यासकांनी या संदर्भात मांडलेली मते अभ्यासणे अधिक उचित ठरेल.

१. **श्रीमती एल. डब्ल्यू. ब्राइस** आणि **बेंजामिन खान** यांनी आपल्या Introduction to Urban Sociology या ग्रंथात नागर समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''नागर समाजशास्त्र ही समाजशास्त्राची नवीन व महत्त्वपूर्ण शाखा असून ती नगरांचा (Cities) आणि नगरांशी संबंधित असलेल्या सर्व समस्यांच्या अभ्यासाशी संबंधित आहे. ह्या नागरी समस्या (Urban Problems) मानवी समस्या असून त्यांची सोडवणूक ही मानवी दृष्टिकोनातूनच मानवाकडून झाली पाहिजे.'' यावरून नागर समाजशास्त्रात १) नगरांचा अभ्यास व २) नागरी समस्यांचा अभ्यास अंतर्भूत असल्याचे स्पष्ट होते.

२. **गार्डन इरिक्सन** यांनी आपल्या Urban Behaviour या ग्रंथात नागर समाजशास्त्रात पुढील चार बाबींचा अभ्यास होतो असे नमूद केलेले आहे.

१) नगर नियंत्रण

२) नागरी सामाजिक संरचना

३) नागरी सभ्यता व संस्कृती

४) नागरी सामाजिक संघटन

इरिक्सन यांनी असेही म्हटले आहे की, ''एक सामाजिक विज्ञान म्हणून नागर समाजशास्त्र हे नागरी सामाजिक जीवनाची निर्मिती करणाऱ्या संपूर्ण परिस्थितीचा व आंतरसंबंधांचा अभ्यास करण्यामध्ये रूची (रस) घेते. हे शास्त्र नागरी सामाजिक जीवनाच्या केवळ एखाद्याच अंगाचे नव्हे तर सर्व अंगांचे (पैलूंचे) विवेचन करते.

३. **पार्क आणि बर्गेस** यांनी आपल्या The Urban Community या ग्रंथात नागर समाजशास्त्राच्या अभ्यास विषयाचे पुढील तीन भाग पाडलेले आहेत.

**अ) परिस्थितीशास्त्र** (Ecology) : यामध्ये भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास समाविष्ट आहे. वेगवेगळ्या ठिकाणाची भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती वेगवेगळी असते आणि तिचा मानवाचे जीवन, व्यवहार, परस्परसंबंध, जीवन पद्धती इत्यादीवर प्रभाव पडत असतो. नागर समाजशास्त्र हे नागरी समुदायावर प्रभाव टाकणाऱ्या भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास

करते. पार्क व बर्गेस यांनी परिस्थितीशास्त्राचे मानव परिस्थितीशास्त्र (Human Ecology) आणि सामाजिक परिस्थितीशास्त्र (Social Ecology) असे दोन भाग पाडलेले आहेत.

ब) **सामाजिक संघटन** (Social Organization) - नागर समाजशास्त्र नागरी सामाजिक संघटनाचा अभ्यास करते. नागरी सामाजिक संघटन हे ग्रामीण सामाजिक संघटनापेक्षा वेगळे असते. नागरी सामाजिक संघटनामध्ये प्राथमिक समूह, संस्था व संघटना यांना कमी महत्त्व असते. नागर समाजशास्त्र हे नागर समुदायातील कुटुंब, जाती, वर्ग, आर्थिक संस्था, मनोरंजन संस्था, राजकीय संस्था इत्यादींचा सविस्तर अभ्यास करते.

**क) सामाजिक विघटन** (Social Disorganization) : नागर समाजशास्त्र हे नागरी जीवनातील विघटनकारी शक्तींचा व प्रक्रियांचाही अभ्यास करते. ग्रामीण जीवनापेक्षा नागरी जीवन हे विविध गंभीर व संकीर्ण समस्यांनी ग्रस्त असल्याचे आढळते. नागर समाजशास्त्र हे गलिच्छ वस्ती, गुन्हेगारी व बालगुन्हेगारी, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, मद्यपान, मादक पदार्थांची व्यसनाधिनता, भ्रष्टाचार, दारिद्र्य, बेकारी इत्यादी नागरी समस्यांचा अभ्यास करते.

वरील अभ्यासकांच्या तसेच इतरही कांही अभ्यासकांच्या मतांच्या आधारे नागर समाजशास्त्राच्या अभ्यासात किंवा व्याप्तीत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**१. नागर समुदायाचा अभ्यास :** नेल्स एण्डरसन यांनी म्हटल्याप्रमाणे नागर समाजशास्त्रात नागर समुदायाचा म्हणजेच शहरांचा (Towns) व नगरांचा (Cities) अभ्यास केला जातो. त्यादृष्टीने नागर समुदाय म्हणजे काय? त्याची कोणती वैशिष्ट्ये आहेत? नागर समुदायाची भौतिक रचना कशी आहे? नागर समुदायाचे म्हणजेच शहरांचे व नगरांचे विविध निकषांच्या आधारे कोणकोणते प्रकार पडतात? इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह नागर समाजशास्त्रात केला जातो.

**२. नागरी जीवनपद्धतीचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नगरातील लोकांच्या जीवनपद्धतीचा किंवा जीवनशैलीचा (Life-style) अभ्यास करते. नागरी जीवनपद्धती ही ग्रामीण जीवनपद्धतीहून खूपच वेगळी असते. तिच्यावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानव निर्मित (कृत्रिम) पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानावर आधारलेल्या यंत्रांचा व तंत्रांचा वापर नागरी समुदायातील लोक मोठ्या प्रमाणावर करतात. या गोष्टीचा त्यांचे राहणीमान, आचारविचार, खाणेपिणे, वेशभूषा-केशभूषा इत्यादींवर मोठा प्रभाव पडलेला असतो. यातूनच या समुदायात एक वेगळी जीवनशैली उदयास आलेली असते. यालाच लुईस वर्थने नगरवाद (Urbanism) असे म्हटले आहे. नागर समाजशास्त्र हे नागरी पर्यावरणातील अशा जीवनपद्धतीचा अभ्यास करते.

**३. नागरी सामाजिक संघटनाचा अभ्यास :** पार्क व बर्गेस यांनी नागरी सामाजिक संघटनांचा अभ्यास हा नागर समाजशास्त्राचा एक महत्त्वाचा विभाग मानला आहे. सामाजिक संघटनाच्या अभ्यासात सामाजिक संस्था, सामाजिक समूह, सामाजिक स्तरीकरण व्यवस्था व इतर यंत्रणांचा समावेश होतो. त्यामुळे नागर समाजशास्त्र हे नागर समाजातील कुटुंब व विवाह यासारख्या सामाजिक संस्थांचा, आप्तसंबंधी समूह (Kinship groups) व व्यावसायिक समूह (Occupational groups) यासारख्या सामाजिक समूहांचा, जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था यासारख्या सामाजिक स्तरीकरण

व्यवस्थेचा तसेच नगरातील नगरपरिषद व महानगरपालिका यासारख्या प्रशासकीय यंत्रणांचा म्हणजेच स्थानिक स्वराज्यसंस्थांचा अभ्यास करते.

४. **नागरी सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास :** नागर समाजातील व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूह-समूह यांच्यात घडणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांचा म्हणजेच प्रक्रियांचा अभ्यास नागर समाजशास्त्र करते. त्यादृष्टीने नागर समाजातील सहकार्य, स्पर्धा, संघर्ष इत्यादी सामाजिक प्रक्रियांचे साधार विवेचन केले जाते.

५. **आर्थिक जीवनाचा अभ्यास :** नागर समाजात अर्थव्यवस्थेस प्राधान्य दिले जाते. येथील अर्थव्यवस्था ही उद्योगप्रधान असते. शहरात विभिन्न प्रकारचे उद्योगधंदे स्थापन झालेले असतात. या उद्योगधंद्यांचा लोकांच्या केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक जीवनावरही मोठा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे नागर समाजशास्त्रात उद्योगधंद्यांचा व औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचा सांगोपांग अभ्यास केला जातो. नागर समाजातील आर्थिक-औद्योगिक संस्था व संघटनांचा सामाजिक संदर्भात अभ्यास केला जातो. औद्योगिकीकरण व यांत्रिकीकरण यांचा नागरी जीवनावरील प्रभाव ही अभ्यासला जातो.

६. **राजकीय जीवनाचा अभ्यास :** शहरे किंवा नगरे ही आज राजकीय जीवनाची किंवा राजकारणाची केंद्रे बनलेली आहेत. नगरातील लोक हे राजकीयदृष्ट्या अधिक जागरूक बनलेले आढळतात. कारण नगरात अनेक राजकीय संस्था, संघटना, पक्ष व दबावगट कार्यरत असतात. त्यांची राजकीय विचारसरणी ही भिन्न भिन्न असते. आपापल्या विचारसरणीचा प्रभाव वाढविण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यामुळे नागरी समाज जीवनावर राजकीय घडामोडींचा मोठा प्रभाव पडत असतो. म्हणून नागर समाजशास्त्रात शहरातील राजकीय घडामोडींचा अभ्यास केला जातो.

७. **धार्मिक जीवनाचा अभ्यास :** साधारणपणे असे मानले जाते की ग्रामीण समाजाच्या तुलनेत नागर समाजात धर्माचा प्रभाव व महत्त्व कमी असते. तथापि वस्तुस्थिती अशी आहे की सर्वच प्रमुख धार्मिक संघटनांची कार्यालये व क्रियाविधी ह्या खेड्यापेक्षा शहरात अधिक प्रमाणात आढळतात. या धार्मिक संघटना व त्यांचे नेते हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कोणत्या ना कोणत्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक शक्तींशी संबंधित असतात. त्यामुळे शहरातील जीवनावरही धार्मिक संस्था, संघटना व विचारसरणीचा कमीजास्त प्रभाव पडतच असतो. नागर समाजशास्त्र ह्या धार्मिक प्रभावाचाही अभ्यास करते.

८. **नागरीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नागरीकरणाच्या प्रक्रियेचाही अभ्यास करते. आधुनिक काळात जगातील सर्वच समाजात ग्रामीण लोक मोठ्या प्रमाणावर शहरांकडे वा नगरांकडे स्थलांतर करू लागले आहेत. त्यामुळे नगरांचा आकार व लोकसंख्या वाढत चालली आहे. तसेच नगरातील जीवनशैलीचा (Life-style) प्रभावही वाढत चालला आहे. या प्रक्रियेसच स्थुलमानाने नागरीकरण म्हणतात. नागर समाजाचा अभ्यास करताना नागरीकरणाच्या प्रक्रियेची कारणे, नागरीकरणाचे प्रवाह व सिद्धांत, नागरिकरणाचे परिणाम इत्यादींचा अभ्यास केला जातो.

९. **नागरी समस्यांचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नागरी समस्यांचाही अभ्यास करते. औद्योगिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची व वाहतुकीची प्रगत साधने, वाढती लोकसंख्या इत्यादी

घटकांचा प्रभाव पडून नागर समाजात दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी व बालगुन्हेगारी, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, मद्यपान व मादक पदार्थांची व्यसनाधिनता, वाहतुकीची कोंडी व अपघात, पर्यावरणाचे प्रदूषण इत्यादी अनेक गंभीर समस्या उद्‌भवल्या असून त्यांची तीव्रता वाढत चालली आहे. त्यामुळे या समस्यांची कारणे व त्यावरील उपाययोजना यांचा ऊहापोह या शास्त्रात केला जातो.

**१०. नगर नियोजनाचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नगर नियोजनाचाही अभ्यास करते. नागरी समस्यांची सोडवणूक करून नगरांचा पद्धतशीर विकास करणे, नगरांची पुनर्रचना करणे यालाच नगर नियोजन म्हणतात. नगरांच्या विकासासाठी केल्या जाणाऱ्या सर्व कार्यक्रमांची व योजनांची चर्चा नागर समाजशास्त्रात केली जाते. त्यादृष्टीने नगर नियोजनाचा अर्थ, प्रकार, तत्त्वे, नगर नियोजनाची अंमलबजावणी, त्याच्या मार्गातील अडथळे इत्यादींचा अभ्यास ह्या शास्त्रात केला जातो.

**११. सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास :** ग्रामीण समाजापेक्षा नागर समाजात सामाजिक परिवर्तनाची गती अधिक आहे. नागरी सामाजिक संबंध व सामाजिक संस्था, नागरी जीवन पद्धती, इत्यादीमध्ये वेगाने परिवर्तन घडून येत आहे. त्यामुळे नागर समाजाचा अभ्यास करताना ह्या परिवर्तनाचे स्वरूप व कारणे, तसेच त्याची गती व दिशा ह्यांचा अभ्यास केला जातो.

### १.३.२ नागर समाजशास्त्राचे स्वरूप (Nature of Urban Sociology)

नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यास विषय व व्याप्ती अभ्यासल्याने या शास्त्राच्या स्वरूपाची सर्वसाधारण कल्पना येते. त्याच्या स्वरूपाची अधिक सविस्तर, परिपूर्ण व सुस्पष्ट कल्पना येण्यासाठी पुढील मुद्दे अभ्यासावे लागतात.

**१. नागर समाजशास्त्र हे एक विज्ञान आहे :** कारण ते नागर समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करते. वैज्ञानिक पद्धती ही अभ्यासाची एक विशेष पद्धती आहे. या पद्धतीने एखाद्या विषयाचा अभ्यास करताना सर्वप्रथम त्या विषयाशी संबंधित असलेल्या घटनांची निरीक्षणाद्वारे वस्तुनिष्ठ माहिती गोळा करतात. यालाच **तथ्य संकलन** (Collection of Data) असे म्हणतात. नंतर त्या माहितीचे किंवा तथ्यांचे **संश्लेषण** (Synthesis), **विश्लेषण** (Analysis) व **वर्गीकरण** (Classification) केले जाते. नंतर या माहितीच्या आधारे घटनाघटनांमधील परस्परसंबंधाविषयी एखादा अंदाज (तर्क वा कयास) म्हणजेच अभ्युपगम किंवा गृहीतकृत्य (Hypothesis) केले जाते. पुढे त्या अभ्युपगमाची प्रथम प्रचिती (Verification) घेतली जाते व नंतर त्याची सिद्धी (Proof) केली जाते. त्यानंतर अशा सिद्ध झालेल्या अभ्युपगमाचे **सामान्यीकरण** (Generalization) करून त्याला सामान्य नियमाचे (General Law) रूप दिले जाते. आणि शेवटी या नियमाचा अगोदरच्या नियमांशी समन्वय साधला जातो. याला **स्पष्टीकरण** (Explaination) असे म्हणतात. अशा पद्धतीने एखाद्या विषयाला लागू पडणारे अनेक नियम शोधून काढले व त्यांची सुव्यवस्थित रचना केली की त्यास शास्त्र किंवा विज्ञान असे म्हणतात. कोणत्याही विषयाचे या पद्धतीने मिळविलेले ज्ञान विज्ञान ठरते. म्हणूनच एखाद्या विशिष्ट विषयाशी संबंधित असलेली ज्ञानाची सुव्यवस्थित रचना म्हणजे विज्ञान होय. (Science is a systematic body of knowledge pertaining to a particular subject matter) अशी व्याख्या आपणास करता येते. वेगवेगळ्या विषयांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास होऊ लागल्याने वेगवेगळी विज्ञाने (शास्त्रे) उदयास आलेली आहेत. प्रत्येक शास्त्र आपल्या

अभ्यासविषयास लागू पडणारे नियम शोधून काढते. उदा. पदार्थ विज्ञान जडद्रव्यांचा (Matters) अभ्यास करून त्यासंबंधीचे नियम शोधून काढते. उदा. मागणी पुरवठ्याचा नियम. नागर समाजशास्त्र देखील असेच एक शास्त्र आहे. नागर समाज हा त्याचा अभ्यासविषय आहे. नागर समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून त्यासंबंधीचे सामान्य नियम ते शोधून काढते. म्हणून ते एक विज्ञान ठरते.

२. **नागर समाजशास्त्र हे एक अनुभवाधिष्ठीत (Empirical) विज्ञान आहे** अनुभवनिरपेक्ष शास्त्रे (Non-empirical sciences) आणि अनुभवाधिष्ठीत शास्त्रे (Empirical Sciences) असे एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. ज्या शास्त्रातील नियम (ज्ञान) हे केवळ बौद्धिक चिंतनातून स्फुरलेले असतात व त्यांचे प्रामाण्यही (सत्यता) केवळ बुद्धीच्या साह्यानेच तपासले जाते त्यासाठी अनुभवाची गरज नसते त्या शास्त्रांना अनुभवनिरपेक्ष शास्त्रे म्हणतात. उदा. तर्कशास्त्र आणि गणित. याउलट ज्या शास्त्रातील नियमांची उभारणी ही अनुभवाच्या आधारे झालेली असते व त्यांचे प्रामाण्यही अनुभवाच्याच आधारे तपासले जाते त्या शास्त्रांना अनुभवाधिष्ठित (अनुभवावर आधारलेली) शास्त्रे असे म्हणतात. उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी. हैड्रोजन व ऑक्सिजन यांच्या संयोगातून पाणी तयार होते हा रसायनशास्त्रातील नियम किंवा हरितद्रव्य बनविण्यासाठी वनस्पतींना सूर्यप्रकाशाची गरज असते हा वनस्पतीशास्त्रातील नियम, केवळ बौद्धिक चिंतनाद्वारे कधीच समजला नसता. त्यासाठी अनुभवाची गरज भासते. म्हणून ही शास्त्रे अनुभवाधिष्ठीत शास्त्रे ठरतात. नागर समाजशास्त्र हे देखील असेच एक अनुभवाधिष्ठीत शास्त्र आहे. कारण त्यातील नियमांची उभारणी ही नागर समाजातील सामाजिक घटनांच्या आधारे होते. नागर समाजशास्त्र हे केवळ बौद्धिक चिंतन न करता नागरी सामाजिक घटनांचा अनुभव घेऊन त्याआधारे नागरी जीवनाविषयीचे सामान्य नियम शोधून काढते म्हणून ते अनुभवाधिष्ठीत शास्त्र ठरते.

३. **नागर समाजशास्त्र हे तथ्यात्मक किंवा वस्तुनिष्ठ** (Positive) **विज्ञान आहे :** तथात्मक शास्त्रे (Positive Sciences) आणि आदर्शात्मक शास्त्रे (Normative Sciences) असेही एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. जी शास्त्रे आपल्या विषयाचा अभ्यास आदर्शांच्या (Ideals) किंवा मूल्यांच्या (Norms or Values) संदर्भात करतात त्यांना आदर्शवादी शास्त्रे म्हणतात. उदा. तर्कशास्त्र, नीतिशास्त्र व सौंदर्यशास्त्र. याउलट जी शास्त्रे आपल्या विषयाचा अभ्यास तथ्यांच्या किंवा वस्तुस्थितीच्या (Facts) संदर्भात करतात त्यांना तथ्यात्मक शास्त्रे असे म्हणतात. उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी. आदर्शात्मक शास्त्रे 'काय असावे (What ought to be)' या प्रश्नाचा तर तथ्यात्मक शास्त्रे काय आहे (What is) या प्रश्नाचा अभ्यास करतात. नीतिशास्त्र हे मानवाचे वर्तन आदर्श स्वरूपात कसे असावे यादृष्टिकोनातून मानवी वर्तनाचा अभ्यास करते. आणि त्यानुसार मानवी वर्तनात योग्य-अयोग्य किंवा चांगले-वाईट असा भेद करते. याउलट नागर समाजशास्त्र हे शहरी लोकांचे वर्तन प्रत्यक्षात कसे आहे यादृष्टीकोनातून अभ्यासते. त्यामध्ये योग्य-अयोग्य किंवा चांगले-वाईट असा भेद न करता शहरी लोकांचे वर्तन जसे आहे तसा स्वरूपात अभ्यासते. म्हणून ते तथ्यात्मक शास्त्र ठरते.

४. **नागर समाजशास्त्राकडे पूर्वकथन क्षमता (Power of prediction) आहे.** कोणत्याही शास्त्रातील नियम हे समान परिस्थितीत सर्वत्र खरेच ठरतात. त्यामुळे त्या नियमांच्या आधारे पूर्वकथन

करता येते. जी स्थिती आता उपलब्ध नाही तिच्याविषयी कांहीतरी निवेदन (Statement) करणे म्हणजे पूर्वकथन होय. पूर्वकथन हे भविष्यकाळाप्रमाणेच भूतकाळासंबंधीचेही असते. उदा. खगोलशास्त्रातील नियमांच्या आधारे भविष्यात केव्हा व कोठे ग्रहणे होतील हे अचूकपणे सांगता येते. पुरातत्त्वशास्त्रातील नियमांच्या आधारे उत्खननात सापडलेल्या वस्तूंचा कालावधी सांगता येतो. नागर समाजशास्त्रातील नियमांच्या आधारेही असे पूर्वकथन करता येते. ज्या विशिष्ट परिस्थितीत सामाजिक घटनांचा अभ्यास करून नागर समाजशास्त्र निष्कर्ष काढते तीच परिस्थिती इतरत्र विद्यमान असेल तर तेथेही ते निष्कर्ष हमखासपणे लागू पडतील असे कथन नागर समाजशास्त्र करू शकते. समान परिस्थितीत विशिष्ट घटना घडून येतील असे पूर्वकथन हे शास्त्र करते. तसेच अशा पूर्वकथन क्षमतेच्या आधारे नागरी समस्या सोडविण्यासाठी व नागर समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी कांही कार्यक्रम ही हे शास्त्र सुचवू शकते. तथापि येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे व ती म्हणजे नैसर्गिक शास्त्रांचे निष्कर्ष हे अधिक निश्चित व काटेकोर असल्याने त्यांच्या साह्याने अधिक अचूक पूर्वकथन करता येते. नागर समाजशास्त्राचे (इतरही सामाजिक शास्त्रांचे) निष्कर्ष हे तितकेसे निश्चित व काटेकोर नसल्याने त्यांच्या साह्याने केलेले पूर्वकथन हे नेहमीच अचूक ठरेलच असे नाही.

**५. नागर समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे :** नागर समाजशास्त्राचा उदय हा अलिकडील काळात विसाव्या शतकाच्या प्रारंभी झाला असला तरी त्याने अल्पावधीतच खूपच प्रगती केलेली आहे. नागर समाजाविषयी शास्त्रशुद्ध असे विपूल ज्ञान त्याने उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे ते एक स्वतंत्र विज्ञान आहे असे वाटू शकते. तथापि ते स्वतंत्र विज्ञान नसून समाजशास्त्राची ती एक विशेष शाखा (Branch) आहे असेच बहुसंख्य समाजशास्त्रज्ञ मानतात. कारण समाजशास्त्रातील अभ्यासपद्धती, सिद्धांत व संकल्पना यांचा वापर करून नागर समाजाचा अभ्यास हे शास्त्र करते. म्हणूनच विल्यम स्कॉट हे नागर समाजशास्त्रास 'नागरी सामाजिक जीवन व संघटन यांचा अभ्यास करणारे समाजशास्त्राचे एक स्वतंत्र क्षेत्र मानतात. नेल्स एण्डरसन हे देखील ग्रामीण समाजशास्त्राप्रमाणेच नागर समाजशास्त्रासही समाजशास्त्राची एक शाखा मानतात. थोडक्यात समाजशास्त्र हे समाजाचा अभ्यास करते. तर नागर समाजशास्त्र हे केवळ नागर समाजाचा अभ्यास करते. त्यामुळे ते समाजशास्त्राची एक शाखा ठरते.

थोडक्यात नागर समाजशास्त्र हे नागर समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे अनुभवाधिष्ठीत व तथ्यात्मक विज्ञान असून त्याच्याकडे पूर्वकथन क्षमता आहे आणि ते समाजशास्त्राची एक शाखा आहे.

### १.३.३ नागर समाजशास्त्राचे महत्त्व (Importance of Urban Sociology)

नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय व स्वरूप अभ्यासल्यानंतर तुम्ही या शास्त्राचे महत्त्व समजावून घेणार आहात. पुढील मुद्यांच्या आधारे या शास्त्राचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

**१. नगर – मानवी सभ्यतेचे केंद्र :** नागर समाजशास्त्र हे नगरातील लोकांच्या जीवनाचा अभ्यास करते. नगरे ही प्राचीन काळापासून मानवाच्या सभ्यतेची (Civilization) केंद्रे असल्याचे आढळते. जगातील विविध प्राचीन सभ्यतांचा (उदा. सिंधु संस्कृती, इजिप्तची संस्कृती, रोमन व ग्रीक संस्कृती इ.) उदय व विकास हा नगरातच झालेला होता. आधुनिक काळात तर मानवाच्या सभ्यतेच्या व संस्कृतीच्या विकासात नगरांचेच मोठे योगदान असल्याचे आढळते. नवी मूल्ये, नवे

विचार, नव्या कल्पना, नवीन शोध, इत्यादींचा उदय हा नगरांमध्येच होतो व तेथूनच या गोष्टींचे संक्रमण खेड्यांमध्ये होते. त्यामुळे आधुनिक नगरे ही मानवी सभ्यतेची व संस्कृतीची खरीखुरी केंद्रे बनली आहेत. मानवाने नगरे वसविली असली तरी नगरांनीच मानवास सभ्य किंवा सुसंस्कृत मानव (Civilized man) बनविली आहे. थोडक्यात मानवी सभ्यतेचा इतिहास म्हणजे नगरांचा इतिहास असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. म्हणून मानवी सभ्यता व संस्कृती समजावून घ्यावयाची झाल्यास आपणास नगरांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. नागर समाजशास्त्र हे नगरांचा व तेथील लोकांच्या जीवनाचा सर्वांगिण व पद्धतशीर अभ्यास करणे. म्हणून त्यास महत्त्व प्राप्त होते.

२. **निम्म्या जगाचे शास्त्र :** मानवाच्या सामूहिक जीवनाच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्रथम खेडी व नंतर नगरे उदयास आली. प्रदीर्घ काळापर्यंत म्हणजेच औद्योगिक क्रांती होईतोपर्यंत जगातील बहुसंख्यांक लोक हे खेड्यांतच राहात होते. त्यामुळे नगरांपेक्षा खेड्यांनाच अधिक महत्त्व होते. औद्योगिक क्रांतीनंतर हे चित्र पालटले. नगरे ही उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य सुविधा, प्रशासन, दळणवळण, मनोरंजन इत्यादींचे केंद्रे बनली. परिणामी खेड्यातील लोक नगरांकडे स्थलांतर करू लागले. त्यामुळे पूर्वीच्या नगरांचा विस्तार होऊ लागला. कांही नवी नगरे ही उदयास येऊ लागली. यातूनच नगरात राहणाऱ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत चालली आहे. आज जगातील एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ निम्मी लोकसंख्या ही नगरात वास्तव्य करते. त्यामुळे नगरांचा व तेथील लोकांच्या जीवनाचा अभ्यास करणारे नागर समाजशास्त्र हे जगातील निम्म्या लोकांचे शास्त्र ठरते. म्हणून ते महत्त्वाचे ठरते.

३. **नगरांचे यथार्थ आकलन :** नागर समाजशास्त्र हे नगरांचा व तेथील लोकांच्या परस्परसंबंधांचा, त्यांच्या जीवनपद्धतीचा व सामाजिक संस्थांचा व संघटनांचा तसेच नागरी समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करते. त्यामुळे आपणास नगरांचे म्हणजेच नागर समाजाचे समग्र व यथार्थ ज्ञान मिळते. परिणामी नगरातील लोकांविषयीचे व जीवनाविषयीचे आपले पूर्वग्रह, गैरसमजूती, काल्पनिक मते इत्यादी दूर होण्यास मदत होते. थोडक्यात नागर समाजशास्त्र हे नागरी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादी सर्व अंगाविषयीचे समग्र व वैज्ञानिक ज्ञान पुरवित असल्याने ते महत्त्वाचे ठरते.

४. **सामाजिक समायोजनासाठी उपयुक्त :** आधुनिक काळात दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे खेड्यांचा व नगरांचा परस्परांशी घनिष्ठ संपर्क येत आहे. हे दोन्ही विभाग आपापल्या गरजापूर्तीसाठी एकमेकांवर अवलंबून आहेत. नगर हे खेड्यावर अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फळे, कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल इत्यादीसाठी अवलंबून आहे. तर खेडे हे नगरावर रोजगार, शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य सुविधा, चैनीच्या वस्तू व कारखान्यातून तयार होणारा पक्का माल इत्यादीसाठी अवलंबून आहे. त्यामुळे खेडे व नगर ही परस्परावलंबी बनली आहेत. आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण जग हेच एक जणू गाव बनले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या जीवनपद्धीचे लोक एकत्र येणे अपरिहार्य बनले आहे. अशा परिस्थितीत खेड्यातील व नगरातील लोकांना परस्परांच्या जीवनपद्धतीचे ज्ञान असणे आवश्यक ठरते. अन्यथा सामाजिक असमायोजनाची समस्या निर्माण होऊ शकते. म्हणून नागर समाजशास्त्र हे केवळ नगरातीलच नव्हे तर खेड्यातील लोकांच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरते. या संदर्भात लॉरी नेल्सन म्हणतात की ग्रामीण किंवा शहरी

व्यक्तीस आपला समाज सोडून इतर समाज कोणत्या परिस्थितीत राहतो हे माहित नसेल तर ती व्यक्ती पुरेशी सुशिक्षित आहे असे म्हणता येणार नाही. नागर समाजशास्त्रामुळे आपणास ग्रामीण व नागर समाजातील साम्यभेदांचे व परस्परसंबंधाचे ज्ञान होते. आणि हे ज्ञान असलेल्या व्यक्तीस कोणत्याही समाजाशी समायोजन साधणे सुलभ जाते. थोडक्यात आजच्या बदलत्या परिस्थितीत नागर समाजशास्त्राचे ज्ञान सामाजिक समायोजनाच्यादृष्टीने उपयुक्त ठरते.

**५. नागरी समस्यांची सोडवणूक :** नागरी समस्यांची सोडवणूक करण्यासाठी नागर समाजशास्त्राचे ज्ञान उपयुक्त ठरते. नागर समाजशास्त्र हे नागरी जीवनातील दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी, भिक्षावृत्ती, वेश्याव्यवसाय, एड्स, प्रदूषण इत्यादी समस्यांचा शास्त्रीयदृष्टीने अभ्यास करते. या समस्यांची कारणे शोधून काढून त्यांच्या निर्मूलनाचे उपायही हे शास्त्र सूचविते. त्यामुळे नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी किमान त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी हे शास्त्र उपयोगी पडते. नगरातील विविध समस्यांविषयी लोकमत जागृत करणे, त्या समस्यांविरुद्ध लोकमत संघटीत करणे व त्या समस्येच्या निर्मूलनासाठी आखलेली उपाययोजना यशस्वी करणे इत्यादी कार्ये नागर समाजशास्त्रीय संशोधनाच्या आधारे पार पाडता येतात. उदा. शहरी लोकांना गलिच्छ वस्त्यांचे (झोपडपट्टीचे) आरोग्यावर व नैतिक जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांची जाणिव करून देऊन गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम यशस्वी करता येतो. उद्योगधंदे, वाहतूक साधने, नागरी कचरा इत्यादीमुळे नागरी पर्यावरणाचे होणारे प्रदूषण कसे घातक आहे हे पटवून देऊन पर्यावरणाच्या संरक्षणाचे व संवर्धनाचे कार्यक्रम यशस्वी करता येतात.

**६. नगर नियोजनाच्यादृष्टीनेही उपयुक्त :** नागर समाजशास्त्र हे नगर नियोजनाच्यादृष्टीने उपयुक्त ठरत असल्याने त्यास महत्त्व आहे. आज औद्योगिकीकरण व नागरीकरण या दोन प्रक्रियांची गती वाढत चालली आहे. या वाढीस व्यवस्थित रूप देण्यासाठी नियोजनाची गरज भासते. नागर समाजशास्त्र हे नगर नियोजनाचे स्वरूप, तत्त्वे, अंमलबजावणी तसेच नगर नियोजनाच्या मार्गातील अडथळे, नगर नियोजनाचे विविध प्रकार इत्यादींचा सविस्तर ऊहापोह करते. नगर नियोजन कोणत्याही प्रकारचे असो त्यासाठी अगोदर नगराच्या रचनेचे सविस्तर अध्ययन उपलब्ध असेल तरच ते नगर नियोजन यशस्वी होऊ शकते. नागर समाजशास्त्र हे नगररचनेचे यथार्थ व संपूर्ण ज्ञान उपलब्ध करून देते त्यामुळे नगर नियोजनाच्यादृष्टीने हे शास्त्र उपयुक्त ठरते.

**७. नगर विकासासाठी उपयुक्त :** नागर समाजशास्त्र हे नगर विकासाच्यादृष्टीनेही उपयुक्त ठरते. नगर नियोजनाचा मूळ उद्देश हा नगर विकास घडवून आणणे हा असतो. आज जगातील सर्वच नगरे ही विविध समस्यांनी ग्रासलेली आहेत. या समस्यांची सोडवणूक करून नगरांचा विकास करण्यासाठी विविध कार्यक्रम व योजना आखल्या व राबविल्या जात आहेत. तथापि नगरांचे व तेथील समस्यांचे शास्त्रीय ज्ञान नसलेल्या लोकांनी जर ह्या कार्यक्रमांची व योजनांची आखणी व अंमलबजावणी केली तर मात्र नगर विकास होणे असंभव आहे. नागर समाजशास्त्र हे नागरी जीवन व समस्यांचे शास्त्रशुद्ध ज्ञान उपलब्ध करून देते. त्यामुळे अशा ज्ञानाच्या आधारे आखलेले व राबविलेले नगर विकासाचे कार्यक्रम हमखासपणे यशस्वी ठरू शकतात. म्हणून नागर समाजशास्त्र हे महत्त्वाचे ठरते.

अशाप्रकारे विविध दृष्टिकोनातून नागर समाजशास्त्रास महत्त्व आहे. आज नगरांची संख्या व नागरीकरणाची गती वाढत आहे. नागरी जीवन पद्धतीचा प्रभाव खेड्यातील लोकांवरही वाढत आहे. त्यामुळे नगरे, नागरीकरण व नागरी जीवनपद्धती यांचा अभ्यास करणाऱ्या नागर समाजशास्त्राचे महत्त्वही वाढत चालले आहे.

## १.४ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अखिल मानव समाजाचे कोणते दोन प्रकार आहेत?

२. नागर समाजशास्त्राची कोणतीही एक व्याख्या द्या.

३. नागर समाजशास्त्रास तथ्यात्मक शास्त्र का मानले जाते?

४. नागर समाजशास्त्रातील निष्कर्षांच्या साह्याने केलेले पूर्वकथन नेहमी अचूक ठरेलच असे का म्हणता येत नाही?

५. नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी नागर समाजशास्त्राचे ज्ञान कसे उपयुक्त ठरते?

## १.५ सारांश (Let us Sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय, स्वरूप आणि महत्त्व इत्यादी बाबी अभ्यासलेल्या आहेत. नागर समाजाचा म्हणजेच नागरी सामाजिक संबंधाचा व या संबंधातून उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्राच्या शाखेस नागर समाजशास्त्र असे म्हणतात. नागर समाजशास्त्रात नागर समुदाय, नागरी जीवन पद्धती, नागरी सामाजिक संघटन, नागरी सामाजिक प्रक्रिया, नागर समाजातील आर्थिक, राजकीय व धार्मिक जीवन, नागरीकरणाची प्रक्रिया, नगर नियोजन व नागर समाजातील परिवर्तन इत्यादी बाबींचा सविस्तर व पद्धतशीर अभ्यास केला जातो. नागर समाजशास्त्राचे स्वरूप समजावून घेण्यासाठी तुम्ही पुढील मुद्दे अभ्यासलेले आहेत. १) नागर समाजशास्त्र हे एक विज्ञान आहे. २) ते अनुभवाधिष्ठीत विज्ञान आहे. ३) ते तथ्यात्मक विज्ञान आहे. ४) त्याच्याकडे पूर्वकथन क्षमता आहे. ५) ते समाजशास्त्राची एक शाखा आहे. आधुनिक काळात नागर समाजशास्त्रास खूपच महत्त्व प्राप्त झालेले आहे. कारण नागर समाज हा मानवी सभ्यतेचे व संस्कृतीचे केंद्र आहे. हे शास्त्र नागर समाजाविषयी वस्तुनिष्ठ वा वैज्ञानिक माहिती पुरविते. या शास्त्रातील ज्ञानाच्या आधारे अनेक सामाजिक समस्यांची सोडवणूक करता येते. तसेच नगर नियोजन, नगर विकास व नगरांची पुनर्रचना इत्यादीसाठी ही या शास्त्रातील ज्ञान उपयोगी पडते. म्हणून नागर समाजशास्त्राच्या अभ्यासास महत्त्व प्राप्त झाले आहे.

## १.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

१. अखिल मानव समाजाचे ग्रामीण समाज व नागर समाज असे दोन प्रकार पडतात.

२. नागर समाजाचा म्हणजेच नागरी सामाजिक संबंधांचा आणि त्या संबंधातून उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारी समाजशास्त्राची एक शाखा म्हणजे नागर समाजशास्त्र होय.

३. नागर समाजशास्त्र हे शहरी लोकांच्या वर्तनात योग्य-अयोग्य किंवा चांगले-वाईट असा भेद न करता त्यांचे वर्तन जसे आहे अशा स्वरूपात अभ्यासते म्हणून ते तथ्यात्मक शास्त्र मानले जाते.

४. नागर समाजशास्त्राचे निष्कर्ष हे तितकेसे निश्चित व काटेकोर नसल्याने त्यांच्या साह्याने केलेले पूर्वकथन हे नेहमीच अचूक ठरेलच असे म्हणता येत नाही.

५. नागर समाजशास्त्र हे नागरी समस्यांची कारणे व उपाययोजना यासंबंधीचे शास्त्रीय ज्ञान देत असल्याने ते ज्ञान नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी उपयुक्त ठरते.

## १.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नागर समाजशास्त्राची व्याख्या देऊन त्याचा अभ्यास विषय स्पष्ट करा.

२. नागर समाजशास्त्राची व्याख्या देऊन त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नागर समाजशास्त्राचे महत्त्व

२. नागर समाजशास्त्राचे स्वरूप

## १.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

ग्रामीण समाजशास्त्र व नागर समाजशास्त्र या दोन शाखांची तुलना करा आणि त्यांच्यातील साम्यभेदांची नोंद करा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. Urban Sociology - E. E. Bergel.

२. Urban Sociology - Anderson Nels and Ishwaran K.

३. नगरीय समाजशास्त्र - शशी के जैन - रिचर्स पब्लिकेशन्स जयपूर, १९९६.

४. नगरीय समाजशास्त्र - शारदा तिवारी, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००४.

❑❑❑

# घटक : २

# नागरीकरणाची प्रक्रिया

## (Process of Urbanization)

**घटक संरचना**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

  २.३.१ नागरीकरणाची व्याख्या आणि स्वरूप

  २.३.२ नागरीकरणाची कारणे

  २.३.३ नागरीकरणाचे परिणाम

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ स्वाध्याय/गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ प्रस्तावना (Introduction)

या चौथ्या अध्ययन घटकात तुम्ही नागरीकरण या संकल्पनेचा सविस्तर अभ्यास करणार आहात. नागरीकरण ही नागर समाजशास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. स्थुलमानाने ग्रामीण लोकसंख्येचे शहर व नगरांकडे होणारे स्थलांतर म्हणजे नागरीकरण असे म्हणता येते. नागरीकरण ही एक आधुनिक प्रक्रिया आहे. औद्योगिक क्रांतीनंतर ही प्रक्रिया सुरू झाली. अनेक पाश्चात्त्य समाजात वेगाने नागरीकरण घडून आले आहे. कांही समाजात तर नागरीकरणाने अंतिम सीमा गाठलेली आहे. पौर्वात्य समाजात मात्र तुलनेने नागरीकरणाची गती अद्याप बरीच मंद आहे. तथापि नागरीकरणाचे दूरगामी परिणाम मात्र स्पष्टपणे सर्वत्रच जाणवू लागले आहेत. त्यामुळे नागर समाजशास्त्रात नागरीकरणाची प्रक्रिया अभ्यासली जाते. तुम्ही या घटकात ह्या प्रक्रियेचे स्वरूप समजावून घेणार आहात.

## २.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास

- नागरीकरणाची व्याख्या व स्वरूप स्पष्ट करता येईल.
- नागरीकरणाची कारणे सांगता येतील.
- नागरीकरणाचे समाजावर झालेले परिणाम समजावून घेता येतील.

## २.३ विषय–विवेचन (Presentation of Subject matter)

नागरीकरणाची प्रक्रिया समजावून घेण्याच्यादृष्टीने आपण या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या घटकात नागरीकरणाची व्याख्या व स्वरूप यांचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या घटकात नागरीकरणास जबाबदार असणाऱ्या कारणांचे किंवा घटकांचे विवेचन केलेले आहे. तर तिसऱ्या घटकात नागरीकरणामुळे समाजावर झालेल्या परिणामांची चर्चा केलेली आहे.

### २.३.१ नागरीकरणाची व्याख्या आणि स्वरूप (Definition and Nature of Urbanization)

नागरीकरणाचा अर्थ समजण्यासाठी आपण प्रथम कांही मान्यवर अभ्यासकांनी नागरीकरणाच्या दिलेल्या व्याख्या अभ्यासणार आहोत.

१. नागरी पर्यावरणाने प्रभावित होऊन सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः खेड्यांतील लोकांनी नगरांकडे स्थलांतर करणे आणि नगरातील बिगरशेती व्यवसाय, मूल्ये आणि जीवनशैली यांचा स्वीकार करण्याच्या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात – **प्रा. चंद्रकांत खंडागळे**

२. ग्रामीण समुदायाचे नागर समुदायात रूपांतर होण्याच्या प्रक्रियेस नागरीकरण म्हणतात – **ई. ई. बर्गेल**

३. कृषी व्यवसायाशी संबंधित असलेल्या लहान समुदायातील लोकसंख्या जेव्हा प्रामुख्याने उद्योग, व्यापार, शासकीय व्यवहार चालत असलेल्या मोठ्या समुदायाकडे स्थलांतरीत होत असेल तर त्या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात – **डब्लु. एस. थॉम्पसन**

४. नागरीकरण ही नगरांच्या वाढीशी संबंधित असणारी प्रक्रिया असून तिचे दोन पैलू आहेत. १) लोक ग्रामीण भागातून नागरी भागाकडे स्थलांतर करतात. २) कृषीविषयक कामे सोडून बिगरकृषी पद्धतीची कामे स्वीकारतात. – **नेल्स एण्डर्सन**

५. नागरीकरण ही ग्रामीण भागाकडून नागरी भागाकडे लोकसंख्येचे होणारे स्थलांतर आहे. आणि त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातल्यापेक्षा नागरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढते. नागरीकरण म्हणजे नागरी वर्तन प्रतिमानांचा व विचार प्रकारांचा प्रसार होणे होय. – **विल्यम स्कॉट**

**नागरीकरणाचे स्वरूप**

वरील व्याख्यांच्या आधारे नागरीकरणाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

**१. स्थलांतर – प्रक्रिया :** नागरीकरण ही लोकसंख्येच्या स्थलांतराची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः लहान आकाराच्या समुदायातील किंवा खेड्यातील लोक तुलनेने मोठ्या आकाराच्या समुदायाकडे किंवा नगराकडे अथवा औद्योगिक केंद्राकडे स्थलांतर करतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या (U.N.O.) एका अहवालानुसार नागरीकरणाच्या प्रक्रियेद्वारे लोकसंख्या एका निश्चित निर्धारित आकाराच्या समूहाकडून मोठ्या आकाराच्या समूहामध्ये एकत्रित होत असते.

**२. आधुनिक प्रक्रिया :** नागरीकरण ही आधुनिक काळातील प्रक्रिया आहे. मानव समाजात प्राचीन काळापासून शहरे (Towns) व नगरे (Cities) अस्तित्वात आहेत. नगरे मानवी संस्कृतीइतकीच प्राचीन आहेत. पण प्राचीन काळात नागरीकरणाची प्रक्रिया प्रचलित नव्हती. खेड्यातील लोक शहराकडे वा नगराकडे मोठ्या प्रमाणावर स्थायी स्वरूपाचे सहसा स्थलांतर करीत नसत. ही प्रक्रिया आधुनिक काळात सुरू झाली. औद्योगिक क्रांतीनंतर प्रथम इंग्लंड व त्यानंतर इतर युरोपियन राष्ट्रात आणि त्यानंतर ती इतर पाश्चात्य राष्ट्रात या प्रक्रियेची सुरुवात झाली आणि त्यानंतर तिचे लोण पौर्वात्य राष्ट्रातही पोहचले. आज सर्वच राष्ट्रात नागरीकरण ही अनिवार्य प्रक्रिया मानली जाते.

**३. सामाजिक प्रक्रिया :** नागरीकरण ही केवळ एका भौगोलिक स्थानाकडून दुसऱ्या भौगोलिक स्थानाकडे स्थलांतरणाची म्हणजेच भौगोलिक गतिशीलतेची प्रक्रिया नाही तर ती एक सामाजिक प्रक्रियासुद्धा आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या आपणास असे म्हणता येईल की नागरीकरण ही नागरी जीवनपद्धतीच्या वैशिष्ट्यात वाढ होण्याची प्रक्रिया आहे. अशा वैशिष्ट्यांनी युक्त असलेली मनोवृत्ती लोकांमध्ये विकसित होणे नागरीकरणात अभिप्रेत आहे. ग्रामीण लोकांनी नगराकडे स्थलांतर करणे व बिगरकृषी व्यवसाय स्वीकारणे एवढेच नागरीकरणासाठी पुरेसे नाही तर त्यांच्या आचार विचार, मूल्ये, राहणीमान, जीवनशैली इत्यादी गोष्टींतही नागरी पर्यावरणाच्या अनुषंगाने परिवर्तन घडून आले पाहिजे. याच अर्थाने **विल्यम स्कॉट** हे नागरीकरणास ''नागरी वर्तन प्रतिमानांचा (Patterns of behaviour) आणि विचार पद्धतींचा (mods of thought) प्रसार होणे.'' असे मानतात. यासंदर्भात **पॉल मीडीज** आणि **मिझरूची** म्हणतात की ''नागरीकरण या संज्ञेद्वारे अशा प्रक्रियेचा बोध होतो की जिच्यामुळे अ) नागरी मूल्यांचा विस्तार होतो. ब) खेड्यांकडून लोक नगराकडे येतात. क) व्यवहार प्रतिमाने बदलता आणि त्यांच्या तादात्मीकरणाचा समन्वय नगरात राहणाऱ्या समूहांशी साधला जातो. त्यामुळे नागरीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया ठरते.

**४. नगरवादाहून वेगळी :** बऱ्याच वेळा नागरीकरणाच्या प्रक्रियेचा संबंध नगरवादाशी (urbanism) जोडल्याचे आढळते. तपापि नागरीकरण ही नगरवादाहून भिन्न किंवा वेगळी अशी गोष्ट आहे. **लुईस वर्थ** यांनी नागरीकरणास एक प्रक्रिया (Process) मानले आहे तर नगरवादास एक स्थिती (Situation) मानले आहे. **एस. बी. क्विन आणि डी. बी. कारपेंटर** यांनी आपल्या The American City या ग्रंथात असे नमूद केले आहे की, ''नगरास निवास करण्याच्या स्थितीशी तादात्म्य प्रस्तापित करणे म्हणजे नगरवाद होय आणि नागरी निवासाच्या जीवनपद्धतीशी तादात्म्यीकरण प्रस्थापित करण्यास नागरीकरण असे म्हणतात.'' नगरवाद ही नगरात राहणाऱ्या लोकांचा जीवन जगण्याचा मार्ग किंवा शैली आहे. नागरीकरणाची प्रक्रिया ह्या जीवनशैलीस समृद्ध करते. ज्या लोकांना ह्या जीवनशैलीचा परिचय नाही त्यांच्यापर्यंत ही जीवनशैली पोहचविण्याचे कार्य

नागरीकरणाची प्रक्रिया करते. थोडक्यात नागरीकरण ही नगरवादाचा प्रसार व विस्तार करणारी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल.

५. **औद्योगिकीकरणाशी संबंधीत :** नागरीकरणाची प्रक्रिया ही औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेशी घनिष्ठपणे संबंधित आहे. औद्योगिकीकरणापाठोपाठ नागरीकरण सुरू होते असे मानले जाते. कांही विद्वानांच्या मते या दोन्ही प्रक्रिया नेहमी हातात हात घालून वाटचाल करीत असतात. नागरीकरण हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू असलेल्या समाजात नागरीकरणाची प्रक्रिया चालू असते. आर्थिक विकास साधू इच्छिणाऱ्या समाजात औद्योगिकीकरणावर भर दिला जातो. औद्योगिकीकरणामुळे नवीन उद्योगकेंद्रे अस्तित्वात येतात तर जुन्या उद्योगकेंद्राचा विकास साधण्यावर भर दिला जातो. अशा उद्योगकेंद्रात नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. परिणामी अशा केंद्राकडे सभोवतालच्या प्रदेशातून लोक नोकरी, धंदा, व्यापार, शिक्षण-प्रशिक्षण इत्यादीच्या निमित्ताने खेचले जातात. त्यातूनच नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होते.

६. **नागरीकरणाच्या पूर्वावश्यकता :** नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होण्यासाठी अगोदर कांही गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक असते. ग्रामीण भागातून नगराकडे लोकांचे स्थलांतर होण्यासाठी वाहतुकीच्या (मोटार, रेल्वे, जहाज, विमान इ.) आणि संदेशवहनाच्या (टपाल, तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ इ.) प्रगत साधनांचे जाळे उभारलेले असले पाहिजे. तसेच त्यांचा वरचेवर विकास घडवून आणला पाहिजे. तसेच नगरात जमीन, पाणी, निवाऱ्याची साधने, वस्तूंच्या देवघेवीची व्यवस्था, इत्यादी बाबींचीही उपलब्धता असली पाहिजे. कांही विद्वानांच्या मते नागरीकरणासाठी विशिष्ट मनोवृत्ती किंवा दृष्टिकोनही निर्माण झालेला असावा लागतो.

७. **नागरीकरणाच्या अवस्था :** नागरीकरणाच्या प्रक्रियेची गती ही औद्योगिकीकरणाच्या गतीवर अवलंबून असते. त्यामुळे औद्योगिकीकरणाच्या विकासाच्या अवस्थांनुसार नागरीकरणाच्याही विविध अवस्थांमधून विकास होत जातो. त्यालाच नागरीकरणाच्या अवस्था (phases of urbanization) असे म्हणतात. त्या अवस्था पुढीलप्रमाणे आहेत -

**अ) पहिली अवस्था :** पहिल्या अवस्थेत नागरीकरणाची सुरुवात प्रथमतः मंद गतीने होते. या अवस्थेत एखाद्या समाजात औद्योगिकीकरणाला नुकतीच सुरुवात झालेली असते. त्यामुळे त्यावर आधारलेल्या नागरीकरणासही फारसा वेग आलेला नसतो. प्रक्रियेचा प्रारंभ मात्र निश्चित रूपाने झालेला असतो. दुसऱ्या अवस्थेला आवश्यक असणारी पोषक परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य पहिल्या अवस्थेकडून केले जाते. नागरीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा उदाहरणार्थ जमीन, निवारा साहित्य, पाणीपुरवठा, सामूहिक जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक-सामाजिक यंत्रणा (मालमत्ता, श्रम, सेवा व वस्तुंची देवघेव व्यवस्था इ.) संरक्षण व्यवस्था, प्रशासन, आणि नवीन मनोवृत्ती किंवा दृष्टिकोन इत्यादी बाबी या पहिल्या अवस्थेत उपलब्ध झालेल्या असतात.

**ब) दुसरी अवस्था :** या अवस्थेत औद्योगिकीकरणाचा वेग बराच वाढलेला असतो. अनेक औद्योगिक नगरे अस्तित्वात येतात. जुन्या औद्योगिक नगरांत स्थलांतरीत लोकांचे प्रमाण खूपच वाढलेले असते. त्यामुळे त्यांचे नुतनीकरण होते. अशा नगरांतून नागरी समस्यांची सुरुवातही झालेली असते. औद्योगिकीकरणाची गती वाढल्याने त्यावर अवलंबून असलेल्या नागरीकरणाचीही गती वाढते.

**क) तिसरी अवस्था :** या अवस्थेत नागरीकरणाची कमाल अवस्था गाठली जाते. कारण औद्योगिकीकरणाची प्रक्रिया पूर्ण होत आलेली असते. औद्योगिक विकास पूर्ण झालेला असतो. नागरीकरणाच्या बहुतेक सर्व समस्यांनी उग्र स्वरूप धारण केलेले असते. नागरीकरणासंबंधी निश्चित धोरण आखून उपाययोजना कराव्या लागतात.

**ड) चौथी अवस्था :** या अवस्थेत नागरीकरणाची गती कमी होते. औद्योगिकीकरण पूर्ण झाल्याने त्यावर अवलंबून असलेल्या नागरीकरणाची गती कमी होणे स्वाभाविकच असते. अशावेळी नागरीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असे मानले जाते. अशाप्रकारे वरील चार अवस्थेतून नागरीकरणाची प्रक्रिया विकसित होऊन पूर्णत्वाला पोहचते.

८. **सामाजिक परिवर्तनाचा घटक :** नागरीकरण सामाजिक परिवर्तनास जबाबदार असणारा एक महत्त्वाचा घटक आहे. नागरीकरणामुळे पारंपारिक सामाजिक संस्था, सामाजिक मूल्ये, सामाजिक जीवन पद्धती इत्यादीमध्ये लक्षणीय परिवर्तन घडून येते हे आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध झालेले आहे. संयुक्त कुटुंबाच्या जागी विभक्त कुटुंब अस्तित्वात येणे, धर्मसंस्थेचे महत्त्व कमी होणे. सामाजिक स्तरीकरणात बदल होणे, लोकांचे राहणीमान, सामाजिक संबंधी, मनोवृत्ती यांमध्ये बदल होणे, औपचारिक अशा शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणास महत्त्व येणे. नवनवीन समस्या निर्माण होणे अशाप्रकारची परिवर्तने घडून येण्यास नागरीकरणामुळे चालना मिळते.

### २.३.२ नागरीकरणाची कारणे (Causes of Urbanization)

नागरीकरणाची व्याख्या व स्वरूप अभ्यासल्यानंतर तुम्ही नागरीकरणास जबाबदार असणाऱ्या कारणांचा किंवा घटकांचा अभ्यास करणार आहात. ग्रामीण भागातून लोकांचे नगराकडे स्थलांतर होणे हा नागरीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे. ह्या स्थलांतरास ज्या घटकांमुळे चालना मिळते त्या घटकांना नागरीकरणाची कारणे असे म्हणता येते. नागरीकरणाची कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. **औद्योगिकीकरण :** औद्योगिकीकरण हे नागरीकरणाचे प्रमुख कारण मानले जाते. औद्योगिक क्रांतीनंतर मानव समाजात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. शास्त्रीय शोधावर आधारलेली यंत्रे व तंत्रे उदयास येऊन त्यांचा उत्पादन प्रक्रियेत वापर होऊ लागला. त्यातून कारखाना उत्पादन पद्धती उदयास आली. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी मोठमोठे कारखाने म्हणजेच उद्योगधंदे सुरू केले जाऊ लागले. उद्योगधंद्याचे केंद्रीकरण होऊ लागले. अशा भागात नोकरी, व्यापार, व्यवसाय करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातील लोक स्थलांतर करू लागले. यातूनच कांही नवीन शहरे उदयास आली तर जुन्या शहरांचा विस्तार व विकास होऊ लागला. अशाप्रकारे औद्योगिकीकरणामुळे नागरीकरणास चालना मिळाली. उदा. सुमारे ३०० वर्षापूर्वी कोळ्यांची वस्तीअसलेल्या मुंबई बेटाचे ब्रिटिश राजवटीत औद्योगिक केद्रात रूपांतर होत गेले व आज ते भारतातील प्रथम क्रमांकाचे नगर बनले आहे. इ.स. १९११ मध्ये एक लहान गाव असलेल्या जमशेटपूरमध्ये 'टिस्को' हा पोलाद कारखाना सुरू केल्यानंतर त्याचे नगरात रुपांतर झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर रशियाच्या सहकार्याने पोलादाचा कारखाना सुरू झाल्यानंतर 'भिलाई' हे नगर उदयास आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात औद्योगिकीकरणास चालना दिली व त्यातूनच भारतात

नागरीकरणाची गती वाढली. अशाप्रकारे औद्योगिकीकरण हा नागरीकरणास जबाबदार ठरणारा मूलभूत घटक आहे.

२. **दळणवळणाची साधने :** दळणवळणाची प्रगत साधने हे नागरीकरणाचे दुसरे कारण आहे. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत कच्चा व पक्का माल तसेच मनुष्यबळ यांची वाहतूक करण्यासाठी व संदेश त्वरित पाठविण्यासाठी दळणवळणाच्या प्रगत साधनांची गरज भासते. यातूनच मोटार, ट्रक, रेल्वे, जहाज, विमान अशी वाहतुकीची साधने आणि टपाल, तारायंत्र, दूरध्वनी, वायरलेस, फॅक्स अशी सदेशवहनाची साधने उदयास आली. जमीन, पाणी व आकाश ह्या तीन मार्गावर दळणवळण साधनांचे जाळे विणले गेले. परिणामी लोकांना ग्रामीण भागातून नगरांकडे स्थलांतर करणे सुलभ झाले. जी गावे, शहरे/नगरे व औद्योगिक केंद्र दळणवळणाच्या प्रगत साधनांनी जोडली गेली त्यांच्याकडे सभोवतालच्या प्रदेशातील लोकसंख्येचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होऊन नागरीकरणास चालना मिळाली आहे.

३. **व्यापार आणि व्यवसाय :** एखादा व्यवसाय किंवा व्यापार करून पैसा कमावण्याच्या हेतुने एखाद्या मध्यवर्ती नगराकडे ग्रामीण लोक, दुसऱ्या नगरातील लोक, एवढेच नव्हे तर परदेशातील लोकही धाव घेतात. म्हणजेच एखाद्या शहरास वा नगरास व्यापाराच्यादृष्टीने महत्त्व प्राप्त झाल्यास त्याकडे स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढत जावे व नागरीकरणास चालना मिळते. भारतात कानपूर व अहमदाबाद यांचा याच कारणामुळे विस्तार घडून आलेला आहे.

४. **शिक्षण :** एखाद्या नगरात, शहरात किंवा गावात एक किंवा अधिक शैक्षणिक संस्था सुरू होतात. त्यामुळे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची व त्यांना हव्या असणाऱ्या सोयीसुविधा पुरविणाऱ्या लोकांची त्या नगरात, शहरात किंवा गावात गर्दी होऊ लागते व त्यातून नागरीकरणास गती मिळते. इ.स. १८५७ साली मुंबई, कलकत्ता, मद्रास (चेन्नई) येथे विद्यापीठे सुरू झाली. पुढे या नगरांतून व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणसंस्थांची संख्या वाढत गेली. त्यामुळे या नगरांकडे शिक्षणप्रेमी मंडळींनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले. विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहराच्या वाढीमध्ये शिक्षण ह्या घटकाचा मोठा वाटा आहे. शैक्षणिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त होऊन एखादे नवीन शहर वा नगर अस्तित्वात येण्याची शक्यतासुद्धा नाकारता येत नाही.

५. **राजकीय घटक :** एखाद्या शहरास वा नगरास राजधानीचा दर्जा मिळाल्यानंतर त्याची झपाट्याने वाढ होते. असे शहर राजकीय, प्रशासकीय कार्यांचे प्रमुख केंद्र बनते. लष्करीदृष्ट्याही त्याचे महत्त्व वाढते. परिणामी सभोवतालच्या भागातील लोक अशा शहराकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करू लागतात व नागरीकरणास चालना मिळते. भारतातील दिल्ली, भोपाळ, हैद्राबाद इत्यादींची वाढ होण्यात त्यांचा राजधानी म्हणून असलेला दर्जा मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. राजधानी किंवा प्रशासकीय केंद्र म्हणून एखादे नवीन शहरसुद्धा अस्तित्वात येऊ शकते. उदा. पंजाब व हरियाणा राज्याची राजधानी असलेले चंदीगढ. महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचे ठिकाण म्हणून 'ओरस' हे शहर वसविण्यात आले. परिणामी सभोवतालच्या भागातील लोक या शहराकडे स्थलांतरीत होऊ लागले आहेत.

६. **धार्मिक क्षेत्र :** धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेल्या क्षेत्राकडे लोक मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करतात. परिणामी त्या क्षेत्राचे नगरात रुपांतर होते. भारतात ही गोष्ट विशेषत्वाने दिसून येते.

वाराणशी, गया, मथुरा, अलाहाबाद इत्यादी धार्मिक क्षेत्रे आज मोठी नगरे बनलेली आहेत. सुमारे ५० वर्षापूर्वी एक छोटेसे खेडे असलेले शिर्डी हे गाव (जि. अहमदनगर) त्याचे धार्मिक महत्त्व वाढल्याने शहरात रुपांतरीत झाले आहे.

७. **पर्यटन केंद्र :** एखादे थंड हवेचे ठिकाण, निसर्गरम्य ठिकाण, एखाद्या महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यामुळे प्रसिद्ध पावलेले ठिकाण इत्यादीकडे हौसी पर्यटक मंडळी खेचली जाते. त्यांना आवश्यक असलेल्या सायीसुविधा पुरविणारे व्यापारी, विक्रेते त्याठिकाणी येऊन दुकाने, हॉटेल, खानावण, लॉज अशी केंद्रे सुरू करतात. पुढे त्या ठिकाणाचा पर्यटन केद्र म्हणून विकास होत जातो व त्याचे नगरात रुपांतर होते. उदा. मसूरी, उटी.

८. **लोकसंख्या वाढ :** अलिकडील काळात जागतिक लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यास खेड्यासारखे लहान समुदाय असमर्थ ठरत आहे. शिवाय वाढती लोकसंख्या खेड्यातील शेती व्यवसायात सामावली जाऊ शकत नाही. परिणामी खेड्यातील लोक रोजगार व अन्य सोयीसुविधा मिळविण्यासाठी जवळपासच्या नगरांकडे स्थलांतर करीत आहेत. यातूनच नागरीकरणास वेग आलेला आहे.

९. **नागरी जीवनाचे आकर्षण :** आधुनिक काळात शहरे व नगरे ही उत्पादन, वितरण, शिक्षण, मनोरंजन, संरक्षण, प्रशासन, राजकारण इत्यादीची केंद्रे बनली आहेत. त्यामुळे शहरात कारखाने, दुकाने, बाजारपेठा, बँका, हॉटेल, लॉज, शाळा, चित्रपट व नाट्यगृहे, क्लब, दवाखाने, बागा, क्रीडांगणे, व्यायामशाळा अशा विविध सोयीसुविधा उपलब्ध असतात. परिणामी नागरी जीवन हे आकर्षक, चैनीचे व चकचकीत बनलेले असते. त्यामुळे नागरी जीवनाचे आकर्षण निर्माण होऊन ग्रामीण लोक नगरात/शहरात वास्तव्यासाठी येऊ लागले आहेत. परिणामी नागरीकरणास चालना मिळाली आहे.

### २.३.३ नागरीकरणाचे परिणाम (Consequences of Urbanization)

नागरीकरण ही सामाजिक परिवर्तनाची एक प्रक्रिया असून तिचे सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रावर परिणाम घडून आलेले आहेत.

**१) सामाजिक विजातियता व सामाजिक सहिष्णुता यामध्ये वाढ** : नागरीकरणामुळे नागर समुदायात सामाजिक विजातियता व सामाजिक सहिष्णूता वाढली आहे. नागरीकरणाच्या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील विविध वंशाचे, वर्गाचे, धर्माचे, जातीचे, भाषेचे, व्यवसायाचे लोक एकाच समुदायात एकवटले जातात. त्यांचे आचारविचार, रूढीपरंपरा, श्रद्धामूल्ये, खाणेपिणे, जीवनविषयक दृष्टिकोन व जीवनशैली इत्यादींमध्ये मोठी विविधता असते. त्यामुळे अशा समुदायात मोठी सामाजिक विजातियता मिर्नाण होत आहे. तथापि अशा समुदायातील लोकांना आपले हितसंबंध साध्य करण्यासाठी परस्परांच्या जीवनपद्धतीविषयी सहिष्णुता दाखविणे भाग पडते. इतरांचे कांही वर्तनप्रकार व मूल्ये पटत नसली तरी त्याबद्दल सामंजस्याचे धोरण ठेवून वागावे लागते. त्यांच्याशी सहकार्य करावे लागते. अशाप्रकारे नागरीकरणामुळे सामाजिक सहिष्णुतेच्या वृत्तीतही वाढ होत आहे.

**२) विवाहसंस्थेवरील परिणाम :** नागरीकरणामुळे विवाहाची वयोमर्यादा वाढली आहे. उच्चशिक्षण घेणे, करिअर घडविणे, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे इत्यादी उद्देशाने नागरी समाजात

बालविवाहाऐवजी प्रौढ विवाहास प्राधान्य दिले जात आहे. तसेच उच्चशिक्षित व कमावत्या मुलामुलींना विवाहाचे जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य मिळू लागले आहे. नागर समाजात विभिन्न जाती धर्माच्या तरुणतरुणींना परस्परांशी घनिष्ठपणे मिसळण्याची संधी उपलब्ध होऊन त्यातून आंतरजातीय व आंतरधर्मिय विवाहास चालना मिळाली आहे. नागरी जीवनात व्यक्तिवाद व व्यक्ती स्वातंत्र्यास वाव मिळतो. त्यामुळे प्रेमविवाह, विधवा विवाह, नोंदणी विवाह यांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्याचबरोबर वैयक्तिक इच्छा आकांक्षा प्रभावी ठरू लागल्याने घटस्फोट घेण्याचे प्रमाणही नागरी जीवनात वाढत आहे. विवाह संबंध त्रासदायक ठरू लागल्यास पतीपत्नींनी घटस्फोट घेणे योग्य अशी विचारसरणी हळूहळू रूजत आहे. त्यामुळे विवाह हा 'संस्कार' न राहता एक 'करार' बनला आहे.

३) **कुटुंबसंस्थेवरील परिणाम :** नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन त्याजागी केंद्र कुटुंब स्थापन करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. नागर समुदायात राहत्या जागेच्या टंचाईमुळे पती पत्नी व मुले असे छोटे कुटुंब सोईचे ठरू लागले असून नागरी कुटुंबात इतर नातेवाईकांना आश्रय मिळेनासा झाला आहे. शहरी जीवनात एक किंवा दोन अपत्यांवर समाधान मानण्याची प्रवृत्ती वाढत आहे. संतती नियमनाच्या साधनांमुळे प्रजोत्पादन थांबवून कुटुंबाचा आकार लहान ठेवणे शक्य झाले आहे. नागरी कुटुंबात कुटुंबप्रमुख पुरुषाच्या अधिकाराचा ऱ्हास होत आहे. सुशिक्षित व कमावती पत्नी आणि तरुण मुलेमुली यांच्या सल्ल्याने कुटुंबप्रमुख पुरुषास कौटुंबिक व्यवहार पार पाडणे भाग पडत आहे. नागरीकरणामुळे व्यक्तिवाद व व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभाव वाढल्याने व्यक्ती कुटुंबाच्या हितापेक्षा स्वतःच्या हितास अधिक प्राधान्य देऊ लागली आहे. त्यामुळे व्यक्ती स्वहिताच्यापुढे इतर नातेवाईकांची फार चिंता करेनाशी झाली आहे. व्यक्तिवाद, स्त्रीचे कमावणे, घटस्फोटाची तरतूद, लहान आकार इत्यादीमुळे नागरी कुटुंब बरेचसे अस्थिर बनले आहे. एखाद्या मोठ्या आघाताने नागरी कुटुंब सहजपणे उध्वस्त होण्याची शक्यता वाढली आहे. महत्त्वाचे म्हणजे नागरीकरणामुळे कुटुंबाची अनेक पारंपारिक कार्ये इतर संस्था व समूहाकडे हस्तांतरीत झाली आहेत. नागरी जीवनात बालसंगोपनासाठी शिशूगृहे, बालवाड्या, अंगणवाड्या, शिक्षणासाठी, शाळा महाविद्यालये, मनोरंजनासाठी चित्रपटगृहे, नाट्यगृहे, क्रीडा मंडळे क्लब्ज, खाण्यापिण्यासाठी व राहण्यासाठी हॉटेल, खाणावळ लॉज, व्यक्तीच्या वर्तनाच्या नियंत्रणासाठी पोलीस, कायदा न्यायालय अशा विविध संस्था वा केंद्रे उदयास आल्याने कुटुंबाचे महत्त्व हळूहळू कमी होत चालले आहे. अशाप्रकारे नागरीकरणामुळे कुटुंबात रचनात्मक-कार्यात्मक परिवर्तन होत आहे.

४) **शिक्षणसंस्थेवरील परिणाम :** नागरीकरणामुळे शिक्षणप्रसार व शैक्षणिक जागृती घडून येण्यास चालना मिळाली आहे. नागरी जीवनात बालवाड्या, शाळा, हायस्कूल, महाविद्यालय, विद्यापीठ, रात्रशाळा, तंत्रशाळा, व्यवसायीक प्रशिक्षण संस्था, संशोधन केंद्रे इत्यादी शैक्षणिक संस्था मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. त्यामुळे शिक्षण घेणे, त्याआधारे नोकरी मिळविणे, करिअर घडविणे याबाबतची जाणीवजागृती लोकांमध्ये निर्माण झाली आहे. शिक्षणाद्वारे संपत्ती, सत्ता, रोजगार, प्रतिष्ठा मिळविता येते हे लोकांना उमजल्याने ते शिक्षण घेण्यासाठी धडपडू लागले आहेत. औद्योगिक-नागर समाजात आज वैज्ञानिक, तांत्रिक, व्यवस्थापकीय शिक्षणाचे महत्त्व वाढत चालले आहे. एकंदरीत नागरीकरणामुळे शिक्षणास प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

**५) धर्मसंस्थेवरील परिणाम :** नागरीकरणामुळे धर्माचा प्रभाव हळूहळू ओसरत चालला आहे. धर्मश्रद्धा, देवभोळ्या समजूती, दैववाद, अंधश्रद्धा, धार्मिक कर्मकांड, मंत्रतंत्र, जादुटोणा, बुवाबाजी, धार्मिक मूल्ये इत्यादीवरील नागरी लोकांचा विश्वास कमी झालेला आहे. नागरी जीवनात शास्त्रीय व तांत्रिक दृष्टिकोनाचा प्रभाव असल्याने धार्मिक बाबीकडे नागरी लोक चिकित्सकपणे पाहू लागले आहेत. कोणत्याही गोष्टीची योग्यायोग्यता ही धर्माआधारे ठरविण्याऐवजी बुद्धीप्रामाण्य व तर्कशुद्ध विचारसरणी या आधारे ठरविली जाऊ लागली आहे. तथापि पारंपारिक धार्मिक व नैतीक मूल्यांचा प्रभाव कमी होत आहे व त्यामुळे नागरी जीवनात अनैतिक कृत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे. परिणामी सामाजिक नियंत्रणाची समस्या बिकट झालेली आहे. एकंदरीत नागरीकरणामुळे धर्मनिरपेक्ष समाजाच्या निर्मितीस हातभार लागला आहे.

**६) सामाजिक स्तरीकरणावरील परिणाम :** नागरीकरणामुळे भारतासारख्या समाजातील जातिव्यवस्थेसारख्या बंदिस्त स्तरीकरणाच्या जागी वर्गव्यवस्थेसारखे मुक्त स्तरीकरण येऊ लागले आहे. नागर समाजात जातिव्यवस्थेचे अनेक पारंपारिक नियम हे नष्ट किंवा शिथील झाले आहेत. व्यक्तीचा दर्जा जन्माऐवजी म्हणजेच जातीऐवजी तिच्या अंगच्या गुणकर्तृत्वाधारे निश्चित होऊ लागला आहे. सत्ता, संपत्ती, शिक्षण घेऊन कनिष्ठ दर्जा असलेल्या व्यक्तीला उच्च दर्जा प्राप्त करणे शक्य होऊ लागले आहे. म्हणजे नागरीकरणामुळे उर्ध्वगामी गतिशीलतेस वाव मिळाला आहे. नागरी जीवनात जातीचाच व्यवसाय करणे व स्वजातीतील व्यक्तीशीच विवाह करणे हे निर्बंध देखील शिथील होत चालले आहेत. जातिव्यवस्था ही ईश्वरनिर्मित आहे ही विचारसरणी आता अमान्य केली जात आहे. नागरीकरणामुळे आर्थिक स्थितीवर आधारलेली उच्चवर्ग, मध्यवर्ग, कनिष्ठ वर्ग अशी वर्गव्यवस्था उदयास आली असून व्यक्तीला वर्ग बदलण्याची संधी उपलब्ध होत आहे. याचाच अर्थ असा की नागरीकरणामुळे मुक्त स्तरीकरण व्यवस्थेस चालना मिळालेली आहे.

**७) स्त्रियांच्या दर्जात सुधारणा :** नागरीकरणामुळे स्त्रियांच्या दर्जात सुधारणा होण्यास चालना मिळाली आहे. नागरी पर्यावरण हे व्यक्तिवादास व व्यक्तिस्वातंत्र्यास पोषक असल्याने नगरात स्त्रियांनी शिक्षण घेणे, नोकरी-व्यवसाय करणे, करिअर घडविणे इत्यादींना प्राधान्य मिळू लागले आहे. नागरी कुटुंबात पती हा पत्नीच्या सल्ल्याने कौटुंबिक अधिकार वापरतो आहे किंवा पतीपत्नीत अधिकारांचे विभाजन होत आहे. शहरात लिंगभेदावर आधारलेले श्रमविभाजन टिकू शकत नाही. कमावत्या पत्नीस पती हा घरकामात मदत करताना दिसतो. नोकरीधंद्यामुळे सतत घराबाहेर राहणाऱ्या पतीला कौटुंबिक व्यवहाराचे काही अधिकार पत्नीला देणे भाग पडत आहे. नागरी कुटुंबात मुलाप्रमाणेच मुलीच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडेही आवर्जून लक्ष दिले जाऊ लागले आहे. पत्नी ही केवळ 'दासी' न मानता सहचारिणी, सखी मानली जाऊ लागली आहे. एकंदरीत नागरीकरणामुळे स्त्रियांची ''चूल व मुल'' या कार्यक्षेत्रातून सुटका होऊन त्यांचा सार्वजनिक जीवनात मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्यास व परिणामी त्यांचे सामाजिक स्थान व दर्जा उंचावण्यास मोठी चालना मिळाली आहे.

**८) सामाजिक समस्यांमध्ये वाढ :** नागरीकरणामुळे कांही सामाजिक समस्या तीव्र झाल्या आहेत. तर कांही नवीन समस्या उदयास आल्या आहेत. ग्रामीण लोकसंख्येचे शहराकडे-नगराकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होऊ लागल्याने तेथे अतिरिक्त लोकसंख्येच्या घनतेची समस्या गंभीर

बनली आहे. वाढत्या लोकसंख्येस, पाणी, वीज, शिक्षण, वाहतूक, आरोग्य इत्यादीबाबतच्या सुविधा पुरविणे अवघड झाले आहे. वाढत्या लोकसंख्येला राहत्या जागेच्या टंचाईमुळे घरे पुरविणे अशक्य झाल्याने नगरात झोपडपट्ट्यांची समस्या गंभीर बनलेली आहे. नगराकडे स्थलांतरीत होणाऱ्या सर्वांनाच रोजगार उपलब्ध होऊ शकत नसल्याने अनेकजण बेकार बनतात. तर त्यापैकी कांहीजण गुन्हेगारीकडे वळतात तर कांहीजण भीक मागतात. तर अनेक स्त्रिया वेश्याव्यवसाय पत्करतात. शहरी जीवनातील ताणतणाव विसरण्यासाठी अनेकजण मद्य, चरस, गर्द अशा मादक पदार्थांचे सेवन करतात. त्यामुळे व्यक्तीचे आरोग्य तर बिघडतेच शिवाय कुटुंबही बरबाद होते. नागरीकरणामुळे नगरात वाहतूक साधनांची गर्दी वाढते त्यातून वाहतुकीची कोंडी होणे, अपघात होणे, अशा दुर्घटना वाढत राहतात. शहरातील कारखाने, पेट्रोल-डिझेलवर चालणारी वाहने, रस्त्यावरील कचऱ्याचे ढीग, उघड्या गटारी इत्यादीमुळे हवा, पाणी, ध्वनी यांचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण वाढत चालले आहे. त्यामुळे नगरात आरोग्याची समस्या गंभीर बनलेली आहे. व्यक्तिवादाच्या प्रभावामुळे नागरी कुटुंबात वृद्ध मातापित्यांना आधार मिळेनासा झाला आहे. त्यामुळे नगरात वृद्धांची समस्याही तीव्र झालेली आहे. अशाप्रकारे नागरीकरणामुळे नागरी जीवनातील समस्यांची तीव्रता वाढत आहे.

**९) ग्रामीण जीवनावरील परिणाम :** नागरीकरणाचे परिणाम केवळ नागरी जीवनावरच झाले नसून ग्रामीण जीवनावरही झालेले आहेत. नागरीकरणामुळे वाहतूक साधनांचे जाळे विस्तारत जाते. त्यामुळे ग्रामीण लोकांना नगरांकडे स्थलांतर करणे सुलभ झाले. खेडी व नगरे यांच्यातील संपर्क घनिष्ठ बनले. त्यामुळे भारतातील खेड्यांची बाह्य जगापासून असलेली अलगता संपुष्टात आली. खेड्यातील शेतकरी नागर समुदायाच्या गरजा विचारात घेवून फळे, फुले, भाजीपाला व अन्य नगदी पिके घेण्यावर भर देऊ लागले. परिणामी कृषी व्यवसायाची प्रगती होण्यास हातभार लागला. खेड्यातील कारागीर बलुतेदार मंडळी खेड्यात बलुत्यात काम करण्याऐवजी नगरात येऊन आपापले व्यवसाय आधुनिक पद्धतीने करण्यास प्रवृत्त झाले आहेत. नागरी समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी ग्रामीण लोकसंख्येचे नगराकडील स्थलांतर रोखण्यासाठी सरकारने खेड्यात ग्रामोद्योग, कुटिरोद्योग सुरू करण्यास व खेड्यात नागरी सुविधा (रस्ते, वीज, शाळा, दवाखाने, कृत्रिम पाणी पुरवठा, बँक इ.) पुरविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे ग्रामीण विकासास चालना मिळाली आहे. नागरीकरणामुळे वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, टेलिफोन, सिनेमा इत्यादी दळणवळण साधने ग्रामीण भागातही पोहचली आहेत. त्यामुळे खेडूतांना नवे विचार, कल्पना, मूल्ये, दृष्टिकोन यांची ओळख होऊन त्यांच्या परंपरागत आचारविचारात, सवयीत, राहणीमानात हळूहळू परिवर्तन होत आहे. एवढेच नव्हे तर ग्रामीण कुटुंब, विवाह, शिक्षण, धर्म इत्यादी सामाजिक संस्थातही परिवर्तन होऊ लागले आहे. ग्रामीण संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन त्याजागी विभक्त कुटुंब स्थापण्याची प्रवृत्ती वाढत आहे. बालविवाहाचे प्रमाण कमी होत चालले आहे. धर्मश्रद्धा, अंधश्रद्धा, कर्मकांड इत्यादीचा प्रभाव ओसरत चालला आहे. ग्रामीण लोकांनाही शिक्षणाचे महत्त्व उमजल्याने शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढू लागले आहे.

अशाप्रकारे नागरीकरणाचे नागरी व ग्रामीण अशा दोन्ही समुदायाच्या जीवनावर विविध व विस्तृत स्वरूपाचे परिणाम झालेले आहेत.

## २.४ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. नागरीकरणाची कोणतीही एक व्याख्या द्या.

२. नागरीकरणाची कोणतीही पाच वैशिष्ट्ये सांगा.

३. नगरवाद आणि नागरीकरण यातील फरक सांगा.

४. नागरीकरणास चालना देणारे पाच घटक सांगा.

५. नागरीकरणामुळे तीव्र झालेल्या कोणत्याही पाच नागरी समस्या सांगा.

## २.५ सारांश (Let Us Sum up)

या चौथ्या घटकात तुम्ही नागरीकरणाची व्याख्या, स्वरूप, कारणे व परिणाम यांचा अभ्यास केलेला आहे. नागरी पर्यावरणाने प्रभावित होऊन सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः खेड्यांतील लोकांनी नगरांकडे स्थलांतर करणे आणि नगरातील व्यवसाय, मूल्ये आणि जीवनशैली यांचा स्वीकार करणे म्हणजे नागरीकरण होय. नागरीकरणाचे स्वरूप समजण्यासाठी त्याची पुढील वैशिष्ट्ये तुम्ही समजावून घेतली आहेत. १) नागरीकरण ही स्थलांतराची प्रक्रिया आहे. २) ती आधुनिक प्रक्रिया आहे. ३) ती सामाजिक प्रक्रिया आहे. ४) नागरीकरण ही नगरवादाहून वेगळी प्रक्रिया आहे. ५) नागरीकरण ही औद्योगिकीकरणाशी संबंधित आहे. ६) नागरीकरण सुरू होण्यासाठी कांही पूर्वावश्यकतांची पूर्तता व्हावी लागते. ७) नागरीकरणाचा विकास विविध अवस्थांमधून होतो. ८) नागरीकरण सामाजिक परिवर्तनाचा एक घटक आहे. यानंतर तुम्ही नागरीकरणाची कारणे अभ्यासली आहेत. १) औद्योगिकीकरण २) दळणवळणाची साधने ३) व्यापार व व्यवसायात होणारी वाढ ४) शिक्षण ५) राजकीय घटक ६) धार्मिक क्षेत्र ७) पर्यटन केंद्र ८) लोकसंख्या वाढ ९) नागरी जीवनाचे आकर्षण इत्यादी कारणांमुळे नागरीकरणास चालना मिळते. यानंतर तुम्ही नागरीकरणाचे विवाह, कुटुंब, शिक्षण, धर्म इत्यादी सामाजिक संस्थांवरील तसेच सामाजिक स्तरीकरण, स्त्रियांचा दर्जा, ग्रामीण जीवन इत्यादीवर झालेले परिणाम अभ्यासले आहेत.

## २.६ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

१. नागरी पर्यावरणाने प्रभावित होऊन सभोवतालच्या प्रदेशातील विशेषतः खेड्यातील लोकांनी नगरांकडे स्थलांतर करणे आणि नगरातील बिगरशेती व्यवसाय, मूल्ये आणि जीवनशैली यांचा स्वीकार करण्याच्या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात.

२. नागरीकरणाची पाच वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. अ) नागरीकरण ही स्थलांतर – प्रक्रिया आहे. ब) नागरीकरण आधुनिक प्रक्रिया आहे. क) नागरीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे. ड) नागरीकरण ही नगरवादाहून भिन्न अशी प्रक्रिया आहे. ई) नागरीकरण औद्योगिकीकरणाशी संबंधित आहे.

३. नगरवाद ही एक जीवनशैली असून नागरीकरण ही ह्या जीवनशैलीचा प्रसार व विस्तार करणारी प्रक्रिया आहे.

४. नागरीकरणास चालना देणारे पाच घटक औद्योगिकीकरण, दळणवळणाची साधने, व्यापार व व्यवसायात होणारी वाढ, शिक्षण आणि राजकीय घटक हे आहेत.

५. नागरीकरणामुळे बेकारी, गुन्हेगारी, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, प्रदूषण ह्या नागरी समस्या तीव्र झाल्या आहेत.

## २.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नागरीकरणाची व्याख्या देऊन त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. नागरीकरणास जबाबदार असणाऱ्या कारणांची किंवा घटकांची चर्चा करा.

३. नागरीकरणाचे परिणाम विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नागरीकरणाचा अर्थ

२. नगरवाद आणि नागरीकरण

३. नागरीकरणामुळे तीव्र झालेल्या समस्या

४. नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम

## २.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- एखाद्या जवळपासच्या खेड्यास भेट द्या आणि तेथे नागरीकरणामुळे कोणत्या समस्या निर्माण झाल्या आहेत याची नोंद करा.
- तुमच्या जवळपासच्या एखाद्या नगरातील समस्यांचे निरीक्षण करून त्या सोडविण्यासाठी सुचणारे उपाय लिहून काढा.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. भारतीय समाज – प्रा. चंद्रकांत खंडागळे – प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, १९९८.

२. भारतातील सामाजिक समस्या – डॉ.विलास संगवे (संपादक) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९.

❑❑❑

# घटक : ३

# नागर समाजशास्त्रातील प्रमुख संकल्पना

## (Major Concepts in Urban Sociology)

**घटक संरचना**

३.१ प्रस्तावना

३.२ उद्दिष्टे

३.३ विषय विवेचन

  ३.३.१ नागर समुदाय

  ३.३.२ नगरवाद

  ३.३.३ ग्रामीण नागर भिन्नता

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.५ सारांश

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ स्वाध्याय/गृहपाठ

३.८ चिंतन आणि कार्य

३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.१ प्रस्तावना (Introduction)

पहिल्या घटकात नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय, स्वरूप, महत्त्व इत्यादींचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही या दुसऱ्या घटकात नागर समाजशास्त्रातील कांही प्रमुख संकल्पना अभ्यासणार आहात. एखाद्या शास्त्राचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यातील महत्त्वाच्या संकल्पनांची ओळख करून घेणे आवश्यक असते. नागर समाजशास्त्राचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्या शास्त्रातील ''नागर समुदाय, नगरवाद व ग्रामीण - नागर भिन्नता'' या तीन संकल्पना तुम्ही अभ्यासणार आहात. त्यामुळे या घटकांचे तीन विभागात विभाजन केलेले आहे. पहिल्या विभागात नागर समुदाय या संकल्पनेची, दुसऱ्या विभागात नगरवाद या संकल्पनेची, तिसऱ्या विभागात ग्रामीण-नागर भिन्नता या संकल्पनांची चर्चा केलेली आहे.

## ३.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास -

- नागर समुदायाचा अर्थ व वैशिष्ट्ये सांगता येतील.
- नगरवाद या संकल्पनेचा अर्थ व वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.
- ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता समजावून घेता येईल.

## ३.३ विषय-विवेचन (Presentation of Subject-Matter)

यानंतर आपण नागर समुदाय, नगरवाद, ग्रामीण-नागर भिन्नता व ग्रामीण-नागर सातत्य या चार संकल्पनांचे क्रमशः सविस्तर विवेचन करणार आहोत.

### ३.३.१ नागर समुदाय (Urban Community)

**अर्थ व व्याख्या :**

नागर समुदाय हा मानवी समाजाच्या विकासातील अत्यंत प्रगत टप्पा आहे. आधुनिक काळात नागर समाजास अनेक दृष्टीने खूपच महत्त्व प्राप्त झालेले आहे. तथापि प्राचीन काळापासून मानव समाजात नगरे अस्तित्वात असल्याचे दिसून येते. नगर हा शब्द city (सिटी) या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. city हा शब्द लॅटीन भाषेतील civitous (सिविटॉस) या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ 'नागरीकता' असा आहे. तथापि यावरून नगर म्हणजे काय याचा स्पष्ट बोध होत नाही. नगर म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर मोठा आकार, दाट लोकवस्ती, पक्की व उंच घरे, माणसांची गर्दी, वाहतूक साधनांनी गजबजलेले रस्ते, विविध उद्योगधंदे, बाजारपेठा, व्यवसाय, शिक्षण प्रशिक्षण संस्था, धर्मस्थळे, करमणुकीची साधने यासारख्या असंख्य गोष्टी उभारतात. तरी परंतु नगराची सर्वसामान्य अशी समाजशास्त्रीय व्याख्या करणे कठीण आहे. वेगवेगळे निकष वापरून व्याख्या करण्याचे प्रयत्न केले जातात. ते निकष पुढीलप्रमाणे :

१) **लोकसंख्या :** जास्त लोकसंख्येच्या वस्तीस नगर असे म्हणतात. पण ही व्याख्या समाधानकारक नाही. कारण वेगवेगळ्या देशात याबाबत वेगवेगळी स्थिती आढळते. उदा. फ्रान्समध्ये २०००, अमेरिकेत २५००, भारतात ५००० तर नेदरलँडमध्ये २००००, तर डेन्मार्कमध्ये केवळ २५० लोकसंख्येच्या वस्तीला नगर मानले जाते. लोकसंख्येची घनता विचारात घेऊन बऱ्याचवेळा लोकसंख्येची घनता जास्त असलेल्या वस्तीला नगर म्हटले जाते. परंतु नेमक्या किती लोकसंख्येच्या घनतेच्या आधारावर खेडे व शहर यामध्ये भेद करावा हे ठरविण्यात अडचण येते. कारण ऑस्ट्रेलिया न्यूझिलंड यासारख्या देशातील कांही नगरामध्ये लोकसंख्येची घनता केवळ १० आहे तर कांही नगरात ती ३५० इतकी आहे. भारतात कमीत कमी ४०० इतकी लोकसंख्येची घनता नागर समुदायासाठी आवश्यक मानली आहे.

२) **व्यवसाय :** व्यवसाय हा निकष लावून बिगरशेती व्यवसाय असणाऱ्या वस्तीस नगर म्हटले जाते. यासंदर्भात **डब्ल्यू. एफ. विलफॉक्स** म्हणतात, 'जेथे निर्वाहाचा प्रमुख आधार शेती असतो ते

खेडे व जेथे शेती व्यवसाय अजिबात नसतो ते शहर होय' पण ही व्याख्या ही निर्दोष नाही. कारण कांही देशातील अनेक लहान लहान खेड्यात बिगरशेती व्यवसाय चालतो. मग त्यांना नगर म्हणावयाचे काय?

**३) पर्यावरण व जीवनपद्धती :** या निकषांच्या आधारे खेडे व नगर यामध्ये भेद केला जातो. खेड्यातील पर्यावरण नैसर्गिक असते तर शहरात मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव असतो असे म्हटले जाते. तसेच खेड्यापेक्षा शहरातील जीवनपद्धती अधिक पुढारलेली किंवा सुधारलेली (Civilized) असते असाही फरक सांगितला जातो. तथापि अशी तुलना योग्य ठरत नाही. **मॅकायव्हर** म्हणतात त्याप्रमाणे ग्रामीण समुदाय कोठे संपतो व नागर समुदाय कोठे सुरू होतो यांमध्ये निश्चित सीमारेषा आखणे अवघड आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीत शहरालगतच्या खेड्यांमध्ये नागरी जीवनपद्धतीचा शिरकाव झाला असून तेथेही मानवनिर्मिती वा कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव वाढत आहे. याउलट मोठमोठ्या शहरातील झोपडपट्ट्या व गरिबांच्या वस्त्यांमध्ये ग्रामीण जीवन पद्धतीची लक्षणे आढळतात. सारांश शुद्ध ग्रामीण व शुद्ध नागरी असे समुदाय आज दिसून येत नाहीत.

थोडक्यात नागर समुदायाची व्याख्या करणे अवघड आहे. तथापि कांही समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

**१) प्रा. चंद्रकांत खंडागळे :** साधारणपणे मर्यादित भूप्रदेशातील दाट व विजातिय स्वरूपाची लोकसंख्या, बिगरशेती व्यवसाय, बाजारपेठा, शैक्षणिक, आरोग्य, दळणवळण व करमणूक सुविधांची विपुलता, दुय्यम संबंधाचे प्राबल्य, कृत्रिम पर्यावरणाचा अधिक प्रभाव इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या मानवी वस्तीस नगर किंवा नागर समुदाय असे म्हणतात.

**२) लेवीस ममफोर्ड :** इतिहासावरून हे स्पष्ट होते की नगर असे केंद्र आहे की जेथे समुदायातील अधिकतम शक्ती व संस्कृतीचे केंद्रीकरण झालेले असते. शहर हे सामाजिक संबंधाच्या समग्रतेचे प्रतिक व स्वरूप असते. ते धर्म, व्यवसाय, न्याय व ज्ञान यांचे महत्त्वपूर्ण केंद्र असते.

**३) थियोडार्सन आणि थियोडार्सन :** नगर म्हणजे असा समुदाय की ज्यामध्ये लोकसंख्येची घनता अधिक असते, बिगरशेती व्यवसायांना प्राधान्य असते, संकीर्ण श्रमविभाजनातून उदयास आलेले उच्च दर्जाचे विशेषीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची औपचारीक व्यवस्था आढळते. या व्याख्येत शहराची प्रमुख वैशिष्ठ्ये स्पष्ट झाली आहेत.

**४) भारताच्या १९९१ च्या जनगणना अहवालानुसार** 'जेथे नगरपालिका, महानगरपालिका, कँटोनमेंट बोर्ड आहे, किमान लोकसंख्या ५००० व काम करणाऱ्या पुरुषांपैकी शे. ७५ पुरुष बिगरशेती व्यवसायात असून लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. ला किमान ४०० आहे असे क्षेत्र नागरी समुदाय ठरते.' याशिवाय नव्याने विकसित झालेले क्षेत्र, विकास प्रकल्पाच्या निमित्ताने स्थापन झालेल्या वसाहती, रेल्वे वसाहती, महत्त्वाची पर्यटन केंद्रे यांचाही नागर विभागात समावेश केला जातो.

**नागर समुदायाची वैशिष्ट्ये :**

**१) मानवनिर्मित पर्यावरण :** नागर समुदायावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानवनिर्मित पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. हा समुदाय निसर्गापासून कांहीसा दूर असल्याने त्याच्यावर नैसर्गिक घडामोडींचा प्रत्यक्ष प्रभाव फारसा पडत नाही. शहरी लोक आपल्या गरजापूर्तीसाठी निसर्गावर फारसे अवलंबून न राहता विज्ञान तंत्रज्ञानावर आधारलेल्या मानवनिर्मित कृत्रिम उपकरणांचा वापर करण्यावर विशेष भर देतात. ग्रामीण लोक पाण्याची गरज नदी, ओढा, तलाव याद्वारे भागवितात. याउलट शहरी लोक कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय करून ही गरज भागवितात. शहरात उन्हाळ्यात थंड हवा मिळविण्यासाठी पंखा-कूलर, एअरकंडिशन अशी कृत्रिम साधने वापरतात.

या मानवनिर्मित पर्यावरणाचा शहरी समुदायावर परिणाम झालेला दिसतो. शहरी लोक अधिक जिज्ञासू व चिकित्सक बनलेले असतात. निसर्गात व समाजजीवनात घडणाऱ्या घटनांकडे ते वैज्ञानिक दृष्टीने पाहतात. घटना घटनांमधील कार्यकारण संबंध शोधण्याचा खटाटोप करतात. वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञानाच्या प्रभावामुळे शहरी लोक अंधश्रद्धा, देवभोळ्या कल्पना, अशास्त्रीय व आतार्किक विचार व दैववादीवृत्ती इत्यादीपासून बऱ्याच प्रमाणात दूर असतात. विज्ञानवाद, बुद्धिवाद, प्रयत्नवाद इत्यादीच्या आधारे कृत्रिम पर्यावरण तयार करून आपले जीवन अधिक सुसह्य व समृद्ध बनविण्याचा प्रयत्न शहरी लोक करतात.

**२) बिगरशेती व्यवसाय :** नागर समुदायातील लोकांचे व्यवसाय बिगरशेती स्वरूपाचे असतात. शहरात विविध तऱ्हेचे व्यवसाय उपलब्ध असतात. उद्योगधंदे, कारखाने, व्यापारपेठा, शिक्षणसंस्था, करमणूक केंद्रे, वाहतूक व संदेशवहनाची व्यवस्था आणि शासकीय-निमशासकीय कार्यालये इत्यादींची शहरात रेलचेल असते. आणि या सर्वांमध्ये काम करून शहरी लोक आपला निर्वाह चालवित असतात. हे सर्व व्यवसाय बिगरशेती व्यवसाय म्हणून ओळखले जातात. शहरात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उदा. अवजारे, खते, जंतुनाशके, कीटकनाशके इ. चे. उत्पादन करणारे व शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगही असतात. अशा उद्योगातही काही शहरी लोक गुंतलेले असतात. असे उद्योग ही बिगरशेती व्यवसायच ठरतात.

**३) मोठा आकार :** नागर समुदाय आकाराने मोठा असतो. शहराची लोकसंख्या खेड्याच्या तुलनेत जास्तच असते. शिवाय शहरात लोकसंख्येची घनता देखील जास्त असते. मर्यादित जागेवर हजारो, लाखो व कांही शहरात तर करोडो लोक दाटीवाटीने रहात असतात. शहरी समुदाय उद्योगधंद्याचे, व्यापाराचे, रोजगाराचे, शिक्षणाचे केंद्र असल्याने सभोवतालच्या भागातून लोक शहरात सतत स्थलांतर करीत असतात. त्यातूनच शहराचा आकार किंवा विस्तार वाढत जातो. नगराच्या भोवती उपनगरे अस्तित्वात येतात व त्यातूनच कांहींना महानगराचे स्वरूप येते. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे शहराचे आकारमान वाढण्यास मदत होते.

**४) सामाजिक विजातीयता :** नागर समुदायात विजातीयता मोठ्या प्रमाणावर असते. विविध व्यवसायांची उपलब्धता व दळणवळणाची प्रगत साधने यामुळे देशाच्या विविध भागांतून भिन्न वंशाचे, भिन्न धर्मांचे, भिन्न जातींचे, भिन्न भाषेंचे व भिन्न संस्कृतीचे लोक शहरात एकत्र आलेले असतात. त्यांची सामाजिक-सांस्कृतिक तसेच आर्थिक पार्श्वभूमी भिन्न भिन्न असते. अशा लोकांचे लहान लहान समूह शहरात अस्तित्वात येतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये आचारविचार, श्रद्धामूल्ये,

जीवनविषयक दृष्टिकोन व जीवनपद्धती इत्यादीबाबतीत विविधता निर्माण होते. लोकसंख्येतील या विविधतेलाच सामाजिक विजातीयता म्हणतात.

५) **सामाजिक सहिष्णुता :** नागर समाज सामाजिकदृष्ट्या विजातीय असला तरी देखील त्यामध्ये सामाजिक सहिष्णुता मोठ्या प्रमाणावर असते. मोठी लोकसंख्या व लोकसंख्येतील विविधता यामुळे शहरात व्यक्तीचा विभिन्न वंशाच्या, जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या, वर्गाच्या लोकांशी संबंध अपरिहार्यपणे येत असतो. या सर्वांच्या आशाआकांक्षा आवडीनिवडी, वृत्तीप्रवृत्ती, मतेमूल्ये व आचारविचार भिन्न भिन्न असतात. तथापि आपले हितसंबंध साध्य करताना शहरी व्यक्तीला इतरांच्या मताबद्दल, चालिरीतीबद्दल, धर्मश्रद्धा व धर्माचरणाबद्दल सहिष्णुता दाखविणे भाग पडते. त्यांच्या कांही गोष्टी आपणाला पटत नसल्यातरी त्यांच्याबद्दल सामंजस्याचे धोरण ठेवावे लागते. इतरांच्या जातीधर्माचा, वंशाचा, भाषेचा, संस्कृतीचा, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा विचार न करता शहरी लोकांना परस्पराशी सहकार्य करावे लागते. एकत्र बसून खाणेपिणे, प्रवास, करमणूक व कामधंदा या गोष्टी कराव्या लागतात. लोकांच्या वैयक्तिक किंवा खाजगी जीवनात न डोकावण्याची वृत्ती ठेवावी लागते. यातूनच शहरी समुदायात सामाजिक सहिष्णुता निर्माण झालेली असते.

६) **दुय्यम संबंध :** शहरी समुदाय दुय्यम समूह असतो. लोकसंख्या ही जास्त, दाट व विजातीय असल्याने लोकांच्या परस्परसंबंधात घनिष्ठता, निकटता व आत्मियता नसते. व्यक्ती परस्परांना नावाने परिचित नसतात. त्यांच्यात समोरासमोरचा संपर्क नसतो, त्यांच्यातील संबंध औपचारिक, कामापुरते, व्यक्तिनिरपेक्ष, करारात्मक व साधनरूप स्वरूपाचे असतात. परस्परसंपर्कासाठी वृत्तपत्रे, फोन, रेडिओ, टेलिव्हीजन अशा संपर्क साधनांचा वापर केला जातो. थोडक्यात शहरातील लोकांचे परस्परसंबंध प्राथमिक नसतात, तर दुय्यम स्वरूपाचे असतात. त्यामुळेच शहरी व्यक्ती प्रचंड गर्दीत राहूनही बऱ्याचदा एक प्रकारचा एकाकीपणा अनुभवीत असते.

७) **दुय्यम समूहांचे नियंत्रण :** नागर समुदायातील लोकांचे संबंध दुय्यम स्वरूपाचे असल्याने त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण देखील दुय्यम समूहांकडूनच होत असते. शहरी लोकांच्या परस्परसंबंधात औपचारिकता, करारात्मकता, उपयुक्तता अधिक असल्याने कुटुंब, शेजार, आप्तजन यासारखे प्राथमिक समूह त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण करण्यास अपूरे व असमर्थ ठरतात. तसेच लोकसंख्येतील विविधतेमुळे रुढी, प्रथा, परंपरा, धर्मश्रद्धा, मूल्ये यासारखी सामाजिक नियमने देखील कुचकामी ठरतात. त्यामुळेच व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी दुय्यम समूहांवर अवलंबून रहावे लागते. शहरात कायदा, पोलीस, न्यायालय, तुरुंग यासारख्या दुय्यम समूहांकडून सामाजिक नियंत्रणाचे कार्य औपचारिकपणे पार पाडले जाते.

८) **ऐच्छिक मंडळांची विपुलता :** नागर समुदायात ऐच्छिक मंडळे मोठ्या प्रमाणावर असतात. आचार विचार, श्रद्धामूल्ये, आवडीनिवडी, वृत्तीप्रवृत्ती याबाबतीत शहरी लोकांमध्ये खूपच विविधता असते. ही विविधताच ऐच्छिक मंडळांच्या स्थापनेसाठी पूरक व पोषक ठरते. शहरातील या विविधतेतच समान आवडीनिवडी, अशाआकांक्षा, छंद, सवयी व हितसंबंध असणारे लोकही भरपूर असतात. असे लोक एकत्र येऊन ऐच्छिक मंडळे स्थापन करतात. राजकीय पक्ष, कामगार संघटना, सांस्कृतिक मंडळ, क्रीडा मंडळ, व्यायाम मंडळ, महिला मंडळ, तरुण मंडळ, वाङ्मय मंडळ, रोटरी क्लब व लायन्स क्लब यासारख्या ऐच्छिक मंडळांची शहरात रेलचेल असते. व्यक्ती आपल्या विविध

हितसंबंधाची पूर्तता करण्यासाठी एकाच वेळी अनेक मंडळांचे सदस्यत्व स्वीकारते. शहरी कुटुंबाच्या रचनेत व कार्यात अलिकडे खूपच परिवर्तन घडून आल्याने कुटुंब पूर्वीसारखे शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, व्यक्तिमत्त्व विकास याबाबतची कार्ये करण्यास समर्थ नाही. त्यामुळे या गरजांच्या पूर्ततेसाठी शहरी व्यक्तिंना ऐच्छिक मंडळावरच अवलंबून रहावे लागते. ही परिस्थिती देखील मंडळांच्या स्थापणेस कारणीभूत ठरते.

९) **व्यक्तिवाद :** नागरी समुदायातील पर्यावरण व्यक्तिवाद व व्यक्तिस्वातंत्र्य यांना पोषक असते. शहरात विभिन्न व्यवसाय, विभिन्न ऐच्छिक मंडळे आणि व्यक्तिमत्त्व विकासाची विविध साधने उपलब्ध असतात. व्यक्ती आपल्या आवडीनिवडीनुसार त्यांचा उपयोग करून स्वतःचा विकास घडवून आणू शकते. आपल्या अंगच्या गुणांच्या आधारे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा मिळवू शकते. व्यक्तीच्या विकासाच्या मार्गात जात, धर्म, रूढी, परंपरा, कुटुंब, कूल इत्यादींचा अडसर फारसा येऊ शकत नाही. व्यक्ती स्वतःचे निर्णय स्वतःच घेण्यास व घेतलेल्या निर्णयानुसार कृती करण्यास स्वतंत्र असते. आपल्या इच्छेप्रमाणे आयुष्य जगू शकते. इतरांचा फारसा विचार न करता एक प्रकारचे स्वतंत्र व स्वयंकेंद्रित जीवन ती जगू शकते. सारांश शहरी पर्यावरण व्यक्तिमत्त्व विकासास अनुकूल असते. त्यामुळे व्यक्तीच्या मनावर व्यक्तिवादाचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभाव आढळतो.

**१०) श्रमविभाजन व विशेषीकरण :** नागरी समुदायात श्रमविभाजन व विशेषीकरणास मोठाच वाव असतो. औद्योगिक, तांत्रिक, व्यापार, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी सर्वच क्षेत्रात सूक्ष्म श्रमविभाजन दिसून येते. या विविध क्षेत्रात व्यक्ती आपल्या पात्रतेनुसार विशिष्ट कार्ये करीत असतात. एकाच व्यवसायात अकुशल, अर्धकुशल, कुशल, तज्ज्ञ, विशेषज्ञ, असे अनेक सेवक काम करीत असतात. प्रत्येकजण एखाद्या विशिष्ट कामातील तज्ज्ञता मिळवण्यासाठी धडपडत असतो. उदा. वैद्यकीय व्यवसायात हृदयरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, दंतरोगतज्ज्ञ, नाक कान घसा तज्ज्ञ, छातीच्या रोगाचा तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ असे विशेषीकरण दिसून येते. हे श्रमविभाजन व विशेषीकरण व्यक्तीची बुद्धिमत्ता, पात्रता, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादीवर आधारलेले असते.

**११) सामाजिक गतिशीलता :** शहरी समुदायात सामाजिक गतिशीलतेला मोठाच वाव असतो. व्यक्तिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषीकरण इत्यादीमुळे शहरात 'अर्जित दर्जाला' महत्त्व असते. त्यामुळे व्यक्तीला स्वकर्तृत्वाने आपल्या सामाजिक दर्जात किंवा सामाजिक स्तरात बदल घडवून आणता येतो. कनिष्ठ स्तरातील व्यक्ती स्वप्रयत्नाने वरिष्ठ स्तरात जाऊ शकते. कनिष्ठ सामाजिक दर्जा असलेली व्यक्ती सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण, कलाकौशल्ये, इत्यादीचे संपादन करून श्रेष्ठ दर्जा मिळवू शकते. क्लार्क असलेली व्यक्ती कलेक्टर होऊ शकते. परंतु याच्या उलट ही होऊ शकते. कर्तृत्वशून्य किंवा अकार्यक्षम व्यक्ती उच्च स्तरातून कनिष्ठ स्तरावर फेकली जाऊ शकते. रावाचा रंक होऊ शकतो. एकंदरीत शहरात सामाजिक गतिशीलता मोठ्या प्रमाणावर असते. दळणवळणाची प्रगत साधने आणि विविध व्यवसायांची उपलब्धता यामुळे गतिशीलतेस चालना मिळते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे आणि एक व्यवसाय किंवा नोकरी सोडून दुसरा व्यवसाय वा नोकरी करणे शहरात शक्य असते. व्यक्तीला राहण्याची जागा, व्यवसाय व सामाजिक दर्जा इत्यादीत बदल करणे सोपे जाते.

**१२) क्षेत्रिय नियोजन :** शहरात मर्यादित जागेवर असंख्य लोक दाटीवाटीने राहतात. त्यातच शहराची लोकसंख्या सतत वाढत असते. त्यामुळे जागेची टंचाई निर्माण होते. त्यामुळे लोकांमध्ये राहण्यासाठी व व्यवसायासाठी जागा मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू होते. त्यामुळे विविध व्यवसाय, उद्योगधंदे, केंद्रे, कार्यालये इत्यादींचे शहराच्या विभिन्न भागात नियोजन केले जाते. शहराच्या मध्यवर्ती भागात स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कार्यालये, विविध व्यापारी केंद्रे यासारखी अत्यावश्यक सेवा व मूलभूत वस्तू पुरविणारी केंद्रे स्थापन झालेली असतात. डॉक्टर्स, वकिल, ऑडिटर्स, चार्टर्ड अकौंटंटस्, इत्यादी श्रेष्ठ व्यावसायिक शहराच्या मध्यवर्ती भागात व्यवसाय स्थापण्यावर भर देतात. त्यामुळे मध्यभागातील जागेची मागणी वाढून किंमती वाढतात. त्यामुळे लोक सभोवतालच्या भागात घरे बांधतात. त्यामुळे एकाच भागात राहणाऱ्या लोकांची जीवनपद्धती बरीचशी समान असते. शहरातील वस्तीस्थानांच्या भिन्नतेबरोबरच लोकांच्या जीवनपद्धतीतील भिन्नता चटकन लक्षात येते. शहरातील क्षेत्रिय नियोजनामुळे शहरी समुदायाची रचना कशी आहे याची कल्पना येते.

### ३.३.२ नगरवाद (Urbanism)

नगरवाद ही नागर समाजशास्त्रातील महत्त्वाची संकल्पना आहे. नागरी पर्यावरणामध्ये राहणाऱ्या लोकांची विशिष्ट अशी एक जीवनपद्धती असते. या लोकांचे राहणीमान, बोलणे-चालणे, खाणेपिणे, शिष्टाचार, वेशभूषा, केशभूषा इत्यादी बाबी वैशिष्ट्यपूर्ण असतात आणि त्याबाबत हे लोक विशेष जागरूक असतात. अशी जागरूकता इतर लोकांमध्ये विशेषतः ग्रामीण लोकांमध्ये सहसा आढळत नाही. नगरातील लोकांची ही जी वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती किंवा जीवन जगण्याचा एक विशिष्ट मार्ग वा शैली (Way of life or life-style) असते तिला उद्देशूनच नगरवाद ही संज्ञा वापरली जाते. नगरवाद या संज्ञेचा अर्थबोध होण्यासाठी कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांची मते विचारात घेणे उचित ठरते.

१. **लुईस वर्थ :** नगरवाद ही संकल्पना लुईस वर्थ या समाजशास्त्राने विकसित केलेली आहे. आपल्या एका लेखात त्याने ''नगरवाद हा जीवनाचा एक मार्ग आहे. (Urbanism is a way of life.)" अशा शब्दात नगरवादाचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. लुईस वर्थच्या मते नगरात राहणारी प्रत्येक व्यक्ती ही नगरातील जीवन पद्धतीचा स्वीकार करतेच असे नाही. तसेच नगरवाद हा केवळ नगरापुरताच मर्यादित असतो असेही नाही.

२. **नेल्स एण्डरसनच्या** मते नगरवाद ही एक जीवनपद्धती आहे. जी केवळ शहर (Town) आणि नगर (City) यांच्यापुरतीच मर्यादित नाही तर तिचा प्रादूर्भाव महानगरांपासून सुरू होतो.

३. **विल्यम स्कॉटच्या** मते ''सापेक्षतः लहान आकाराच्या क्षेत्रात मोठ्या लोकसंख्येचे केंद्रिकरण झाल्याचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या सामाजिक आंतरक्रियेच्या व संस्कृतीच्या प्रतिमानांस नगरवाद म्हणतात.'' संकीर्ण श्रमविभाजन, उच्चदर्जाचे तंत्रज्ञान, उच्च गतिशीलता आर्थिक कार्यांच्या पूर्तीसाठी समाजातील सदस्यांमध्ये असलेले परस्परावलंबन आणि व्यक्तिनिरपेक्ष सामाजिक संबंध ही नगरवादाची वैशिष्ट्ये आहेत.

**नगरवादाची वैशिष्ट्ये (Characteristics of Urbanism)**

लुईस वर्थ यांनी नगरवादाची पुढील तीन वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१. **अस्थिरता किंवा अल्पकालिनता** (Transiency) नगरवाद ही एक विशिष्ट अशी जीवन पद्धती असून या जीवनपद्धतीत लोकांचे परस्परांशी येणारा संबंध हे अल्पकाळ टिकणारे म्हणजेच क्षणिक स्वरूपाचे असतात. त्यामुळे त्यांच्या संबंधात स्थिरता नसते. नागरी जीवनात प्रत्येक व्यक्ती अत्यंत व्यस्त असते तसे स्पर्धा ही मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे इतरांना भेटण्यासाठी लोकांकडे पुरेसा वेळच नसतो. आपल्या जवळच्या आप्तमित्रांकडे जाण्यासही त्यांना फुरसत नसते. त्यामुळे लोकांचे परस्परांशी घनिष्ठ व अनौपचारिक संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत. त्यामुळे जे कांही संबंध येतात ते बहुतांशी औपचारिक, अस्थिर, अल्पकालिक व कामापुरते असतात.

२. **दिखाऊपणा किंवा कृत्रिमता** (Superficiality) नागरी जीवनपद्धतीत दिखाऊपणा, नाटकीपणा किंवा कृत्रिमता मोठ्या प्रमाणावर असते. नागरी लोकांचे जीवन अत्यंत व्यस्त, गुंतागुंतीचे व औपचारिक स्वरूपाचे असते. त्यामुळे इतरांशी घनिष्ठ, मनमोकळेपणाचे, आपुलकीचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी लागणारा वेळ त्यांच्याकडे नसतो तसेच त्याबाबतची इच्छाशक्तीही नसते. इतरांच्या सुखदुःखात मनापासून सहभागी होणे त्यांना जमत नाही. त्यामुळे नागरी जीवनात केवळ शिष्टाचार पाळला जातो. जे कांही संबंध जोडले जातात त्यामुळे दिखाऊपणा व कृत्रिमपणाच अधिक असतो.

३. **अपरिचितता** (Anonymity) नगरात लोकांची प्रचंड गर्दी असते. जो तो आपल्याच घाईत व नादात वावरत असतो. प्रत्येकजण एक प्रकारच्या अनोळखी किंवा अपरिचित वातावरणात राहात असतो. गर्दीत राहूनही व्यक्ती एकाकी असते. ती बहुसंख्य लोकांना ओळखत नसते तसेच बहुसंख्य लोकही तिला ओळखत नसतात. व्यक्ती ज्यांना ओळखते किंवा जे लोक व्यक्तिला ओळखतात अशा लोकांचा समूह अत्यंत लहान असतो. आणि त्या समूहातील लोकांचे संबंध देखील जुजबी, कामचलाऊ, तात्पुरते व अत्यंत औपचारिक स्वरूपाचे असतात.

**नेल्स एण्डरसन** आणि **के. ईश्वरन** यांनी नगरवादाची पुढील वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

१. **मुद्राप्रधान अर्थव्यवस्था** (Money Oriented Economy) नगरातील लोकांचा परस्परांशी फारसा परिचय नसतो. तसेच त्यांच्या सर्वच गरजांची पूर्तता ही पैशाद्वारे होत असते. त्यामुळे लोक पैशाला खूपच महत्त्व देत असतात. नागर समुदायातील कोणत्याही वस्तू व सेवांची खरेदी-विक्री ही पैशाच्या माध्यमातूनच होते. सर्व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू हा पैसा असतो. त्यामुळे नागरी अर्थव्यवस्था ही मुद्राप्रधान असते.

२. **लिखित प्रमाण** (Written Records) नागरी जीवनपद्धतीत लोक परस्परांशी सहसा तोंडी व्यवहार करीत नाहीत. त्यांच्यामध्ये जो कांही व्यवहार किंवा करार होतो तो प्रामुख्याने लिखीत स्वरूपाचा असतो. अनेक महत्त्वाचे व्यवहार तर कोर्ट स्टँपवर साक्षीदाराच्या सहीनेच होतात. मोठ्या प्रमाणावरील पैशाची देवघेव ही रोखीने न होता चेक वा ड्राफ्ट यांच्या साह्याने होते. आणि असे लिखीत व्यवहार आवश्यक व योग्य ही मानले जातात. कारण नागरी लोकसंख्या ही अत्यंत विजातीय स्वरूपाची असते. म्हणजे लोक वेगवेगळ्या वंशाचे, धर्माचे, जातीचे, प्रांतांचे असतात. ते परस्परांना अपरिचित असतात त्यामुळे फसवणूक होण्याची दाट शक्यता असते. म्हणून बहुतेक व्यवहार लिखीत

स्वरूपात होतात आणि त्यातील अटींचे पालन न झाल्यास पोलीस, न्यायालय अशा औपचारिक नियंत्रण साधनांची मदत घेतली जाते व ही साधने लिखीत प्रमाणावरच (पुराव्यावरच) विश्वास ठेवतात. म्हणून नागरी जीवनात प्रत्येक व्यवहाराची कागदोपत्री नोंद ठेवण्यावर विशेष भर दिला जातो.

३. **शोध आणि तंत्र यांची विविधता** (Diversity of investigation and techniques) नागरी जीवनात तंत्रविद्या ही खूपच विकसित असते आणि विविध क्षेत्रांत नित्य नवे शोध लागत असतात. ही तंत्रविद्या व शोध मानवाच्या गरजा पूर्ण करतात त्याच्या सुखसोयीत वाढ करतात, शिवाय मानवी संबंध अधिकाधिक संकीर्णही बनवितात. मानवी जीवनात नवनव्या समस्याही निर्माण करतात. आणि या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी नवीन व्यवस्था निर्माण केल्या जातात.

४. **संघटीत आणि दृढ प्रशासन** (Organized and strict Administration) नागरी जीवनातील विशालता, संकीर्णता व अपरिचितता या गोष्टींशी सामना करण्यासाठी संघटीत व दृढ प्रशासनाची आवश्यकता असते. नागरी जीवनात गृहबांधणी वाहतूक, दळणवळण, साफसफाई, वीज, पाणी, गलिच्छ वस्ती सुधारणा, समाजकल्याण कुटुंब नियोजन, व्यापार इत्यादी क्षेत्रात विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात. आणि त्यासाठी संघटीत व दृढ प्रशासनाची गरज असते.

५. **सांस्कृतिक शोध** (Cultural Investigation) नागरी जीवनात भौतिक जीवनात परिवर्तन वेगाने होत रहाते. आणि त्याचा परिणाम म्हणून सांस्कृतिक जीवनात ही परिवर्तन घडून येण्यास चालना मिळते. नवनवीन सांस्कृतिक तत्त्वे उदयास येऊन नागली संस्कृती विकसित होत राहते. तथापि भौतिक परिवर्तनाच्या तुलनेत सांस्कृतिक परिवर्तनाची गती मंद असते. त्यामुळे समाजात सांस्कृतिक पश्चायनाची स्थिती निर्माण होऊन अनेक समस्या निर्माण होतात. असे असले तरी भौतिक विकासामुळे नागरी जीवनात नवीनवी सांस्कृतिक तत्त्वे समाविष्ट होत असतात.

### ३.३.३ ग्रामीण आणि नागर समुदायातील भिन्नता (भेद किंवा फरक) (Rural-Urban differences)

प्रास्ताविक : समुदायाचे ग्रामीण समुदाय (गाव किंवा खेडे) व नागर समुदाय (नगर किंवा शहर) असे दोन प्रकार पडतात. त्यापैकी नागर समुदायाचा समग्र व पद्धतशीर अभ्यास नागर समाजशास्त्रात होतो. नागर समुदायाचे परिपूर्ण व यथार्थ आकलन होण्यासाठी या दोन्ही समुदायांचा तुलनात्मक अभ्यास करून ग्रामीण समुदाय नागर समुदायाहून कसा भिन्न आहे म्हणजेच त्यांच्यात कोणते भेद आहेत हे समजावून घ्यावे लागते.

**अडचणी :**

तथापि त्यांच्यातील भेद स्पष्ट करण्यामध्ये पुढील अडचणी आहेत.

**१) सार्वत्रिक व्याख्येचा अभाव :** ग्रामीण व नागर समुदाय यांची सर्वत्र लागू पडेल अशी व सर्वांना मान्य होईल अशी व्याख्या करणे अत्यंत कठीण आहे. खेडे म्हणजे काय व नगर म्हणजे काय हे आपणास कळते. तथापि त्यांची समाधानकारक व्याख्या करता येत नाही. म्हणूनच **बर्गेल** म्हणतो की नगर म्हणजे काय हे प्रत्येकास माहित आहे पण त्याची कोणीही समाधानकारक व्याख्या दिलेली नाही.

२) **लोकसंख्येचे प्रमाण :** खेडे कमी लोकसंख्येचे तर नगर जास्त लोकसंख्येचे असते असे स्थूलपणे म्हटले जाते. पण लोकसंख्येच्या आधारे त्यांच्यात स्पष्टपणे भेद करणे कठीण जाते. कारण त्यासाठी वेगवेगळ्या देशात वेगवेगळे प्रमाण स्वीकारलेले दिसते. उदा. फ्रान्समध्ये २०००, अमेरिकेमध्ये २५००, भारतात ५००० तर जपानमध्ये ३०,००० लोकसंख्येच्या वस्तीला शहर मानले जाते.

३) **अंशाचा फरक :** खेडे व शहर हे मानवी वस्तीचे म्हणजेच समुदायाचे दोन प्रकार असून समुदाय जीवनाची प्रमुख वैशिष्ट्ये दोन्हीमध्येही आढळतात. फक्त त्या वैशिष्ट्यांमध्ये अंशाचा म्हणजे प्रमाणाचा फरक (Difference of degree or quantity) आढळतो. खेड्यात शहरांची कांही वैशिष्ट्ये आढळतात तर शहरातही खेड्यांची कांही वैशिष्ट्ये आढळतात. शहराजवळील खेड्यात नागरी जीवनाचे कांही अंश आढळतात तर शहरातील कामगारवस्त्या व झोपडपट्ट्या यांच्यात ग्रामीण जीवनाची झलक पहावयास मिळते. म्हणून त्यांच्यात स्पष्ट अशी विभाजनरेषा आखता येत नाही. म्हणून **मॅकायव्हर** म्हणतात की, 'नगर कोठे संपते व खेडे कोठून सुरू होते हे ठरविणारी विभाजनरेषा आखणे कठीण आहे.'

४) **पर्यावरणातील भिन्नता :** खेड्यातील व शहरातील पर्यावरण वेगवेगळे असते. तथापि एकाच शहरातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळे पर्यावरण आढळते. उच्चभ्रू श्रीमंतांची कॉलनी, पांढरपेशा मध्यमवर्गीयांचे अपार्टमेंटस्, कामगारांची चाळ व गरिबांची झोपडपट्टी यांच्यातील पर्यावरण वेगवेगळे असते. त्यामुळे यापैकी नेमक्या कोणत्या पर्यावरणाची तुलना खेड्यातील पर्यावरणाशी करावयाची असा प्रश्न पडतो.

५) **बदलते स्वरूप :** या दोन्ही समुदायातील भेद दर्शविण्यामधील एक प्रमुख अडचण अशी की या दोन्ही समुदायाचे स्वरूप बदलत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची प्रगत साधने इ. मुळे त्यांच्यातील संपर्काचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यामुळे त्यांच्यातील अंतर झपाट्याने कमी होत आहे. शहरातील अनेक नागरी सुविधा (उदा. शाळा, महाविद्यालये, बँका, कृत्रिम पाणीपुरवठा, वीज, पक्के रस्ते, दळणवळणाची साधने इ.) खेड्यात उपलब्ध होऊ लागल्या आहेत. त्यामुळे एखाद्या वस्तीस कोठपर्यंत खेडे म्हणावयाचे व तिला शहर म्हणण्यास केंव्हा सुरुवात करावयाची हे ठरविणे कठीण जात आहे.

थोडक्यात आज शुद्ध ग्रामीण समुदाय व शुद्ध नागर समुदाय आढळत नाही. त्यामुळे त्यांच्यात स्पष्ट भेद दर्शविणे कठीण जाते. **गिस्ट व हेलबर्ट** म्हणतात त्याप्रमाणे ग्रामीण व नागर समुदाय यांच्यातील विभाजन हे समुदाय जीवनाच्या वस्तुस्थितीपेक्षा (Facts of community life) सैद्धांतिक संकल्पनेवर (Theoretical Concepts) अधिक आधारलेले आहे.

असे असले तरी ग्रामीण व नागर समुदायात कांही भेद दाखविले जातात. **सोरोकिन व झिम्मरमन** यांनी 'Principles of Rural Urban Sociology' या ग्रंथात कांही निकष वापरून या दोन्ही समाजातील भेद स्पष्ट केले आहेत.

**भेद :**

**१) व्यवसायातील भिन्नता :** शेती हा ग्रामीण लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीशिवाय इतरही कांही व्यवसाय (उदा. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, विणकाम, लोहारकाम, सुतारकाम इ.) ग्रामीण लोक करतात. तथापि हे व्यवसाय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेतीशीच निगडीत असतात. म्हणून त्यांना जोडधंदे किंवा पूरक व्यवसाय असे म्हणतात. याउलट शहरी लोकांचे व्यवसाय बिगरशेती स्वरूपाचे असतात. लहानमोठे उद्योग, कारखाने, व्यापारपेठा, विविध वस्तूंची विक्री केंद्रे, आरोग्य सेवेची केंद्रे, सल्लादायी केंद्रे, वाहतूक व संदेशवहनाची व्यवस्था, शिक्षणसंस्था, बँका, विमा कंपन्या, शासकीय व निमशासकीय कार्यालये इ. ची शहरात रेलचेल असते आणि त्यांच्यामध्ये काम करून शहरी लोक निर्वाह चालवतात. या सर्व व्यवसायांना बिगरशेती व्यवसाय म्हणतात. शहरात शेती व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उदा. खते, जंतूनाशके, शेती अवजारे इ. चे उत्पादन व विक्री करणारे व्यवसाय असतात आणि त्यामध्ये ही कांही शहरी लोक गुंतलेले असतात. असे व्यवसायही बिगरशेतीच मानले जातात. थोडक्यात खेड्यात शेती हा एकमेव प्रमुख व्यवसाय असल्याने तेथे व्यवसायाची एकविधता आढळते तर शहरात अनेक व्यवसाय असल्याने तेथे व्यवसायाची अनेकविधता आढळते.

**२) पर्यावरणातील भिन्नता :** ग्रामीण समुदायावर नैसर्गिक पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. शेती व्यवसायामुळे ग्रामीण लोकांचा निसर्गाशी घनिष्ठ संबंध येतो. त्यांच्या बहुतांशी गरजांची पूर्तता निसर्गाकडून होते. उदा. त्यांची पाण्याची गरज नदी, ओढे, तलाव यांच्याद्वारे, तर इंधनाची गरज जंगलाद्वारे पूर्ण होते. म्हणून ते निसर्गावर अवलंबून असतात. गरजपूर्तीसाठी ते निसर्गाला शरण जातात. त्यांना नैसर्गिक घडामोडींचे (ऊन, वारा, पाऊस) शास्त्रीय ज्ञान नसल्याने ते नैसर्गिक शक्तींना देवदेवता (उदा. जलदेवता, वायुदेवता, अग्निदेवता, वनदेवता) मानून त्यांची पूजा करतात. त्यामुळे ते दैववादी, अंधश्रद्धा बनलेले दिसतात. त्यांचे आर्थिकच नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक जीवनही नैसर्गिक पर्यावरणाने प्रभावित झालेले असते. त्यांचे आचारविचार, सवयी, श्रद्धा, दृष्टिकोन, सणसमारंभ, विविध कला इ. बाबी निसर्गाशी मोठ्या प्रमाणावर निगडीत असतात. याउलट शहरी समुदायावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानवनिर्मित (कृत्रिम) पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. नैसर्गिक पर्यावरणाचा प्रत्यक्ष प्रभाव शहरी जीवनावर फारसा पडत नाही. शहरी लोक आपल्या गरजापूर्तीसाठी निसर्गावर फारसे अवलंबून न राहता विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारलेल्या कृत्रिम उपकरणांचा वापर करण्यावर जास्त भर देतात. उदा. पाण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ्याची व्यवस्था करतात. इंधन म्हणून लाकडाऐवजी एल.पी.जी. गॅस व वीज वापरतात. उन्हाळ्यात थंड हवा मिळविण्यासाठी कूलर, पंखा, एअरकंडिशनर वापरतात. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे शहरी लोक चिकित्सक, बुद्धिवादी, विज्ञानवादी, प्रयत्नवादी बनलेले असतात. अंधश्रद्धा, देवभोळ्या कल्पना, अशास्त्रीय विचारसरणी यांपासून ते दूर राहतात. निसर्गाला शरण न जाता त्याचे शास्त्रीय ज्ञान मिळवून त्याच्यावर मात करण्याचा प्रयत्न करतात. कृत्रिम पर्यावरण उभारून आपले जीवन सुखी व सुसह्य करण्याचा प्रयत्न करतात. थोडक्यात, ग्रामीण लोकांच्या मनोवृत्तीवर व जीवनावर नैसर्गिक पर्यावरणाचा तर शहरी लोकांच्या मनोवृत्तीवर व जीवनावर मानवनिर्मित पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो.

**३) आकारातील भिन्नता :** ग्रामीण समुदाय आकाराने लहान असतो. कारण शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने शेतीसाठी (धान्य लागवडीसाठी) मोठ्या भूभागाची (जमिनीची) गरज भासते. त्यामुळे राहण्यासाठी (वस्तीसाठी) कमी जागा वापराची लागते. याउलट शहरी समुदाय आकाराने मोठा असतो. शहराची लोकसंख्या खेड्याच्या मानाने जास्त असते. मर्यादित जागेवर हजारो, लाखो, करोडो लोक दाटीवाटीने राहतात. शहरे ही उद्योगाची, व्यापाराची, रोजगाराची, शिक्षणाची, भौतिक सोयीसुविधांची केंद्रे असल्याने सभोवतालच्या प्रदेशातील लोक शहराकडे सतत स्थलांतर करीत असतात. त्यातूनच शहराचा आकार किंवा विस्तार वाढत जातो. नगराच्या भोवती उपनगरे अस्तित्वात येतात व त्यातूनच काहींना महानगराचे स्वरूप येते. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे शहरांचे आकारमान वाढण्यास मदत होते. थोडक्यात ग्रामीण समुदाय लहान तर शहरी समुदाय मोठ्या आकाराचा असतो.

**४) लोकसंख्येच्या घनतेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायात केवळ लोकसंख्याच नव्हे तर लोकसंख्येची घनता देखील कमी असते. दर चौरस कि.मी. मागे किती लोक वास्तव्य करतात यावरून लोकसंख्येची घनता ठरविली जाते. खेड्यातील लोक एकतर शेतात घरे बांधून राहतात किंवा शेताजवळच्या जागेवर राहतात. तसेच खेड्यात रोजगाराच्या संधीही कमीच असतात. परिणामी तेथे लोकसंख्या व तिची घनता कमीच राहते. याउलट शहरी समुदायात लोकसंख्या व लोकसंख्येची घनताही खूपच जास्त असते. शहरात रोजगाराच्या, शिक्षणाच्या संधी विपुल प्रमाणात असल्याने शहराभोवतालच्या प्रदेशातून लोक शहराकडे सतत स्थलांतर करतात. त्यामुळे तेथील लोकसंख्या वाढत राहते. शिवाय शहरात कारखाने, दुकाने, कार्यालये, रस्ते, शाळा, बागा, क्रीडांगणे इ. साठी जागा राखीव ठेवली जाते. त्यामुळे रहात्या जागेची टंचाई निर्माण होते. परिणामी कमीत कमी जागेत जास्तीत जास्त लोकांना निवास करणे भाग पडते. उंच उंच इमारती (अपार्टमेंटस्) व दाटीवाटीच्या झोपडपट्ट्या उभ्या राहतात. परिणामी लोकसंख्येची घनता वाढत जाते. थोडक्यात ग्रामीण समुदायात लोकसंख्येची घनता कमी तर शहरी समुदायात जास्त असते.

**५) लोकसंख्येची सजातीयता व विजातीयता याबाबतची भिन्नता :** ग्रामीण समुदायात लोकसंख्येची सजातीयता आढळते. खेड्यातही विविध जातीधर्माचे व वर्गाचे लोक राहत असले तरी त्यांचे जीवन प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेती ह्या एकाच व्यवसायावर आधारलेले असते. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेत व जीवनपद्धतीत मोठ्या प्रमाणावर एकविधता (एकसारखेपणा) आढळते. त्यांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, रूढीपरंपरा, सणसमारंभ, सवयी, भाषा, वेषभूषा, केशभूषा, भोजनव्यवस्था इ. बाबतीत बहुतांशी समानता आढळते. यालाच लोकसंख्येची सजातीयता म्हणतात. याउलट शहरी समुदायात लोकसंख्येची विजातीयता अधिक असते. कारण शहरात उद्योगधंद्याची, शिक्षणाची उपलब्धता असल्याने सभोवतालच्या प्रदेशातून भिन्न भिन्न वंशाचे, धर्माचे, जातीचे, भाषेचे संस्कृतीचे लोक शहरात एकत्र आलेले असतात. त्यांची आर्थिक-सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी भिन्न भिन्न असते. त्यामुळे त्यांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, रूढीपरंपरा, सणसमारंभ, सवयी, भाषा, वेषभूषा, केशभूषा, भोजनव्यवस्था इ. बाबी भिन्न भिन्न असतात. या भिन्नतेलाच लोकसंख्येची विजातीयता म्हणतात. थोडक्यात ग्रामीण समुदायात लोकसंख्येची सजातीयता तर शहरी समुदायात लोकसंख्येची विजातीयता असते.

**६) गतिशीलतेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायात गतिशीलतेस फारसा वाव नसतो. गतिशीलता म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची क्रिया होय. गतिशीलता ही तीन प्रकारची असते.

**(अ) भौगोलिक गतिशीलता :** म्हणजे एका भौगोलिक ठिकाणाहून दुसऱ्या भौगोलिक ठिकाणाकडे जाणे होय. उदा. एक गाव किंवा शहर सोडून दुसऱ्या गावी किंवा शहरी जाणे होय.

**(ब) व्यावसायिक गतिशीलता :** म्हणजे शेती सोडून नोकरी किंवा व्यापार करणे.

**(क) सामाजिक गतिशीलता :** म्हणजे एका सामाजिक दर्जाकडून किंवा स्तराकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे किंवा स्तराकडे जाणे होय. उदा. कनिष्ठ सामाजिक दर्जात बदल करून उच्च सामाजिक दर्जा मिळविणे.

ग्रामीण समुदायात या तिन्ही प्रकारच्या गतिशीलतेस फारशी संधी नसते. कारण तेथे शेतीशिवाय इतर व्यवसाय फारसे उपलब्ध नसतात. त्यामुळे व्यक्ती शेती व्यवसायातच गुंतली जाते. शिवाय खेड्यातील लोकांमध्ये जिव्हाळ्याचे, आत्मियतेचे संबंध असतात. त्यामुळे आपले गाव, आपले कुटुंब, आपले शेत, आपले आप्तमित्र इ. ना. सोडून दुसरीकडे जाणे व्यक्तीला नकोसे वाटते. त्यामुळे खेड्यात व्यावसायिक व भौगोलिक गतिशीलतेस फारसा वाव मिळत नाही. तसेच खेड्यात व्यक्तीचा सामाजिक दर्जा किंवा स्थान किंवा स्तर हा जन्म, जात, व्यवसाय, लिंग, वय इ. च्या आधारे निश्चित होतो व त्याला रूढीपरंपरेची मान्यता असते. अज्ञान, निरक्षरता, रूढीप्रियता, अंधश्रद्धा, दैववादीवृत्ती इ. मुळे रूढीपरंपरेची बंधने झुगारून देण्याचे धाडस व्यक्तीकडे नसते. म्हणून परंपरेने मिळालेला दर्जा (अर्पित दर्जा) व्यक्ती निमूटपणे स्वीकारते. स्वकतृत्वाने त्यात बदल करण्याची संधीही तिला फारशी मिळत नाही. अशाप्रकारे ग्रामीण समाजात गतिशीलतेस वाव नसतो. याउलट शहरी समुदायात तिन्ही प्रकारच्या गतिशिलतेस मोठा वाव असतो. शहरात व्यक्तिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, दळणवळणाची प्रगत साधने, शिक्षण-प्रशिक्षणाच्या सोयी व विविध व्यवसाय इ. उपलब्ध असल्याने व्यक्ती आपल्या पात्रतेत वाढ करून एका ठिकाणाहून दुसरीकडे जाऊ शकते. एक व्यवसाय किंवा नोकरी सोडून दुसरा व्यवसाय किंवा नोकरी करू शकते. तसेच कनिष्ठ स्तरातील व्यक्ती स्वकर्तृत्वाने उच्च शिक्षण, सत्ता, संपत्ती, कलाकौशल्ये इ. प्राप्त करून त्याआधारे उच्च सामाजिक स्तर वा दर्जा मिळवू शकते. उदा. क्लार्कचा कलेक्टर होऊ शकते. याउलट कर्तृत्वशून्य वा अकार्यक्षम व्यक्ती उच्च स्तरातून कनिष्ठ स्तराकडे फेकली जाऊ शकते. उदा. कारखानदाराचा कामगार होऊ शकतो. अशाप्रकारे शहरात व्यावसायिक, भौगोलिक व सामाजिक गतिशीलतेस खूपच वाव असतो. थोडक्यात ग्रामीण समुदायात सामाजिक गतिशीलतेस फारसा वाव नसतो तर शहरात तो असतो. यासंदर्भात **सोराकिन व झिम्मरमन** म्हणतात की, 'ग्रामीण समुदाय घागरीतील शांत पाण्यासारखा तर शहरी समुदाय किटलीतील उकळत्या पाण्यासारखा आहे. स्थिरता हा पहिल्याचा तर गतिशीलता हा दुसऱ्याचा गुण आहे.

**७) स्थलांतराच्या दिशेतील भिन्नता :** ग्रामीण लोक हे प्रामुख्याने शहराकडे स्थलांतर करतात. म्हणजे ते वेगळ्या प्रकारच्या पर्यावरणामध्ये स्थलांतर करता. औद्योगिक क्रांतीनंतर जगात सर्वत्रच ग्रामीण समुदायाचे मोठ्या प्रमाणावर विघटन सुरू झाले. त्यामुळे खेड्यातून लोक शहराकडे स्थलांतर करू लागले. यालाच नागरीकरण म्हणतात. नागरीकरणाची ही प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढतच आहे. याउलट शहरी लोक हे प्रामुख्याने एका शहराकडून दुसऱ्या शहराकडे किंवा शहराच्या एका

विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे स्थलांतर करतात. म्हणजेच ते समान पर्यावरणामध्ये स्थलांतर करतात. साधारणपणे शहरात जन्मलेली व वाढलेली व्यक्ती खेड्याकडे स्थलांतर करीत नाही. तसेच खेड्यातून शहराकडे गेलेली व तेथे रुळलेली व्यक्तीही पुन्हा खेड्याकडे स्थलांतर करण्यास सहसा राजी नसते असा अनुभव आहे.

**८) सामाजिक स्तरीकरणातील भिन्नता :** ग्रामीण तसेच शहरी समुदायातही सामाजिक स्तरीकरण आढळते. तथापि ग्रामीण समुदायातील विविध सामाजिक स्तरांमध्ये किंवा वर्गांमध्ये लक्षणीय असा फरक जाणवत नाही. कारण ग्रामीण लोकांचे एकूणच राहणीमान निम्न (हलक्या) दर्जाचे आहे. दुसरे म्हणजे ग्रामीण लोक मूलतः साधी राहणी पसंत करतात. त्यामुळे तेथील उच्च व कनिष्ठ स्तरातील लोकांच्या राहणीमानात विशेष फरक नसतो. गरीब, मध्यम, श्रीमंत यांचे राहणीमान, सवयी, आचार, विचार, श्रद्धामूल्ये व एकंदर जीवनपद्धती यांच्यात विशेष तफावत नसते. याउलट शहरी समुदायातील विविध सामाजिक स्तरांमध्ये किंवा वर्गांमध्ये लक्षणीय फरक जाणवतो. शहरातील स्तरीकरण म्हणजे वर्गव्यवस्था ही आर्थिक स्थितीवर आधारलेली असते. शहरात अतिउच्चभ्रू व विलासी जीवन जगणारे गर्भश्रीमंत असतात. खाऊन पिऊन सुखी असणारे मध्यम लोकही असतात तसेच अत्यंत निकृष्ट राहणीमान असणारे कनिष्ठ स्तरातील गरीब लोकही असतात. आणि या तिन्ही वर्गाच्या आर्थिक तसेच सामाजिक-सांस्कृतिक जीवनात कमालीची तफावत असते. त्यामुळे शहरातील स्तरीकरण प्रकर्षाने लक्षात येते.

**९) सामाजिक आंतरक्रियेच्या स्वरूपातील भिन्नता :** ग्रामीण लोकांत प्रत्यक्ष स्वरूपाची सामाजिक आंतरक्रिया घडून येते. कारण खेड्याचा लहान आकार, कमी लोकसंख्या, समान व्यवसाय व संदेशवहनाच्या प्रगत साधनांची कमतरता इ. मुळे खेड्यातील लोकांचा परस्परांशी घनिष्ठ असा समोरासमोरचा नित्य संपर्क येतो. त्यामुळे त्यांच्या आत्मियतेचे, जिव्हाळ्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित होतात. याउलट शहरी लोकांत अप्रत्यक्ष स्वरूपाची सामाजिक आंतरक्रिया घडून येते. कारण शहराचा मोठा आकार, जास्त लोकसंख्या, विभिन्न व्यवसाय, संदेशवहनाच्या प्रगत साधनांची विपुलता इ. मुळे शहरी लोकांचा परस्परांशी घनिष्ठ असा समोरासमोरचा नित्य संपर्क येत नाही. त्यामुळे त्यांच्यात होणारी सामाजिक आंतरक्रिया ही अप्रत्यक्ष वा सांकेतिक स्वरूपाची असते. शहरी लोक एकाच समुदायात रहात असूनही ते परस्परांशी आंतरक्रिया करण्यासाठी टपाल, वृत्तपत्रे, दूरध्वनी, आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट, ई-मेल अशा साधनांचा अधिक वापर करतात. त्यामुळे त्यांच्या संबंधात फारसी आत्मियता, जिव्हाळा व सहकार्य भावना नसते.

**१०) सामाजिक नियंत्रण व्यवस्थेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायातील सामाजिक नियंत्रण व्यवस्था अनौपचारिक (Informal) स्वरूपाची असते. लहान आकार व कमी लोकसंख्या यामुळे खेड्यातील लोकांचे परस्परांशी अत्यंत घनिष्ठ, समोरासमोरचे, आत्मियतेचे, सहकार्याचे व व्यक्तिगत स्वरूपाचे संबंध असतात. अशा संबंधांना प्राथमिक संबंध म्हणतात आणि ग्रामीण लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण अशा प्राथमिक संबंधाद्वारे अनौपचारिकपणे पण प्रभावीरित्या होत असते. कुटुंब, शेजारी, आप्तसंबंधी (नातलग), मित्रपरिवार इ. प्राथमिक समूह व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण करतात. त्यासाठी लोकमत, लोकरूढी, लोकनीती, धर्मकल्पना, सामाजिक व नैतिक मूल्ये इ. अनौपचारिक साधनांचा (सामाजिक नियमांचा) वापर करतात. याउलट शहरातील सामाजिक नियंत्रण व्यवस्था ही औपचारिक

(Formal) असते. मोठा आकार व जास्त लोकसंख्येमुळे शहरी लोकांचे परस्परसंबंध हे अत्यंत औपचारिक, अप्रत्यक्ष, कामचलाऊ, करारात्मक व व्यक्तीनिरपेक्ष असतात. त्या संबंधात जिव्हाळा, घनिष्ठता, निकटता नसते. अशा संबंधास दुय्यम संबंध म्हणतात. शहरी लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण अशा दुय्यम संबंधाद्वारे औपचारिकपणे केले जाते. शहरात सामाजिक नियंत्रण करण्यासाठी कुटुंब, शेजारी, मित्र, नातलग इ. प्राथमिक समूह अपुरे व असमर्थ ठरतात. तसेच शहरी लोकसंख्या विजातीय असल्याने लोकमत, लोकरूढी, लोकनीती, धर्मकल्पना, मूल्ये इ. साधनेही नियंत्रण ठेवण्यास कुचकामी ठरतात. म्हणून शहरात सामाजिक नियंत्रणासाठी कायदा, पोलीस, न्यायालय, तुरुंग अशी औपचारिक साधनेच वापरली जातात.

## ३.४ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

१. नागर समुदायाची एक व्याख्या द्या.

२. लुईस वर्थ यांनी नगरवादाची कोणती तीन वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत?

३. ग्रामीण व नागर समुदायातील कोणतेही तीन फरक सांगा.

४. ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना कोणी मांडली?

## ३.५ सारांश (Let us sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही नागर समुदाय, नगरवाद, ग्रामीण-नागर भिन्नता व ग्रामीण-नागर सातत्य या चार संकल्पना समजावून घेतल्या आहेत. शहर किंवा नगर म्हणजे नागर समुदाय होय. कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव, बिगरशेती व्यवसाय, मोठा आकार, सामाजिक विजातियता, सामाजिक सहिष्णूता, दुय्यम संबंध, दुय्यम समूहांचे नियंत्रण, ऐच्छिक मंडळांची विपूलता व्यक्तिवादाचा प्रभाव, श्रमविभाजन व विशेषीकरण, सामाजिक गतिशीलतेस वाव व क्षेत्रिय नियोजन ही नागर समुदायाची वैशिष्ट्ये आहेत. नगरवाद म्हणजे नगरात किंवा शहरात राहणाऱ्या लोकांची विशिष्ट अशी जीवनपद्धती किंवा जीवनशैली होय. लुईस वर्थ यांनी नगरवादाची ''अस्थिरता, कृत्रिमता व अपरिचितता'' ही तीन प्रमुख वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. यानंतर तुम्ही ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता म्हणजेच फरक अभ्यासले आहेत. या दोन समुदायात व्यवसाय, पर्यावरण, आकार, लोकसंख्येची घनता, लोकसंख्येची सजातियता व विजातियता, गतिशीलता, स्थलांतराची दिशा, सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप, सामाजिक आंतरक्रियांचे स्वरूप व सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था इत्यादी मुद्यांच्या आधारे कशी भिन्नता आहे हे समजावून घेतले आहे.

## ३.६ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

१. साधारणपणे मर्यादित भूप्रदेशातील दाट व विजातीय स्वरूपाची लोकसंख्या, बिगरशेती व्यवसाय, बाजारपेठा, शैक्षणिक, आरोग्य, दळणवळण व मनोरंजन सुविधांची विपुलता, दुय्यम संबंधाचे प्राबल्य, कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या मानवी वस्तीस नागर समुदाय असे म्हणतात.

२. लुईस वर्थ यांनी नगरवादाची अस्थिरता, कृत्रिमता व अपरिचितता ही तीन वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

३. ग्रामीण व नागर समुदायातील तीन फरक पुढीलप्रमाणे आहेत.

अ) ग्रामीण समुदायात शेती तर नागर समुदायात बिगरशेती व्यवसाय चालतो.

ब) ग्रामीण समुदायावर नैसर्गिक तर नागर समुदायावर मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव अधिक असतो.

क) ग्रामीण समुदायात लोकसंख्येची घनता कमी तर नागर समुदायात ती जास्त असते.

४. रॉबर्ट रेडफिल्ड यांनी ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना मांडली.

## ३.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नागर समुदायाची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. ग्रामीण व नागर समुदायातील फरक स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नगरवाद - एक जीवनमार्ग

२. ग्रामीण व नागर समुदायातील फरक स्पष्ट करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी.

३. नागर समुदायाच्या व्याख्येसाठी वापरले जाणारे निकष.

## ३.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- नगराच्या जवळ असलेल्या एका खेड्यास भेट द्या. आणि त्या खेड्यात नागरी जीवनाच्या कोणकोणत्या पैलूंचा शिरकाव झालेला आहे याची नोंद करा.
- एका नगराचे निरीक्षण करा. आणि त्यामध्ये ग्रामीण जीवनाचे कोणकोणते पैलू आढळतात याची नोंद करा.

## ३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. भारतीय समाज - प्रा. चंद्रकांत खंडागळे - प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, १९९८.

२. ग्रामीण समाजशास्त्र - प्रा. चंद्रकांत खंडागळे - प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.

३. नगरीय समाजशास्त्र - शशी के जैन - रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर, १९९५.

❑❑❑

# घटक : ४

# नगरांची वाढ

## (Growth of Cities)

**घटक संरचना**


४.१ प्रस्तावना

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय विवेचन

४.३.१ नगरांचा उदय व वाढ : ऐतिहासिक पार्श्वभूमी

४.३.२ ई. ई. बर्गेल यांचे नगराचे वर्गीकरण

४.३.३ नगराच्या वाढीची कारणे

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ स्वाध्याय/गृहपाठ

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.१ प्रस्तावना (Introduction)

नागर समुदाय म्हणजेच नगर (city) ही नागर समाजशास्त्रातील मध्यवर्ती संकल्पना आहे. या शास्त्रात नगरांचा सविस्तर अभ्यास केला जातो. दुसऱ्या घटकात तुम्ही नगराची व्याख्या व वैशिष्ट्ये अभ्यासलेली आहेत. आता या तिसऱ्या घटकात तुम्ही नगरांचा उदय आणि वाढ किंवा विकास या बाबींचा अभ्यास करणार आहात. नगरे ही मानवी सभ्यतेइतकीच प्राचीन आहेत. नगरांची वाढ व विकास आणि मानवी सभ्यतेचा विकास हातात हात घालून झालेला आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जगात सर्वत्रच नगरे असली तरी त्यांचे स्वरूप सारखे नाही. याचाच अर्थ असा की नगरे ही विविध प्रकारची आहेत. म्हणून या घटकात तुम्ही नगरांचे विविध प्रकार म्हणजेच वर्गीकरण ही अभ्यासणार आहात.

## ४.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास –

- नगरांच्या वाढीची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेता येईल.
- नगरांचे वर्गीकरण स्पष्ट करता येईल.
- कोल्हापूर आणि मुंबई नगरांच्या वाढीचे स्वरूप विशद करता येईल.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject matter)

नगरांची वाढ वा विकास समजावून घेण्यासाठी आपण या घटकाचे तीन विभाग पाडलेले आहेत. पहिल्या विभागात नगरांचा उदय व वाढ यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या विभागात ई. ई. बर्गेलचे नगराचे वर्गीकरण स्पष्ट केले आहे. तर तिसऱ्या विभागात नगरांच्या वाढीची कारणे विशद केलेली आहेत.

### ४.३.१ नगरांचा उदय आणि वाढ : ऐतिहासिक पार्श्वभूमी

**(Origin and Growth of Cities : Historical Background)**

नगरांचा उदय व विकास किंवा वाढ समजण्यासाठी नगरांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे आवश्यक ठरते. तथापि नगरांचा उदय नेमका कधी झाला याचा कालावधी निश्चित करणे कठीण आहे. **रॉबर्ट बिअरस्टेड** यांनी त्यांच्या The social order या ग्रंथात असे नमूद केले आहे की नगरांचा उदय हा सुमारे ७ किंवा ८ हजार वर्षापूर्वी झालेला असावा. मानवाने शेतीशिवाय इतर व्यवसाय शोधून काढल्यानंतर नगरांचा उदय झाला असावा. दगडी कोळसा व लोखंड यांचा उपयोग, वाहतूक साधने व विविध यंत्रे व तंत्रे यांचा शोध व वापर इत्यादी घटकांमुळे नगरांचा उदय होण्यास चालना मिळाली. याचाच अर्थ असा की मानवी सभ्यतेच्या उदयाबरोबरच नगरांचा उदय झालेला असावा. नगरे ही मानवी सभ्यतेइतकीच प्राचीन आहेत. नगरे व मानवी सभ्यतेचा उदय व विकास हातात हात घालून झाला.

**खेडी : नगरांचे उगमस्थान :** जगातील बहुसंख्यांक नगरे ही त्यांच्या प्रारंभिच्या अवस्थेत गाव किंवा खेडी म्हणूनच वसलेली होती. यासंदर्भात **ममफोर्ड** आपल्या 'Culture of Cities' या ग्रंथात म्हणतात की ''नगरे ही प्रथम खेडी म्हणूनच विकसित झाली. त्यामध्ये विशाल राज्यांच्या राजधान्याही समाविष्ट होत्या. तथापि पाषाणयुगात कशाप्रकारे खेडी ही नगरांत रुपांतरीत झाली याचा ठोस पुरावा आपणाकडे नाही.'' जगातील बहुसंख्यांक लोक हे प्रदीर्घकाळापर्यंत खेड्यातच रहात होते. इ.स. पूर्व १८०० पर्यंत जगात फारच थोडी नगरे होती. प्राचीन वा प्रारंभिच्या काळातील नगरांचा शोध अद्याप मानवास लागलेला नाही. नगरांच्या उदयाची व वाढीची ऐतिहासिक पार्श्वभूमी आपणास तीन टप्प्यातून अभ्यासता येईल. १) प्राचीन काळातील नगरे २) मध्ययुगातील नगरे ३) आधुनिक काळातील नगरे.

**१) प्राचीन काळातील नगरे :** विद्वानांच्या मते इतिहासपूर्वकाळापासून नगरांचे अस्तित्व आढळते. तथापि प्राचीन काळातील नगरे ही आजच्या आधुनिक नगराइतकी मोठी नव्हती. आजच्या

भाषेत ती शहरे (Towns) होती. ही शहरे प्रामुख्याने नद्यांच्या खोऱ्यात वसलेली होती. नद्यांचे जलमार्ग हे वसाहत व व्यापार यांच्या प्रगतीसाठी सोयीचे होते. त्यामुळे नाईल, तैग्रिस, युफ्रेटिस, हुआँग हो, सिंधु इत्यादी नद्यांच्या खोऱ्यात अनेक नगरे उदयास आली. **एच. सी. वेल्स** यांच्या मते मेसोपोटेमियातील 'अर' हे सर्वात प्राचीन (इ.स. पूर्व ३५००) नगर आहे. या नगराच्या अवशेषावरून तेथे अनेक मजली घरे, मातीचे मनोरे, मंदिरे, शाळा, कालवे, बंदरे इत्यादी गोष्टी असल्याचे अनुमान केले जाते. मेसोपोटेमियाची नगररचना शैली ही पूर्वेस, इराण, उत्तरेस मेसिडोनिया, पश्चिमेस रोमपर्यंत पसरली होती. प्राचीन नगरामध्ये इ.स. पूर्व ३००० च्या सुमारास अस्तित्वात असलेले बॅबिलन हे महत्त्वाचे शहर होते. त्याची नगररचना ही चौरसाकृती होती. त्याच्याभोवती संरक्षक तटबंदी व पाण्याचे खंदक होते. त्याच्या मध्यातून युफ्राटीस नदी वाहात असल्याने शहराचे दोन भाग पडलेले होते. नदीच्या पूराच्या मर्यादा अभ्यासून नदीपासून अंतर ठेऊन उंच चबुतऱ्यावर इमारती (तीन चार मजली) बांधलेल्या होत्या. तेथील रस्ते विस्तीर्ण व सरळ होते. प्राचीन इंजिप्तची नगरेदेखील अत्यंत भव्य होती. इ.स. पूर्व २६०० मध्ये गीझा नगराभोवती पिरॅमिड उभारली गेली. पिरॅमिडच्या बांधकामाचे कामगार व कारागीर यांच्यासाठी राजाज्ञेवरून अनेक शहरे वसविण्यात आली होती. प्राचीन काळातील ग्रीकांची 'पोलिस' ही नगरराज्ये वैशिष्ट्यपूर्ण होती. ग्रीकांनी अनेक खेडी वसविलेली होती. पुढे अर्थात्पादन व संरक्षण या उद्देशाने जमीनदार, जहागीरदार, व्यापारी इत्यादी एकत्र येऊन अनेक खेड्यांचे नगरांत रुपांतर झाले. कांही खेडी आकाराने वाढत जाऊन नगरे बनली. एकमेकांजवळची खेडी एकत्र येऊन नगरराज्ये निर्माण झाली. अर्थात नगरराज्ये ही लहान म्हणजे सुमारे १० हजारापेक्षा कमी लोकसंख्येची होती. 'अथेन्स' हे नगर मात्र १ ते १.५ लाख लोकसंख्येचे होते. ऑलिंपिया, डेल्फॉय, कॉस इत्यादी ग्रीक नगरे प्रसिद्ध होती. रोमन लोकांची प्राचीन नगरेही उल्लेखनीय होती. रोमन साम्राज्य म्हणजे जणू नगरे उभारण्याचा एक मोठा उद्योगच होता. पाँपेई. हर्क्युलेनियम, रोम, ऑस्ट्रिया इत्यादी प्राचीन रोमन नगरे अत्यंत वैभवशाली होती. भारतातील प्राचीन नगरांपैकी सिंधु संस्कृतीच्या काळातील (इ.स. पूर्व २५०० ते १७००) हराप्पा व मोहेंजोदारो ही नगरे उल्लेखनीय होती. या नगरांची रचना ही अत्यंत नियोजनबद्ध होती. पक्क्या विटांची दुमजली-तीनमजली घरे, सरळ रस्ते, बंदिस्त गटारे, भव्य व सुंदर स्नानगृहे इत्यादींनी युक्त अशी ही नगरे होती. प्राचीन काळात धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण अशी काशी, हरिद्वार, द्वारका, मथुरा इ. नगरे उभारण्यात आली होती. मौर्यकाळात पाटलीपुत्र, वैशाली, उज्जयीन इ. तर गुप्तकाळात मथुरा, प्रयाग, काशी, नालंदा, गया, कनोज इत्यादी नगरे विकसित झाली होती.

### मध्ययुगातील नगरे

रोमन सत्तेचा ऱ्हास झाला तरी रोमन तंत्रविद्या टिकून राहिली. वाढत्या व्यापारामुळे भारत व चीन येथील प्रगत तंत्रविद्या पाश्चात्य लोकांना उपलब्ध झाली. बंदुकीची दारू, कागद, छपाई इत्यादी गोष्टी पाश्चात्त्यांना मिळाल्या. परिणामी शहरांची संख्या झपाट्याने वाढली. इ.स. ५ वे शतक ते १५०० पर्यंत ख्रिस्ती चर्चचा युरोपवर प्रभाव होता. त्यामुळे मध्ययुगीन युरोपियन नगरे ही ख्रिस्ती नगरे होती. ख्रिस्ती धर्मप्रणित जीवन जगणे ह्या उद्देशातून नगरे स्थापन करण्यात आली. त्यांच्यावर चर्च, मठ, अमीरउमरावांचे किल्ले, व्यापारी-कारागीरांचे संघगृहे (गिल्ड हॉल्स) यांचा ठसा होता. पुढे सरंजामशाहीच्या काळात चर्चचे नगरांवरील वर्चस्व कमी झाले. त्यांच्या जागी राजे, सरदार, अमीर, उमराव अशा अभिजनांचे वर्चस्व आले. त्यांनी नवीन नगरे उभारण्यास उत्तेजन दिले. नगरात

वास्तव्यास येणाऱ्यांना करमाफीची सवलत दिली. नगरात व्यापारी, उद्योजक, कारागीर, कलाकार, विद्वान अशांना उदार आश्रय मिळू लागला. परिणामी महत्त्वाकांक्षी लोक नगरांकडे स्थलांतर करू लागले. परिणामी नगरांचा विस्तार होऊ लागला. मध्ययुगीन शहरे प्रारंभी खेड्यासारखीच होती. घरे रस्त्याच्या दोन्ही बाजूस बांधली जात. पण रस्ते हे अरुंद होते व ते पक्केही नव्हते. पुढे मोठ्या शहरांत रस्तेबांधणी सुरू झाली. उदा. ११८४ मध्ये पॅरिस शहरात तर १२३५ मध्ये फ्लॉरेन्स शहरात रस्तेबांधणी सुरू झाली. तथापि शहरांची लोकसंख्या आजच्यासारखी अफाट नव्हती. ती कांही हजारावरच होती. उदा. १४ व्या शतकात लंडन शहराची लोकसंख्या ही सुमारे ४० हजार होती. मात्र पॅरिस व व्हेनिस या शहरांची लोकसंख्या मात्र १ लाखापर्यंत होती. मात्र ही उदाहरणे अपवादात्मक होती.

**लुईस ममफोर्ड** यांच्या मते मध्ययुगीन नगरांच्या उदय व विकासामागे सरंजामदार वर्गाची भूमिका महत्त्वाची होती. सरंजामदारांनी आपले उत्पन्न वाढविण्यासाठी नगरांच्या विकासास प्रोत्साहन दिले. तसेच नवीन केंद्रे ही स्थापन केली. अर्थात सरंजामांची सत्ता ही विखुरलेली होती. पुढे ही सत्ता एकत्रित करून मध्यवर्ती ठिकाणी राजकीय सत्तेचे केंद्र निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. यातूनच राजधानी-नगर (कॅपिटल सिटी) हा नवीन नगराचा प्रकार उदयास आला. मध्ययुगात नगरांच्या सुरक्षिततेसाठी किल्ले बांधले गेले. किल्ल्याभोवती पाण्याचे खंदक खोदले गेले. त्यामुळे किल्ल्यांबरोबरच नगरांचा विकास झाला. हळूहळू ही नगरे व्यापार केंद्रे बनली. ही केंद्रे वाहतुकीच्या सोयीसाठी रस्त्यांच्या कडेला किंवा किल्ल्यांच्या आसपास किंवा समुद्रकिनाऱ्यावर उभारली गेली. कालांतराने ही केंद्रे व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बनली. व्हेनिस, मिलन, फ्लोरेंस, जिनिव्हा इत्यादी नगरांचा विकास याच पद्धतीने झाला.

मध्ययुगीन भारतात मुस्लिम राजवट होती. अनेक मुस्लिम आक्रमकांनी विविध नगरांवर आक्रमणे केली. तथापि त्यापैकी अनेक नगरांचा कालांतराने विकास घडून आला. कनोज, मथुरा, थानेश्वर, सोमनाथ, दिल्ली, दौलताबाद, हैद्राबाद, अहमदनगर, औरंगाबाद इत्यादी नगरांचा विकास मुस्लिम राजवटीतच झाला.

### ३) आधुनिक काळातील नगरे

औद्योगिक क्रांतीनंतर नगरांचा विकास, विस्तार व वाढ जलद गतीने घडून आला. औद्योगिक क्रांतीनंतर सरंजामशाहीचा अस्त झाला. उत्पादन प्रक्रियेचे यांत्रिकीकरण झाले. उत्पादनात संकीर्ण श्रमविभाजन व विशेषीकरण उदयास आले. कारखाना उत्पादन पद्धती सुरू झाली. कारखान्यात मोठमोठ्या यंत्रांच्या साह्याने सुबक व विपूल प्रमाणात वस्तूंचे उत्पादन होऊ लागले. त्यामुळे मानवाच्या सुखसुविधामध्ये प्रचंड वाढ झाली. प्रारंभी मोठमोठे कारखाने उद्योगधंदे हे शहरात किंवा शहराजवळ निघाले. त्यामुळे कारखान्याभोवती लोकवस्ती केंद्रित झाली. पुढे मोटार, रेल्वे अशी जलद गतीची वाहने व टपाल, तारायंत्र, दूरध्वनी अशी संदेशवहन साधने उदयास आली. त्यांचा वापर वाढत गेला. आणि कारखान्यापासून दूर अंतरावर वस्ती करणे शक्य झाले. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून जुन्या शहरांचा विस्तार होत गेला. तर कांही नवीन शहरे उदयास आली. शहरांची/नगरांची संख्या वाढली. उदा. इंग्लंड आणि वेल्समध्ये १८०१ मध्ये ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येची केवळ १०६ शहरे होती. त्यांची संख्या १८९१ मध्ये ६२२ इतकी झाली.

औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिकीकरणाची गती जगभर वाढली. औद्योगिकीकरणापाठोपाठ नागरीकरणास चालना मिळाली. शहरे/नगरे ही उद्योग, व्यापार, रोजगार, शिक्षण, प्रशिक्षण, मनोरंजन, कला, क्रीडा इत्यादीची केंद्रे बनली. त्यामुळे शहरी जीवनपद्धतीचे आकर्षण वाढले. खेड्यातील व सभोवतालच्या प्रदेशातील लोक नगरांकडे स्थलांतर करू लागले. हे लोक विभिन्न वंशाचे, वर्गाचे, धर्माचे, भाषेचे, प्रांताचे असल्याने शहरी लोकसंख्या विजातिय स्वरूपाची बनली. विद्वान, धाडसी, महत्त्वाकांक्षी, तज्ज्ञ, विशेषज्ज्ञ इत्यादींना शहरे ही आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाची केंद्रे वाटू लागली. त्यामुळे ते शहरात आश्रय घेणे पसंत करू लागले. त्याचबरोबर अपंग, अनाथ, बेकार, भिकारी, दिनदुबळे असे निम्न गुणवत्तेचे लोकही शहरांच्या आश्रयास येऊ लागले. यातूनच शहरांची लोकसंख्या वाढू लागली आणि शहरांमध्ये राहत्या जागेची टंचाई, झोपडपट्ट्या गुन्हेगारी, बेकारी, व्यसनाधिनता, चोरटा व्यापार, जुगार, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, पर्यावरणाचे प्रदूषण अशा गंभीर समस्या उद्‌भवल्या. आज जातील सर्वच लहानमोठी नगरे ही अशा समस्यांनी ग्रस्त आहेत.

भारतासारख्या देशात ब्रिटिश राजवटीत औद्योगिकीकरणास प्रारंभ झाला. उद्योगधंदे, व्यापार वाढला. वाहतूक व दळणवळण साधनांचे जाळे विणले गेले. परिणामी छोट्या शहरांचे मोठ्या नगरात रुपांतर होऊ लागले. उदा. कोलकोता, (कलकत्ता) मुंबई, चेन्नई (मद्रास), पाँडेचरी इत्यादी. याशिवाय डेहराडून मसूरी, नैनीताल, सिमला इत्यादी थंड हवेची ठिकाणे ही नगर म्हणून विकसित झाली. स्वातंत्र्यानंतर टाटानगर, भिलाई, बोकारो, दुर्गापूर अशी औद्योगिक नगरेही उदयास आली. अर्थात अन्य देशातील नगरांप्रमाणे भारतातील आधुनिक नगरे ही विविध समस्यांनी ग्रासलेली आहेत.

### ४.३.२ ई. ई. बर्गेलचे वर्गीकरण (E. E. Bergel's classification)

नगरांच्या उदय व वाढीची पार्श्वभूमी अभ्यासल्यानंतर आता तुम्ही इ. ई. बर्गेल यांचे नगरांचे वर्गीकरण अभ्यासणार आहात. ई. ई. बर्गेल यांनी त्यांच्या 'Urban Sociology' या ग्रंथात नगरांचे प्रमुख सात प्रकार पाडलेले आहेत.

१. **आर्थिक केंद्र** (Economic Centre) अशा केंद्रांचे पाच प्रकारांत विभाजन केलेले आहे. १) आर्थिक केंद्र, २) राजकीय केंद्र, ३) सांस्कृतिक केंद्र, ४) आरोग्य केंद्र, ५) निवास केंद्र, ६) सांकेतिक नगर, ७) विविधतापूर्ण नगर

**अ) उत्पादन केंद्र** (Production Centre) यामध्ये **खाणीची केंद्रे** (उदा. दगडी कोळशाची खाण असलेले झारिया, सोन्याची खाण असलेले कोलार इ.) **खनिज तेलाची** केंद्रे (उदा. दिग्बोई, अंकलेश्वर इ.) आणि मत्स्योद्योग केंद्रे (उदा. समुद्रकिनाऱ्यावर वसलेले लहान लहान नगरे) यांचा समावेश होतो.

**ब) औद्यौगिक केंद्र** (Production Centre) यामध्ये मोठमोठे उद्योगधंदे असणारी केंद्रे (उदा. टाटानगर, चित्तरंजन, पेरांबूर, दुर्गापूर, बेंगलोर इ.) तसेच लघुद्योग चालणारी केंद्रे (उदा. चिनी मातीची भांडी बनविणारे ग्वाल्हेर, पितळी खेळणी बनविणारे जयपूर, लाकडी खेळणी बनविणारे सावंतवाडी इ.) समाविष्ट होतात.

**क) व्यापारी केंद्र** (Commercial centre) यामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराची केंद्रे (उदा. कोणत्याही देशातील मोठी नगरे) आणि स्थानिक पातळीवरील व्यापारी केंद्रे (लहान नगरे/शहरे) यांचा समावेश होतो.

**ड) परिवहन केंद्र** (Transportation Centre) यामध्ये मोटार वाहतूकांची केंद्रे, मोठमोठी रेल्वे जंक्शन स्टेशन, बंदरे आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विमानतळ असणारी केंद्रे समाविष्ट होतात.

**ई) आर्थिक सेवा केंद्र** (Economic Service Centre) यामध्ये स्टॉक एक्स्चेंज व शेअर बाजार तसेच वित्तीय कंपन्या असणारी केंद्रे येतात.

२. **राजकीय केंद्र** (Political Centre) राजकीयदृष्ट्या महत्त्वाची असलेली केंद्रे दोन प्रकारची असतात.

**अ) नागरी राजकीय केंद्रे** (Civil Political Centres) यामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाची केंद्रे (उदा. जिनिव्हा, पॅरिस, हेग, न्यूयॉर्क इ.) राष्ट्रीय राजधानी असलेली केंद्रे (उदा. दिल्ली, मॉस्को, लंडन इ.) घटकराज्यांच्या राजधानीची केंद्रे (उदा. मुंबई, बेंगलोर, चेन्नई इ.) आणि स्थानिक प्रशासकीय केंद्रे (उदा. जिल्ह्याची व तालुक्याची ठिकाणे) समाविष्ट होतात.

**ब) लष्करी राजकीय केंद्र** (Military Political Centres) यामध्ये १) प्राचीन काळातील लष्करप्रमुखाचे शासन असलेली व सभोवताली तटबंदी असलेली नगरे येतात. आज अशी नगरे वसविली जात नाहीत. तसेच २) लष्करी छावणी असलेली केंद्रे (उदा. महू, अंबाला, पठाणकोट इ.) आणि लष्करी शिक्षण-प्रशिक्षणाची केंद्रे (उदा. डेहराडून, खडकवासला (पुणे) इ.) येतात.

३. **सांस्कृतिक केंद्र** (Cultural Centre)

धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, कलात्मकदृष्ट्या प्रसिद्ध असलेली नगरे यामध्ये येतात. अशा नगरांचे दोन उपप्रकार पाडता येतात.

**अ) धार्मिक केंद्र :** धार्मिकदृष्ट्या महत्त्वाची असणारी केंद्रे ही तीन प्रकारची असतात. १) धर्मशासन केंद्रे : उदा. 'रोम' (इटली) येथे पोपचे शासन तर 'लहासा' (तिबेट) येथे दलाई लामाचे शासन चालते. २) तीर्थयात्रेची केंद्रे (उदा. मक्का, गया, बद्रिनाथ, बनारस, अलाहाबाद इ.) ३) स्मारक केंद्रे (उदा. जेरुसलेम)

**ब) धर्मनिरपेक्ष सांस्कृतिक केंद्र :** यामध्ये (१) शैक्षणिक केंद्रे (उदा. प्राचीन काळातील नालंदा व तक्षशिला आणि आजचे पुणे, इंग्लंडमधील ऑक्सफर्ड व केंब्रिज इ.) (२) विशेष संस्कृती केंद्र (उदा. लखनौ) (३) ऐतिहासिक स्मारक केंद्रे (उदा. सांची, सारनाथ, अजंठा-वेरुळ, मदुराई इ.) (४) सांस्कृतिक उदा. सारनाथ, मथुरा इ.) थंड हवेची ठिकाणे.

४. **आरोग्य केंद्र** (Health Centre)

यामध्ये आरोग्य आणि मनोरंजनाच्यादृष्टीने प्रसिद्ध असलेली नगरे येतात. उदा. मसूरी, उटी, पंचमढी, सिमला, दार्जिलिंग इ.

५. **निवास केंद्र** (Residential Centre)

या प्रकारची केंद्रे दोन प्रकारची असतात.

**अ) उपनगर** – महानगरांच्या जवळ लहान लहान उपनगरे वसली जातात. ह्या लहान नगरातील लोक दिवसा महानगरात कामासाठी येतात व रात्र परत लहान नगरात निवासासाठी येतात. उदा. शाहदरा (दिल्ली) खार (मुंबई) बिजलपूर (इंदोर) हबीबगंज (भोपाल) इ.

**ब) विश्राम केंद्र** – सेवानिवृत्तीनंतर लोक विश्राम करण्यासाठी अशा नगरामध्ये जाऊन राहतात. पाश्चात्य राष्ट्रात अशी नगरे आहेत. भारतात मात्र ती नाहीत.

६. **सांकेतिक नगरे** (Symbolic Cities)

या प्रकारची नगरे कोणती तरी विचारसरणी, तत्त्वज्ञान, संस्कृती, धर्म किंवा कालावधी इत्यादीच्या विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे प्रतिनिधित्व करतात. उदा. मास्को (रशिया) हे साम्यवादी विचारसरणीचे प्रतिक आहे. रोम (इटली) हे कॅथालिक चर्चचे प्रतिक आहे.

७. **विविधतापूर्ण नगरे** (Diversified Cities)

या प्रकारच्या नगरांमध्ये विविध प्रकारची कार्ये चालतात. पण कोणत्याच कार्याचे विशेषीकरण झालेले आढळत नाही. उदा. दिल्ली, आग्रा.

### ४.३.३ नगराच्या वाढीची कारणे (Causes of Growth of Cities)

नगरांच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्र्वभूमी अभ्यासताना नगराच्या वाढीची कारणे अभ्यासावी लागतात. खेडी विस्तारत जाऊन त्यांचे शहरात, नगरात व महानगरात रुपांतर होत गेले आहे. नगराच्या उदयाची व विस्ताराची किंवा वाढीची कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१) कृषी व्यवसायाचा विकास** : खाद्यसंकलन, शिकार, पशुपालन या अवस्थेत मनुष्य अन्नाच्या शोधात सतत भटके जीवन जगत होता. शेतीचा शोध लागल्यानंतर त्याची भटकंती संपली. तो एके ठिकाणी स्थिर वस्ती करून राहू लागला. यातून प्रथम खेडी उदयास आली. शेती व्यवसायातील उत्पादन तंत्राचा विकास झाल्यानंतर मुबलक प्रमाणात अन्नधान्य पिकू लागले. त्यामुळे खेड्यातील लोकांच्या गरजा भागून शिल्लक राहिलेले अन्नधान्य, जेथे अन्नधान्य पिकत नाही अशा ठिकाणी पाठविण्यास सुरुवात झाली. यातूनच नगरांच्या उदयाची मुहूर्तमेढ रोवली गेली. नगरे ही प्रारंभापासूनच खेड्यातील अतिरिक्त अन्नधान्यावर अवलंबून आहेत. नगरांच्या उदयाची ही अवस्था नवपाषाण युगाच्या उत्तरार्धात ७ ते ८ हजार वर्षापूर्वीची मानली जाते. आधुनिक काळात शेती व्यवसायात रासायनिक खते, जंतुनाशके, संकरित बी-बियाणे, सुधारित शेती अवजारे, कृत्रिम पाणी पुरवठ्याची साधने (वीजपंप, धरणे, कालवे, लिफ्ट इरिगेशन, बोअरिंग, टुबवेल्स, ठिबक व तुषार सिंचन इ.) यांचा वापर करून कृषी उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढविणे शक्य झाले आहे. त्यामुळे शहराच्या व नगराच्या वाढीस चालना मिळाली आहे. युरोप-अमेरिकेत अशाप्रकारेच अनेक शहरे विकसित झाली आहेत. भारतात साखर कारखाने, सुत गिरण्या इत्यादी शेतीमालावर आधारलेल्या उद्योगाच्या आधारे अनेक खेड्यांना हळूहळू शहराचे स्वरूप प्राप्त झालेले आहे.

**२) धातुंचा शोध :** तांबे, कथिल, ब्राँझ, लोखंड इत्यादी धातूंचा शोध हेही नगरांच्या उदयाचे एक प्रमुख कारण आहे. धातुपासून मनुष्य विविध हत्यारे, शस्त्रे, यंत्रे, भांडीकुंडी, अलंकार बनवू लागला. त्यातूनच विविध प्रकारचे बिगरशेती व्यवसाय उदयास आले. परिणामी खेड्यातील कारागिरांची संख्या वाढत गेली व शहरे उदयास आली. **मार्गेट मूर**च्या मते नगरांचा उदय हा धातुयुगात झाला. तो म्हणतो धातुची हत्यारे ही दगडी हत्यारापेक्षा चांगली असल्याने धातुची हत्यारे वापरणारे लोक इतरांवर शासन करू लागले. यातूनच संरक्षणाच्यादृष्टीने सैन्य (लष्कर) उदयास आले. अशाप्रकारे स्थायी लष्करी केंद्राच्या रुपात अनेक शहरे उदयास आली.

सतराव्या-आठराव्या शतकात अनेक शास्त्रीय-तांत्रिक शोध लागले. त्यावर आधारलेली विविध यंत्रे व तंत्रे निर्माण केली गेली. यालाच औद्योगिक क्रांती म्हणतात. या क्रांतीमुळे उत्पादनासाठी मोठमोठी यंत्रे वापरली जाऊ लागली. यातूनच उत्पादनासाठी मोठमोठे कारखाने निघाले. कारखान्याच्या ठिकाणी भांडवलदार, कामगार, तंत्रज्ञ, व्यापारी, विक्रेते अशाप्रकारे लोक वास्तव्य करू लागले आणि यातूनच आधुनिक काळातील औद्योगिक शहरे, नगरे, महानगरे उदयास आली.

**३) व्यापार वृद्धी :** कृषी व्यवसायाच्या विकासामुळे अन्नधान्याचे तर यंत्रतंत्राच्या वापरामुळे अन्य वस्तुंचे उत्पादन वाढले. यातूनच व्यापार उदयास आला. वाढत्या लोकसंख्येबरोबर उत्पादनवाढ होऊन व्यापार वृद्धीही होऊ लागली. जी ठिकाणे, गावे, खेडी, ही एका प्रदेशातून वा देशातून दुसऱ्या प्रदेशात वा देशात जाण्याच्या मार्गावर होती तेथून व्यापारी लोक येऊ जाऊ लागले अशाप्रकारे तेथील व्यापार भरभराटीस येऊन तेथे नगरे उदयास आली.

**४) दळणवळण सुविधा :** नगरांच्या उदय व विकासात वाहतूक साधनांचे व संदेशवहन साधनांचे मोठे योगदान आहे. प्रवास व व्यापार यासाठी प्रथम मानवाने घोडा, बैल, उंट, गाढव अशा प्राण्यांचा वापर सुरू केला. वाहतूक सुलभ व्हावी म्हणून सडका निर्माण केल्या. सडकांवर म्हणजेच पक्क्या रस्त्यांवर अनेक नगरे वसवली गेली. औद्योगिक क्रांतीनंतर सायकल, मोटार, रेल्वे अशी जलदगतीची वाहने वापरली जाऊ लागली. त्यातून रस्ते व लोहमार्गांचा विकास झाला. ही गोष्ट नगरांच्या विकासास कारणीभूत ठरली. रस्त्यावरील वाहतुकीपेक्षा नद्या, सरोवर, समुद्र इत्यादीद्वारे म्हणजेच जलमार्गाद्वारे वाहतूक अधिक सुलभ व स्वस्त पडते. त्यामुळे मानवाने तरफ, होडी, नाव, जहाज अशी साधने निर्माण केली. परिणामी नद्या, सरोवरे, समुद्रकिनारा अशा ठिकाणी नगरे विकसित झाली. समुद्रकिनाऱ्यावर बंदरे बांधल्याने 'बंदर-शहरे' उदयास आली. पुढे मानवाने विमानाचा शोध लावला. जेथे विमानतळ आहे अशी ठिकाणे वेगाने नगरात रुपांतरीत होऊ लागली.

वाहतूक साधनांबरोबरच वृत्तपत्रे, पुस्तके, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, टेलिफोन, टपाल व तारायंत्र इत्यादी संदेशवहन साधनांचीही नगरांच्या विकासातील भूमिका महत्त्वाची ठरली आहे. या साधनांमुळे व्यापार, उद्योग, प्रशासन, संरक्षण, शिक्षण, मनोरंजन इत्यादींचा वेगाने विकास झाला व त्यातूनच नगरांच्या विकासास चालना मिळाली. यासंदर्भात **चार्लस कूले** म्हणतो की, ''नगरांचा उदय व विकास हा दळणवळण साधनांच्या विकासाचाच परिणाम आहे. जेथे वाहतूक व संदेशवहन साधनांच्या विकासास अनुकूल स्थिती आहे; तेथेच साधारणपणे मोठमोठी नगरे वसलेली आहेत.''

**५) राजकीय घटक :** नगरांच्या उदयास व विकासास राजकीय घटकही जबाबदार आहेत. प्रारंभापासूनच नगरे ही राजकीय घडामोडीची केंद्रे असल्याचे आढळते. साधारणतः मध्यवर्ती व

सुरक्षित अशा ठिकाणी देशाच्या व प्रांताच्या राजधान्या स्थापन केल्या जातात. तेथे राज्यकर्ते, प्रशासक, सैनिक यांची कार्यालये व निवासस्थाने उभारली जातात. शिवाय तेथे उद्योग, व्यापार, शिक्षण-प्रशिक्षण, कला इत्यादींना उत्तेजन मिळते. परिणामी अशी ठिकाणी नगरांमध्ये रुपांतरीत होतात. उदा. पूर्वी चंदीगढ हे लहान गाव होते. पंजाबची राजधानी केल्यानंतर त्याचा वेगाने विकास होऊन ते अत्याधुनिक नगर बनले.

**६) नागरी जीवनाचे आकर्षण :** नागरी जीवनाचे आकर्षण हेही नगरांच्या उदय व विकासाचे एक महत्त्वपूर्ण कारण आहे. नागरी जीवनपद्धती ही नेहमीच ग्रामीण लोकांच्या आकर्षणाचे केंद्र राहिलेली आहे. नगरातील जीवनशैली ही आकर्षक व चैनीची असते. तेथे महत्त्वाकांक्षी लोकांना प्रगतीच्या विविध संधी उपलब्ध असतात. तसेच उद्योग, व्यापार, रोजगार, शिक्षण, प्रशिक्षण, मनोरंजन, आरोग्य इत्यादीबाबतच्या सोयीसुविधांची रेलचेल असते. परिणामी सभोवतालच्या प्रदेशातील लोक नागरी क्षेत्राकडे धाव घेतात. त्यामुळे शहरांचा विस्तार होऊन नगरे, नगरांचा विस्तार होऊन महानगरे तर महानगरांचा विस्तार होऊन प्रचंड नगरे उदयास येतात.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

१. एच. सी. वेल्स यांच्या मते सर्वात प्राचीन नगर कोणते आहे?

२. स्वातंत्र्यानंतर भारतात उदयास आलेल्या औद्योगिक नगरांची नावे लिहा.

३. नगरांच्या वाढीची प्रमुख कारणे सांगा.

४. ई. ई. बर्गेल यांनी नगराचे किती व कोणते प्रकार सांगितले आहेत.

## ४.५ सारांश (Let us Sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही प्रथम नगरांची वाढ कशी होत गेली याची ऐतिहासिक पार्श्वभूमी १) प्राचीन काळातील नगरे २) मध्ययुगातील नगरे आणि ३) आधुनिक नगरे अशा तीन टप्प्यात अभ्यासलेली आहे. त्यानंतर तुम्ही नगरांचे विविध प्रकार समजावून घेण्यासाठी बर्गेल या समाजशास्त्रज्ञांनी नगरांचे दिलेले वर्गीकरण अभ्यासलेले आहे. बर्गेलने नगरांचे आर्थिक केंद्र, राजकीय केंद्र, सांस्कृतिक केंद्र, आरोग्य केंद्र, निवास केंद्र, सांकेतिक नगर आणि विविधतापूर्ण नगर असे सात प्रकार पाडलेले आहेत. सर्वात शेवटी नगराच्या वाढीच्या कारणांचा अभ्यास केला आहे.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check your Progress)

१. एच. सी. वेल्स यांच्या मते मेसोपोटेमियातील 'अर' हे सर्वात प्राचीन नगर आहे.

२. टाटानगर, भिलाई, बोकारो, दुर्गापूर इत्यादी.

३. नगरांच्या वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) कृषी व्यवसायाचा विकास ब) धातुंचा शोध क) व्यापार वृद्धी ड) दळणवळण सुविधा ई) राजकीय घटक फ) नागरी जीवनाचे आकर्षण.

४. ई. ई. बर्गेल यांनी नगराचे पुढील सात प्रकार सांगितले आहेत.

अ) आर्थिक केंद्र, ब) राजकीय केंद्र, क) सांस्कृतिक केंद्र, ड) आरोग्य केंद्र, ई) निवास केंद्र, फ) सांकेतिक नगर, ग) विविधतापूर्ण नगर.

## ४.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नगरांच्या उदय व वाढीची ऐतिहासिक पार्श्वभूमी रेखाटा.

२. ई. ई. बर्गेल यांनी केलेले नगरांचे वर्गीकरण स्पष्ट करा.

३. कोल्हापूर शहराची वाढ स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नगराच्या वाढीची कारणे

२. ई. ई. बर्गेलचे नगरांचे वर्गीकरण

## ४.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- तुमच्या जवळपासच्या एखाद्या नगरास भेट देऊन त्याच्या वाढीस जबाबदार असणाऱ्या कारणांची नोंद करा.
- कोल्हापूर नगराच्या वाढीत शिवाजी विद्यापीठाचे असलेले योगदान समजावून घ्या व त्या आधारे एक टिपण तयार करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. E. E. Bergel - Urban Sociology.

२. नगरीय समाजशास्त्र - शशी के. जैन - रिसर्च पब्लिकेशन, जयपूर-१९९६.

३. जनरल नॉलेज (वर्णनात्मक) - प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका - सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.

❑❑❑

## सत्र ६ : घटक १

# नागरी सामाजिक संरचना

## (Urban Social Structure)

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

  १.३.१ नागर कुटुंब : स्वरूप व परिवर्तन

  १.३.२ नागर कुटुंबाचे विघटन

  १.३.३ नागर वर्गसंरचना : प्रकार व परिवर्तन

१.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.५ सारांश

१.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ स्वाध्याय/गृहपाठ

१.८ चिंतन आणि कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना (Introduction)

या पाचव्या अध्ययन घटकात तुम्ही नागरी सामाजिक संरचनेचा अभ्यास करणार आहात. सामाजिक संरचना (Social Structure) ही समाजशास्त्रातील महत्त्वाची संकल्पना आहे. समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी सामाजिक संरचनेचा अभ्यास आवश्यक ठरतो. नागर समाजाचे आकलन होण्यासाठी नागरी सामाजिक संरचना अभ्यासावी लागते. **हॅरि जॉन्सच्या** मते ''कोणत्याही वस्तूच्या विविध घटकांमध्ये असलेले पुष्कळशा स्थिर स्वरूपाचे परस्परसंबंध म्हणजे त्या वस्तूची संरचना होय. दगड, विटा, चुना, वाळू, सिमेंट, लाकूड, लोखंड, इत्यादींचा केवळ ढिगारा म्हणजे घर नव्हे. जेव्हा या घटकांत बहुतांशी स्थिर व निश्चित स्वरूपाचे परस्परसंबंध प्रस्थापित होतात तेव्हा घर ही वस्तू तयार होते. घराच्या ह्या विविध घटकातील स्थिर व निश्चित परस्परसंबंधासच घराची संरचना असे म्हणतात. घराप्रमाणेच समाजासही संरचना असते. विविध सामाजिक समूह, संस्था, नियमने व मूल्ये इत्यादी समाजाचे घटक आहेत. या घटकांत बहुतांशी स्थिर व निश्चित स्वरूपाचे परस्परसंबंध प्रस्थापित झाले की समाजास संरचना प्राप्त होते. तिलाच सामाजिक संरचना असे म्हणतात. **टॉलकॉट**

**पार्सन्स** यांच्या मते ''परस्परसंबंधित संस्था, अभिकरणे आणि सामाजिक प्रतिमाने तसेच समूहात प्रत्येक व्यक्तीने धारण केलेले दर्जे व भूमिका यांच्या विशिष्ट मांडणीस किंवा व्यवस्थेस उद्देशून सामाजिक संरचना ही संज्ञा वापरली जाते.'' यावरून सामाजिक संरचनेत विविध संस्था, अभिकरणे, समूहातील पदे व भूमिका, सामाजिक प्रतिमाने इत्यादींचा समावेश होतो. नागरी समाजाच्या सामाजिक संरचनेतही वरील घटक अंतर्भूत आहेत. नागरी सामाजिक संरचना समजावून घेताना तुम्ही या ठिकाणी नागर समाजातील कुटुंबसंस्था, व वर्गसंरचना आणि नागर कुटुंबाचे विघटन यांचा अभ्यास करणार आहात.

## १.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हास -

- नागरी कुटुंबाचे स्वरूप व परिवर्तन समजावून घेता येईल.
- नागरी वर्गव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- नागरी कुटुंबाचे विघटन समजावून घेता येईल.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या घटकात तुम्ही नागरी सामाजिक संरचनेचा अभ्यास करणार आहात. विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे तीन भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागात कुटुंबाची व्याख्या व नागरी कुटुंबाचे वैशिष्ट्ये यांचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या भागात वर्गव्यवस्थेची चर्चा केलेली आहे. तर तिसऱ्या विभागात नागरी कुटुंबाचे विघटन स्पष्ट केलेले आहे.

### १.३.१ नागरी कुटुंब (Urban Family) : स्वरूप व परिवर्तन

नागरी सामाजिक संरचनेचा एक महत्त्वपूर्ण घटक असलेल्या कुटुंबसंस्थेचे स्वरूप व परिवर्तन तुम्ही समजावून घेणार आहात. त्यासाठी प्रथम कुटुंबाची व्याख्या व वैशिष्ट्ये संक्षिप्त स्वरूपात समजावून घेऊ व त्यानंतर नागरी कुटुंबाचे स्वरूप व परिवर्तन समजावून घेऊ.

#### कुटुंबाची व्याख्या (Definition of family)

कुटुंब हा सामाजिक संरचनेचा एक प्रमुख घटक आहे. कुटुंब हे व्यक्तीच्यादृष्टीने कामतृप्ती, बालसंगोपन, समाजीकरण, शारीरिक व मानसिक संरक्षण तर समाजाच्या दृष्टीने संस्कृती-संक्रमण, सामाजिक नियंत्रण, समाज सातत्य राखणे इत्यादी कार्ये पार पाडते. म्हणून समाजशास्त्रात कुटुंबाच्या अभ्यासास अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. कुटुंब म्हणजे काय हे समजण्यासाठी त्याच्या कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पाहू.

१. **मॅकायव्हर आणि पेज :** प्रजोत्पादन व अपत्याचे संगोपन करण्यासाठी पर्याप्तपणे निश्चित व दीर्घकाळ टिकणाऱ्या लैंगिक संबंधावर आधारलेला समूह म्हणजे कुटुंब होय.

२. **मार्शल जोन्स :** कुटुंब ही लैंगिक संबंधावर आधारलेली एक सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही तिची कार्ये आहेत.

३. **किंबाल यंग :** कुटुंब हा असा सामाजिक समूह आहे की ज्यामध्ये एक किंवा अनेक पुरुष आणि एक किंवा अनेक स्त्रिया आपल्या स्वतःच्या किंवा दत्तक घेतलेल्या अपत्यांसह निदान अपत्ये मोठी होईतोपर्यंत तरी एकाच घरात राहतात.

वरील व्याख्यांवरून कुटुंबाचा एक संस्था म्हणून तसेच एक समूह म्हणून विचार करता येतो. वेगवेगळी पदे व त्यांच्याशी संबंधित भूमिका, सदस्यांच्या वर्तनाचे नियम, त्यामागील उद्देश इत्यादी अमूर्त गोष्टींचा विचार करता कुटुंब ही एक सामाजिक संस्था ठरते. याउलट एकत्र येऊन परस्पर सहकार्याने निश्चित उद्दिष्टांची पूर्तता करणारा गट यादृष्टीने विचार करता कुटुंब एक सामाजिक समूह ठरतो.

**कुटुंबाची वैशिष्ट्ये** (Characteristics of family)

जगातील सर्वच समाजात कुटुंब असून त्याची सामान्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. **विवाह बंधन :** कुटुंबाची उभारणी ही दोन किंवा अधिक भिन्न लिंगीय व्यक्तीतील विवाहसंबंधावर होते.

२. **रक्तसंबंध :** कुटुंबातील सदस्यात रक्तसंबंध असतात. मातापिता व त्यांची अपत्ये यांच्यात रक्तसंबंध असतात. तसेच मातापित्यांचे ज्यांच्याशी रक्तसंबंध असतात त्यांच्याशीही अपत्यांचे रक्तसंबंध प्रस्थापित होतात. मात्र मातापिता व दत्तक मुले आणि सावत्र माता किंवा पिता व सावत्र मुले यांच्यातील रक्तसंबंध खरे नसून गृहीत धरलेले असतात.

३. **द्विपक्षीयता :** कुटुंब द्विपक्षीय समूह आहे. त्यामध्ये पित्याकडील (काका, आत्या) आणि मातेकडील (मामा-मावशी) नातेवाईकांना महत्त्वाचे स्थान असते.

४. **समान निवासस्थान :** साधारणतः कुटुंबातील सदस्य एकाच घरात निवास करतात. मात्र कांही वेळा कांही कुटुंबातील सदस्य वेगवेगळ्या ठिकाणी राहताना आढळतात.

**मॅकाव्हर व पेज** यांनी कुटुंबाची **प्रभेदक** वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

१. **सार्वत्रिकता :** मानव समाजाच्या विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये व जगातील सर्वच समाजात कुटुंब आढळते. म्हणून कुटुंब सार्वत्रिक स्वरूपाचा समूह ठरतो.

२. **भावनात्मकता :** कामतृप्ती, प्रजोत्पादन, वात्सल्य, प्रेमसंपादन, वंशाभिमान, वंशवृद्धी, आर्थिक स्थैर्य, वस्तूवरील वैयक्तिक मालकी हक्क इत्यादी भावभावना कुटुंबाच्या मुळाशी आहेत.

३. **अग्रता :** कुटुंब हे व्यक्तीचे पहिले सामाजिक पर्यावरण असते. तिचा जन्म व पालनपोषण कुटुंबातच होत असल्याने व्यक्तीवर प्रभाव टाकणाऱ्या समूहात व संस्थात कुटुंब अग्रस्थानी असते.

**४. लघुआकार :** कुटुंब हा सर्वात लहान आकाराचा समूह आहे. कुटुंबातील सदस्यांची संख्या जीवशास्त्रीय नियमानुसार निश्चित होत असल्याने व्यक्तीला स्वइच्छेनुसार कुटुंबाचा आकार वाढविता येत नाही.

**५. सदस्यांचे उत्तरदायित्व :** इतर कोणत्याही समूहापेक्षा व्यक्तीला आपल्या कुटुंबाविषयी अधिक जबाबदारीची जाणीव असते. व्यक्ती केवळ स्वतःसाठी नव्हे तर कुटुंबासाठी जगत असते; कुटुंबासाठी वाटेल तो त्याग व कष्ट करीत असते.

**६. सामाजिक नियंत्रण :** कुटुंबाचे स्वरूप कायम रहावे म्हणून विविध सामाजिक नियमनांच्याद्वारे कुटुंबाच्या विविध अंगाचे नियंत्रण केले जाते.

वर नमूद केल्याप्रमाणे कुटुंब हा जगातील सर्वच समाजात आढळणारा सामाजिक समूह आहे. आणि कुटुंबाची वरील वैशिष्ट्ये ही जगातील सर्वच समाजातील सर्व प्रकारच्या कुटुंबात आढळतात. नागर समाजातील कुटुंबातही ही वैशिष्ट्ये आढळतात. तथापि नागर कुटुंबाची इतर कांही खास अशी वैशिष्ट्ये आहेत, जी ग्रामीण कुटुंबात किंवा आदिम कुटुंबात आढळत नाहीत किंवा अगदीच अल्प प्रमाणात आढळतात. नागर कुटुंबाचे स्वरूप व परिवर्तन पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. केंद्र कुटुंब** (Nuclear family) : कुटुंबातील सदस्यांच्या संख्येच्या आधारे कुटुंबाचे केंद्र कुटुंब व संयुक्त कुटुंब असे दोन प्रकार पडतात. पती पत्नी व त्यांची अविवाहित अपत्ये एवढेच सदस्य (दोन पिढ्यांचे) असलेल्या कुटुंबास केंद्र कुटुंब म्हणतात. याउलट ज्या कुटुंबात पती-पत्नी, त्यांची विवाहित मुले व सुना, अविवाहीत मुली, विवाहित व अविवाहीत नातवंडे आणि इतरही कांही जवळचे नातलग (दोनपेक्षा अधिक पिढ्यांचे) इत्यादी सदस्य एकत्र राहतात त्यास संयुक्त कुटुंब म्हणतात.

आधुनिक काळातील नागरी कुटुंब हे प्रामुख्याने केद्र कुटुंब आहे. पारंपारिक किंवा औद्योगिक-पूर्व नगरातील कुटुंबे ही केंद्र तसेच संयुक्त अशा दोन्ही प्रकारची होती. मात्र औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिकीकरण व नागरीकरण यामुळे संयुक्त कुटुंबाची जागा हळूहळू केंद्र कुटुंबानी घेतली आहे. पतीपत्नी व त्यांची अविवाहित अपत्ये एवढेव सदस्य असलेले केंद्र किंवा विभक्त कुटुंब नागर समाजात अनेक दृष्टीने सोयीचे ठरत गेले व ते रूढ झाले आहे. साधारणतः नागरी कुटुंबातील मुले विवाहानंतर कांहीकाळ मातापित्याच्या कुटुंबात राहतात आणि नंतर शक्यतो लगेच त्या कुटुंबापासून विभक्त होऊन स्वतंत्र असे वेगळे कुटुंब म्हणजेच केंद्र कुटुंब स्थापन करतात.

**२. लहान आकाराचे कुटुंब :** नागरी कुटुंब हे केंद्र किंवा विभक्त प्रकारचे कुटुंब असल्याने त्याचा आकार संयुक्त कुटुंबाच्या तुलनेत लहान असतो. व्यक्तिवादाचा प्रभाव, राहत्या जागेची टंचाई, उच्च जीवनमान टिकविण्याची आकांक्षा, स्त्रीने ही नोकरी धंदा करणे, नगरातील धावपळीचे जीवन इत्यादी कारणांमुळे नगरात कुटुंबाचा आकार लहान ठेवणे गरजेचे व सोयीचे ठरते. म्हणून पतीपत्नी व त्यांची अपत्ये यांच्याशिवाय इतर नातेवाईक नागरी कुटुंबात अडचणीचे ठरतात. तसेच संतती नियमनांच्या साधनांमुळे प्रजोत्पादनाद्वारे वाढणारा कुटुंबाचा आकार मर्यादित वा नियंत्रित ठेवणे शक्य झाले आहे. आज पित्याचाच व्यवसाय मुलाने पुढे चालविणे किंवा मातापित्याच्याच समुदायात (नगरात) मुलांना रोजगार मिळणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे मुलांचे इतरत्र स्थलांतर

करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळेही नागरी कुटुंबाचा आकार लहान ठेवणे शक्य होत आहे.

**३. पितृसत्ताक अधिकाराचा ऱ्हास :** नागरी कुटुंबात कुटुंबप्रमुख असलेल्या पुरुषाच्या (पतीच्या वा पित्याच्या) एकाधिकारशाहीचा बऱ्यापैकी ऱ्हास झालेला आहे. नागरी कुटुंबात पती हाच कुटुंब प्रमुख असला तरी त्याला पत्नी व मुलांच्या मतांचा, आवडीनिवडीचा, आशाआकांक्षाचा आदर करून निर्णय घ्यावे लागतात. मातापिता आपले निर्णय मुलांवर सक्तीने लादत नाहीत व मुले ही मातापित्यांच्या प्रत्येक आज्ञेचे आंधळेपणाने पालन करीत नाहीत. मातापिता व प्रौढ मुलेमुली ही परस्पर सहमतीने कौटुंबिक निर्णय घेतात. म्हणजेच नागरी कुटुंब हे मोठ्याप्रमाणावर समतावादी असल्याचे आढळते. याचाच अर्थ असा की नागरी कुटुंबात एकाधिकारशाहीच्या जागी लोकशाही व्यवस्था अधिक आढळते.

**४. स्त्रियांचा उन्नत दर्जा :** नागरी कुटुंबात स्त्रियांचा दर्जा बराच उन्नत (उच्च) झालेला आहे. पती हा पत्नीच्या सल्ल्यानेच कौटुंबिक अधिकार वापरतो. किंवा पती पत्नीमध्ये ह्या अधिकारांचे विभाजन झालेले असते. कुटुंबातील कामाच्या बाबतीत लिंगभेदावर आधारलेले कार्यविभाजन शहरात टिकू शकत नाही. कमावत्या पत्नीला पती स्वयंपाक व इतर घरकामात मदत करतो. नोकरीधंद्यामुळे सतत घराबाहेर राहणाऱ्या पुरुषास कुटुंबाच्या दैनंदिन व्यवहाराकडे लक्ष देणे शक्य नसते. त्यामुळेच पती बाजारहाट करणे, पोष्टात, बँकेत जाणे, विविध बीले भरणे, मुलांना शाळेत नेणे-आणणे, त्यांचा अभ्यास घेणे इ. कामे करणे व त्याबाबतचे स्वातंत्र्य/अधिकार तिला प्राप्त होतात. नोकरी करणारे पतीपत्नी त्यांच्या सोयीनुसार व सवडीनुसार घरातील व घराबाहेरील कामे पार पाडतात. एकंदरीत नागरी कुटुंबात परिस्थितीजन्य समता प्रस्थापित झालेली असते. मुलाप्रमाणेच मुलींनाही अनेक अधिकार व स्वातंत्र्य दिले जाते. पत्नीला पायाची दासी न मानता 'सखी'/सहचारिणी मानले जाते. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा उन्नत असलेला दिसतो.

**५. व्यक्तिवादाचा प्रभाव :** नागरी कुटुंब हा एक सामाजिक समूह असला तरी त्याच्यावर समष्टीवादापेक्षा व्यक्तिवादाचा अधिक प्रभाव असतो. नागर समाजात व्यक्तिला स्वकर्तृत्वाने शिक्षण, नोकरी, व्यवसाय, पैसा, प्रतिष्ठा मिळविण्याची संधी मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे मातापित्यांची इच्छा, कुटुंबाची गरज, कुलाचार इत्यादीपेक्षा व्यक्तिगत इच्छा-आकांक्षा अधिक महत्त्वाच्या ठरतात. शिक्षण, व्यवसाय, विवाह याबाबतचे निर्णय घेताना सदस्य कुटुंबाच्या हितापेक्षा स्वतःच्या हितास अधिक प्राधान्य देताना दिसतात.

**६. कुटुंबाची कार्ये :** नागरी कुटुंबाची अनेक पारंपारिक कार्ये ही इतर संस्था, संघटना, समूह व मंडळे यांच्याकडे हस्तांतरीत झालेली आहेत. प्रजोत्पादनाचे कार्य हे आजही कुटुंबातच चालते. तथापि त्यासाठी डॉक्टर्स, नर्स, प्रसुतीगृहे यांचे तर बालसंगोपनासाठी बालरोग तज्ज्ञ, बाल आरोग्य केंद्रे यांचे सहाय्य व सल्ला घेतला जातो. नोकरीधंदा करणाऱ्या जोडप्यांना मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणागृहे, शिशू सदन, अंगणवाडी इत्यादीवर अवलंबून रहावे लागते. मुलांच्या सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी नागरी कुटुंब बालवाडीपासून विद्यापीठापर्यंतच्या शिक्षणसंस्थांवर अवलंबून आहे. मुलांचे समाजीकरण व त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण कुटुंबाच्या हातात फारसे राहिलेले नाही. मुलांचा बराचसा वेळ घराबाहेर जातो. त्यामुळे नोकरी करणारे मातापिता मुलांना शिस्त लावणे,

त्यांच्यावर संस्कार करणे, त्यांचे मनोरंजन करणे यासाठी फारसा वेळ देऊ शकत नाहीत. करमणूक, खेळ, शिक्षण, स्वास्थ्य इत्यादीबाबत नागरी कुटुंबास इतर संस्थांवर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर कुटुंबाबाहेरील ह्या संस्थांचा व पर्यावरणाचा मोठा प्रभाव पडतो; व त्यामुळे त्यांची वृत्ती कुटुंबनिरपेक्ष असे स्वहित पाहण्याची बनते. त्यातूनच कुटुंब सदस्यांच्या परस्परसंबंधात परिवर्तन होत राहते.

अर्थव्यवस्थेतील उत्पादन, वितरण, विनिमय व उपभोग या चार प्रक्रियांपैकी केवळ उपभोग हीच प्रक्रिया नागरी कुटुंबाच्या हातात राहिलेली आढळते. इतर प्रक्रिया इतर संस्था व संघटनांकडे हस्तांतरीत झाल्या आहेत. नागर समाजात व्यक्तीचा दर्जा व प्रतिष्ठा कुटुंबावरून निर्धारित न होता व्यक्तिच्या कर्तृत्वाच्या आधारे निर्धारित होतो. व्यक्तिला मिळालेला दर्जा व प्रतिष्ठा तिच्या कुटुंबाच्या पुढच्या पिढीत टिकून राहील याची शाश्वती आज राहिलेली नाही.

७. **कुटुंबाशी संबंधित समस्या :** नागरी कुटुंबाशी संबंधित अशा अनेक समस्या आधुनिक काळात निर्माण झालेल्या आहेत. नगरातील केंद्र वा विभक्त कुटुंबात नात्यातील वृद्ध, अपंग, निराधार, परित्यक्ता इत्यादींना आश्रय मिळेनासा झाला आहे. व्यावसायिक, सामाजिक व भौगोलिक गतिशीलतेमुळे कमावती मुले व वृद्ध मातापिता यांच्यात भौतिक, भावनिक व आर्थिक दुरावा निर्माण झालेला आहे. त्यातून वृद्धांची समस्या तीव्र बनलेली आहे. वृद्धावस्थेत कौटुंबिक संरक्षण मिळेनासे झाल्याने भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन, आयुर्विमा, वृद्धाश्रम इ. सुविधा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे उदरनिर्वाहास मदत होत असली तरी भावनिक दुरावा व एकाकीपणा नाहीसा होत नाही.

नागरी कुटुंबात पत्नीदेखील पतीप्रमाणेच सुशिक्षित व कमावती असल्याने ती कुटुंबात समान दर्जाची अपेक्षा करते आणि पतीकडून ती अपेक्षा पूर्ण न झाल्यास पती-पत्नी संबंधात वितुष्ट येते. कमावत्या स्त्रियांचे कुटुंबाकडे, मुलांकडे कांहीसे दुर्लक्ष होते. यातून मुले बिघडतात, वाईट मार्गास लागतात. त्याबाबत पती-पत्नी परस्परांना दोषी ठरवितात. यातून ताणतणाव वाढत जातात आणि त्याचे पर्यावसन घटस्फोटात होते. घटस्फोटाचे वाढते प्रमाण हे नागरी कुटुंबाच्या दृष्टीने चिंताजनक बनले आहे.

८. **सापेक्षतः अस्थिर कुटुंब :** नागरी कुटुंब हे ग्रामीण कुटुंबाशी तुलना करता कांहीसे अस्थिर असल्याचे जाणवते. नागरी कुटुंबातील सदस्यसंख्या कमी असते. तसेच कुटुंब सदस्यांवर व्यक्तीवादाचा मोठा पगडा असतो. त्यामुळे हे कुटुंब मोठे आघात सहन करू शकत नाही. कुटुंबप्रमुखाच्या मृत्यूने, अपघाताने वा नोकरीधंदा बुडाल्याने नागरी कुटुंब उघड्यावर पडते. घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणामुळे हे कुटुंब चटकन उध्वस्त होते. कमावती मुले विभक्त झाल्याने वृद्ध मातापित्यांचे कुटुंब अस्थिर बनते. आई एका मुलाकडे तर पिता एका मुलाकडे अशी विभागणी झाल्यास मुळचे कुटुंब संपुष्टात येते.

**१.३.२ नागर कुटुंबाचे विघटन** (Disorganization of Urban Family)

आधुनिक नागर कुटुंबाचे हळूहळू विघटन होत आहे. **एलियट आणि मेरिल** यांच्या मते ''व्यापक अर्थाने पाहता कुटुंबाचे विघटन म्हणजे विविध प्रकारच्या कुटुंबातील कार्यात्मक विसंवादाची तऱ्हा होय.'' कुटुंबातील विघटनाची कांही ठळक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. **कौटुंबिक ऐक्याचा अभाव :** नागर कुटुंबातील सदस्यांमध्ये कौटुंबिक ऐक्याचे प्रमाण घटत चालले आहे. प्रत्येक सदस्याच्या गरजा, धोरणे, ध्येये, कार्यक्रम, इत्यादी भिन्न असून त्यामध्ये इतरांचा हस्तक्षेप नाकारला जातो. एकाच घरात राहणे, जेवणे, झोपणे या क्रिया एखाद्या लॉज वा हॉटेलमधल्यासारख्या होत चालल्या आहेत. पती-पत्नी दोघेही कमावते असतील तर ऐक्यभावनेचा अभाव दिसून येतो.

२. **कुटुंबाच्या नियंत्रणात घट :** नागर कुटुंबाचे आपल्या सदस्यांवरील नियंत्रण हळूहळू घटत चालले आहे. त्यांना व्यक्तिस्वातंत्र्य हवे असते व इतरांचे नियंत्रण नको असते. म्हणूनच नोकरी लागताच किंवा विवाह होताच मुले स्वतंत्र होऊ इच्छितात.

३. **विवाह बंधनातील शिथिलता :** कुटुंबाची उभारणी ही विवाहबंधनावर होते. तथापि नागर समाजात आता विवाह हा धार्मिक संस्कार न राहता एक करार बनला आहे. आणि हा करार फायदेशीर ठरत नसल्यास तो मोडण्याकडे म्हणजेच घटस्फोट घेण्याकडे प्रवृत्ती वाढत आहे. स्त्रीचे उच्चशिक्षण, कमावणे, आर्थिक स्वावलंबन, पतीची पारंपारिक मनोवृत्ती इत्यादीमुळे विवाहबंधन आणि म्हणून कौटुंबिक संबंध शिथिल होत आहेत. आधुनिक नागर कुटुंबातील पती-पत्नीचा विवाह हा बहुधा प्रेमविवाह असतो. विवाहापूर्वीच्या प्रेमिकांच्या अपेक्षा व स्वप्ने विवाहानंतर प्रत्यक्षात न साकार झाल्यास त्यांचा अपेक्षाभंग होतो व ते घटस्फोटास बळी पडतात. परिणामी कुटुंबाचे विघटन होते.

४. **दोन पिढ्यातील संघर्ष :** नागर कुटुंबातील पालक व मुले यांच्यातील संघर्ष वाढत चालले असून मुलांना मातापित्यांचे मार्गदर्शन, नियंत्रण नकोसे वाटत आहे. दोन पिढ्यातील वैचारिक अंतर वाढत चालले असल्याने त्यांच्यातील संघर्ष कौटुंबिक विघटनाचे कारण ठरत आहे.

५. **संरक्षणाचा अभाव :** नागर कुटुंबातील पती व पत्नीत, तसेच मातापिता व मुले यांच्यातील संघर्ष वाढत चालल्याने नागरी कुटुंब व्यक्तीला मानसिक व भावनिक संरक्षण देण्यास असमर्थ होत चालले आहे. पूर्वी कुटुंबातील संघर्षाचे निवारण हे जवळच्या नात्यातील वयस्कर लोक व सामाजिक रूढीपरंपरा व मूल्यांद्वारे होत असे. आज नागरी कुटुंबात जवळच्या नातलगांना स्थान व महत्त्व नाही. तसेच पारंपारिक मूल्यांचा प्रभाव ओसरला आहे. परिणामी नागरी कुटुंबास सामाजिक संरक्षण मिळेनासे झाले आहे. त्यामुळेही कुटुंबाचे विघटन घडून येत आहे.

**नागरी कुटुंबाचे भवितव्य :** आज नागर कुटुंब अनेक समस्यांनी ग्रस्त असून विविध घटकांचा प्रभाव पडून त्याचे विघटन सुरू झाले आहे. त्यामुळे त्याच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. भविष्यात नागरी जीवनात कुटुंबाचे अस्तित्व राहील की नाही अशी शंका व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात असे म्हणता येईल की कुटुंबसंस्था ही मानवाच्या मूलभूत, जैविक वा नैसर्गिक गरजांची पूर्तता करणारी प्रमुख संस्था असून ती समाजरचनेचा गाभा आहे. कुटुंबापुढे अनेक समस्या

असल्या व त्याच्या कार्यांचा संकोच झाला असला तरीही भविष्यातदेखील कुटुंबसंस्था टिकून राहील. कारण प्रजोत्पादन, वात्सल्य भावना ह्या मानवाच्या नैसर्गिक भावना असून त्यांच्या पूर्तीसाठी मानव कुटुंब टिकवून ठेवीलच असे वाटते. नागरी कुटुंबातील सदस्यांत दिवसेंदिवस विसंवाद वाढत चालला असला तरी तो कमी करण्यासाठी कौटुंबिक स्वास्थ्य सल्ला केंद्रे शहरात निघाली आहेत. कुटुंबाची अनेक कार्ये इतर संस्थानी आपल्याकडे घेतली असली तरी माया, ममता, प्रेम, जिव्हाळा, आत्मियता या गोष्टी कुटुंबाशिवाय अन्यत्र कोठेही मिळू शकत नाहीत. आणि त्यामुळेच कुटुंबाचे अस्तित्व टिकून राहील अशी आशा समाजशास्त्रज्ञांना वाटते.

## १.३.३ नागर वर्गसंरचना : प्रकार व परिवर्तन

कुटुंबाप्रमाणेच सामाजिक स्तरीकरण व्यवस्था ही सामाजिक संरचनेचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे नागरी सामाजिक संरचनेचे स्वरूप समजण्यासाठी नागर समाजातील सामाजिक स्तरीकरणाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून या ठिकाणी तुम्ही सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ, प्रकार आणि भारतातील नागर समाजातील सामाजिक वर्गसंरचनेचा अभ्यास करणार आहात.

**सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ आणि व्याख्या :**

कोणत्याही समाजातील सर्व लोकांचा सामाजिक दर्जा (किंवा स्थान) समान मानला जात नाही. विविध निकषांच्या आधारे (उदा. जन्म, वय, लिंग, सत्ता, संपत्ती, शिक्षण इ.) लोकांच्या सामाजिक दर्जात श्रेष्ठ, मध्यम कनिष्ठ असा भेद करून त्यांचे विविध गटात किंवा स्तरात विभाजन केले जाते. या विभाजनासच सामाजिक स्तरीकरण असे म्हणतात. **पी. गिस्बर्ट** यांच्या मते श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा परस्परसंबंधाने परस्परांशी जोडलेल्या स्थायी समूहात किंवा प्रवर्गात समाजाचे झालेले विभाजन म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय. **रेमंड मूरे** यांच्या मते श्रेष्ठ-कनिष्ठ अशा सामाजिक एककात झालेली समतल विभागणी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय. **सदरलँड आणि वुडवर्थ** यांच्या मते सामाजिक स्तरीकरण ही विभेदनाची किंवा आंतरक्रियेची अशी सरळ प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे कांही व्यक्ती इतरापेक्षा उच्च मानल्या जातात.

**सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार**

सामाजिक स्तरीकरणाचे बंदिस्त (closed) स्तरीकरण व मुक्त (open) स्तरीकरण असे दोन प्रकार आढळतात.

१. **बंदिस्त स्तरीकरण :** ज्या स्तरीकरणात व्यक्तीला जन्माने प्राप्त होणारा सामाजिक दर्जा वा स्थान स्वकर्तृत्वाने बदलण्याची संधी नसते, त्यास बंदिस्त स्तरीकरण म्हणतात. या प्रकारात व्यक्ती ज्या सामाजिक स्तरात जन्मते तो स्तर मरेपर्यंत कायम राहते. एका सामाजिक स्तरातून दुसऱ्या सामाजिक स्तरात जात येत नाही. म्हणजेच सामाजिक गतिशिलतेचा अभाव असतो. भारतातील जातिव्यवस्था (caste system) हे बंदिस्त स्तरीकरण आहे.

२. **मुक्त स्तरीकरण :** ज्या स्तरीकरणात व्यक्तीला जन्माने प्राप्त होणारा सामाजिक दर्जा वा स्थान स्वकर्तृत्वाने बदलण्याची संधी असते त्यास मुक्त स्तरीकरण म्हणतात. या प्रकारात व्यक्ती ज्या सामाजिक स्तरात जन्मते तो स्तर व्यक्तीला बदलता येतो. म्हणजेच या प्रकारात सामाजिक

गतिशीलतेस वाव असतो. पाश्चात्त्य समाजात उदयास आलेली वर्गव्यवस्था (class system) हे मुक्त सामाजिक स्तरीकरण आहे.

समकालीन भारतीय समाजात सामाजिक स्तरीकरणाचे हे दोन्ही प्रकार आढळतात. पारंपारिक भारतात जातिव्यवस्थेचे प्राबल्य होते तर आधुनिक भारतात जातिव्यवस्थेचा प्रभाव हळूहळू कमी होत चालला असून त्याजागी वर्गव्यवस्था हळूहळू रूजत चालली आहे. म्हणजेच भारतीय समाज विशेषतः नागर समाज हा सामाजिक स्तरीकरणाच्या दृष्टीने संक्रमणावस्थेत आहे असे म्हणता येईल. नागर समाजातील सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप समजण्यासाठी वर्गसंरचनेचे स्वरूप थोडक्यात अभ्यासू.

**वर्गाचा अर्थ :** समाजात अनेक लोक असतात. पण त्या सर्वांचे समाजातील स्थान किंवा दर्जा समान नसतो. जन्म, लिंग, वय, सत्ता, संपत्ती, शिक्षण इ. घटकांच्या आधारे त्यांच्या स्थानात किंवा दर्जात भेदभाव केला जातो. कांही लोकांचे स्थान वा दर्जा कनिष्ठ तर काहींचा या दोन्हीच्या मध्ये मानला जातो. ज्यांचे स्थान व दर्जा समान असतो अशा लोकांचा एक समूह निर्माण होतो. या समूहासच साधारणपणे सामाजिक वर्ग असे म्हणतात आणि हा वर्ग त्याच्या सामाजिक दर्जाच्या दृष्टीने समाजातील इतर वर्गापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असतो. एका सामाजिक वर्गात मोडणाऱ्या लोकांचे सामाजिक स्थान वा दर्जा जसा समान असतो तसेच त्यांची आर्थिक स्थिती, अभिवृत्ती, वर्तनप्रकार, सामाजिक मूल्ये व एकंदर जीवनपद्धती इ. गोष्टीही साधारणपणे समानच असतात. या समानतेमुळेच त्यांच्यात आपण सर्व एका वर्गाचे सदस्य आहोत अशी जाणीव निर्माण झालेली असते. या जाणीवेसच वर्ग-जाणीव असे म्हणतात. ह्या वर्ग जाणीवेमुळेच एक वर्ग दुसऱ्या वर्गाहून भिन्न ठरतो. प्रत्येक वर्ग समाजातील आपली वर्ग प्रतिष्ठा (Class prestige) जोपासण्याचा प्रयत्न करतो. अशा या वर्गव्यवस्थेत व्यक्तिला आपले सामाजिक स्थान वा दर्जा उंचावण्याची व त्याआधारे वर्ग बदलण्याची संधी असते. म्हणजेच वर्गव्यवस्थेत सामाजिक गतिशीलतेला वाव असतो. म्हणून वर्गव्यवस्था मुक्त सामाजिक स्तरीकरण ठरते.

**वर्गाची व्याख्या :**

१) **प्रा. चंद्रकांत खंडागळे :** सामाजिक वर्ग हा एखाद्या समाजात समान सामाजिक दर्जा असलेल्या लोकांचा असा समूह असतो की जो इतर समूहांपेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानला जातो आणि आपल्या सदस्यांना दर्जा बदलण्याची संधी देतो.

२) **हॉर्टन व हंट :** सामाजिक दर्जाच्या अधिक्रमी रचनेत समान स्थान असणाऱ्या लोकांचा स्तर म्हणजे सामाजिक वर्ग होय. (A social class may be defined as a stratum of people of similar position in the social status hierarchy.)

३) **मॅकायव्हर व पेज :** सामाजिक वर्ग म्हणजे एखाद्या समुदायाचा असा कोणताही विभाग की जो त्याच्या सामाजिक दर्जामुळे इतर विभागापेक्षा वेगळा करता येतो. (A social class is any portion of a community marked off from the rest by social status.)

४) **पी. गिसबर्ट :** सामाजिक वर्ग म्हणजे समाजात निश्चित दर्जा असणाऱ्या लोकांचा असा प्रवर्ग किंवा समूह आहे की त्या दर्जामुळे त्यांचे इतर समूहांशी असणारे संबंध स्थायी स्वरूपात

निर्धारित झालेले असतात. (A social class is a category of group of persons having a definite status in society which permanently determines its relation to other groups.)

५) **टिश्लेर, व्हायटन आणि हंटर :** समान संधी, समान आर्थिक व व्यावसायिक स्थाने, समान जीवनशैली आणि समान अभिवृत्ती व वर्तनप्रकार असणाऱ्या लोकांचा प्रवर्ग म्हणजे सामाजिक वर्ग होय. (A social class consists of a category of people who share similar opportunities, similar economic and vocational positions, similar life-style and similar attitudes and behaviour)

**वर्गाची वैशिष्ट्ये :**

वरील व्याख्यांच्या आधारे सामाजिक वर्गाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतात.

१) **सामाजिक दर्जा हा आधार :** सामाजिक वर्ग हा व्यक्तिच्या जन्मावर नव्हे तर तिच्या सामाजिक दर्जावर किंवा स्थानावर आधारलेला असतो. व्यक्तिचा सामाजिक दर्जा किंवा स्थान तिचा सामाजिक वर्ग निश्चित करते. समान सामाजिक दर्जा असणाऱ्या लोकांचा एक वर्ग निर्माण होतो.

२) **अधिक्रमी रचना :** वर्गव्यवस्था ही सामाजिक स्तरीकरणाचा एक प्रकार असल्याने तिच्यात श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या भावनेवर आधारलेली अधिक्रमी रचना किंवा सोपान परंपरा निर्माण झालेली असते. म्हणजे एक वर्ग हा इतर वर्गापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानला जातो आणि विविध वर्गांचे हे श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व हे समाजमान्य झालेले असते. तसेच व्यक्तिनेदेखील तिला तिच्या वर्गानुसार मिळालेले श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठत्व स्वीकारलेले असते. व्यक्ती स्वतःस आपल्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या वर्गातील व्यक्तिपेक्षा सर्वच बाबतीत श्रेष्ठ समजत असते. याउलट ती स्वतःस आपल्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्या वर्गातील व्यक्तिपेक्षा सर्वच बाबतीत कनिष्ठ समजत असते. म्हणजेच आपल्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या वर्गाच्या बाबतीत व्यक्तिच्या मनात स्वतःविषयी 'अहंगंडाची' तर आपल्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्या वर्गाच्या बाबतीत तिच्या मनात स्वतःविषयी 'न्यूनगंडाची' भावना असते.

३) **मुक्त स्तरीकरण :** वर्गव्यवस्था ही मुक्त स्तरीकरण व्यवस्था आहे. कारण तिच्यामध्ये सामाजिक गतिशीलतेस वाव असतो. म्हणजे व्यक्तिला स्वकर्तृत्वाने कारखानदार बनू शकतो. सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण, विशेष कलाकौशल्य इ. संपादन करून कनिष्ठ व्यक्ती वर्गातील उच्च सामाजिक स्थान व दर्जा मिळवू शकते व उच्च वर्गात जाऊ शकते. यालाच उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलता (Upward social mobility) म्हणतात. अर्थात उच्च वर्गातील व्यक्तिचा श्रेष्ठ सामाजिक दर्जा कांही कारणाने ढासळल्यास ती व्यक्ती कनिष्ठ वर्गात फेकली जाऊ शकते. उदा. एखाद्या श्रीमंत व्यापाऱ्याचे दिवाळे निघाल्यास तो निर्धन होतो व त्याचा दर्जा ढासळून तो कनिष्ठ वर्गात फेकला जातो. यालाच अधोगामी गतिशीलता (Downward social mibility) असे म्हणतात. थोडक्यात वर्गव्यवस्थेत व्यक्तिचा सामाजिक दर्जा व वर्ग बदलू शकतो. त्यामुळे ती मुक्त (open) स्तरीकरण व्यवस्था ठरते.

४) **समान जीवनशैली :** एका सामाजिक वर्गातील सर्व लोकांची जीवनशैली किंवा जीवनपद्धती ही बहुतांशी समान असते. त्यांचे व्यवसाय भिन्न असले तरी ते समान दर्जाचे असतात. त्यांची

निवासस्थाने, पोषाख, अलंकार, समारंभ, आवडी-निवडी, आचारविचार, नीतीमूल्ये, सवयी इ. गोष्टींमध्ये बराचसा सारखेपणा असतो. एकाच वर्गातील लोकांची जीवनशैली समान असली तरी ती दुसऱ्या वर्गाच्या जीवनशैलीहून वेगळी असते. म्हणजे प्रत्येक वर्गाची स्वतःची अशी वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण जीवनशैली असते आणि तिच्यामुळे वर्गावरील भिन्नता सहजपणे जाणवते.

५) **वर्ग जाणीव :** व्यक्तिच्या मनात वर्ग जाणीव निर्माण झालेली असते. या वर्ग जाणीवेचे दोन पैलू असतात. (अ) व्यक्तिच्या मनात स्वतःच्या वर्गाबद्दल आपलेपणाची आणि निकटतेची भावना असते. (ब) दुसऱ्या वर्गाविषयी परकेपणाची व दूरत्वाची भावना असते. दोन वर्गातील आंतरक्रियेवरून ह्या वर्ग जाणीवेची प्रचिती येते. एकाच वर्गातील व्यक्तिचे हितसंबंध समान असतात व ते जपण्यासाठी त्या व्यक्ती एकत्र येतात. गरज पडल्यास इतर वर्गांशी संघर्षही करतात. अशाप्रकारे वर्ग जाणीव हे वर्गसंघर्षाचे मूळ कारण असते.

६) **मर्यादित संबंध :** वर्गजाणीवेमुळे वेगवेगळ्या वर्गातील परस्परसंबंध हे अत्यंत मर्यादित, तात्पुरते व कामचलाऊ असे असतात. एका वर्गातील लोक परस्परांशी घनिष्ठ संबंध ठेवताना दिसतात. मात्र आपल्यापेक्षा कनिष्ठ वर्गातील लोकांशी घनिष्ठ संबंध ठेवणे हे कमीपणाचे, अप्रतिष्ठेचे मानतात आणि जर कोणी ठेवत असले तर त्याची कुचेष्ठाही होते. अर्थात याबाबतचे कठोर निर्बंध नसतात. तथापि जे असतात त्याचे पालन बहुसंख्य लोक करतात.

७) **कुटुंब हा एकक :** सामाजिक वर्गाबाबतच्या आतापर्यंतच्या विवेचनात सामाजिक वर्ग हा व्यक्तिचा समूह आहे असे मानले आहे. पण **हॅरी जॉन्सनच्या** मते सामाजिक वर्ग ही व्यक्तिवाचक संज्ञा नसून कुटुंबवाचक संज्ञा आहे. त्यांच्या मते समाजात ज्यांचा सामाजिक दर्जा समान असतो अशा कुटुंबाचा समुच्चय म्हणजे सामाजिक वर्ग होय. साधारणतः समाजात एखाद्या कुटुंबाचा जो दर्जा असतो तोच त्या कुटुंबातील सदस्यांचा असतो. कुटुंबातील पुरुषाचा जो सामाजिक दर्जा असतो तोच त्या कुटुंबातील सदस्यांचा असतो. कुटुंबातील पुरुषाचा जो सामाजिक दर्जा असतो तो त्याच्या पत्नी व मुलांना मिळत असतो. अर्थात त्यामध्ये कालांतराने बदल होऊ शकतो. म्हणून जॉन्सन व्यक्तिऐवजी कुटुंबास समाजिक वर्गाचा एकक (Unit) मानतात.

८) **असंघटीत समूह :** सामाजिक वर्ग हा व्यक्तिंचा समूह असो वा कुटुंबाचा समूह असो तो समूह कोणीतरी जाणीवपूर्वक निर्माण केलेला नसतो. तर वेगवेगळे सामाजिक वर्ग हे समाजात आपोआपच उदयास आलेले असतात व ते असंघटीत समुहासारखे असतात. कुटुंब, कारखाना, कामगार संघटना, राजकीय पक्ष इ. सामाजिक समुहासारखे संघटन सामाजिक वर्गामध्ये नसते. म्हणून वर्ग असंघटीत समूह ठरतो.

९) **आर्थिक वर्गाहून भिन्न :** सामाजिक वर्ग ही संकल्पना आर्थिक वर्गाहून भिन्न आहे. सामाजिक वर्ग हा व्यक्तिच्या सामाजिक दर्जावर आधारलेला असतो. याउलट आर्थिक वर्ग हा व्यक्तिच्या सामाजिक दर्जावर आधारलेला असतो. 'आर्थिक व्यवस्थेत समान स्थान असणाऱ्या अनेक व्यक्ती म्हणजे वर्ग होय.' अशी जी वर्गाची व्याख्या **एलि चिनॉय** यांनी केली आहे ती आर्थिक वर्गास लागू पडते. आधुनिक भांडवलशाही समाजात व्यक्तीचे सामाजिक स्थान वा दर्जा निर्धारित करण्यामध्ये संपत्ती, व्यवसाय, उत्पादन साधने या आर्थिक घटकांना खूपच महत्त्व आलेले आहे.

तरीही केवळ आर्थिक घटकांच्या आधारेच व्यक्तिचा सामाजिक दर्जा व वर्ग ठरतो हे खरे, तथापि जुगार, चोरी, स्मगलिंग, भ्रष्टाचार अशा मार्गांनी श्रीमंत बनलेल्या व्यक्तिस समाज उच्च सामाजिक वर्गातला मानीलच असे नाही. याउलट फारशी संपत्ती नसलेला एखादा थोर शास्त्रज्ञ किंवा संगीतकार याचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ मानून त्याला उच्च सामाजिक वर्गातील मानले जाऊ शकते.

**१०) सार्वत्रिकता :** वर्गव्यवस्था ही सार्वत्रिक स्वरूपाची आहे. म्हणजे ती प्राचीन तसेच अर्वाचीन, प्रगत तसेच अप्रगत, नागरी तसेच ग्रामीण अशा सर्व प्रकारच्या समाजात आढळते. प्राचीन राजेशाहीच्या काळात राजघराण्यातील व्यक्ती, सरदार व प्रजा असे तीन वर्ग होते. मध्ययुगातील सरंजामशाहीत सरंजाम व कुळे असे दोन वर्ग होते. आधुनिक भांडवलशाहीत उच्च वर्ग, मध्यम वर्ग व कनिष्ठ वर्ग असे तीन वर्ग आढळतात. आधुनिक नागर समाजात हेच तीन वर्ग दिसून येतात.

**वर्गाचे प्रकार :**

पारंपारिक समाजात धार्मिक वा अध्यात्मिक ज्ञान, शारीरिक शक्ती, सत्ता, राज्यव्यवस्थेतील विशिष्ट पद इत्यादी निकषांच्या आधारे वर्गाचे निर्धारण होत असे. आधुनिक समाजात मात्र व्यक्तिच्या अंगी असलेली गुणकौशल्ये, शैक्षणिक पात्रता, संपत्ती, व्यवसायाचे स्वरूप, उत्पादन साधने, राजकीय अधिकार किंवा सत्ता इत्यादींच्या आधारे वर्गाचे निर्धारण होते.

या विविध निर्धारकापैकी संपत्ती किंवा मालमत्ता हा निर्धारक (निकष) वर्गाचा सर्वात महत्त्वपूर्ण निर्धारक मानला जातो. आधुनिक अर्थप्रधान समाजव्यवस्थेत व्यक्तिचे सामाजिक स्थान किंवा दर्जा म्हणजेच वर्ग निर्धारित करण्यामध्ये संपत्तीला सर्वाधिक महत्त्व दिले जाते. कारण संपत्तीद्वारेच व्यक्तिला समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा, सोयीसुविधा, मिळते. त्यामुळे आज संपत्तीच्या आधारे उच्च वर्ग, मध्यम वर्ग आणि निम्न वर्ग असे तीन प्रकार पाडले जातात.

**१) उच्च किंवा श्रेष्ठ वर्ग (Upper or Higher Class)**

समाजातील ज्या व्यक्तिंकडे खूप संपत्ती असते, जे गर्भश्रीमंत असतात त्या व्यक्तिंचा उच्च वर्गात समावेश होतो. हा वर्ग लोकसंख्येच्यादृष्टीने सर्वात कमी सभासद संख्या असलेला वर्ग असतो. पण तो समाजातील सर्वात शक्तीशाली वा प्रभावशाली वर्ग असतो. समाजातील उत्पादन साधनांचे व संपत्तीचे केंद्रीकरण या वर्गाच्या हाती झालेले असते. त्यामुळे या वर्गाकडे भौतिक सुखाच्या सर्व सोयीसुविधा असतात. जीवनातील सर्व ऐषोरामाचा उपभोग हा वर्ग घेत असतो. अत्याधिक संपत्तीमुळेच या वर्गास समाजात प्रतिष्ठा, उच्च स्थान, अधिकार या गोष्टी प्राप्त होतात. या गोष्टी तसेच आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी हा वर्ग संपत्तीचा हत्यार म्हणून वापर करीत असतो. आपल्या आशा आकांक्षा व गरजा पूर्ण करण्यामध्ये हा वर्ग सर्वात आघाडीवर व सामर्थ्यवान असतो.

भारतीय समाजातील मोठमोठे उद्योगपती, व्यापारी, राजकीय सत्ताधारी व्यक्ती (मंत्री, खासदार, आमदार), सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील प्रशासकीय/व्यवस्थापकीय पदावरील उच्च अधिकारी, मोठमोठे सिनेकलावंत व अन्य कलाकार, इत्यादींचा समावेश उच्च वर्गात करता येईल.

### २) मध्यम वर्ग (Middle Class)

उच्च वर्गातील लोकांपेक्षा कमी पण निम्न वर्गातील लोकांपेक्षा अधिक संपत्ती असलेल्या व्यक्तिंचा मध्यम वर्गात समावेश होतो. या वर्गातील लोकांकडे आर्थिक उत्पन्नाची निश्चित अशी साधने असतात. मात्र उत्पादन साधनांवर बहुधा त्यांचा एकाधिकार प्रस्थापित झालेला नसतो. आपल्या गरजा व आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी ह्या वर्गास सतत कार्यरत राहावे लागते. या वर्गातील लोक विविध व्यवसायाशी, नोकऱ्यांशी, उद्योगधंद्यांशी, सेवाक्षेत्राशी संबंधीत असतात. उच्च दर्जाची शारीरिक, बौद्धिक, मानसिक, व्यावसायिक कलाकौशल्ये या वर्गाकडे असतात व त्या आधारेच ते संपत्ती वा उत्पन्न मिळवित असतात. उच्च वर्गाच्या जीवनशैलीचे अनुकरण करून उच्च वर्गात समाविष्ट होण्याची इच्छा मध्यम वर्गातील व्यक्ती बाळगून असतात व त्यासाठी धडपडत असतात. विवाह, शिक्षण, गाडी, बंगला इत्यादीवर उच्च वर्गासारखा खर्च करू इच्छितात व तो करण्यासाठी त्यांना मोठी आर्थिक ओढाताण सहन करावी लागते.

भारतीय समाजातील डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्राध्यापक वकील, लघुद्योजक, मध्यम दर्जाच्या पदावरील शासकीय कर्मचारी इत्यादींचा मध्यम वर्गात समावेश करता येईल.

### ३) निम्न किंवा कनिष्ठ वर्ग (Lower class)

ज्यांच्याकडे जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी संपत्ती नसते म्हणजेच जे दरिद्री वा गरीब असतात अशा व्यक्ती या वर्गात मोडतात, लोकसंख्येच्या दृष्टीने हा वर्ग समाजातील सर्वात मोठा वर्ग असतो. या वर्गाकडे बहुधा निश्चित उत्पन्न देणारी साधने नसतात त्यामुळे जगण्यासाठी या वर्गास अपार कष्ट करावे लागतात. कुटुंबातील सर्व सदस्यांना पैसा मिळविण्यासाठी कोणते ना कोणते काम करावे लागते. सर्वजण मिळून जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी धडपडत असतात. आणि त्यामध्ये ते बऱ्यापैकी यशस्वी होत असतात. मात्र दुय्यम गरजा पूर्ण करण्याची त्यांची आर्थिक कुवत नसते. या वर्गातील कांही कुटुंबे आपल्या मुलाबाळांना शिक्षण देऊन निश्चित उत्पन्न देणारा एखादा धंदा वा नोकरी मिळवून देण्याची व त्याद्वारे मध्यम वर्गात प्रवेश करण्याची अभिलाषा बाळगून असतात. या वर्गास समाजात सर्वात कनिष्ठ स्थान असते. संपत्तीच्या अभावी सर्व क्षेत्रात ते मागासलेले असतात. सत्ता, संपत्ती, शिक्षण, सत्ता, अधिकार, मानसन्मान, प्रतिष्ठा इत्यादीपासून हा वर्ग वंचित राहिलेला असतो.

नागर समाजातील अकुशल कामगार, सफाई कामगार, हमाल, घरगडी व मोलकरणी, रोजंदारी करणारे मजूर इत्यादींचा निम्न वर्गात समावेश होतो.

आधुनिक काळातील नागर समाजात वरील तीन प्रमुख वर्ग आढळतात. भारतातही हे तीन वर्ग उदयास आलेले आहेत. नागर समाजातील जातिव्यवस्थेचे हळूहळू विघटन होत असून तिच्या जागी वर वर्णन केलेली वर्गव्यवस्था रूढ होत चालली आहे. भारतातील मोठमोठ्या नगरातील एकाच वर्गात विभिन्न जातीचे लोक एकत्रित होत असून त्यांच्यातील जातीची जाणीव हळूहळू शिथील होत आहे व त्या जागी वर्गीय जाणीव विकसित होत चालली आहे.

## १.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. कुटुंबाची कोणतीही एक व्याख्या द्या.

२. नागरी कुटुंबाची पाच वैशिष्ट्ये सांगा.

३. सामाजिक वर्ग म्हणजे काय?

४. जात आणि वर्ग यातील एक फरक सांगा.

## १.५ सारांश (Let us sum up)

ह्या पाचव्या अध्ययन घटकात तुम्ही नागर समाजातील सामाजिक संरचना समजून घेण्यासाठी नागरी कुटुंब, नागरी वर्गव्यवस्था यांचा बाबींचा अभ्यास केलेला आहे. नागरी कुटुंब हे केंद्र कुटुंब असून त्याचा आकार लहान असतो. या कुटुंबातून पितृसत्ताक अधिकाराचा ऱ्हास होत चालला आहे. आणि स्त्रियांचा दर्जा उंचावत आहे. या कुटुंबावर व्यक्तिवादाचा प्रभाव असून त्याची कांही पारंपारिक कार्ये इतर संस्थांकडे हस्तांतरीत झाली आहेत. आज नागरी कुटुंबासमोर अनेक समस्या आहेत. त्यानंतर तुम्ही सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ, वैशिष्ट्ये व प्रकार यांचा अभ्यास केला आहे. तसेच नागर समाजातील सामाजिक स्तरीकरणाचा एक प्रकार म्हणून वर्गव्यवस्थेचे विवेचन अभ्यासलेले आहे. शेवटी नागर कुटुंबाचे विघटन समजावून घेतलेले आहे.

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१. मार्शल जोन्सच्या मते कुटुंब ही लैंगिक संबंधावर आधारलेली एक सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही तिची कार्ये आहेत.

२. नागरी कुटुंबाची पाच वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

अ) नागरी कुटुंब हे केंद्र कुटुंब आहे.

ब) ते लहान आकाराचे आहे.

क) त्यामध्ये पितृसत्ताक अधिकाराचा ऱ्हास होत आहे.

ड) त्यामध्ये स्त्रियांचा दर्जा उंचावत आहे.

ई) त्याच्यावर व्यक्तिवादाचा प्रभाव आहे.

३. मॅकायव्हर आणि पेज यांच्या मते सामाजिक वर्ग म्हणजे एखाद्या समुदायाचा असा कोणताही विभाग की जो त्याच्या सामाजिक दर्जामुळे इतर विभागापेक्षा वेगळा करता येतो.

४. जात आणि वर्ग यातील एक फरक असा की जन्माने प्राप्त होणारा वर्ग व्यक्तीला स्वकर्तृत्वाने बदलता येतो मात्र जन्माने प्राप्त होणारी जात स्वकर्तृत्वाने बदलता येत नाही.

## १.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. कुटुंबाची व्याख्या देऊन नागरी कुटुंबाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. नागर समाजातील वर्गव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. सामाजिक स्तरीकरण

२. वर्गव्यवस्थेची वैशिष्ट्ये

३. नागर समाजातील वर्गाचे प्रकार

## १.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- नागरी कुटुंबात परिवर्तन घडवून आणणाऱ्या घटकांची नोंद करा.
- नागर समाजात जातीची पारंपारिक वैशिष्ट्ये कशी शिथिल होत आहेत याचे निरीक्षण करा.
- नागरी व्यवसाय व ग्रामीण व्यवसायातील भेद समजावून घेवून त्या आधारे भेददर्शक तक्ता तयार करा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. Urban Sociolog : Rajendra K. Sharma, Atlantic Publishers & Distributors, New Delhi - 1997.

२. भारतीय समाज - रचना आणि परिवर्तन, प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका मायादेवी खंडागळे, सांगली-२००६.


❑❑❑

घटक २

# नागरी सामाजिक समस्या

## (Urban Social Problems)

**घटक संरचना**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

२.३.१ निवास आणि गलिच्छ वस्तीची समस्या

२.३.२ मादक द्रव्यासक्तीची समस्या

२.३.३ वेश्याव्यवसायाची समस्या

२.३.४ पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ स्वाध्याय/गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ प्रस्तावना (Introduction)

नागर समाजातील सामाजिक संबंध व त्या संबंधातून उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्या यांचा अभ्यास नागर समाजशास्त्र करते. त्यामुळे या घटकांत तुम्ही नागर समाजातील कांही महत्त्वाच्या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणार आहात. कोणत्याही समाजाचे अध्ययन करताना त्या समाजाची समाजसंरचना जशी अभ्यासणे गरजेचे असते तसेच त्या समाजातील सामाजिक समस्या अभ्यासणेही आवश्यक असते. आधुनिक काळात नागर समाज अनेक सामाजिक समस्यानी ग्रस्त आहेत. निवासाची समस्या, बेकारी, दारिद्र्य, गुन्हेगारी, वाहतुकीची कोंडी, मद्यपान व मादक द्रव्यासक्तीची समस्या, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, वृद्धांची समस्या, घटस्फोट, आत्महत्त्यांचे वाढते प्रमाण, पर्यावरणाचे प्रदूषण इत्यादी समाजिक समस्यांनी नागर समाजात गंभीर स्वरूप धारण केले आहे. यापैकी कांही समस्यांचे स्वरूप, कारणे, उपाययोजना यांचा अभ्यास तुम्ही भारतातील नागर समाजाच्या विशेष संदर्भात करणार आहात.

## २.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास –

- निवास आणि गलिच्छ वस्तीच्या समस्येचे आकलन होईल.
- मादक द्रव्यासक्तीच्या समस्येचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- वेश्याव्यवसायाच्या समस्येचे स्वरूप विशद करता येईल.
- पर्यावरणाच्या प्रदूषणाचे प्रकार, कारणे व उपाययोजना सांगता येतील.

## २.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

नागर समाजातील कांही सामाजिक समस्यांचा तुम्ही या ठिकाणी अभ्यास करणार आहात. नागर समाजात अनेक समस्या आहेत. त्यापैकी तुम्ही केवळ चार समस्यांचा, त्या म्हणजे निवास व गलिच्छ वस्ती, मादक द्रव्यासक्ती, वेश्याव्यवसाय व पर्यावरणाचे प्रदूषण यांचा अभ्यास करणार आहात. विवेचनाच्या सोयीसाठी या घटकाचे चार विभागात विभाजन केलेले आहे. पहिल्या विभागात निवास व गलिच्छ वस्ती या समस्येची, दुसऱ्या विभागात मादक द्रव्यासक्ती या समस्येची, तिसऱ्या विभागात वेश्याव्यवसायाच्या समस्येची तर चौथ्या विभागात पर्यावरणाच्या प्रदूषणाच्या समस्येची चर्चा केली जाईल.

### २.३.१ निवास आणि गलिच्छ वस्तीची समस्या (The Problem of Housing and Slum)

जगातील सर्वच देशातील नगरांमध्ये निवासाची व गलिच्छ वस्तीची समस्या निर्माण झालेली आहे. नगरात मर्यादित जागेत लाखो-करोडो लोक दाटीवाटीने घरे बांधून राहतात. शहरातील बहुतांशी जागा ही कार्यालये, दुकाने, कारखाने, शिक्षणसंस्था, बँका, वाहनतळ, बागा, क्रीडांगणे, रस्ते, लोहमार्ग इत्यादींनी व्यापलेली असते. त्यामुळे घरे बांधण्यासाठी जागेची टंचाई निर्माण होते. परिणामी जागेच्या किंमती भरमसाठ वाढतात. केवळ गरिबांनाच नव्हे तर मध्यमवर्गीयांनाही जागा खरेदी करून घरे बांधणे अशक्य होते. म्हणून ते नगरात/शहरात मिळेल तेथील रिकाम्या जागेत अनाधिकृतपणे, अनियोजितपणे, दाटीवाटीने मोडकी-तोडकी वा कच्ची घरे म्हणजेच झोपड्या बांधून राहतात. अशा झोपड्यांच्या समूहासच झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती असे म्हणतात. अशा वस्तीत कोणत्याही नागरी सुविधा नसतात. त्यामुळे ही वस्ती आरोग्याच्यादृष्टीने घातक असते. अशा वस्तीत गुंड, चोर, मवाली, जुगारी, भिकारी, अपंग, अवैध कृत्ये करणारे व निम्न आर्थिक स्थिती (दरिद्री) असणारे लोक हे बहुसंख्यांक असतात. त्यामुळे तेथे अवैध व अनैतिक कृत्ये घडत असतात. त्यामुळे गलिच्छ वस्ती ही नागरी जीवनातील गंभीर समस्या बनली आहे.

**निवासाची समस्या :** जगातील सर्वच देशातील नगरांमध्ये निवास व गलिच्छ वस्तीच्या समस्याने उग्र स्वरूप धारण केले आहे. अन्न व वस्त्राप्रमाणेच निवारा किंवा निवास म्हणजेच घर ही मानवाची मूलभूत गरज आहे. ''निवास किंवा घर हे असे ठिकाण असते की जेथील वातावरण आरोग्यदायी व आरामदायक असते. आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांसह तेथे राहणे व्यक्तीला आनंददायी वा सुखकारक वाटत असते.'' परंतु दुर्दैवाने आज जगातील विशेषतः नगरातील अनेक लोकांना निवास

किंवा घर उपलब्ध नाही. वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, नागरीकरण, राहत्या जागेची टंचाई व तिच्या वाढत्या किंमती, घरबांधणीसाठी लागणाऱ्या साहित्याच्या वाढत्या किंमती, वाढते दारिद्र्य व बेकारी इत्यादी कारणामुळे नगरात निवासाची समस्या उद्‌भवली असून अनेक लोक डोईजड ठरणाऱ्या भाड्याच्या घरात राहतात, कांहीजण रस्त्यावर, फुटपाथवर, उघड्यावर किंवा गलिच्छ वस्तीत आश्रय घेतात. ज्यांना स्वतःचे घर आहे अशी असंख्य कुटुंबेदेखील एक किंवा दोन खोल्यांच्या घरात राहतात.

**गलिच्छ वस्तीची समस्या :** गलिच्छ वस्तीची समस्या ही सार्वत्रिक/जागतिक स्वरूपाची आहे. केवळ भारतासारख्या विकसनशील देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, नेदरलँड अशा विकसित देशातही लाखो लोक गलिच्छ वस्तीत राहतात. भारतातील नागरी लोकसंख्येपैकी सुमारे ३५ ते ४० टक्के लोकसंख्या गलिच्छ वस्तीत राहते.

**गलिच्छ वस्तीची व्याख्या :**

१. **प्रा. चंद्रकांत खंडागळे :** गलिच्छ वस्ती म्हणजे अनियमितपणे व दाटीवाटीने वसलेल्या व नागरी सुविधांचा अभाव असलेल्या मोडक्या तोडक्या किंवा कच्चा घरांचा समूह होय, तेथील परिस्थिती ही व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षा व नीतिमत्ता यांच्यादृष्टीने घातक असते.

२. **ई. ई. बर्गेल :** गलिच्छ वस्ती शहरातील असे क्षेत्र असते की जेथील निवासाची स्थिती निम्न दर्जाची असते.

३. **संयुक्त राष्ट्रसंघ :** अतिगर्दी, अनारोग्याची स्थिती आणि सुविधांचा अभाव ह्या वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या घरांचा समूह किंवा क्षेत्र म्हणजे गलिच्छ वस्ती होय. ह्या स्थितीमुळे किंवा यापैकी कोणत्यातरी एकामुळे तेथे राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यास, सुरक्षिततेस व नैतिकतेस धोक निर्माण होतो.

४. **भारत सेवक समाज :** विस्कळीत स्वरूपात वसलेल्या, अव्यवस्थितपणे विकसित झालेल्या क्षेत्रास गलिच्छ वस्ती म्हटले जाऊ शकते. तसेच साधारणपणे त्या क्षेत्रात लोकसंख्या अधिक व दाटीवाटीची असते, मोडकी तोडकी घरे असतात व त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले जाते.

**गलिच्छ वस्तीची वैशिष्ट्ये :**

**१. गलिच्छ वस्तीचे स्थान :** गलिच्छ वस्ती ही शहरातील किंवा शहरालगतच्या मोकळ्या जागेवर बहुधा अनाधिकृतपणे उभारलेली असते.

**२. मोडकीतोडकी घरे :** गलिच्छ वस्तीतील घरे ही अत्यंत छोटी, कमी उंचीची, मोडकीतोडकी किंवा कच्च्या स्वरूपाची असतात. लाकडी फळ्या, पत्रे, दगड, माती, क्वचित विटा, गोणपाट, प्लॅस्टिक कागद इत्यादींचा वापर करून आणि विस्कळीत स्वरूपात व दाटीवाटीने बांधलेली असतात. अशा घरात अनेक लोक दाटीवाटीने राहात असतात. तेथे सूर्यप्रकाश व हवा येण्यास फारसा वाव नसतो.

३. **नागरी सुविधांचा अभाव :** गलिच्छ वस्तीत वीज, पाणी, रस्ता, शौचालय, स्नानगृह, गटार इत्यादी नागरी सुविधा नसतात त्यामुळे तेथे सर्वत्र अस्वच्छतेचे व घाणीचे साम्राज्य असते. परिणामी तेथे वैयक्तिक व सामुदायिक आरोग्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो.

४. **लोकसंख्येची विजातियता :** गलिच्छ वस्तीत विभिन्न धर्माचे, जातीचे, प्रांताचे, भाषेचे लोक राहत असतात. तथापि, या आधारेच त्यांचे छोटे छोटे समूह अस्तित्वात आलेले असतात. आणि या छोट्या समूहाअंतर्गत घनिष्ट संबंध प्रस्थापित झालेला दिसतो.

५. **कनिष्ठ आर्थिक स्थिती :** गलिच्छ वस्तीतील बहुसंख्य लोकांची आर्थिक स्थिती कनिष्ठ दर्जाची असते. कारण त्यांना कायम स्वरूपी व चांगले उत्पन्न देणारा रोजगार बहुधा नसतो. बरेचजण हे अकुशल कामगार, अपंग, भिकारी, भूरटे चोर, खिसेकापू, भंगार गोळा करणारे, अवैध धंदे करणारे असे असतात. परिणामी निश्चित उत्पन्नाची हमी नसल्याने ते दरिद्रीच असतात.

६. **शैक्षणिक सुविधांचा अभाव :** गलिच्छ वस्तीत बहुधा शैक्षणिक सुविधा नसतात. पालक हे अडाणी, निरक्षर व दरिद्री असल्याने त्यांना शिक्षणाचे महत्त्व नसते. परिणामी ते मुलांना शाळेत घालण्याऐवजी एखाद्या कामास जुंपतात. महानगरातील गलिच्छ वस्तीत बहुभाषिक लोक रहात असल्याने शाळा सुरू करणे कठीण होते.

७. **उपसंस्कृती :** गलिच्छ वस्तीत गुन्हेगार, गुंड, मवाली, चोर, अपंग भिकारी, अनाथ, दरिद्री अशा निम्न गुणवत्तेच्या लोकांचा अधिक भरणा असतो. त्यामुळे तेथे सतत भांडणे, मारामाऱ्या, अवैध व अनैतिक कृत्ये, जुगार, मटका, दारूविक्री, इत्यादींना ऊत आलेला असतो. गुंड, मवाली, दादा, गुन्हेगार असे लोक येथील नेते व मार्गदर्शक असतात. तेथे त्यांचेच राज्य असते. यातूनच तेथे एक वेगळीच जीवनपद्धती व सामाजिक मूल्ये उदयास आलेली असतात. याच अर्थाने **अल्बर्ट कोहेन** म्हणतात की गलिच्छ वस्तीत एक वेगळीच उपसंस्कृती निर्माण झालेली आहे.

**निवासाच्या व गलिच्छ वस्तीच्या समस्येची कारणे**

नागर समाजात निवासाची व गलिच्छ वस्तीची समस्या उद्भवण्यास पुढील कारणे जबाबदार आहेत.

१. **औद्योगिकीकरण :** औद्योगिक क्रांतीनंतर शहरांमध्ये मोठमोठे उद्योगधंदे सुरू झाले. त्यामुळे खेड्यातील घरगुती उद्योग बंद पडले. परिणामी बेकार झालेले लोक शहरातील उद्योगधंद्यात रोजगार मिळविण्यासाठी स्थलांतर करू लागले. तथापि, तेथे सर्वांनाच रोजगार मिळत नाही. ज्यांना रोजगार मिळाला त्यांना चांगली घरे बांधणे परवडत नाही. तसेच उद्योगातील कामगारांसाठी उद्योगपतींनी कारखान्याजवळ घरे बांधली नाहीत. परिणामी अशा लोकांना घराची समस्या भेडसावू लागली व त्यांनी शहरातील मोकळ्या जागेवर गलिच्छ वस्त्या उभारल्या.

२. **नागरीकरण :** औद्योगिकीकरणाबरोबरच नागरीकरण सुरू झाले. शहरे ही रोजगार, शिक्षण, उद्योग, व्यापार, नागरी सुविधा, चैनीचे जीवन यांची केंद्रे बनली. त्यामुळे सभोवतालच्या प्रदेशातील लोक शहरात वास्तव्यासाठी स्थलांतर करू लागले. त्यांना शहरातील चांगल्या वस्तीत जागा घेऊन घरबांधणे अशक्य होते. परिणामी त्यांनी गलिच्छ वस्त्या उभारल्या.

३. **लोकसंख्यावाढ :** वैद्यकीय सुविधांच्या उपलब्धतेमुळे मृत्यूदर घटला पण त्याप्रमाणात जन्मदर घटला नाही. परिणामी लोकसंख्या वाढू लागली. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा शेती व्यवसायावर भागू शकत नसल्याने शेती क्षेत्रातील बेकार व अतिरिक्त लोक पोटासाठी शहराकडे येऊ लागले. तेथे त्यांना चांगली निवासस्थाने बांधणे शक्य नसल्याने त्यांनी गलिच्छ वस्त्या उभारल्या.

४. **नैसर्गिक आपत्ती :** महापूर, अवर्षण, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, साथीचे रोग, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तीत सापडलेले लोक शहरात आश्रमासाठी येतात. पुढे आपत्ती टळली तरी मूळ गावी न जाता शहरातच राहाणे पसंत करतात. तथापि, आर्थिक कुवत नसल्याने झोपड्या बांधून राहू लागतात.

५. **राहत्या जागेची टंचाई :** नैसर्गिक वाढ व स्थलांतर यामुळे नगरातील लोकसंख्या वाढते. तसेच लोकसंख्येची घनताही वाढते. त्यामुळे जागेची टंचाई होऊन तिचे भाव (दर) सामान्याच्या आवाक्याबाहेर जातात. परिणाम घरबांधणे अशक्य होते. म्हणून सामान्य लोक गलिच्छ वस्त्या उभारतात.

६. **दारिद्र्य :** वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार वाढत नाही. शिवाय उद्योगधंद्यात मंदी येऊन कामगार कपात होते. परिणामी शहरात बेकारी वाढते. लोकांचे उत्पन्न घटते. त्यामुळे त्यांना मूलभूत गरजा भागविणेही जड जाते. परिणामी अशा बेकार व दरिद्री लोकांना गलिच्छ वस्ती उभारण्याशिवाय पर्याय नसतो.

७. **परकीयांचे स्थलांतर :** बऱ्याच वेळा एखाद्या देशातील महानगरांमध्ये परकीय लोकही स्थलांतर करतात. उदा. भारत-पाक फाळणीनंतर आणि बांगला देश मुक्ती संग्रामाच्यावेळी तत्कालीन पश्चिम व पूर्व पाकिस्तानातील अत्याचाराला कंटाळून असंख्य निर्वासित भारतातील सीमेलगतच्या शहरात स्थलांतरीत झाले व झोपड्या बांधून राहू लागले. श्रीलंकेतील वांशिक दंगलीमुळे अनेक तमिळांनी चेन्नई व अन्य शहरातील गलिच्छ वस्त्यात स्थलांतर केले आहे.

**निवासाची समस्या सोडविण्यासाठी केलेली उपाययोजना**

१. **वित्त पुरवठा :** केंद्र सरकार, राज्य सरकार, तसेच एल.आय.सी. आपल्या कर्मचाऱ्यांना व विमा धारकांना गृहबांधणीसाठी कमी व्याज दराने वित्तपुरवठा करतात. तसे गृहनिर्माण व नगर विकास महामंडळ देखील गृहबांधणीसाठी कर्मचाऱ्यांना वित्त पुरवठा करणे, सर्वसाधारण जनतेला स्वतःचे घरबांधण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँका (उदा. स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया इ.) आणि खाजगी क्षेत्रातील बँका (उदा. एच.डी.एफ.सी., आय.सी.आय.सी.आय. इ.) देखील वित्तपुरवठा करतात.

२. केंद्रसरकारच्या गृहनिर्माण व नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालयातर्फे 'केंद्र सरकार कर्मचारी कल्याण व गृहनिर्माण संघटना' ही संघटना स्थापन केली असून ती केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी अखिल भारतीय स्तरावर ''ना नफा ना तोटा'' या तत्त्वावर गृहबांधणीचे प्रकल्प राबविते.

३. **भारतीय राष्ट्रीय सहकारी गृहनिर्माण** संघाची स्थापना १९६९ मध्ये केली असून हा संघ संपूर्ण भारतात सहकारी तत्त्वावर घरबांधणी करण्याच्या मोहीमेचे नेतृत्व करणारी शिखरसंस्था आहे. सहकारी तत्त्वावर गृहबांधणी कार्यास ही संस्था प्रोत्साहन व मार्गदर्शन पुरविते.

**४. गृहनिर्माण आणि नगर विकास महामंडळाची स्थापना :** याची १९७० मध्ये केली असून शहरात गृहबांधणी करणारी ही अग्रेसर संस्था आहे. शहरात घरे व पायाभूत सुविधांसाठी सर्वांना विशेषतः दुर्बल व वंचित घटकांना अर्थसहाय्य करते. आजपर्यंत सुमारे १५० लाख घरांसाठी अर्थसहाय्य पुरविले आहे.

**५. दोन दशलक्ष घरेबांधणीचा कार्यक्रम** - हा १९९८-९९ मध्ये सुरू केला. सर्वांना घर पुरविणे हा त्याचा उद्देश आहे. तथापि निम्न उत्पन्न गटातील लोकांना व दुर्बल घटकांना घरे पुरविण्यावर विशेष भर दिला जातो. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ४ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

**गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्यासाठी केलेले उपाय**

गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्यासाठी सरकारतर्फे दोन प्रकारचे उपाय योजले आहेत.

**१. गलिच्छ वस्तीचे निर्मूलन करणे :** या प्रकारात पर्यायी जागा शोधून त्या ठिकाणी गलिच्छ वस्तीतील लोकांना घरे बांधून दिली जातात आणि गलिच्छ वस्तीचे निर्मूलन केले जाते.

**२. गलिच्छ वस्तीत सुधारणा करणे :** या प्रकारात गलिच्छ वस्ती आहे. त्या ठिकाणीच ठेऊन त्या वस्तीत सुधारणा घडवून आणल्या जातात. त्यानुसार गलिच्छ वस्तीत रस्ते, गटारी, वीज, सार्वजनिक शौचालये, मुताऱ्या, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा पुरविल्या जातात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्र सरकारने १९५६ मध्ये घटकराज्यांना गलिच्छ वस्ती निर्मूलन व सुधारणांसाठी आर्थिक मदत देण्यासाठी '**गलिच्छ वस्ती निर्मूलन व सुधार योजना**' सुरू केली. या योजनेखाली गलिच्छ वस्तीतील लोकांना पर्यायी जागा देऊन घरे बांधून देणे, तसेच सद्याच्या गलिच्छ वस्तीत रस्ते, वीज, पाणी, शौचालये इ. सुविधा पुरविणे यावर भर दिला.

१९६० मध्ये अनाधिकृतपणे वसलेल्या झोपड्या हटविण्यासाठी त्यांना ९९ वर्षाच्या कराराने पर्यायी जागा देऊन तेथे घरे बांधण्याची योजना सुरू केली.

१९७२ मध्ये ''**गलिच्छ वस्ती पर्यावरण सुधार मध्यवर्ती योजना**'' सुरू केली. या योजनेखाली मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, हैद्राबाद, बेंगलोर, कानपूर, लखनौ, मद्रास (चेन्नई), नागपूर, पुणे ही दहा नगरे समाविष्ट केली. पुढे १९७३-७४ मध्ये आणखीन दहा नगरे समाविष्ट केली. या योजनेखाली केंद्र सरकार राज्यांना गलिच्छ वस्तीत नागरी सुविधा पुरविण्यासाठी अर्थसहाय्य देते.

ऑगस्ट १९९६ पासून **राष्ट्रीय गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रम** सुरू केला असून त्या अंतर्गत राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना प्रदेशांना गलिच्छ वस्तीत पिण्याचे पाणी, गटारी, सार्वजनिक स्वच्छतागृहे व स्नानगृहे अशा सुविधा पुरविण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते.

२ डिसेंबर २००१ पासून **वाल्मिकी-आंबेडकर आवास योजना** सुरू केली आहे. शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या पर्याप्त निवारा नसणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीसाठी आरोग्यदायी वातावरण असलेली (शौचालये व स्नानगृह युक्त) घरे बांधून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

वरील प्रमुख उपायाबरोबरच इतरही कांही उपाय केले जात आहेत. उदा. १) नवीन गलिच्छ वस्त्या उभारण्यास पायबंद घालण्यासाठी कायदे करणे, २) महानगरपालिकांमध्ये गलिच्छ वस्ती सुधार समिती स्थापन करणे. ३) नगराच्या गरजा व समस्या विचारात घेऊन नगर नियोजन करणे, ४) नगरात नवीन कारखाने उभारण्यास परवानगी न देणे, ५) नगरात क्रीडांगणे, उद्याने, शाळा, दवाखाने, बाजार, वाहनतळ, करमणूक केंद्रे इत्यादीसाठी जागा आरक्षित करणे इ.

अशाप्रकारे निर्मूलन, सुधारणा, पुनर्वसन, प्रतिबंध इत्यादी मार्गाने गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तथापि त्याच्या मार्गात पुढील अडचणी येतात. १) पर्यायी जागा मिळणे अवघड असते व मिळाली तरी तेथे घरे बांधून देणे अत्यंत खर्चिक असते. २) नवीन/पर्यायी जागेत जाण्यास लोकांचा विरोध होतो. कारण त्यासाठी त्यांना कांहीतरी किंमत द्यावी लागते. ३) सद्याच्या गलिच्छ वस्त्या हलविण्यास राजकारणी (नगरसेवक), गुंड, व्यापारी अशी मंडळीही विरोध करतात. कारण त्यांच्या हितसंबंधास बाधा येत असते. ४) जमिनीचा ताबा मिळविणे, त्यावर घरे बांधणे या कामात अनेक कायदेशीर-प्रशासकीय अडचणी उद्‌भवत असतात.

**निवासाची व गलिच्छ वस्तीची समस्या सोडविण्यासाठी आपणास पुढील उपाययोजना सुचविता येतील–**

१. **कर्जपुरवठा :** कमी खर्चाची पण आवश्यक त्या सुविधा असणारी स्वमालकीची घरे बांधण्यासाठी लोकांना अल्पव्याजाने त्वरित व भ्रष्टाचारमुक्त स्वरूपात कर्जपुरवठा करावा.

२. **दारिद्र्य निर्मूलन :** हे निवासाच्या व गलिच्छ वस्त्याच्या समस्येचे मूळ कारण असल्याने लोकांचे दारिद्र्य दूर करण्यासाठी सर्वंकष उपाय योजावेत.

३. **गलिच्छ वस्ती उभारण्यास पायबंद** घालण्यासाठी खेड्यात शेतीविकास करून व उद्योगधंदे उभारून तेथील लोकांना पुरेसा रोजगार उपलब्ध करून द्यावा म्हणजे ते शहराकडे स्थलांतर करणार नाहीत.

४. **कडक कायदे :** नव्याने गलिच्छ वस्त्या उभारू नयेत यासाठी कडक कायदे करावेत. अनाधिकृत वस्त्या कठोरपणे उठावाव्यात व संबंधितांना शासन करावे. तसेच गलिच्छ वस्तीतील गुंड, दादा, मवाली, जुगारी, मद्यविक्रेते, अवैध धंदे करणारे, इत्यादींचा बंदोबस्त करून पर्यावरणात्मक सुधारणा कराव्यात.

५. **नियोजन :** शहरातील उद्योगधंद्यांचा सुनियोजितपणे विकास करावा. शक्यतो नगराबाहेर नवे उद्योग उभारावेत. शहराचा विस्तार मर्यादित ठेवण्याचे उपाय योजावेत.

६. **स्वयंसेवी संस्थांची मदत :** गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, सुशिक्षित मंडळी, यांनी एकत्र येऊन शासनास मदत करावी.

### २.३.२ मादक द्रव्यासक्तीची समस्या (Problem of Drug Addiction)

मानव प्राचीन काळापासून मद्य, अफू, गांजा इत्यादी नशा आणणाऱ्या पदार्थांचे म्हणजेच मादकद्रव्यांचे सेवन करीत आलेला आहे. तथापि अशा पदार्थांचे सेवन करणे, त्यांचा दुरूपयोग करणे, या पदार्थांच्या सेवनाची आसक्ती निर्माण होणे ही आधुनिक काळातील विशेषतः नागर समाजातील

एक गंभीर सामाजिक समस्या बनलेली आहे. या समस्येची कारणे आणि उताययोजनांचा अभ्यास याठिकाणी तुम्ही करणार आहात. त्यासाठी अगोदर ''मादकद्रव्य, मादकद्रव्यांचा दुरुपयोग, मादकद्रव्यांवरील अवलंबित्व आणि मादकद्रव्यांची आसक्ती किंवा अधिनता'' या चार संज्ञांचा अर्थ समजावून घेऊ.

१. **मादक द्रव्य** – Drug या इंग्रजी शब्दासाठी मराठीत मादकद्रव्य, मादकपदार्थ, अंमली पदार्थ असे शब्द रूढ झालेले आहेत. तथापि Drug याचा अर्थ 'औषधी पदार्थ' असा असून डॉक्टरने रोग/आजार बरा करण्यासाठी रोग्यास Drug घेण्याची शिफारस करणे आणि डॉक्टरच्या शिफारसीनुसारच औषधविक्रेत्याने (ड्रगिस्ट) तो रोग्यास विकणे अभिप्रेत किंवा समाज संमत आहे. **जागतिक आरोग्य संघटनेच्या** मतानुसार ''ड्रग म्हणजे असा कोणताही रासायनिक पदार्थ किंवा द्रव्य, जे सजीवाने, शरीरात घेतले असता त्याच्या एका किंवा अनेक कार्यात बदल घडून येतो.'' मादक द्रव्ये ही अ) **वनस्पतीजन्य** (उदा. तंबाखू, मद्य, अफू, गांजा, भांग, चरस इ.) आणि ब) **रासायनिक** (उदा. एल. एस. डी. (Lysergic Acid Diethylamide), मस्कॉलीन, सायलोसायबीन, अम्फोटामाईन्स, बार्बीच्यूरेटस, मार्फिन व हेरॉईन इ.) अशा दोन प्रकारची आहेत. या मादक द्रव्यांचे सेवन केले असता त्याचे व्यक्तीच्या शारीरिक क्रियांवर, भावनावेगावर, संवेदनक्षमतेवर व जाणिवेवर परिणाम होतात.

२. **मादकद्रव्यांचा दुरूपयोग** (Drug abuse) डॉक्टरी सल्ल्यानुसार रोगमुक्तीसाठी मादक द्रव्याचा उपयोग करणे हे योग्य व चांगले असते. तथापि या द्रव्यांचा डॉक्टरच्या सल्ल्याऐवजी वेगळ्याच उद्देशाने म्हणजेच अवैद्यकीय (Non medical) उद्देशाने वापर करणे म्हणजे मादकद्रव्यांचा गैरवापर किंवा दुरुपयोग (Misuse or abuse) होय. **जागतिक आरोग्य संघटनेच्या** मतानुसार ''ड्रगअबयुज म्हणजे अवैद्यकीय कारणासाठी व्यक्तीने स्वतःच (डॉक्टरच्या सल्ल्याशिवाय) मादक द्रव्याचे मोठ्या प्रमाणावर पुन्हा पुन्हा सेवन करणे होय.'' मादकद्रव्याचा दुरूपयोग दोन प्रकारे होतो. (अ) कांही मादक द्रव्यांच्या सेवनास कायद्याने मान्यता दिलेली आहे. तथापि त्यासाठी डॉक्टरची अधिकृत संमती आवश्यक असते. पण डॉक्टरी सल्ल्याशिवाय मादक द्रव्याचे अयोग्यपणे व अतिप्रमाणात सेवन करणे हे मादक द्रव्याचा दुरुपयोग ठरतो. (ब) कांही मादकद्रव्यांच्या सेवनावर व खरेदी-विक्रीवर कायद्याने बंधने घातलेली आहेत. अशा मादकद्रव्यांची खरेदी-विक्री व सेवन करणे हेही मादकद्रव्याचा दुरुपयोग ठरते. मॉर्फिन, पेथीड्रीन ही द्रव्ये वेदनाशामक म्हणून योग्य प्रमाणात डॉक्टरच्या शिफारसीनुसार वापरणे सदोपयोगाचे उदाहरण ठरते. या द्रव्यांत नशा किंवा गुंगी आणण्याचा गुणधर्म आहे. डॉक्टरच्या शिफारसीशिवाय केवळ नशा/गुंगी यावी, बेहोशीचा आनंद उपभोगता यावा म्हणून जर त्यांचे वारंवार व अतिप्रमाणात वापर केला तर ते दुरुपयोगाचे उदाहरण ठरेल.

३. **मादकद्रव्यांवरील अवलंबित्व** (Drug dependence) जी व्यक्ती मादक पदार्थाचे सेवन (तोंडाने गिळून, नाकाने हुंगून किंवा इंजक्शनद्वारे शरीरात टोचून) करते तिला या सेवनाची हळूहळू सवय लागते. म्हणजेच या पदार्थाचे सेवन केलेच पाहिजे. अशी तिची धारणा होते. यालाच मादकद्रव्यांवरील अवलंबित्व असे म्हणतात. हे अवलंबित्व शारीरिक तसेच मानसिक स्वरूपाचे असते.

४. **मादकद्रव्यासक्ती** (Drug addiction) मादकद्रव्यासक्ती म्हणजे व्यक्ती मादकद्रव्याच्या सेवनाच्या पूर्णपणे आहारी जाणे होय. किंवा मादकद्रव्यांनी व्यक्तिच्या मनावर व शरीरावर आपली घट्ट पकड बसविणे होय. मादकद्रव्यासक्ती होणे ही एक प्रक्रिया असून तिच्या तीन अवस्था आहेत.

**अ) सवय :** (Habit) एखादा मादक पदार्थ नियमितपणे सेवन करणे यास सवय म्हणतात. सवयीत व्यक्तिला मादकपदार्थ वेळेवर न मिळाल्यास तिला तरतरी वा हुशार वाटत नाही. तिचे कामात लक्ष लागत नाही. परंतु तो पदार्थ घेतला की ती पूर्वीसारखी नॉर्मल होते.

**ब) सह्यता** (Tolerance) मादकद्रव्य सेवनांमुळे जी तरतरी वा हुशारी येते किंवा आनंद वाटतो तो पुढे हळूहळू येईनासा होतो. यालाच मादकद्रव्याबाबतची सह्यता असे म्हणतात. परिणामी आनंद/नशा येण्यासाठी व्यक्ती मादकद्रव्याची मात्रा (डोस) तसेच घेण्याच्या वेळा वाढविते.

**क) आसक्ती** (Addiction) त्यानंतर व्यक्तीला मादकद्रव्य घेण्याची एवढी चटक लागते की ती त्याच्या पूर्णपणे आहारी जाते, अधिन होते. मादकद्रव्य न घेतल्यास तिच्या शारीरिक व मानसिक लक्षणात बदल होतो. उदा. शारीरिक वेदना होणे, नाकाडोळ्यातून पाणी वाहणे, हातापायास कंप सुटणे, उलट्या-जुलाब होणे, अडखळत चालणे बोलणे, मनाची एकाग्रता संपणे इत्यादी. त्यामुळे व्यक्ती कोणताही विधीनिषेध न बाळगता हे मादकद्रव्य मिळविण्यासाठी धडपडू लागते. आणि जेव्हा तिला तो द्रव्य सेवनास मिळतो तेव्हाच तिला बरे (तात्पुरते) वाटू लागते. पुढे ठराविक काळानंतर त्या द्रव्यसेवनाची पुन्हा तीव्र इच्छा निर्माण होऊन वरील लक्षणे सुरू होतात. अशा या स्थितीस मादकद्रव्यांची आसक्ती, अधिनता किंवा व्यसनाधिनता असे म्हणतात.

**मादकद्रव्यासक्तीची कारणे :**

आधुनिक समाजात विशेषतः नागर समाजात मादकद्रव्यासक्तीची समस्या अत्यंत गंभीर बनलेली आहे. आणि ती दिवसेंदिवस विस्तारत चालली आहे. नागर तसेच ग्रामीण भागातील लोक, श्रीमंत तसेच गरीब, प्रौढ तसेच युवक, सुशिक्षित तसेच अशिक्षित, पुरूष तसेच स्त्रिया अशा सर्व घटकांना या समस्येने ग्रासलेले आहे. या समस्येची कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१. **शारीरिक कारणे :** कांही व्यक्तींना चिंता, भीती, नैराश्य यामुळे झोप येत नाही. कांही व्यक्ती डोकेदुखी, अंगदुखीने त्रस्त असतात. अपघातग्रस्त व कर्करोगग्रस्त रुग्णांना अतिवेदना होत असतात. अशावेळी झोप यावी, वेदना कमी व्हाव्यात म्हणून डॉक्टर औषधोपचाराचा भाग म्हणून मादक पदार्थांची उपाययोजना करतात. मात्र अशा पदार्थांच्या सेवनाची कांही रुग्णांना चटक लागून ते मादकद्रव्याच्या अधिन होतात. तसेच रात्रपाळी करणाऱ्या व्यक्ती, रात्रभर ड्रायव्हींग करू इच्छिणारे ड्रायव्हर्स, नाटक तमाशातील कलाकार, रात्री अभ्यास करणारे विद्यार्थी इत्यादी मंडळी जागरण करण्यासाठी मादक द्रव्याचे सेवन करू लागतात व पुढे कायमचे व्यसनाधिन होतात. त्याचबरोबर अनेक खेळाडू शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी, तर कांही लोक लैंगिक समागमाचा कालावधी वाढविण्यासाठी, तर अंगमेहनतीची कामे करणारे लोक शारीरिक थकवा घालविण्यासाठी मादकद्रव्यांचे सेवन करू लागतात व त्यानंतर त्याचे आसक्त होतात. सुरुवातीस मादक द्रव्याच्या सेवनाने केंद्रीय मज्जासंस्थेस उत्तेजना मिळून व्यक्तीस शारीरिक सुखाची अनुभूती येते. परिणामी शरीर वारंवार अशा मादकद्रव्यांची मागणी करू लागते आणि व्यक्ती त्यांच्या अधिन होते.

२. **मानसिक कारणे :** व्यक्ती मादकद्रव्याची आसक्त होण्यास कांही मानसिक घटकही कारणीभूत ठरतात. आजचे नागरी जीवन हे अत्यंत धकधकीचे, धावपळीचे, स्पर्धेचे, अडीअडचणीचे बनलेले आहे, त्यामुळे व्यक्तीच्या मनावर प्रचंड ताण येतो; ती चिंताग्रस्त होते. ताण व चिंतांचा विसर पडावा म्हणून व्यक्ती मादकपदार्थांचे सेवन करू लागतात व व्यसनाधिन होतात. कांही व्यक्तींना जीवनात अपयश, फसवणूक, अपेक्षाभंग, विरह अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्यांना नैराश्य वा वैफल्य येते. अशा वैफल्यग्रस्त व्यक्ती मादकद्रव्यांचा आश्रय घेतात व त्यांच्या आधिन होतात. कांही व्यक्ती गंमत म्हणून, मौजमजा करावयाची म्हणून किंवा मादकद्रव्यांचे सेवन केल्याने नेमके काय होते याचा अनुभव घेण्याची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी म्हणून मादक द्रव्यसेवनास सुरुवात करतात व पुढे त्यांच्या अधिन होतात. कांही व्यक्ती अपंग, कुरूप, मंदबुद्धीचे शारीरिक व मानसिकदृष्ट्या दुर्बल असतात. त्यामुळे त्यांच्या मनात न्युनगंडाची भावना निर्माण होते. ते एकलकोंडे बनतात. नैराश्याने घेरले जातात. अशा स्थितीचा विसर पडावा म्हणून ते मादक द्रव्यसेवन सुरू करतात व त्याचे आसक्त बनतात.

३. **सामाजिक कारणे :** मादकद्रव्यासक्तीच्या समस्येस कांही सामाजिक घटकही उदा. कौटुंबिक सौख्याचा अभाव, कुसंगत, सामाजिक मूल्यांचा ऱ्हास, सामाजिक प्रथा इ. जबाबदार आहेत. कुटुंबातील पती-पत्नी, पालक-मुले यांच्यातील संबंध हे संघर्षाचे वा ताणतणावाचे असतील तर कुटुंबसदस्यांना कौटुंबिक सौख्य, प्रेम, माया, सहानुभूती मिळत नाही. परिणामी कांही सदस्य ही पोकळी भरून काढण्यासाठी मादकद्रव्यसेवनाच्या आहारी जातात. तसेच घटस्फोट, मातापिता यापैकी एकाचा मृत्यू, मातापित्यानी विभक्त रहाणे, त्यांचे मुलांकडे दुर्लक्ष असणे इत्यादी घटकांमुळेही मुले मादकद्रव्यसेवनाच्या अधिन होतात. कुटुंबातील प्रौढ मंडळी मादकद्रव्यसेवन करीत असतील तर त्याचा प्रभाव पडून मुलांनाही त्याचे व्यसन लागण्याची दाट शक्यता असते. तसेच व्यक्तीला कुटुंबाबाहेर म्हणजे समाजात कुसंगत लाभली तर व्यक्ती विविध व्यसनांच्या आहारी जाते. बहुसंख्य विद्यार्थी हे मित्राच्या संगतीतच मादकद्रव्ये सेवनास सुरुवात करतात व पुढे त्याच्या अधिन होतात असा अनुभव आहे. अलिकडे धार्मिक-नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत चालला असून नव्या पिढीवर भोगवाद, भौतिकवाद, चंगळवाद, व्यक्तिवाद इत्यादींचा अतिरेकी प्रभाव वाढत आहे. त्यामुळे सुखप्राप्ती, आनंद उपभोग घेणे, चंगळ करणे इत्यादीच्या नावाखाली मादकद्रव्याचे सेवन करण्याचे फॅड वाढत आहे. कांही प्रथापरंपराही या समस्येस कारणीभूत आहेत. एरवी मादकद्रव्य सेवन हे निषिद्ध मानले जाते. तथापि यात्रा, जत्रा, सणसमारंभ इत्यादीप्रसंगी मात्र मादकपदार्थांचे सेवन करण्यास समाजसंमती दिलेली आढळते. उदा. होळीच्या वेळी भांग व दारू सेवनास परवानगी असते. त्यामुळे अशा अपवादात्मक प्रसंगी केलेल्या मादकद्रव्यसेवनाची काही व्यक्तीना चटक लागून पुढे त्या व्यसनी बनतात. कांही आदिम समाजात मद्यपान करणे ही समाजसंमत प्रथा मानली जाते. तर कांही समूहात पाहुणचाराचा भाग म्हणून पाहुण्यांना मादकद्रव्ये आदरपूर्वक पुरविली जातात. यामुळेही कांही व्यक्ती व्यसनाधिन होतात.

४. **आर्थिक कारणे :** मादकद्रव्यासक्तीस कांही आर्थिक घटकही उदा. दारिद्र्य, बेकारी, श्रीमंती, अचानक धनलाभ होणे, कामाच्या ठिकाणची परिस्थिती इत्यादी-कारणीभूत ठरतात. दारिद्र्यामुळे आपल्या व आपल्या कुटुंबाच्या गरजा भागवू न शकणारी व्यक्ती आपले दुःख व दारिद्र्य विसरण्यासाठी गांजा, भांग, मद्य इत्यादीच्या सेवनास प्रारंभ करते व पुढे त्यांच्या अधिन होते.

आधुनिक काळात बेकारीची समस्या उग्र बनलेली आहे. ज्यांना रोजगार मिळत नाही अशा व्यक्तीं वैफल्यग्रस्त होऊन मादकद्रव्यांच्या आहारी जातात. मंदी किंवा अन्य कारणामुळे नोकरीधंदा बंद पडून बेकार झालेली व्यक्तीही आपले दुःख विसरण्यासाठी मादकद्रव्यांना जवळ करते. समाजात कांही व्यक्तींना विनासायास भरपूर पैसा मिळत असतो. त्यामुळे अशा व्यक्ती रंगढंग, चैन, ऐषोआराम करण्याच्या नावाखाली मादक द्रव्यांचे सेवन करू लागतात. श्रीमंत कुटुंबातील बऱ्याच व्यक्ती भरपूर पैसा असल्यामुळेच मादकद्रव्य सेवनास प्रारंभ करतात व त्यांच्या आहारी जातात. कांही वेळा व्यक्तीस अचानक धनलाभ होतो. अपेक्षा व पात्रता नसताना मिळालेल्या पैशाचा योग्य वापर कसा करावा हे न समजल्याने अशा व्यक्ती मौजमजा करण्याच्या नावाखाली मादकद्रव्यसेवनाच्या आहारी जातात. कांही व्यक्तींना अत्यंत खडतर परिस्थितीत आपली नोकरी, धंदा, व्यवसाय करावा लागतो. उदा. अतिउष्ण वा अतिथंड किंवा दुर्गंधीयुक्त वातावरणात काम करणे. त्यामुळे ही खडतर वा प्रतिकूल परिस्थिती सहन करण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून मादकद्रव्य सेवनाच्या आहारी जातात. बऱ्याच उच्चभ्र व्यवसायांमध्ये चर्चा, परिषदा, मिटींग, पार्टी, सौदेबाजी, ग्राहक पटविणे, कॉन्ट्रॅक्ट मिळविणे इत्यादी प्रसंगी मादकद्रव्य सेवन हे शिष्टाचार मानला आहे. ह्या शिष्टाचाराचे पालन करण्यातूनच अनेक व्यक्ती मादकद्रव्यांचा व्यापार मोठ्या प्रमाणात फोफावला आहे. या व्यापारात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत असे लोक नव्या नव्या क्लृप्ती वापरून लोकांना विशेषतः युवा पिढीस मादकद्रव्य सेवनाची सवय लावतात. त्यामुळे अनेकजण नकळतपणे मादकद्रव्यासक्त होतात. उदा. खाद्यपदार्थ, शीतपेये, फळे इत्यादीत मादकद्रव्ये मिसळून मुलांना नकळतपणे मादकद्रव्यसेवनाची चटक लावण्याचे प्रमाण वाढत आहे. अशी चटक लागलेली मुले पुढे जाणिवपूर्वक मादकद्रव्य सेवन करू लागतात. कांही व्यापारी मुलांना प्रारंभी मोफत मादकद्रव्ये पुरवून त्याची चटक लावतात व पुढे ही मुले स्वतःहून अशा पदार्थांची खरेदी करू लागतात.

**मादकद्रव्यासक्तीच्या समस्येवरील उपाययोजना**

मादकद्रव्यासक्तीची समस्या सोडविण्यासाठीच्या उपाययोजनांचे १) नियंत्रणात्मक/कायदेशीर उपाययोजना २) उपचारात्मक उपाययोजना व ३) प्रतिबंधात्मक उपाययोजना अशा तीन गटात विभाजन करता येईल.

**१) नियंत्रणात्मक /कायदेशीर उपाययोजना**

मादकद्रव्य सेवनाचे व्यक्तीच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यावर तसेच तिच्या कुटुंबावर आणि एकूणच समाजजीवनावर गंभीर दुष्परिणाम होतात. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी मादकद्रव्यांचे उत्पादन, व्यापार (खरेदी-विक्री) व सेवन इत्यादींवर नियंत्रणे घालण्यासाठी शासनाने वेळोवेळी कायदेशीर उपाययोजना केलेल्या आहेत.

अ) ब्रिटिश राजवटीत सरकारने **दि ऑफिम ॲक्ट १९५७, दि आफिम ॲक्ट-१८७८** आणि **घातक ड्रग्ज ॲक्ट - १९३०** असे तीन कायदे संमत केले. या कायद्यांमध्ये मादकद्रव्यांचा अवैध व्यापार करणाऱ्यास दंडासह किंवा दंडाविना तीन वर्ष कारावासाच्या शिक्षेची तरतूद केलेली होती. तसेच अशाच स्वरूपाचा गुन्हा दुसऱ्यांना करणाऱ्यास दंडासह वा दंडाविना जास्तीत जास्त आठ वर्ष कारावासाची तरतूद केलेली होती. मात्र या कायद्यांमध्ये किमान शिक्षेची निश्चिती केलेली नव्हती.

त्यामुळे न्यायाधीश अशा गुन्ह्यासाठी अत्यंत अल्प दंडाची व कारावासाची शिक्षा सुनावित असत. त्यामुळे हे कायदे फारसे परिणामकारक ठरले नाहीत.

ब) स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बहुतेक सर्व घटक राज्यांनी **ओपियम स्मोकिंग ॲक्ट** (Opium Smoking Act) संमत करून विनापरवाना मादकद्रव्य सेवनास बंदी घातली. **मद्रास प्रोहिबिशन ॲक्ट – १९४७** नुसार 'हेम्प' वनस्पतीच्या लागवडीवर बंदी घातली. मात्र औषधनिर्मितीचा परवाना असणाऱ्यांना मात्र लागवडीस परवानगी दिली होती. ''**दि बाँबे प्रोहिबिशन ॲक्ट–१९४९** नुसार मादकद्रव्यांचे (मद्य, अफू, गांजा, चरस किंवा असा कोणताही पदार्थ जो मादक आहे असे शासन जाहीर करील) उत्पादन, विक्री वितरण व सेवन करणाऱ्यावर प्रतिबंध घालण्यात आले. आणि या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यास दंड व जास्तीत जास्त तीन वर्ष कारावास अशा शिक्षेची तरतूद केली.

क) १९८५ मध्ये भारत सरकारने ''**दि नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सीस ॲक्ट**'' या नावाचा कायदा संमत केला आहे. या कायद्याने मादकद्रव्यांची एक यादी तयार केलेली आहे. या यादीतील कोणत्याही द्रव्याचे वा पदार्थाचे उत्पादन, वितरण, खरेदी–विक्री, उपभोग इत्यादीवर नियंत्रण व प्रतिबंध घातला आहे. या कायद्याचे प्रथम उल्लंघन करणाऱ्यास किमान १० वर्षे कारावास व १ लाख रुपये दंड तर कमाल २० वर्षे कारावास व २ लाख रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद केली आहे. असाच गुन्हा परत घडल्यास किमान १५ वर्षे कारावास व दीड लाख रुपये दंड आणि कमाल ३० वर्षे कारावास व ३ लाख रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद केलेली आहे. तथापि गांजालागवडीसाठी मात्र ५ वर्षे कारावास व ५० हजार रुपये दंडाची तरतूद केलेली आहे.

ज्या व्यक्ती मादकद्रव्याच्या आहारी गेलेल्या आहेत व ज्यांनी स्वतःजवळ गुंगी आणणारी मादकद्रव्ये बाळगली आहेत अशांना या कायद्यानुसार १ वर्ष कारावास व दंड अशी शिक्षा होऊ शकते. मात्र जर मादकद्रव्याच्या आहारी गेलेल्या व्यक्तीस त्यातून बाहेर पडावयाचे असेल व त्यासाठी वैद्यकीय उपचार घ्यावयाचे असतील तर मात्र अशा व्यक्तीस कारावासात न डांबता तिला शासनमान्य दवाखान्यात वा संस्थेत पाठविण्याचा अधिकार या कायद्याने न्यायालयास दिलेला आहे.

### २) उपचारात्मक उपाययोजना

मादकद्रव्यसेवनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींना शोधून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करणे (यामध्ये मानसोपचार व समाजोपचार (Social therapy यांचाही समावेश होतो.) आवश्यक आहे. यासाठी शासन व स्वयंसेवी संस्थांनी खास दवाखाने सुरू केलेले आहेत. या दवाखान्यात अशा व्यक्तींना भरती करून त्याला व्यसनमुक्त होण्यासाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची वैद्यकीय उपाययोजना केली जाते. उदा. व्यसनमुक्त होण्याचा मनोनिग्रह दृढ करणे मादकद्रव्यावरील शारीरिक व मानसिक अवलंबन हळूहळू कमी करत जाणे, तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार प्रारंभी कमी तीव्रतेची मादकद्रव्ये देऊन त्यांचा उपयोग पुढे हळूहळू कमी करत जाणे, आवश्यक ती प्रतिजैवके (अँटीबायोटीक्स औषधे) देणे इत्यादी. अशा व्यक्तीला इतर व्यसनाधिन व्यक्तींशी तसेच व्यसनमुक्त झालेल्या व्यक्तिंशी मनमोकळेपणाने संवाद साधू दिला जातो. आपले अनुभव, समस्या, अडचणी, वेदना, व्यथा इत्यादी मुक्तपणे इतरांसमोर मांडू दिल्या जातात. त्यामुळे त्याच्या मनावरील ताण कमी होण्यास मदत होते. यालाच ''**नॉर्कोटिक ॲनॉनिमस**'' (N.A.) असे म्हणतात. मादक द्रव्यांच्या

व्यसनातून मुक्त झालेल्या व्यक्तीचे समाजात पुनर्वसन करणे आवश्यक असते. त्यासाठी प्रथम 'व्यसनी' म्हणून लागलेला कलंक पुसला जाणे आवश्यक असते. तसेच त्याला व्यावसायिक कौशल्ये शिकवून एखादा रोजगार उपलब्ध करून देऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे आवश्यक असते. तसेच मादकद्रव्यसेवनास त्याने परत सुरुवात करू नये म्हणून मादकद्रव्यांशी संबंधित व्यक्ती, ठिकाणी, प्रसंग, वातावरण इत्यादीपासून त्याला दूर ठेवणेही आवश्यक असते.

भारत सरकारच्या समाजकल्याण मंत्रालयाने मादकद्रव्यसेवनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तींसाठी एक कृती कार्यक्रम बनविला आहे. या कार्यक्रमांतर्गत १) अशा व्यक्तींचा शोध घेणे, त्यांना व्यसनापासून मुक्त होण्याची प्रेरणा देणे, मार्गदर्शन, उपचार व पुनर्वसन करणे यासाठी समुदाय पातळीवर उपक्रम राबविले जातात. २) तसेच मादकद्रव्यांच्या दुष्परिणामाविषयी समाजात जाणिवजागृती निर्माण केली जाते. ३) या कामात मदत करू इच्छिणाऱ्या सेवाभावी व्यक्ती व संस्थांना प्रशिक्षण दिले जाते. ४) या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी बिगरशासकीय संघटनाचे (NGOs) सहकार्य घेऊन त्यांना मदत दिली जाते.

**३) प्रतिबंधात्मक उपाययोजना**

लोक मादकद्रव्यसेवनाच्या आहारी जाणार नाहीत, याची काळजी घेण्यासाठी करावयाच्या उपायांना प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणता येते. यासंदर्भात पुढील उपाययोजना सूचविता येईल.

**अ) कायद्याची कडक अंमलबजावणी :** मादकद्रव्यांचे उत्पादन, वितरण, अवैध व्यापार व सेवन यासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींची अत्यंत प्रामाणिक व कडक स्वरूपात अंमलबजावणी करून गुन्हेगारास कडक शासन झाले पाहिजे. तरच मादकद्रव्यांची सहज उपलब्धता व दुरुपयोगास आळा बसेल. यासंदर्भात पोलीस, तुरुंग, न्यायालय इत्यादी शासकीय यंत्रणांचे शुद्धीकरण झाले पाहिजे म्हणजे त्या भ्रष्टाचारमुक्त झाल्या पाहिजेत. मादकद्रव्यांच्या व्यापाराकडे हप्ते घेऊन दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. तसेच तुरुंग, दवाखाने, उपचारकेंद्रे इत्यादीतील कर्मचारी हे या कायद्यानुसार शिक्षा झालेल्या कैद्यांना व व्यसनमुक्तीसाठी उपचार घेणाऱ्या व्यक्तींना चोरून मादकद्रव्ये पुरवितात. अशा कर्मचाऱ्यांवरही कठोर कारवाई झाली पाहिजे. एकंदरीत मादकद्रव्याशी संबंधित असणाऱ्या सर्व घटकांवर दहशत बसेल अशापद्धतीने कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

**ब) वैद्यकीय व्यावसायिकांच्या दृष्टिकोनात बदल :** वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित असणारे डॉक्टर, औषध विक्रते इत्यादींच्या दृष्टिकोनात बदल झाला पाहिजे. अनेक डॉक्टर्स रुग्णाला तात्काळ बरे वाटावे व आपण तज्ज्ञ डॉक्टर आहोत असा लोकात लौकीक व्हावा म्हणून रुग्णांना भरमसाठ ड्रग्ज (औषधे) लिहून देतात. पुढे काही रोगी डॉक्टरच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय स्वतःच ड्रग्ज खरेदी करू लागतात व औषध विक्रेतेही ती विकतात. यातूनच अनेक रुग्ण ड्रग्जचे शिकार होतात. म्हणून डॉक्टर्सनी शक्यतो गंगी/नशा आणणाऱ्या ड्रग्जचा वापर टाळावा. जर अशा ड्रग्जचा औषर म्हणून वापर करणे अत्यावश्यक असेल तरच वाजवी/मर्यादीत प्रमाणात त्यांची शिफारस करावी. तसे करताना ड्रग्जच्या दुष्परिणामांची रुग्णांना पुरेसी कल्पना द्यावी व त्यांचा दुरुपयोग न करण्यासंबंधी रुग्णाला सचेत करावे. औषधविक्रेत्यांनीही डॉक्टरी सल्ल्याशिवाय ड्रग्जची विक्री करू नये.

**क) जाणिव जागृती :** मादकद्रव्यसेवनांच्या दुष्परिणामांची लोकांना जाणिव करून देण्यासाठी समाजात मोठ्या प्रमाणावर जागृती मोहिम राबविली पाहिजे. त्यासाठी विद्यार्थी, कामगार, हमाल, अतिश्रीमंत व अति दरिद्री व्यक्ती, गलिच्छ वस्तीतील लोक इत्यादींसाठी जाणिव जागृतीचे/प्रबोधनाचे उपक्रम (चर्चा, मेळावे, परिषदा इ.) राबविले पाहिजेत. या उपक्रमांत शासन, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, पालक, शिक्षक, विचारवंत, कलावंत इत्यादींनी सहभागी झाले पाहिजे. लोकांना विशेषतः युवकांना मादकद्रव्यासंबंधीचे शास्त्रीय ज्ञान दिले पाहिजे. मादकद्रव्यासक्ती व मादकद्रव्यांचा दुरुपयोग या समस्येशी संबंधित असणाऱ्या विविध पैलुंचे शास्त्रीय संशोधन करून त्याचे निष्कर्ष समाजात प्रसारीत केले पाहिजेत. त्यासाठी प्रसारमाध्यमांचा सुयोग्य उपयोग करून घेतला पाहिजे. एकंदरीत मादकद्रव्यांच्या विरोधी वातावरण समाजात निर्माण झाले पाहिजे.

**ड) इतर उपाय :** याशिवाय समाजातील दारिद्र्य, बेकारी, अनारोग्य, अज्ञान यासारख्या समस्यांचे निर्मूलन झाले पाहिजे. प्रत्येकास पुरेसा रोजगार, शिक्षण व आरोग्य सुविधा प्राप्त होऊन सुखासमाधानाने जगता येईल अशी सामाजिक परिस्थिती निर्माण केली पाहिजे. कारण दारिद्र्य, बेकारी, आजार, अज्ञान इत्यादीने गांजलेले लोक चटकन व्यसनाधिन होताना आढळतात. तसेच कुटुंबातील सदस्यांचे परस्परसंबंधही प्रेमाचे/स्नेहाचे असावेत. कारण कौटुंबिक सौख्यास पारखी झालेली व्यक्तीही व्यसनाकडे वळण्याची दाट शक्यता असते. यासंदर्भात पालकांनी आपल्या मुलांच्या सवयीकडे/वर्तनाकडे पुरेसे लक्ष दिले पाहिजे. कुसंगतीत सापडून मुले मादकद्रव्यसेवन तर करीत नाहीत ना याची वेळोवेळी खात्री करून घेतली पाहिजे. जर मुले माद्रकद्रव्यसेवन करताना आढळली तर वेळीच त्यांना प्रेमाने, डॉक्टरी सल्ल्याने, गरज भासल्यास सक्तीने त्या सेवनापासून परावृत्त केले पाहिजे.

### २.३.३ वेश्या व्यवसायाची समस्या (Problem of Prostitution)

जगातील बहुतेक समाजात प्राचीन काळापासून वेश्याव्यवसाय आढळतो. तथापि एक सामाजिक समस्या म्हणून वेश्याव्यवसायाची तीव्रता औद्योगिकीकरण – नागरीकरण या प्रक्रिया गतिमान झाल्यानंतर वाढली आहे. वेश्याव्यवसाय ही प्रामुख्याने नागरी समस्या मानली जाते. नागरीकरणाच्या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील अनेक पुरुष नोकरी, व्यवसाय, शिक्षण, व्यापार, बाजारहाट, पर्यटन इत्यादीच्या निमित्ताने दीर्घकाळ वा अल्पकाळ एकटेच शहरात वास्तव्यास येतात आणि आपली लैंगिक भूक भागविण्यासाठी वेश्यागमन करतात. कांही गरिब व निराधार स्त्रियां पोटासाठी तर कांही स्त्रिया चैनीसाठी वेश्याव्यवसाय पत्करतात. कांही स्त्रियांना फसवून या व्यवसायात ढकलले जाते. आज वेश्याव्यवसाय ही एक गंभीर अशी नागरी समस्या बनलेली आहे.

#### वेश्याव्यवसायाचा अर्थ आणि व्याख्या

निर्वाह चालविण्यासाठी व्यक्तीला कोणता ना कोणता तरी व्यवसाय करावा लागतो. मजुरी, नोकरी, शेती, पशुपालन, उद्योग, व्यापार यासारखे विविध व्यवसाय समाजात उपलब्ध असतात. आणि हे व्यवसाय समाजसंमत असतात. तथापि कांही व्यक्ती निर्वाहासाठी/गरजापूर्तीसाठी/पैसा मिळविण्यासाठी वेश्याव्यवसाय पत्करतात. साधारणपणे हा व्यवसाय अवैध (illicit), अनैतिक व निषिद्ध स्वरूपाचा मानला जातो. तथापि कांही आधुनिक समाजात हा व्यवसाय कायदेशीर (Legal) ठरविलेला दिसतो. हा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीस वेश्या (Prostitute) असे म्हणतात. **जी. आर.**

**स्कॉट** यांच्या मते समलिंगी किंवा भिन्न लिंगीय अनेक व्यक्तीबरोबर बक्षीस (पैसा किंवा अन्य स्वरूपातील) किंवा वैयक्तिक समाधान मिळविण्यासाठी अर्धवेळ किंवा पूर्णवेळ, नैसर्गिक किंवा अनैसर्गिक लैंगिक संबंध प्रस्थापित करणारी व्यक्ती म्हणजे वेश्या होय.'' या व्याख्येवरून वेश्या ही संज्ञा स्त्री तसेच पुरुषासाठीदेखील वापरली जाते हे स्पष्ट होते. तथापि स्त्रियांच्याबाबतीत ही संज्ञा अधिक रूढ झालेली आहे. कारण पुरुष वेश्यापेक्षा स्त्री वेश्यांचे प्रमाण कोणत्याही समाजात जास्त असल्याचे आढळते.

वेश्या शब्दाचा अर्थ पाहिल्यानंतर वेश्याव्यवसाय म्हणजे काय हे समजावून घेऊ.

१. **प्रा. चंद्रकांत खंडागळे** : केवळ पैशाच्या किंवा तत्सम मोबदल्यात इतर व्यक्तीस तिच्या कामतृप्तीसाठी देहविक्रय करणे म्हणजे वेश्याव्यवसाय होय.

२. **डब्ल्यु. जे. रॉबिनसन् :** कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता पैशासाठी केलेला लैंगिक समागम म्हणजे वेश्याव्यवसाय होय.

३. **इलियट आणि मेरिट :** अनिर्बंध आणि द्रव्यलोभावर आधारलेले, भावनिकदृष्ट्या तटस्थ असणारे अवैध किंवा निषिद्ध लैंगिक संबंध म्हणजे वेश्याव्यवसाय होय.

वरील व्याख्यांवरून वेश्याव्यवसायाविषयी पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

१. वेश्याव्यवसाय हा पैसा किंवा तशाच स्वरूपाचा अन्य मोबदला मिळविण्यासाठी केला जातो.

२. हा व्यवसाय स्त्री तसेच पुरुष देखील करते. तथापि स्त्रियांचे प्रमाण या व्यवसायात अधिक आढळते. त्यामुळे वेश्या म्हणजे स्त्रीवेश्या असाच अर्थ घेतला जातो.

३. हा व्यवसाय करणारी व्यक्ती इतर व्यक्तीच्या कामतृप्तीसाठी आपले शरीर देत असते.

४. हा व्यवसाय करणारी व्यक्ती कामतृप्तीच्या किंवा लैंगिक संबंधाच्या क्रियेत भावनिकदृष्ट्या तटस्थ असते. म्हणजे लैंगिक संबंधाबाबतची आपली इच्छा, अपेक्षा, आवड बाजूला ठेऊन देहविक्रय करीत असते.

५. साधारणपणे असा व्यवसाय हा अवैध/अनैतिक/निषिद्ध मानला जातो.

### वेश्याव्यवसायाची कारणे

वेश्याव्यवसायास अनेक कारणे किंवा घटक जबाबदार आहेत. त्यांचे आपणास आर्थिक, सामाजिक आणि मानसिक किंवा वैयक्तिक अशा तीन गटात विभाजन करता येईल.

### अ) आर्थिक कारणे

बहुसंख्य सामाजिक समस्येच्या मूळाशी आर्थिक घटक जबाबदार असल्याचे आढळते. वेश्याव्यवसायासही विविध आर्थिक घटक जबाबदार आहेत.

**१. दारिद्र्य :** दारिद्र्य हे वेश्याव्यवसायाचे प्रमुख कारण आहे. कारण दरिद्री कुटुंबातील स्त्रियांचे प्रमाण या व्यवसायात सर्वाधिक असल्याचे दिसते. ज्या कुटुंबाला आपल्या निर्वाहविषयक गरजांची पूर्तता समाजसंमत मार्गाने करता येत नाही अशा कांही कुटुंबातील स्त्रिया/मुली आपला व

कुटुंबाचा निर्वाह चालविण्यासाठी वेश्याव्यवसाय पत्करतात. कांही दरिद्री पालक बऱ्याचवेळा आपल्या मुलींना या व्यवसायात ढकलतात किंवा वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या व्यक्तींना मुलींची विक्री करतात. आणि ह्या व्यक्ती मुलींना हा व्यवसाय करावयास लावतात.

२. **बालकामगार :** दारिद्र्यामुळे कांही पालक आपल्या मुलींना बालवयातच एखाद्या ठिकाणी (उदा. हॉटेल, कारखाना, दुकान, श्रीमंताचे घर) कामास ठेवतात. मुलगी देखणी असल्यास कामाच्या ठिकाणचे पुरुष तिच्या अज्ञानाचा, दारिद्र्याचा, असहाय्यतेचा, संकोचाचा गैरफायदा घेऊन तिच्याशी लैंगिक संबंध प्रस्थापित करतात. त्याबदल्यात तिला पैसा वा भेटवस्तू देतात. यातूनच पुढे अशा मुली सराईतपणे वेश्याव्यवसाय सुरू करतात.

३. **कामाच्या ठिकाणची परिस्थिती :** आधुनिक काळात दारिद्र्यामुळे तसेच उच्च जीवनमानाच्या अपेक्षेने स्त्रिया मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडून नोकरी-व्यवसाय करू लागल्या आहेत. त्यामुळे त्यांचा अनेक पुरुषांशी संबंध येत आहे. त्यापैकी कांही पुरुष अशा स्त्रियांना कांहीतरी आमिष दाखवून किंवा धमकी देऊन आपल्याशी लैंगिक संबंध ठेवण्यास भाग पाडतात. अब्रु व नोकरी वाचविण्यासाठी अशा स्त्रिया प्रारंभी मूकपणे या संबंधास तयार होतात. आणि पुढे कळत नकळतपणे वेश्याव्यवसायास सुरुवात करतात.

४. **स्त्रियांचा अनैतिक व्यापार :** सुंदर, असाहाय्य, विशेषतः तरुण स्त्रियांना प्रेमाचे/लग्नाचे आमिष दाखवून (फूस लावून) किंवा फसवून वा जबरदस्तीने पळवून नेऊन वेश्यागृहात (कुंटणखान्यात) किंवा रंगेल श्रीमंतांना विकण्याचा धंदा करून पैसे मिळविणारा असा एक दलालांचा/समाजकंटकाचा वर्ग समाजात उदयास आलेला आहे. हा वर्ग वेश्याव्यवसायास स्त्रियांचा पुरवठा करीत रहातो व त्यावर आपला निर्वाह चालवितो.

५. **चंगळवाद :** आधुनिक काळात समाजात विशेषतः नागरी विभागात चंगळवादाचा प्रभाव खूपच वाढला आहे. चैन/मौजमस्ती करण्यासाठी, भौतिक सुखोपभोग घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैशाची गरज असते. तो मिळविण्यासाठी अनेक सुंदर, सुशिक्षित, चतुर स्त्रिया स्वेच्छेने वेश्याव्यवसाय पत्करतात. यातूनच 'कॉलगर्ल्स' हा प्रकार उदयास आलेला आहे. कमी श्रमात सहजपणे भरपूर पैसा देणारा व्यवसाय किंवा सौंदर्याचा व तारुण्याचा पैसा मिळविण्यासाठी वापर करणे यामध्ये कांही गैर नाही अशाप्रकारची विचारसरणी अशा स्त्रियांमध्ये रूढ होत चालली आहे. त्यामुळे अनेक आर्थिक, औद्योगिक वित्तीय, प्रशासकीय, राजकीय क्षेत्रातील पुरुषमंडळीकडून आपले आर्थिक हितसंबंध साध्य करून घेण्यासाठी त्यांना अशा सुंदर व तरुण स्त्रिया पुरविल्या जातात. यातूनच उच्चभ्रू वर्गात देखील हा व्यवसाय अत्यंत प्रगत व आकर्षक स्वरूपात फोफावला आहे.

६. **नवीन व्यवसाय :** आधुनिक शहरांमध्ये मोठमोठी हॉटेल्स, लॉज, परमीट रूम, डान्स बार, क्लब्ज, जुगार अड्डे असे नवनवीन व्यवसाय उदयास आले आहेत. चैन, मौजमस्ती, रंगढंग करणारे श्रीमंत पुरूष या व्यवसायंचे ग्राहक असतात. अशा ग्राहकांना खूष करण्यासाठी या व्यवसायात तरूण व सुंदर मुलींना नोकरीवर ठेवले जाते. या व्यवसायातील मोहमयी (ग्लॅमरस) वातावरणास बळी पडून या तरुणी पुढे वेश्याव्यवसाय करू लागतात.

### ब) सामाजिक कारणे

आर्थिक घटकांप्रमाणेच कांही सामाजिक घटक देखील वेश्याव्यवसायास जबाबदार आहेत.

१. **कौटुंबिक घटक :** कुटुंबातील मातापित्याचे संबंध विद्वेषाचे, ताणतणावाचे असतील, माता-पित्यापैकी कोणीतरी व्यभिचारी वर्तन करणारा असेल, कुटुंबात मुलींना पुरेसे प्रेम व संस्कार मिळत नसतील तर अशा कौटुंबिक परिस्थितीचा प्रभाव पडून मुली वाममार्गास लागण्याची व पुढे वेश्याव्यवसाय करण्याची दाट शक्यता असते.

२. **वैवाहिक घटक :** जर पती नपुंसक असेल, किंवा बाहेरख्याली असेल किंवा पत्नीकडे दुर्लक्ष करीत असेल तर पत्नी प्रथम कामतृप्तीसाठी परपुरुषांशी लैंगिक संबंध ठेवण्याची व त्यातून पुढे पैसे घेऊन असे संबंध ठेवण्याची शक्यता निर्माण होते. आणि या सवयीचे रुपांतर हळूहळू वेश्याव्यवसायात होऊ शकते. कांही मुलींचा या ना त्या कारणाने लवकर विवाह होत नाही. अशा प्रौढ कुमारीका प्राथम कामतृप्तीसाठी आणि पुढे एकूणच जीवन जगण्यासाठी वेश्याव्यवसाय करण्यास बाध्य होतात.

३. **वाईट शेजार :** वेश्याव्यवसाय चालणाऱ्या परिसरात राहणाऱ्या मुलींवर वेश्याव्यवसायाचे संस्कार होण्याची दाट शक्यता असते. आपणही लैंगिक सुखाची अनुभूती घ्यावी, देहविक्रय करून पैसा मिळवावा व चैनीचे जीवन जगावे अशी इच्छा मुलींच्या मनात निर्माण होते व त्या वेश्याव्यवसायाकडे वळतात. तसेच शेजारील कुटुंबातील स्त्री चोरून व उघडपणे वेश्याव्यवसाय करीत असेल तर ती जवळपासच्या मुलींना या व्यवसायाकडे आकर्षित करण्याची दाट शक्यता असते. तसेच शेजारील कुटुंबातील स्त्री वा पुरूष कुंटणखान्यास मुली पुरविण्याचा व्यवसाय करणारा असेल तर तो आसपासच्या गरीब व निराधार तरुणींना वेश्याव्यवसायात ओढण्याची शक्यता असते.

४. **कुमारी मातृत्व :** एखाद्या तरुणीचे विवाहापूर्वी चुकून वाकडे पाऊल पडले किंवा तिच्यावर कोणीतरी जबरदस्ती केली आणि त्यातून ती गर्भवती राहिली तर तिला व्यभिचारीणी ठरविले जाते. समाजात तिची बदनामी होते. तिच्याशी विवाहास कोणी तरुण तयार होत नाही. समाजातील वासनांध पुरुष तिच्याशी लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. अशा स्थितीत त्यांची फुकट वासनापूर्ती करण्यापेक्षा पैसे घेऊन सरळसरळ वेश्याव्यवसाय केलेला बरा म्हणून अशा मुली या व्यवसायात उतरतात.

५. **अनिष्ट प्रथा :** भारतीय समाजातील कांही अनिष्ट प्रथा ही वेश्याव्यवसायास कारणीभूत ठरलेल्या आहेत.

**अ) हुंडाप्रथा :** भारतात हुंडा दिल्याशिवाय मुलींचा विवाह होत नाही. कुटुंब दरिद्री असेल वा कुटुंबात अनेक मुली असतील तर पैशाअभावी मुलींचा विवाह लवकर जुळत नाही. अशा वेळी मुलींचे विवाहाचे वय वाढत जाते. अशा मुली कामतृप्तीसाठी एखाद्या पुरुषाशी लैंगिक संबंध प्रस्तापित करतात आणि त्यातूनच पुढे वेश्याव्यवसाय करू लागतात. बऱ्याचवेळा अशा कुटुंबातील एखादी मुलगी आपल्या व बहिणींच्या विवाहासाठी हुंडा गोळा करण्याच्या उद्देशानेही वेश्याव्यवसाय स्वीकारते.

**ब) बालविवाह व विधवाविवाहबंदी :** भारतात अद्यापही बालविवाह होतात. एखाद्या मुलीस बालवयातच वैधव्य आल्यास तिचा पुनर्विवाह करणे निषिद्ध मानले जाते. त्यामुळे अशी विधवा आपल्या कामवासनेच्या तृप्तीसाठी प्रथम चोरून परपुरुषाशी लैंगिक संबंध ठेऊ लागते. आणि पुढे कामतृप्तीबरोबरच पैसे मिळत असल्यास का मिळवू नये असा विचार करून सरळसरळ वेश्याव्यवसाय करू लागते. बऱ्याचवेळा कांही मुलींचा त्यांच्यापेक्षा कितीतरी वयस्क असलेल्या पुरुषाशी विवाह केला जातो. वाढत्या वयानुसार असा पुरुष आपल्या पत्निची लैंगिक तृप्ती करू शकत नाही. त्यामुळे ती परपुरुषांशी लैंगिक संबंध जोडते आणि नंतर हळूहळू वेश्याव्यवसाय सुरू करते.

**क) देवदासी प्रथा :** भारतात देवांची सेवा करण्यासाठी कांही मुलींना देवाला वाहिले जाते. अशा मुलींना विवाह करता येत नाही. त्यांना देवदासी म्हणतात. देवदासी तारुण्यात येताच तिच्याशी संबंधित असलेले पुरुष तिचा लैंगिक उपभोग घेणे सुरू करतात. समाजात तिला एखाद्या वेश्येसारखीच वागणूक दिली जाते. अशा परिस्थितीत देवदासी पुढे उघडपणे वेश्याव्यवसाय करू लागते. यल्लमादेवीच्या जोगतिणी, खंडोबादेवाच्या मुरळ्या किंवा बसवी, भाविणी इत्यादी नावाने देवदासींना ओळखले जाते. देवाधर्माच्या नावाखाली त्यांचे लैंगिक शोषण होते व शेवटी त्यांना वेश्याव्यवसाय करणे भाग पडते.

**६) औद्योगिकीकरण–नागरीकरण :** ह्या दोन प्रक्रियादेखील वेश्याव्यवसायाच्या वाढीस कारणीभूत आहेत. शहरातील उद्योगधंद्यात काम मिळविण्यासाठी सभोवतालच्या प्रदेशातील कांही पुरुष एकटेच शहरात वास्तव्यास येतात. कामवासनेच्यातृप्तीसाठी ते वेश्यागमन करतात. परिणामी वेश्याव्यवसायात नवनवीन मुलींची भरती होण्यास चालना मिळत राहते. पोटासाठी शहरात येणाऱ्या सर्वच स्त्रीपुरुषांना रोजगार मिळत नाही. त्यामुळे नाईलाजाने काही स्त्रियांना वेश्याव्यवसाय स्वीकारावा लागतो. ग्रामीण भागातून शहरात स्थलांतरीत होणाऱ्या लोकांनी शहरात गलिच्छ वस्त्या उभारल्या आहेत. या वस्त्या अनैतिक/अवैध कृत्ये मोठ्या प्रमाणावर चालतात. तेथील दादा–गुंड–मवाली अशी मंडळी गरीब, निराधार, असहाय्य स्त्रियांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडतात. लहानपणापासून अशा अनैतिक वातावरणात वाढलेल्या कांही मुली तारुण्यात येताच राजीखुषीने वेश्याव्यवसाय पत्करतात.

**७) नैतिक मूल्यांचा ऱ्हास :** आधुनिक नागरी समाजात पारंपारिक नैतिक व धार्मिक मूल्यांचा ऱ्हास होत चालला आहे. नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिका, जाहिराती, साहित्य, इत्यादीमधून नग्नता, व्यभिचार, बलात्कार, लैंगिक संबंध इत्यादींचे सादरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. तसेच शहरातील डान्सबार, डिस्कोबार, पंचतारांकीत हॉटेल्स इत्यादीमधूनही स्वैर लैंगिक वर्तनास चालना मिळत आहे. परिणामी लहानपणापासूनच मुलांमुलींवर लैंगिकतेचे संस्कार होऊन ती वाममार्गास लागण्याचे प्रमाण वाढले आहे. यातूनच कांही मुलींना लैंगिक संबंधाची चटक लागून पुढे त्या वेश्याव्यवसाय करू लागल्या आहेत.

**क) मानसिक आणि वैयक्तिक कारणे**

आर्थिक व सामाजिक घटकांप्रमाणेच कांही मानसिक व वैयक्तिक घटकही वेश्याव्यवसायास कारणीभूत ठरतात.

**१. अज्ञान :** कांही मुली अज्ञानी व साध्याभोळ्या स्वभावाच्या असतात. त्या कोणावरही पटकन विश्वास ठेवतात. त्यांच्या या स्वभावाचा गैरफायदा घेऊन कांही मंडळी त्यांना प्रेमाचे, लग्नाचे, नोकरीचे आमिष दाखवून त्यांचे लैंगिक शोषण करतात व पुढे सोडून देतात. अशा स्त्रियाना शेवटी वेश्याव्यवसायाचाच आधार घ्यावा लागतो. तर कांहीजण अशा स्त्रियांना शहरात आणून कुंटनखान्यास विकतात.

**२. लैंगिक अनुभूतीची इच्छा :** कांही मुलींना वयात येताच लैंगिक सुखाची अनुभूती घेण्याची तीव्र इच्छा निर्माण होते व त्यासाठी त्या पुरुषांशी लैंगिक संबंध ठेवतात. पुढे या सुखाची चटक लागून त्या स्वैर लैंगिक जीवन जगू लागतात. आणि यातूनच वेश्याव्यवसायाकडे वळतात.

**३. कामूकता :** कांही स्त्रियां लैंगिकदृष्ट्या अधिक कामूक असतात. एका पुरुषाशी संबंध ठेऊन त्यांची लैंगिक तृप्ती होत नाही. त्यामुळे त्या लैंगिक सुखातील विविधता अनुभवण्यासाठी अनेक पुरुषांशी संबंध जोडतात व पुढे सरळसरळ वेश्या बनतात.

**४. इतर घटक :** कांही स्त्रिया मानसिकदृष्ट्या दुर्बल असतात. कांही शारीरिकदृष्ट्या अपंग असतात. कांही कुरूप असतात. कांही पुरुषांना आपली पत्नी आवडत नसते. त्यामुळे ते तिला नांदवत नाहीत. कांही सुंदर स्त्रियांचे पती कुरूप असल्याने त्यांना ते आवडत नसतात. अशाप्रकारच्या स्त्रिया अन्य पुरुषांशी संबंध प्रस्थापित करतात आणि कांही काळाने वेश्याव्यवसाय करू लागतात.

**वेश्याव्यवसाय : उपाययोजना**

वेश्याव्यवसाय ही गंभीर सामाजिक समस्या आहे. या व्यवसायाचे व्यक्ती, कुटुंब व समाज यांच्यावर निश्चित असे गंभीर दुष्परिणाम होतात हे खरे असले तरी अनेक मंडळी वेश्याव्यवसाय अत्यावश्यक दुरित (necessary evil) मानतात. वेश्याव्यवसायांमुळे कामांध/अतृप्त पुरुषांच्या कामवासनेची तृप्ती शक्य होते व समाजातील इतर स्त्रियांच्या शीलाचे रक्षण होते असा युक्तिवाद केला जातो. त्यामुळे कांही मंडळी वेश्याव्यवसाय सामाजिकदृष्ट्या आवश्यक आहेत असे मानतात. तथापि कांही मंडळी हा व्यवसाय घाणेरडा मानून त्याचे पूर्णतः निर्मूलन करावे असा आग्रह धरतात. तथापि या व्यवसायाचे पूर्णतः निर्मूलन करणे अत्यंत अवघड आहे. त्यामुळे विविध समाजात या व्यवसायाचे नियंत्रण करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

भारतीय समाजाच्या संदर्भात विचार करता वेश्याव्यवसायाबाबतीत अ) कायदेशीर उपाययोजना ब) प्रतिबंधात्मक उपाययोजना क) पुनर्वसनात्मक उपाययोजना अशा तीन प्रकारच्या उपाययोजनांचा अभ्यास करावा लागतो.

**अ) कायदेशीर उपाययोजना**

भारतात वेश्याव्यवसायासंबंधी कायदेशीर तरतुदी ब्रिटिश राजवटीत करण्यास सुरुवात झाली.

१. भारतीय दंडसंहितेतील कलम ३७२ व ३७३ नुसार वेश्याव्यवसायासाठी अल्पवयीन मुलींची खरेदी-विक्री करणे हा दखलपात्र गुन्हा ठरविला आहे.

२. १८४४ च्या भारतीय कायद्याने भारत सरकारला वेश्यागृहे व वेश्यांचे उच्चाटन करण्याविषयी आदेश देण्याचे अधिकार देण्यात आले.

३. १९२३ मध्ये सर्वप्रथम मुंबई राज्याने ''दि बॉंबे प्रिव्हेन्शन ऑफ प्रॉस्टिट्यूशन ॲक्ट'' हा कायदा संमत करून त्याद्वारे वेश्या व त्यांचे सार्वजनिक ठिकाणचे लज्जास्पद वर्तन, वेश्यांना मदत करणारे व त्यांच्या कमाईवर जगणारे लोक यांच्यावर कडक नियंत्रणे घातली.

४. त्यानंतर मद्रास (१९३०), बंगाल (१९३२), उत्तरप्रदेश (१९३३) पंजाब (१९३५) म्हैसूर (१९३६) या प्रांतानीही अनैतिक व्यापार बंदीचे कायदे केले.

५. १९३४ मध्ये मुंबई प्रांताने ''बॉंबे देवदासी प्रोटेक्शन ॲक्ट आणि १९४७ मध्ये मद्रास प्रांताने देवदासी (प्रिव्हेशन ऑफ डेडिकेशन) ॲक्ट असे कायदे करून देवदासी प्रथेस आळा घालण्याचा प्रयत्न केला.

६. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने ''**स्त्रिया आणि मुलींचा अनैतिक व्यापार बंदी कायदा**'' (Suppression of Immoral Traffic of Women & Girls Act-1956) १९५६ मध्ये संमत केला. त्यातील प्रमुख परतुदी पुढीलप्रमाणे आहेत –

अ) कुंटणखाना चालविणे, त्याचे व्यवस्थापन पाहणे, त्यात सक्रीय सहभाग घेणे, कुंटणखाना चालविणाऱ्यास मदत करणे यासाठी १ ते ३ वर्षे तुरुंगवास व रु. २००० दंड अशी तरतूद केली आहे.

ब) १८ वर्षावरील जी व्यक्ती पूर्णतः वा अंशतः वेश्याच्या कमाईवर जगते तसेच वेश्याव्यवसायासाठी स्त्रिया व मुलींची दलाली करते त्यांना १ वर्ष किंवा अधिक काळाच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल.

क) सार्वजनिक ठिकाणापासून २०० यार्ड परिसरात वेश्याव्यवसायास बंदी घातली आहे. तसेच सार्वजनिक रस्त्यावर पुरुषाशी लगट करण्यासही बंदी घातली आहे.

ड) या कायद्यानुसार हक्क वेश्यांना दिलेला आहे.

ई) वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रीस/मुलीस त्या ठिकाणाहून इतर ठिकाणी हलविण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यास दिलेला आहे.

७. १९८२ मध्ये कर्नाटक सरकारने देवदासी प्रतिबंधक कायदा संमत करून देवदासी होणे व एखाद्या मुलीस देवदासी होण्यास भाग पाडणे या गोष्टी बेकायदेशीर ठरवून संबंधितांना शिक्षा करण्याची तरतूद केलेली आहे.

**ब) प्रतिबंधात्मक उपाययोजना**

केवळ कायदे करून कोणतीही सामाजिक समस्या पूर्णतः सुटू शकत नाही. त्यासाठी कांही प्रतिबंधात्मक उपायही योजावे लागतात. समाजातील मुली/स्त्रिया वेश्या व्यवसायाकडे वळणारच नाहीत यासाठी करावयाच्या उपायांना प्रतिबंधात्मक उपाय म्हणता येते ते पुढीलप्रमाणे–

**१. दारिद्र्य निर्मूलन :** दारिद्र्यामुळे बहुसंख्य स्त्रिया हा व्यवसाय पत्करतात. म्हणून या व्यवसायास प्रतिबंध करण्यासाठी दारिद्र्य निर्मूलनाचे सर्वंकष उपाय योजले पाहिजेत. दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक प्रौढ स्त्रीला समाजमान्य रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. स्त्रियांसाठी व्यावसायिक शिक्षण–प्रशिक्षण सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

**२. निराधार मुलींना/स्त्रियांना आश्रय :** अनाथ/निराधार स्त्रियांना फसवून वेश्या व्यवसायात ढकलण्याचे प्रमाण मोठे आहे. म्हणून अशा मुलींसाठी/स्त्रियांसाठी अनाथालये, सुरक्षागृहे, वसतीगृहे इ. मोठ्या प्रमाणावर सुरू करून त्यांचे समाजकंटकापासून/दलालापासून संरक्षण केले पाहिजे.

**३. लैंगिक शिक्षण :** कामवासना चेतविणाऱ्या साहित्य व चित्रपटावर बंदी घालून मुलामुलींना शास्त्रशुद्ध लैंगिक शिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे त्यांना वेश्याव्यवसायातील गंभीर धोक्यांची जाणीव होईल व ते तिकडे वळणार नाहीत.

**४. अंधश्रद्धा निर्मूलन :** अंधश्रद्धेपोटी अनेक मुलींना देवाच्या सेवेसाठी वाहिले जाते. अशा मुलींना पुढे वेश्याव्यवसाय करावा लागतो. म्हणून देवदासी व तत्सम प्रथेच्या मुळाशी असलेल्या देवभोळ्या समजूती व अंधश्रद्धा यांचे निर्मूलन केले पाहिजे. त्यासाठी समाजप्रबोधनाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविले पाहिजेत.

**५. वेश्यागृहांचे अलगीकरण :** कुसंगत/वाईट शेजार यामुळेही वेश्याव्यवसायास चालना मिळते. म्हणून वेश्यागृहे/कुंटणखाने यांना सभ्य वस्ती, शिक्षणसंस्था, सार्वजनिक ठिकाणे इत्यादीपासून अलग करण्यात यावे. त्यामुळे वेश्याव्यवसायाचे व वेश्यागमनाचे कुसंस्कार मुलांमुलीवर होण्यास कांही प्रमाणात तरी अटकाव होईल.

**६. कुमारी मातृत्वाविषयी उदार दृष्टिकोन :** कुमारीकेस गर्भधारणा झाल्यास तिला बदचलन ठरविले जाते व तिला लोकनिंदेस तोंड देत जगणे अवघड होते म्हणून ती वेश्याव्यवसायाकडे वळते. हे टाळण्यासाठी कुमारी मातृत्वाविषयी समाजाने थोडासा उदार दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. अशा कुमारीकेच्या संततीस संततीहिन जोडप्याने दत्तक घेणे, तिचा विवाह घडवून आणणे, आणि तिला सामान्य जीवन जगण्यास अनुकूल परिस्थिती उपलब्ध करून देणे इत्यादीसाठी स्वयंसेवी संस्था, व सामाजिक कार्यकर्ते यांनी पुढाकार घेतला पाहिजे.

**७. कायद्यांची कडक अंमलबजावणी :** वेश्याव्यवसायावर नियंत्रण ठेवण्यासाठी केलेल्या कायद्यांची कडकपणे अंमलबजावणी केली पाहिजे. वेश्यागृहाचे मालक/मालकीण, मुली पुरविणारे दलाल, मुलींना फूस लावून पळवून आणणारे, मुलींची विक्री करणारे इत्यादी समाजकंटकांना कठोर शासन झाले पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे पोलीस खात्याचे अशा मंडळीशी आर्थिक हितसंबंध तयार झालेले आहेत. त्यामुळे भ्रष्ट पोलिसांवरही कठोर कारवाई झाली पाहिजे. यासाठी नागरिकांनी/सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे.

**क) पुनर्वसनात्मक/सुधारणात्मक उपाययोजना**

वेश्याव्यवसायात गुंतलेल्या स्त्रियांची त्यातून सुटका करून त्यांना समाजात सन्मानाचे जीवन जगण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांना पुनर्वसनात्मक/सुधारात्मक उपाययोजना असे म्हणतात.

**१. वेश्यांचा शोध घेणे व त्यांना आश्रय देणे :** उघड किंवा छुप्या स्वरूपात वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचा कुंटणखाने, हॉटेल्स, लॉज, डान्सबार इत्यादी ठिकाणी शोध घेऊन त्यांना अनाथगृहे, नारीगृहे, संरक्षकगृहे, मुलींचे निरीक्षण गृह (१८ वर्षाखालील मुलींसाठी) इत्यादीमध्ये आश्रय मिळवून दिला पाहिजे. अशा आश्रय संस्था किंवा जागरूक स्वीकार केंद्रे स्थापन झालेली असून त्यामध्ये वेश्याव्यवसायातून सुटका झालेल्या स्त्रियांना आणले जाते. त्यांच्या भौतिक गरजांची

पूर्तता केली जाते. तसेच त्यांच्यावर आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचार केले जातात. आणि समाजात नव्याने चांगले जीवन सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी मनोवृत्ती निर्माण केली जाते.

२. **आर्थिक पुनर्वसन :** वेश्याव्यवसापासून सुटका केल्यानंतर जगावयाचे कसे हा प्रश्न अशा स्त्रियांपुढे असतो. त्यासाठी सरकार, सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांची भूमिका महत्त्वाची ठरते. अशा स्त्रियांसाठी बचाव संस्था (Rescue Home), सुधारगृहे स्थापन झाली असून त्यामध्ये अशा स्त्रियांना दीर्घकाळ ठेवले जाते. तेथे त्यांना छोट्या मोठ्या व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर त्यांना रोजगारी नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो. एकंदरीत समाजमान्य पद्धतीने त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी मदत केली जाते.

३. **मानसिक–सामाजिक पुनर्वसन :** वेश्याव्यवसायातून सुटका होऊन त्याऐवजी समाजमान्य व्यवसाय करून अशा स्त्रिया/मुली नव्याने जीवन सुरू करू लागल्या तरी 'वेश्या' म्हणून लागलेला कलंक लगेच पुसला जाता नाही. अशा स्त्रिया स्वतःस अपराधी, वा पापी समजत असतात. त्यामुळे त्यांची ही अपराधीपणाची भावना काढून टाकण्यासाठी त्यांच्यावर मानसोपचार करण्याची गरज असते. तसेच समाजदेखील अशा स्त्रियांना 'कलंकित' म्हणूनच वागणूक देत असतो. समाजाचा हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक असते. वेश्याव्यवसायातून मुक्त झालेल्या स्त्रियांना त्यांच्या पालकांकडे/कुटुंबाकडे पाठविणे, अविवाहीत असल्यास त्यांचा विवाह घडवून आणणे, त्यासाठी पुरोगामी विचारांच्या तरुणांचा/पुरुषांचा शोध घेणे, अशा जोडप्यांना समाजात सन्मानपूर्वक वागणूक मिळेल अशी तजवीज करणे आवश्यक असते. थोडक्यात वेश्याव्यवसायातून मुक्त झालेल्या स्त्रियांचे आर्थिक, मानसिक व सामाजिक पुनर्वसन करणे आवश्यक ठरते.

### २.३.४ पर्यावरणाच्या अवनतीची समस्या (Problem of Environmental Degradation)

पर्यावरणाची अवनती ही आधुनिक काळातील सर्वात गंभीर अशी समस्या आहे. सजीवांच्या सभोवताली असणाऱ्या व त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या परिस्थितीस पर्यावरण असे म्हणतात. पृथ्वीवरील सजीवांच्या सभोवताली निसर्गाने निर्माण केलेल्या हवा, पाणी, भूमी, सजीव आणि मानवाने निर्माण केलेल्या भौतिक व अभौतिक वस्तू इत्यादी प्रमुख घटकांचे आवरण आहे. या घटकांनाच अनुक्रमे वातावरण, जलावरण, भूआवरण, जीवावरण आणि संस्कृती असे म्हणतात. ह्या पाच घटकांतील किंवा आवरणातील सहसंबंधामुळे सजीवासाठी जी आवश्यक परिस्थिती निर्माण होते तिला पर्यावरण असे म्हणतात. प्रत्येक सजीवाचे स्वतःचे असे खास पर्यावरण आहे. आणि प्रत्येक सजीव आपल्या गरजापूर्तीसाठी पर्यावरणातील विविध घटकांचा उपयोग करून घेत असतो. मानवदेखील आपल्या गरजापूर्तीसाठी/सुखप्राप्तीसाठी पर्यावरणातील विविध घटकांचा अंधाधुंदपणे वापर करू लागला आहे. त्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी किंवा ऱ्हास किंवा अवनती होऊ लागला आहे. पर्यावरणाचे प्रदूषण हे या अवनतीचे एक प्रमुख कारण आहे. प्रदूषणाच्या समस्येने सर्व जगालाच ग्रासलेले आहे. म्हणून या ठिकाणी आपण प्रदूषणाचा अर्थ, प्रकार, कारणे व प्रदूषण नियंत्रणाची उपाययोजना यांचा ऊहापोह करणार आहोत.

## ■ प्रदूषणाचा अर्थ आणि व्याख्या

Pollution हा इंग्रजी शब्द लॅटिन भाषेतील Polluere या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ एखादी गोष्ट दूषित किंवा अशुद्ध होणे असा आहे. यावरून पर्यावरणाचे प्रदूषण म्हणजे पर्यावरणातील हवा, पाणी, अन्न, भूमी, इत्यादी घटक दूषित किंवा अशुद्ध होणे होय. पर्यावरणाच्या प्रदूषणाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी त्याच्या कांही व्याख्या पाहू.

१. **प्रा. चंद्रकांत खंडागळे** : पर्यावरणाचे प्रदूषण म्हणजे पर्यावरणाचे घटक असलेल्या हवा, पाणी, भूमी इत्यादींच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मांमध्ये होणारे असे अवांछनीय परिवर्तन, की जे सजीवांचे आरोग्य, क्षमता व कृती यांना धोकादायक ठरते.

२. **एन्व्हारमेंटल पोल्यूशन पॅनेल (वाशिंग्टन) :** सजीवांची विपुलता, भौतिक व रासायनिक घडण, उत्सर्जनाच्या पातळ्या, ऊर्जेची प्रतिमाने यातील बदलांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम म्हणून आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत होणाऱ्या प्रतिकूल फेरफारास पर्यावरणाचे प्रदूषण असे म्हणतात.

३. **पर्यावरण (संरक्षण) कायदा–१९८६ :** जे पदार्थ किंवा घटक घन, द्रव किंवा वायू स्वरूपात मानवी कृतीद्वारे किंवा नैसर्गिकपणे पर्यावरणात मिसळतात व पर्यावरणास घातक ठरू शकतात त्यांना प्रदूषके म्हणतात. अशा प्रदूषकांची पर्यावरणातील घातक उपस्थिती किंवा त्यांच्या उपस्थितीमुळे घडून आलेले घातक बदल म्हणजे पर्यावरण प्रदूषण होय.

## ■ पर्यावरणीय प्रदूषणाचे प्रकार :

पर्यावरणातील प्रदूषणाचे विविध निकषांच्या आधारे विविध प्रकार पाडता येतात. स्थूलमानाने प्रदूषणाचे हवा प्रदूषण, जलप्रदूषण, भूप्रदूषण व ध्वनीप्रदूषण असे चार प्रकार पडतात.

**१. हवा प्रदूषण :** हवा प्रदूषण म्हणजे हवेत दूषित पदार्थ किंवा घटक मिसळून हवा दूषित किंवा अशुद्ध होणे होय. दूषित पदार्थांना प्रदूषके असे म्हणतात. ही प्रदूषके वायू प्रदूषके (उदा. कार्बन डॉय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साइड, सल्फर, नायट्रोजनची संयुगे, क्लोरिन इत्यादी) आणि कणप्रदूषके (उदा. धूलीकण, जलबिंदू, धूर, धुरळा, रोगकारक जीवाणू इत्यादी) अशा दोन प्रकारची असतात. हवेत अनेक वायू असून त्यांचे हवेतील नैसर्गिक प्रमाण निश्चित असे आहे. उदा. हवेत नायट्रोजन ७८%, ऑक्सिजन २१%, कार्बनडॉयॉक्साईड ०.०३% इतके असून पाण्याची वाफ व इतर वायूंचे प्रमाण अल्प आहे. कांही नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे हवेतील वायूंचे हे प्रमाण बदलते. तसेच हवेची नैसर्गिक गुणवत्ताही बदलते आणि हे बदल सजीवांच्या आरोग्यास हानिकारक ठरतात. तसेच भौतिक मालमत्तेस हानी किंवा नुकसान पोहचवितात.

## ■ हवा प्रदूषणाचे दुष्परिणाम

**१. दृष्टिदोष :** हवेतील धूर, धुरळा, धुके, राख, काजळी इत्यादीमुळे प्रकाशकिरण सर्वत्र पसरून डोळ्यांना दिसण्यात अडथळा येतो व अपघात होतात.

२. **पदार्थावर परिणाम :** हवेतील प्रदूषकांमुळे संगमरवरी इमारती, धातूची साधने व वाहने, काच, रंग इत्यादीवर गंज चढतो. त्यांची झीज होते.

**३. अनारोग्य :** अशुद्ध हवेमुळे फुफ्फुसाचा कर्करोग, अस्थमा, डोकेदुखी, श्वसनमार्गास सूज, पेशींच्या कार्यात बिघाड, डोळ्यांची जळजळ, इ. आजार होऊन आरोग्य बिघडते. नवजात बालकांवर अशक्तपणा, विकलांगता, अकाली मृत्यू इ. परिणाम होतात.

**४. आम्लपर्जन्य :** सल्फर डायॉक्साईड व नायट्रोजन ऑक्साईड मिसळून आम्लयुक्त पाऊस पडतो. त्यामुळे वनस्पतींची वाढ खुंटते. जंगले नष्ट होतात. पुल, पुतळे, इमारती यांना गंज चढतो.

**५. तापमान वाढ :** हवेत कार्बन डायॉक्साईडचे प्रमाण वाढून पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे अनेक जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. वाढत्या तापमानाने बर्फ वितळून समद्राच्या पाण्याची पातळी वाढून मानवी वसाहतींना धोका निर्माण झाला आहे.

**६. ओझोनचा नाश :** कूलर, एअरकंडिशनर्स, जेट विमानातील इंधन, प्लास्टिक फोम इत्यादीत वापरल्या जाणाऱ्या क्लोरोफ्लुरोकार्बन (CFC) नावाच्या रासायनिक संयुगाचा हवेतील ओझोन वायूशी संयोग होऊन ओझनचे प्रमाण कमी होत आहे. हा वायू सूर्यापासून येणाऱ्या घातक 'अल्ट्रा-व्हायोलेट' किरणांना थोपवून त्याची तीव्रता कमी करतो. तथापि त्याचे हवेतील प्रमाण कमी होत असल्याने हे घातक किरण पृथ्वीवर पोहचून गंभीर त्वचारोग होऊ शकतात.

**७. किरणोत्सर्जनामुळे** कर्करोग व इतर कांही रोगांच्या प्रमाणात वाढ होत आहे. तसेच जीवशास्त्रीय जनुकीय घडणीत बदल होऊन त्याचे जीवसृष्टीवर दुष्परिणाम होत आहेत.

**२. जलप्रदूषण :**

पृथ्वीवरील महासागर, सागर, सरोवरे, नद्या, ओढे इत्यादी जलाशयांचा जलावरणात समावेश होतो. सजीवांना हवेप्रमाणेच पाण्याची गरज आहे. तथापि कांही नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे ह्या जलाशयात जंतू, विषाणू, आम्ले, क्षार, पारा, शिसे, नायट्रेट्स्, फॉस्फेट, किरणोत्सारी आयसोटोप्स, तेल, कीटकनाशके, धुण्याच्या पावडरी, धूळ, कचरा, राख इ. प्रदूषके मिसळून त्यातील पाणी बेचव, अशुद्ध, घाणरडे व दुर्गंधीयुक्त होऊन ते आरोग्यास धोकादायक बनते. यालाच स्थूलमानाने जलप्रदूषण असे म्हणतात. ''**पाण्यात विविध दूषित पदार्थ मिसळून त्याच्या नैसर्गिक गुणवत्तेत बदल होणे व त्यामुळे ते पिण्यास व वापरण्यास अयोग्य बनणे म्हणजे जलप्रदूषण होय.**'' जलप्रदूषणामुळे जगात सर्वत्रच पिण्याच्या शुद्ध पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून मानवासह सर्वच जीवसृष्टीचे आरोग्य व पर्यायाने अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

■ **जलप्रदूषणाचे दुष्परिणाम :**

**१. ऑक्सिजनची कमतरता :** प्रदूषणामुळे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन पाण्यातील वनस्पती व प्राणी यांचा नाश होतो. तेल व ग्रीसच्या तवंगामुळे पाण्यात खोलवर प्रकाश पोहचत नाही. त्यामुळे वनस्पतीच्या प्रकाश संश्लेषणात अडथळे येतात. त्यामुळे ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन वनस्पतींचा नाश होतो.

**२. तापमानात वाढ :** प्रदूषणामुळे पाण्याचे तापमान वाढते. त्यामुळे जलाचरांच्या जीवनचक्रात बाधा येऊन त्यांना हानी पोहचते.

**३. जलचरांचे आजार :** प्रदूषित पाण्यामुळे जलचरांना विविध रोग होतात. उदा. प्रदूषित पाण्यातील अमोनियामुळे माशांना कर्करोग व कल्ल्याचे विकार होतात. खनीज तेलातील कर्करोगजन्य रसायनांमुळे प्राण्यांचा मृत्यू होतो. डी.डी.टी. सारख्या कीटकनाशकांमुळे जलचरांची व पक्षांची अंडी फुटतात व आतील पिल्ले मरतात.

**४. मानवी आरोग्यास धोका :** प्रदुषित पाण्यामुळे मानवास विविध गंभीर आजार जडतात. पाण्यातील जंतू, विषाणू, आम्ले इत्यादीमुळे कावीळ, पटकी, विषमज्वर, आमांश, डांग्या खोखला, घटसर्प इत्यादी रोग होतात. पाण्यातील ॲल्युमिनियममुळे अलझायमर, शिशामुळे मतिमंदत्व, पाऱ्यामुळे मानसिक संतुलन ढळणे व अपंगत्व असे आजार होतात.

**५. परिसंस्थेचा विनाश :** एखाद्या नदीच्या किंवा तळ्याच्या पाण्यात कीटकनाशके व इतर प्रदूषके मिसळल्याने तेथील परिसंस्थेचा विनाश होतो.

**६. प्रवाळांना धोका :** पाण्याचे तापमान वाढून प्रवाळ खडक ठिसूळ बनतात व पांढुरके पडतात. गाळ साचल्याने प्रवाळ बेटे नष्ट होतात. प्रवाळावर गाळ साचल्याने प्रकाश संश्लेषणात अडथळे येऊन प्रवाळातील सूक्ष्मजीवांना खाद्य मिळत नाही.

### ३. ध्वनी प्रदूषण

ध्वनी प्रदूषण हा प्रदूषणाचा एक प्रकार आहे. इंग्रजीत त्यास Noise Pollution म्हणतात. Noise हा शब्द लॅटिन भाषेतील Nausea या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ कर्कश आवाज किंवा ध्वनी असा आहे. ध्वनी मापनासाठी 'डेसिबल' (dB) हे परिमाण वापरतात. साधारणपणे ५० ते ६० डेसिबलपर्यंतचा ध्वनी सुसह्य ठरतो. मात्र ८० डेसिबल्सनंतरचा ध्वनी असह्य होतो; गोंगाट/कर्कश ठरतो. तर १२० डेसिबल्सनंतरचा ध्वनी शरीरास हानिकारक ठरतो. आधुनिक काळात प्रामुख्याने नागर समाजात ध्वनी प्रदूषणाची समस्या गंभीर बनलेली आहे. शहरातील लोकांचा गोंगाट, मोटार, रेल्वे, विमाने, कारखान्यातील यंत्रे, घरातील रेडिओ, दूरदर्शन, पंखे, वातानुकूलित यंत्रे, सभा संमेलने, सण उत्सव इत्यादीच्या निमित्ताने लावले जाणारे लाऊसस्पिकर्स, स्टिरिओ, डॉल्बी इत्यादीमुळे ध्वनीप्रदूषण मोठ्या प्रमाणावर होत आहे.

■ **ध्वनीप्रदूषणाचे दुष्परिणाम :**

१. **बहिरेपणा :** साधारणतः १०० डेसिबल्सपेक्षा अधिक तीव्रतेचा आवाज सतत कानावर पडला तर बहिरेपणा येतो.

२. **शारीरिक व्याधी :** ध्वनीप्रदूषणामुळे रक्ताभिसरणाची क्रिया मंदावते. पवनसंस्थेत व श्वसनक्रियेत बिघाड होतो. मळमळणे, डोकेदुखी, रक्तदाब वाढ अशा व्याधी जडतात.

३. गरोदर स्त्रियांच्या पोटातील गर्भावर घातक परिणाम होतात.

४. गोंगाटामुळे रोगप्रतिकारशक्ती कमी होते.

५. सततच्या ध्वनी प्रदूषणामुळे मानसिक स्वास्थ्य बिघडते. निद्रानाश जडतो. स्वभाव चिडचिडा बनतो. मनावर ताण येतो. परिणामी व्यक्तीची कार्यक्षमता कमी होते.

### ४. भूप्रदूषण किंवा मृदा प्रदूषण

''रासायनिक द्रव्ये, धातुंचे कण, कचरा, हवेतील व पाण्यातील प्रदूषके इत्यादीच्या प्रभावामुळे जमिनीचा पोत बिघडणे, तिची उपजाऊ (पिकाऊ) क्षमता कमी होणे व ती वापरण्यास निरुपयोगी होणे म्हणजे भूप्रदूषण होय.'' भूमी किंवा जमीन, तिच्यावरील माती, दगड, खडक, पर्वत, पठारे, मैदाने, वाळवंटे, जमिनीतील खनीजे इत्यादींचा भूआवरणात समावेश होतो. जमीन या परिसंस्थेतील वनस्पती, सुक्ष्मजीवजंतू, कृमीकीटक, पशुपक्षी, मानव हे सजीव असून त्यांच्या गरजा जमिनीद्वारेच पूर्ण होतात. तथापि कांही नैसर्गिक व मानवनिर्मित कारणांमुळे जमिनीचे/मातीचे प्रदूषण होऊन तिची नैसर्गिक गुणवत्ता ढासळत आहे.

■ **भूप्रदूषणाचे दुष्परिणाम :**

**१. सजीवांस घातक :** शेतातील रासायनिक खते व कीटकनाशके मातीत मिसळल्याने मातीतील कांही उपयुक्त जीव व वनस्पतींचा नाश होतो. खतांचे व कीटकनाशकांचे अंश भूगर्भातील पाण्यात मिसळून जलप्रदूषण होते व त्या पाण्यातील जीव नष्ट होतात. असे पाणी विहिरीत उतरून ते पिण्याने आरोग्य बिघडते. खते व कीटकनाशकातील अंश अन्नधान्ये, फळे, भाजीपाला यात उतरून ती खाल्ल्यानेही आरोग्य बिघडते.

**२. क्षारपड व नापीक जमीन :** रासायनिक खते व पाण्याचा अतिरेकी वापर होऊन जमीन क्षारपड बनते. तसेच मातीत आम्लधर्मीय व अल्कलीधर्मीय रासायनिक द्रव्ये मिसळून जमीन नापीक होते. कारखान्यातील टाकाऊ पदार्थातील रासायनिक द्रव्ये मातीत मिसळून ती नापीक बनते.

**३. रोगराई :** जमिनीवरील कचऱ्याच्या ढिगात जंतू व विषारी द्रव्ये तयार होऊन ती हवा, पाणी, खाद्यपदार्थ यांच्यात मिसळतात. या ढिगाजवळ उंदीर, माशा, डास, चिलटे इत्यादी रोगप्रसारक जीवांची वाढ होऊन रोगराई पसरते.

**४. धातुयुक्त प्रदूषके :** खाणीजवळील धातुयुक्त प्रदूषके मातीत मिसळून तिच्यातील जीवजंतू-कृमीकीटक मरतात. वनस्पतींची वाढ खुंटते. जमिनीची पीक उत्पादनक्षमता घटते. अन्नधान्यात धातुंचे कण मिसळून ते मानवी आरोग्यास घातक ठरतात.

### पर्यावरणीय प्रदूषणाची कारणे :

पर्यावरण प्रदूषणास अनेक कारणे जबाबदार आहेत. त्या कारणांचे (अ) नैसर्गिक कारणे आणि (ब) मानवनिर्मित कारणे असे मुख्य दोन प्रकार पाडता येतात.

### अ) नैसर्गिक कारणे :

१) ज्वालामुखीचा उद्रेक, जंगलातील वणवे यातून तयार होणारी राख, समुद्राच्या पाण्याचे बाष्पिभवन होऊन खाली शिल्लक राहिलेले क्षार, वादळांमुळे उडणारी धूळ, जैविक पदार्थांच्या विघटनातून तयार होणारे वायू व द्रव्ये हवेत मिसळून **हवा प्रदूषण** होते.

२) वादळी वारे, जमिनीची धूप, सेंद्रिय पदार्थांचे विघटन इत्यादीमुळे **जलप्रदूषण** होते.

३) ज्वालामुखीच्या उद्रेकातून बाहेर पडणारी राख व ज्वालारस जमिनीवर पसरणे, नदीच्या पुराबरोबर वाहून येणारी घाण, कचरा व इतर प्रदूषके नदीकाठावरील मातीत मिसळणे, वाऱ्याबरोबर वाहून येणारी प्रदूषके मातीत मिसळणे इत्यादीमुळे **भूप्रदूषण** (मृदाप्रदूषण) होते.

४) ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट, गोंगाट करीत घोंगावणारी वादळे, पशुपक्षांचा कलकलाट इत्यादीमुळे **ध्वनीप्रदूषण** होते.

**ब) मानवनिर्मित कारणे :**

नैसर्गिक कारणामुळे होणारे पर्यावरण प्रदूषण हे फारसे गंभीर, तीव्र व धोकादायक नाही. परंतु मानवनिर्मित कारणांमुळे होणारे प्रदूषण मात्र अत्यंत घातक ठरत आहे. त्यापैकी कांही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे–

**१. औद्योगिकीकरण :** आधुनिक काळात सर्वच समाजात विशेषतः नागरी समाजात औद्योगिकीकरणाची गती खूपच वाढत चालली आहे. सर्वत्र विविध कारखाने निघाले आहेत. या कारखान्यातून कार्बन डायॉक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डायॉक्साईड, मॅग्नेशियम डायॉक्साईड, क्लोरीन, अमोनिया इत्यादी घातक वायू तसेच धूर, धुरळा, काजळी, राख, कार्बन इत्यादी प्रदूषके हवेत मिसळून **हवाप्रदूषण** होते. तसेच ह्या कारखान्यातून रसायने, क्षार, राख, मळी, विविध धातुंचे (जस्त, तांबे, कथील, शिसे, पारा, क्रोमियम, कॅडमिअम, आर्सेनिक इ.) कण किंवा अंश कारखान्यातील सांडपाण्यात मिसळतात व ते पाणी नद्या, सरोवरे, समुद्र इत्यादीत मिसळते व **जलप्रदूषण** होते. विविध कारखान्यातील टाकाऊ पदार्थांचे जमिनीवर ढीग साचतात व त्यातील रासायनिक द्रव्ये मातीत मिसळतात. औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातून बाहेर पडणारी राख, साखर कारखान्यातील मळी इत्यादी मातीत मिसळतात व भूप्रदूषण होते. कारखान्यातील यंत्रांच्या खडखडाटामुळे ध्वनीप्रदूषण होते. थोडक्यात औद्योगिकीकरण हे पर्यावरणीय प्रदूषणाचे एक प्रमुख कारण आहे.

**२. वाहतूक साधने :** खनीज तेलावर (पेट्रोल-डिझेल) चालणाऱ्या वाहनांची शहरात प्रचंड गर्दी झालेली आहे. खनीज तेलाच्या अपुऱ्या ज्वलनामुळे कार्बन डायॉक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर ऑक्साईड्स, हायड्रो कार्बन्स, शिसे, धूर व धूरके इत्यादी दूषितके हवेत मिसळून हवा प्रदूषण होते. समुद्रातून तेल वाहतूक करणाऱ्या जहाजांना अपघात होऊन तेल समुद्रात मिसळते व जलप्रदूषण होते. अशा या वाहतुक साधनांच्या इंजिनचा आवाज व हॉर्न्स यामुळे ध्वनीप्रदूषण होते.

**३. खाणी व तेल शुद्धीकरण केंद्रे :** खाणिजवळील जमिनीत कॅडमिअम, जस्त, शिसे, तांबे, आर्सेनिक, निकेल इत्यादी धातूंचे कण मिसळून **भूप्रदूषण** होते. खनीज तेल शुद्धीकरण प्रक्रियेतून क्षारयुक्त पाणी, अल्कली, आम्ल, सायनाईड्स, हायड्रोकार्बन्स, फिनॉल्स इ. घातक पदार्थ तयार होऊन ते पाण्यात मिसळतात तसेच तेलगळती पाण्यात होते व जलप्रदूषण घडून येते.

**४. आधुनिक शेती :** शेती उत्पादनवाढीसाठी वापरली जाणारी रासायनिक खते व कीटकनाशके मातीत मिसळतात आणि **भूप्रदूषण** होते. अशी प्रदूषित माती पाण्याबरोबर वाहात जाऊन नदी, तळी, समुद्र यात मिसळते व **जलप्रदूषण** होते. तसेच खतातील व जंतुनाशकातील अंश भूगर्भातील पाण्यात

उतरतात व ते पाणीही प्रदूषित होते. पिकावर फवारली जाणारी औषधे, रसायने, जंतुनाशके हवेत पसरून **हवाप्रदूषण** होते.

५. **अणुस्फोट व आण्विक कचरा :** अनुस्फोटातून अनेक किरणोत्सर्गी कण हवेत मिसळून हवाप्रदूषण होते. आण्विक कचरा डब्यात सीलबंद करून ते डबे समुद्रात खोलवर सोडतात. तथापि त्यातून गळती होऊन किरणोत्सर्जनामुळे सागरीप्रदूषण होते.

६. **कचरा व सांडपाणी :** शहरात जागोजागी कचऱ्याचे प्रचंड ढीग तयार होतात. या ढिगाऱ्यात जंतू, विषारी वायू व अन्य प्रदूषके तयार होतात. ती हवेत व पाण्यात मिसळून हवेचे व पाण्याचे प्रदूषण होते. समुद्रकिनारी व नद्यांच्या काठी आलेले पर्यटक प्लॅस्टिक, कागद व अन्य कचरा पाण्यात टाकतात व त्यामुळे जलप्रदूषण होते. शहरातील स्वयंपाकगृहे, हॉटेल्स, स्नानगृहे, शौचालये, कारखाने इत्यादीतील सांडपाणी त्यावर प्रक्रिया न करता नद्या, सरोवर, समुद्र यात सोडल्याने जलप्रदूषण होते. शहरातील उघड्या गटारीतील पाण्यात रोगजंतू तयार होऊन हवेत मिसळल्याने हवा प्रदूषण होते. मानव व इतर प्राण्यांचे मलमूत्र, अन्नधान्ये, फळे, भाज्या, इत्यादीच्या साली, मानवाने वापरून फेकून दिलेल्या वस्तूंचे जमिनीवर ढीग साचून त्यात विषारी द्रव्ये तयार होतात व मातीत मिसळतात व भूप्रदूषण होते.

७. **जंगलतोड :** मानवाने रस्ते व लोहमार्गबांधणी, घरबांधणी, फर्निचर इत्यादीसाठी लाकूड मिळावे, तसेच शेतीसाठी जमीन उपलब्ध व्हावी म्हणून प्रचंड प्रमाणावर जंगलतोड केल्याने वनस्पतींचे प्रमाण घटत आहे. परिणामी वातावरणातील कार्बनडायॉक्साईड वायू शोषून घेण्याची क्रिया मंदावत चालली आहे. परिणामी वातावरणाचे तापमान वाढून हरितगृह परिणामाची समस्या उद्‌भवल्याने हवा प्रदूषण वाढले आहे. जंगलतोडीमुळे जमिनीची धूप होऊन वाळवंटीकरणाची प्रक्रिया विस्तारत आहे. भूस्खलनाचे प्रमाणही वाढले आहे.

८. **इतर कारणे : अ) इंधने –** उष्णतेसाठी व अन्न शिजविण्यासाठी जाळल्या जाणाऱ्या लाकूड, कोळसा व अन्य इंधनामुळे धूर, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रस ऑक्साईड, सल्फर डायॉक्साईड इत्यादी हवेत मिसळून हवाप्रदूषण होते.

**ब) शस्त्रास्त्रे :** युद्धात वापरली जाणारी अण्वस्त्रे व रासायनिक तसेच जैविक अस्त्रे यांच्यामुळे प्रचंड हवाप्रदूषण होते.

**क) धुम्रपानातून** कार्बन मोनॉक्साईड, पॉलिसायक्लिक ॲरोमॅटिक, सायनाईड, बेन्झीपायरीन इ. घातक पदार्थ हवेत मिसळून हवाप्रदूषण होते.

**ड) उष्णता :** कारखान्यातील शीतकरण प्रक्रियेतून व ऊर्जा निर्मिती केंद्रातून निर्माण होणारी उष्णता नदी व तलावात सोडल्याने जलप्रदूषण होते.

■ **पर्यावरणीय प्रदूषणावरील उपाययोजना :**

पर्यावरणीय प्रदूषणास प्रतिबंध करणे, त्याचे नियंत्रण करणे आणि त्याद्वारे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे या उद्देशाने जगातील इतर देशांप्रमाणेच भारतातही विविध उपाययोजना राबविल्या जात

आहेत. ह्या उपाययोजना अ) कायदेशीर आणि ब) प्रतिबंधात्मक अशा दोन प्रकारात विभागता येतील.

### अ) कायदेशीर उपाययोजना :

पर्यावरणाच्या प्रदूषणास प्रतिबंध करणे व त्याचे नियंत्रणकरणे यासाठी भारतात विविध कायदे संमत केलेले आहेत. त्यापैकी कांही महत्त्वपूर्ण कायदे पुढीलप्रमाणे आहेत.

### १. जल (प्रदूषणाचे नियंत्रण व प्रतिबंध) कायदा – १९७४

हा कायदा १९७४ मध्ये भारतीय संसदेने संमत केला असून तो देशभर लागू आहे. या कायद्यानुसार केंद्रिय जलप्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य जलप्रदूषण नियंत्रण मंडळे स्थापन करण्याची तरतूद केली आहे. या मंडळांना नद्या, नाले, विहीरी, तळी इत्यादीची स्वच्छता राखण्यास चालना देणे, त्यातील पाण्याच्या प्रदूषणाबाबत संशोधन करणे, त्यासाठी प्रयोगशाळा स्थापने, जलप्रदूषणाबाबत सरकारला सल्ला देणे, जलप्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रणासंदर्भात कृती आराखडा तयार करणे, पाण्यातील प्रदूषणाचे प्रमाण ठरविणारे मानदंड निश्चित करणे इत्यादी अधिकार आहेत. या कायद्यानुसार नदी, तलाव, विहिरी इत्यादीत जाणीवपूर्वक विषारी/घातक पदार्थ सोडणे हा कायदेशीर गुन्हा ठरवून त्यासाठी ६ वर्षे कारावासाची शिक्षा निश्चित केलेली आहे. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या परवानगीशिवाय कारखान्यातील सांडपाणी जलप्रवाहात सोडण्यास प्रतिबंध केलेला आहे. कारखान्यातील सांडपाणी तपासण्याचा अधिकारही ह्या मंडळास दिला आहे. मंडळाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यास तीन महिने कारावास वा रु. १० हजार दंड अथवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात.

### २. हवा (प्रदूषणाचे नियंत्रण व प्रतिबंध) कायदा – १९८१

भारतीय संसदेने हा कायदा १९८१ मध्ये संमत करून देशभर लागू केला आहे. या कायद्यात केंद्रीय हवा प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच राज्य हवाप्रदूषण नियंत्रण मंडळे स्थापण्याची तरतूद आहे. ह्या मंडळांना – हवाप्रदूषणासंबंधी सरकारला सल्ला देणे, त्याबाबत संशोधन करणे, प्रदूषण नियंत्रणासाठी कृती आराखडा बनविणे व त्याची अंमलबजावणी करणे, प्रदूषण विषयक माहिती गोळा करून प्रसिद्ध करणे, विविध प्रदूषकांचे मानदंड ठरविणे, प्रदूषणचाचणी घेण्यासाठी प्रयोगशाळा स्थापन करणे, एखादे क्षेत्र हवा प्रदूषित क्षेत्र म्हणून घोषित करणे. इत्यादी अधिकार आहेत. या कायद्यानुसार हवा प्रदूषित घोषित क्षेत्रातील कारखान्याच्या हवा प्रदूषित करण्याच्या कृतीवर निर्बंध घालता येतात. तसेच हवा प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्धारित केलेल्या मापदंडापेक्षा अधिक प्रमाणात प्रदूषण न करण्याचे बंधन कारखान्यांवर घालता येते. ह्या बंधनाचे उल्लंघन करणाऱ्या कारखान्यावर हे मंडल खटला भरू शकते. निर्धारित मानदंडापेक्षा अधिक प्रमाणात हवा प्रदूषके वातावरणात सोडल्यास किंवा त्याबाबतचा मंडळाचा आदेश न पाळल्यास संबंधितास दीड वर्ष कारावास व अर्थदंड अशी शिक्षा होऊ शकते. अशा गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास वाढीव दंडाचीही तरतुद केलेली आहे.

### ३. पर्यावरण (संरक्षण) कायदा – १९८६

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी १९८६ मध्ये संमत केलेल्या ह्या कायद्यात ''पर्यावरणीय प्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रित करण्यासाठी'' पुढील तरतुदी केलेल्या आहेत.

अ) कारखाना/उद्योग चालविणाऱ्या जबाबदार व्यक्तिंना निर्धारित मापदंडापेक्षा अधिक प्रमाणात प्रदूषके उत्सर्जित करण्यास परवानगी नाकारली अहे.

ब) धोकादायक व घातक पदार्थांच्या/द्रव्यांच्या हाताळणी संदर्भात संरक्षण कार्यपद्धतीचा अवलंब करण्याची सक्ती केली आहे.

क) एखादा कारखाना निर्धारित मापदंडापेक्षा अधिक प्रमाणात प्रदूषके उत्सर्जित करीत असेल तर कारखान्यातील जबाबदार व्यक्तीने त्याचे नियंत्रण करावे व त्याची माहिती वरिष्ठास द्यावी.

ड) कारखान्यातील प्रदूषणाचे नमुने घेणे, ते चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठविणे व प्रयोगशाळेतील निष्कर्षानुसार त्या कारखान्यास प्रदूषण नियंत्रणाच्या सूचना देणे आवश्यक आहे.

इ) या कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस पाच वर्ष कारावास किंवा रु. एक लाख दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**ब) प्रतिबंधात्मक उपाययोजना**

पर्यावरणाचे प्रदूषण होऊ नये म्हणून करावयाच्या उपाययोजनेस प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणता येते. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) हवा प्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

शक्यतो कारखाने मानवी वसाहतीबाहेर काढावेत. कारखान्याची धुराडी उंच ठेवावीत. प्रत्येक कारखान्यात प्रदूषण नियंत्रक यंत्रणा बसवावी. अतिप्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर बंदी घालावी. खनीजतेलावरील वाहनांचा कमीतकमी वापर करावा. पायी जाणे, सायकलवरून जाणे, सार्वजनिक बस/रेल्वेने प्रवास करणे, आठवड्यातून किमान एक दिवस खाजगी चारचाकी/दुचाकी वापर बंदी करणे इत्यादीस प्राधान्य द्यावे. अपारंपारिक ऊर्जेवर चालणाऱ्या साधनांचा (सौरऊर्जा, पवन ऊर्जा, गोबर गॅस, सुर्यचूल इ.) वापर करावा. कोळसा व खनिज तेल याऐवजी कारखान्यात जलविद्युतचा वापर करावा. वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन, सामाजिक वनीकरण इ. उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबवावेत. घनकचरा जाळणे टाळावे कारण त्यामुळे हवाप्रदूषण खूप होते. बंदिस्त गटारी योजना राबवावी.

**ब) जलप्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

घरातील, हॉटेल व लॉजमधील, कारखान्यातील सांडपाणी व कचरा किंवा टाकाऊ पदार्थ जलाशयात टाकू नये. सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा वापरात आणावे, घरातील सांडपाण्याद्वारे घराभोवती बाग फुलवावी किंवा भाजीपाला लागवड करावी. नदी, तलाव, ओढे, समुद्र इत्यादीमध्ये कपडे, भांडी, जनावरे, वाहने धुणे, स्नान करणे, निर्माल्ये टाकणे बंद करावे. शेतात रासायनिक खताऐवजी सेंद्रिय खते वापरावीत.

**क) भूप्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

रासायनिक खते व जंतुनाशकाऐवजी नैसर्गिक/सेंद्रिय खते व जंतुनाशके वापरावीत. सांडपाणी मातीत मिसळू देऊ नये. कचरा जमिनीवर कुजू न देता खड्ड्यात कुजवून खत बनवावे. गांडूळ खत

वापरावे. जनावरांची मुक्त चराई टाळावी. जमिनीवर बांधबंदीस्ती करावी. आलटून-पालटून पीके घ्यावीत शेतात पाण्याचा अतिवापर टाळावा. वेगवेगळ्या खाणीतील धातुंचे कण मातीत मिसळणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**ड) ध्वनी प्रदूषणावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

प्रत्येक कारखान्यात ध्वनी नियंत्रक यंत्रणा बसवावी. सभा संमेलने व सण उत्सव या प्रसंगी वाद्यांचा व ध्यनीसेवकांचा वापर कमीत कमी करावा. फटाके वाजविणे व दारुकाम यावर बंदी घालावी. कारखाने, विमानतळ इत्यादी मानवी वस्तीपासून दूर ठेवावेत. वाहनांना सायलेन्सर्स बसवावीत. रस्ते डांबराऐवजी ॲस्फाल्ट सिमेंटचे बनवावेत. त्यामुळे वाहतुकीचा आवाज कमी होतो. शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी. उद्याने उभारावीत. कारण पानांनी बहरलेले वृक्ष ध्वनीची तीव्रता १० ते १५ डेसिबल्सनी कमी करतात.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. गलिच्छ वस्तीची कोणतीही एक व्याख्या द्या.

२. मादकद्रव्याचा दुरुपयोग म्हणजे काय?

३. वेश्याव्यवसायाची व्याख्या सांगा.

४. स्त्रिया आणि मुलींचा अनैतिक व्यापार बंदी कायदा केव्हा संमत झाला आहे.

५. पर्यावरण प्रदूषणाचा अर्थ स्पष्ट करा.

## २.५ सारांश (Let us sum up)

या घटकात तुम्ही नागर समाजातील प्रमुख चार सामाजिक समस्यांचा अभ्यास केलेला आहे. नागर समाजात लोकांची गर्दी वाढत गेल्याने राहत्या जागेची टंचाई निर्माण होऊन जमिनीचे भाव प्रचंड वाढल्याने सामान्यांना घर बांधणे अवघड बनले आहे. त्यामुळे शहरात असे लोक झोपडपट्ट्या बांधून राहू लागतात. अशा झोपडपट्टीत नागरी सुविधांचा अभाव असल्याने तेथील वातावरण आरोग्यास घातक असते. यातूनच शहरात निवासाची व गलिच्छ वस्तीची समस्या उद्‌भवलेली आहे. केंद्र व राज्य सरकारांद्वारे ही समस्या सोडविण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. यानंतर तुम्ही मादक द्रव्यासक्तीची समस्या अभ्यासली अहे. शहरात अनेक व्यक्ती विविध प्रकारच्या मादक पदार्थांच्या सेवनाच्या आहारी गेलेल्या आहेत. यालाच मादकद्रव्यासक्ती असे म्हणतात. ही आसक्ती निर्माण होण्यास शारीरिक मानसिक, सामाजिक, आर्थिक, कारणे जबाबदार आहेत. मादक द्रव्यासक्तीची समस्या सोडविण्यासाठी शासनाकडून ''दि नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकेट्रॉपिक सबस्टन्सीस ॲक्ट - १९८५'' हा कायदा संमत केलेला आहे. तसेच शासकीय दवाखान्यात अशा व्यसनाधिन लोकांवर उपचार करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. त्यानंतर वेश्याव्यवसायाच्या समस्येचा ऊहापोह केलेला आहे. केवळ पैशासाठी देहविक्रय करणे म्हणजे

वेश्याव्यवसाय होय. वेश्याव्यवसायास आर्थिक, सामाजिक मानसिक व वैयक्तिक घटक कारणीभूत आहेत. वेश्याव्यवसायाची समस्या सोडविण्यासाठी शासनाने ''स्त्रिया व मुलींचा अनैतिक व्यापार बंदी कायदा-१९५६'' संमत केला आहे. ही समस्या सोडविण्यासाठी विविध प्रकारचे प्रतिबंधात्मक व पुनर्वसनात्मक उपाय देखील केलेले आहेत. सर्वात शेवटी तुम्ही पर्यावरणाच्या अवनतीच्या समस्येचा अभ्यास केलेला आहे. पर्यावरणातील हवा, पाणी, ध्वनी, भूमी इत्यादी घटक दूषित होणे व ते सजीवास हानिकारक ठरणे याला पर्यावरणाचे प्रदूषण असे म्हणतात. प्रदूषणाचे हवाप्रदूषण, जलप्रदूषण, भूमीप्रदूषण व ध्वनीप्रदूषण असे चार प्रकार पडतात. या प्रदूषणाचे मानवासह संपूर्ण जीवसृष्टीवर गंभीर दुष्परिणाम होत आहेत. पर्यावरणाच्या प्रदूषणास औद्योगिकीकरण, वाहतूक साधने, खाणी, तेलशुद्धीकरण प्रकल्प, आधुनिक शेती, जंगलतोड, अणुस्फोट, कचरा व सांडपाणी, युद्धे इत्यादी कारणे जबाबदार आहेत. प्रदूषणास प्रतिबंध व नियंत्रित करण्यासाठी सरकारने विविध कायदे संमत केलेले आहेत.

## २.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

१. गलिच्छ वस्ती म्हणजे अनियमितपणे व दाटीवाटीने वसलेल्या व नागरी सुविधांचा अभाव असलेल्या मोडक्यातोडक्या किंवा कच्च्या घरांचा समूह होय. तेथील परिस्थिती ही व्यक्तीचे आरोग्य, सुरक्षा व नीतिमत्ता यांच्यादृष्टीने घातक असते.

२. मादकद्रव्याचा दुरुपयोग म्हणजे अवैद्यकीय कारणासाठी व्यक्तीने स्वतःच (डॉक्टरी सल्ल्याशिवाय) मादकद्रव्याचे मोठ्या प्रमाणावर पुन्हा पुन्हा सेवन करणे होय.

३. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता पैशासाठी केलेला लैंगिक समागम म्हणजे वेश्याव्यवसाय होय.

४. स्त्रिया आणि मुलींचा अनैतिक व्यापारबंदी कायदा १९५६ साली संमत झाला आहे.

५. पर्यावरणाचे प्रदूषण म्हणजे पर्यावरणाचे घटक असलेल्या हवा, पाणी, भूमी, इत्यादीच्या भौतिक व रासायनिक गुणधर्मांमध्ये होणारे असे अचांछनीय परिवर्तन की जे सजीवांचे आरोग्य, क्षमता व कृती यांना धोकदायक असते.

## २.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. गलिच्छ वस्ती निर्मूलनासाठी केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

२. मादकद्रव्यासक्तीच्या समस्येची विविध कारणे विशद करा.

३. वेश्याव्यवसायास जबाबदार असणाऱ्या विविध कारणांची चर्चा करा.

४. पर्यावरण प्रदूषणाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. गलिच्छ वस्ती निर्माण होण्याची कारणे.

२. वेश्याव्यवसाय समस्येवरील उपाययोजना.

३. मादक द्रव्यासक्तीवरील उपाययोजना.

४. पर्यावरण प्रदूषणाची कारणे.

## २.८ चिंतन आणि कार्य (Reflection & Action)

- तुमच्या जवळपासच्या शहरास भेट देऊन तेथील समस्या निर्मूलनासाठी राबविल्या जात असलेल्या उपाययोजनांची नोंद करा.
- पर्यावरण संरक्षणासाठी सुरू असलेल्या जनआंदोलनांची माहिती लिहून काढा.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Reading)


1. Social Problems in India - Ram Ahuja, Rawat Publications, Jaipur, 2002.

२. समकालीन भारतातील सामाजिक समस्या - डॉ. सर्जेराव साळुंखे व इतर, नरेंद्र प्रकाशन, पुणे, २००२.

३. ग्रामीण समाजशास्त्र - प्रा. चंद्रकांत खंडागळे - प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.


❑❑❑

सत्र ६ : घटक ३

# नागरी स्थानिक स्वराज्य संस्था

## (Urban Local Self-Government)

**घटक संरचना**

३.१ प्रस्तावना

३.२ उद्दिष्टे

३.३ विषय विवेचन

   ३.३.१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास

   ३.३.२ नगर परिषद आणि महानगरपालिका : रचना आणि कार्ये

   ३.३.३ महिला आणि दुर्बल घटकांचे सबलीकरण

३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.५ सारांश

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ स्वाध्याय/गृहपाठ

३.८ चिंतन आणि कार्य

३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.१ प्रस्तावना (Introduction)

नागर समाजशास्त्रात नगरांचा/शहरांचा सविस्तर व पद्धतशीर अभ्यास होतो. नगरातील/शहरातील स्थानिक कारभार (प्रशासन) पाहण्यासाठी कांही संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. त्यांना नागरी स्थानिक स्वराज्यसंस्था असे म्हणतात. नगरातील/शहरातील नागरिकांना विविध सोयीसुविधा व सेवा पुरविण्यासाठी भारतात महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, कटक मंडळ, पोर्ट ट्रस्ट इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या संस्था ह्या नागरी जीवनाचा आवश्यक व महत्त्वपूर्ण भाग आहे. म्हणून नागरी जीवनाचा अभ्यास करताना या संस्थांचा उदय, विकास, त्यांची रचना, कार्ये इत्यादींचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून या घटकात तुम्ही भारतातील नागरी स्वराज्यसंस्थांचा अभ्यास करणार आहात.

## ३.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हास –

- भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास समजावून घेता येईल.
- नगर परिषद आणि महानगरपालिका यांची रचना आणि कार्ये स्पष्ट करता येतील.
- महिला आणि दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठीची उपाययोजना सांगता येईल.

## ३.३ विषय विवेचन (Presentation of Subject-matter)

या घटकात तुम्ही भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा अभ्यास करणार आहात. या विषयाच्या विवेचनाच्या दृष्टीने ह्या घटकाचे तीन भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागात भारतातील नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांचा इतिहास स्पष्ट केलेला आहे. दुसऱ्या विभागात नगरपरिषद आणि महानगरपालिका यांची रचना आणि कार्ये यांचे विवेचन केलेले आहे. तर तिसऱ्या विभागात ७४ व्या संविधान दुरुस्तीच्या अनुषंगाने महिला व दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी केलेल्या उपाययोजनांची चर्चा केलेली आहे.

### ३.३.१ भारतातील नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांचा इतिहास

**(History of Urban Local Self-Government)**

भारतातील नागरी स्वराज्यसंस्थांचा अभ्यास करण्यापूर्वी तुम्ही भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास थोडक्यात समजावून घेणार आहात. भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास पुढील तीन टप्प्यात अभ्यासता येईल.

१) प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंड

२) ब्रिटिश राजवटीचा कालखंड

३) स्वातंत्र्योत्तर कालखंड

ह्या तीन कालखंडाचा आढावा आपण क्रमशः घेणार आहोत.

**१. प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंड**

भारतात आणि प्राचीन काळापासून नगरे अस्तित्वात आहेत. त्यामुळे त्यावेळीही त्या नगरातील स्थानिक कारभार पाहण्यासाठी निश्चित अशी प्रशासन यंत्रणा असली पाहिजे. सिंधु संस्कृती ही भारतातील सर्वात प्राचीन अशी ज्ञात संस्कृती आहे. ही संस्कृती प्रामुख्याने नागरी संस्कृती होती. मोहोंजोदारो व हडप्पा येथील उत्खननात जे अवशेष सापडलेले आहेत त्यामध्ये वस्तीच्या मध्यभागी अनेक गोल घुमटाकार दगडी प्रासाद आढळले. त्या प्रासादांच्या दर्शनी भागात सिंहासन व त्याच्यासभोरच्या भागात बैठकव्यवस्था होती. त्यावरून ही रचना नगराचा कारभार पाहणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेची असावी असा निष्कर्ष भारतीय पुरातन संशोधन मंडळाने काढलेला आहे. सिंधु संस्कृतीतील नगररचना एवढी सुव्यवस्थित होती की त्यावरून तेथे उत्तम अशी स्थानिक कारभाराची

यंत्रणा असलीच पाहिजे असा निष्कर्ष काढता येतो. सिंधु संस्कृतीतील नगरे ही बहुधा स्वयंपूर्ण असल्याने तेथील स्थानिक कारभार हा नगरराज्याप्रमाणे चालत असावा असे कांही विद्वानांना वाटते.

वैदिक काळाच्या प्रारंभी आर्य संस्कृती ही ग्रामीण होती. परंतु आर्थिक स्थैर्य मिळाल्यावर व युद्धजन्य स्थिती संपल्यानंतर आर्य संस्कृतीचे नागरीकरण सुरू झाले. पूर, पतन, निगम, नगर, महानगर इत्यादी नावाच्या नागरी वस्त्या उदयास आल्या. महाकाव्यांच्या काळात हस्तिनापूर, इंद्रप्रस्थ, मथुरा, कुरुक्षेत्र, अयोध्या अशी मोठी नगरे होती व त्यांचा स्थानिक कारभार पाहण्यासाठी खास यंत्रणा होती असे उल्लेख तत्कालीन साहित्यात आढळतात. मौर्यकाळातील पाटलीपुत्र, तक्षशिला, उज्जैनी, तोषाली, सुवर्णगिरी, सामप, इशिला, कोशांबी इत्यादी नगरांचा उल्लेख सम्राट अशोकाच्या शिलालेखात आढळतो. तत्कालीन नगर प्रशासनाचे वर्णन कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथाच्या दुसऱ्या विभागात आढळते. तर ग्रीक प्रवासी मेगॅस्थिनच्या इंडिका या ग्रंथात पाटलीपुत्र या राजधानीच्या नगर प्रशासनाची माहिती मिळते. नगर प्रशासनास बरीच स्वायत्तता होती. नगराचा कारभार लोकनियुक्त ३० सदस्य पाहात. नगराचा कारभार पाहण्यासाठी एकूण ६ समित्या (कर, परदेशीय, जनगणना, वाणिज्य, उद्योग आणि शिल्पकला) होत्या. प्रत्येक समित्यात ५ सदस्य असत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार नगरप्रशासनात अन्नछत्रे, मनोरंजन, आरोग्य, स्थापत्य, शिक्षण, नैतिक आचरण, संरक्षण इत्यादी कामांचा समावेश केलेला आढळतो. तक्षशिला नगर प्रशासन नाणी पाडण्याचेही काम करीत असे. नगराच्या प्रमुखास 'नगरक' म्हणत. शाळा, दवाखाने, बंदरे, पाणीपुरवठा, बाजारतळ, रस्तेदुरुस्ती इत्यादी लोकोपयोगी कामे नगरप्रमुख व समित्या पार पाडीत असत.

मौर्यकाळातील नगरसमित्या मध्ययुगात लोप पावल्या. मध्ययुगातील मोगल राजवटीतील नगर प्रशासनाची माहिती अबु फजल यांच्या 'ऐने-ए-अकबरी' या ग्रंथात मिळते. मोगलकाळात 'कोतवाल' नावाचा नगरप्रमुख अधिकारी होता. तो नगरचा सर्वेसर्वा होता. शहरात शांतता व सुव्यवस्था राखणे, गुन्हे घडू न देणे, गुन्हेगारांचा शोध घेणे, त्यांना शिक्षा करणे, वस्तुंच्या किंमती नियंत्रित ठेवणे, रहिवाशांची सूची ठेवणे, दैनंदिन शहरी प्रशासनात गरज वाटल्यास हस्तक्षेप करणे इत्यादी कर्तव्य कोतवालाची होती. शहरात अनेक गुप्तहेर नेमले जात. ते धर्मशाळेत व शहरात येणाऱ्या-जाणाऱ्यावर लक्ष ठेवित असत.

### २. ब्रिटिश राजवटीचा कालखंड

ब्रिटिश राजवटीत नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या विकासास मोठी चालना मिळाली. ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत १६८७ मध्ये मद्रास (चेन्नई) शहरासाठी 'नगर निगम' या स्थानिक संस्थेची स्थापना केली. पुढे १७९३ मध्ये मुंबई व कलकत्ता (कोलकोता) येथे महानगरपालिका स्थापन करण्यात आल्या. तथापि त्यांचा विकास केला गेला नाही. १८४२ मध्ये बंगालमध्ये नगरपालिका स्थापण्याचा कायदा संमत केला. तथापि जनतेने त्यास विरोधच केला. १८५० मध्ये संपूर्ण भारतात नगरपालिका स्थापण्यासंबंधीचा कायदा संमत केला. १८५६ मध्ये मुंबई महानगरपालिकेत कांही रचनात्मक बदल केले. **लॉर्ड लारेन्स** यांनी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या विकासास चालना दिली. परिणामी अनेक शहरात नगरपालिका स्थापन झाल्या.

**लॉर्ड मेयोचा प्रस्ताव :** १८५७ च्या उठावानंतर ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता जाऊन भारतावर इंग्लंडच्या राणीची सत्ता आली. भारतातील ब्रिटिश राजवट टिकविण्यासाठी स्थानिक बुद्धिमान लोकांना प्रथम स्थानिक कारभारात व नंतर प्रांतिक व केंद्रीय राज्यकारभारात सहभागी करून घेण्याचे धोरण ब्रिटिश सरकारने आखले. त्यानुसार **लॉर्ड मेयो** यांनी स्थानिक स्वराज्यसंस्था स्थापन करून त्यामध्ये भारतीयांना राजकीय सहभाग देण्याचा प्रस्ताव मंजूर केला. त्यानंतर अनेक प्रांतात स्थानिक स्वराज्य संस्थाविषयीचे कायदे संमत केले परिणामी नगरपालिकांची संख्या वाढली.

**लार्ड रिपनचा प्रस्ताव :** भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा पाया **लॉर्ड रिपन** यांनी घातला म्हणून त्यास स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक असे म्हणतात. सुशिक्षित भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभाग देऊन त्यांना राज्यकारभाराचे धडे देण्याच्या उद्देशाने १८८२ मध्ये रिपनने एक प्रस्ताव तयार केला. स्थानिक स्वराज्यसंस्थांना स्वायत्तता देणे, आर्थिक स्वातंत्र्य देणे, या संस्थांमध्ये शासकीय सदस्यांची संख्या १/३ पेक्षा जास्त न ठेवणे अशा सूचना या प्रस्तावात केल्या. तथापि प्रांतिक सरकारांनी या सूचनांची अपेक्षेप्रमाणे अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे या संस्थांत शासकीय कर्मचाऱ्यांचेच वर्चस्व राहिले. लॉर्ड कर्झनने तर स्थानिक स्वराज्य संस्थांना विरोधच केला.

**हॉबहाऊस आयोगाच्या शिफारसी :** १९०९ मध्ये **हॉबहाऊस** आयोगाने १) शहरात नगरपालिका स्थापन करणे, २) नागरिकांचा स्थानिक स्वराज्य संस्थातील सहभाग वाढविणे, ३) नगरपालिकेचा अध्यक्ष सभासदांनी निवडणे, ४) नगरपालिकांना करवसुली करता यावी म्हणून त्यांना आर्थिक अधिकार देणे ५) नगरपालिकांवर शिक्षणाची जबाबदारी सोपविणे ६) सरकारचे नगरपालिकांवर मर्यादित नियंत्रण ठेवणे इत्यादी शिफारसी केल्या. त्यामुळे नगरपालिकांना आर्थिक अनुदान अधिक प्रमाणात मिळू लागले. तथापि त्यांना पुरेसी स्वायत्तता मिळाली नाही. राज्यसरकारच्या प्रशासकीय शाखा असेच त्यांचे स्वरूप राहिले.

**लॉर्ड चेम्सफोर्डचा प्रस्ताव :** स्थानिक कारभारात लोक सहभाग वाढवून लोकांना राजकीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने १९१६ मध्ये चेम्सफोर्ड याने एक प्रस्ताव मांडला. त्यामध्ये १) स्थानिक राज्यकारभारात लोकांचे प्रतिनिधी अधिक असावेत, २) त्यासाठी मतदानाचा अधिकार अधिक विस्तृत करावा, ३) स्थानिक स्वराज्यसंस्थातील सदस्य शासनाने नियुक्त करू नयेत, ४) या संस्थांना आर्थिक स्वातंत्र्य व अधिकार द्यावेत इत्यादी शिफारसी केल्या. पुढे २० ऑगस्ट १९१७ रोजी केलेल्या भारतमंत्री माँटेग्यूच्या घोषणेतही ''राज्यकारभारात भारतीयांचा जास्तीत जास्त सहभाग वाढवून व स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ करून स्वराज्य देण्याचे ध्येय गाठले जाईल.'' असे प्रतिपादन केले. त्यानुसार १९१९ च्या सुधारणा कायद्यात (माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा) स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय प्रांताच्या यादीत समाविष्ट केला.

१९२० ते १९३७ या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांचा फारसा विकास झाला नाही. कारण १९१९ च्या कायद्यानुसार निर्माण झालेल्या द्विदल शासनपद्धतीमुळे स्थानिक स्वराज्यसंस्थांकडे दुर्लक्ष झाले. पुढे १९३५ च्या कायद्यानुसार द्विदलपद्धती नष्ट करून प्रांतांना अधिक स्वायत्तता दिल्याने मात्र या संस्थांना राष्ट्रीय सरकारचाच एक भाग मानून सत्तेच्या विकेंद्रीकरणास महत्त्व प्राप्त झाले. १९३७ साली प्रांतिक स्वायत्तता सुरू झाली आणि अशा संस्थांचे सर्व सदस्य लोकांनी निवडावेत असा बदल केला. तथापि १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू होऊन त्यात ब्रिटिश सरकारने भारतास ओढले. म्हणून

प्रांतिक मंत्रिमंडळानी राजीनामे दिले व स्थानिक स्वराज्यसंस्थांचा विषय स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत दुर्लक्षित राहिला.

### ३. स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ब्रिटिश सत्तेच्या नियंत्रणापासून नागरी स्थानिक स्वराज्यसंस्था मुक्त झाल्या. त्यांच्यामध्ये लोकनिर्वाचित प्रतिनिधींचे शासन सुरू झाले. या संस्थांच्या विकासासाठी विविध समित्या स्थापन केल्या. केंद्र सरकारनेही या संस्थांसाठी स्वतंत्र खाते (मंत्रालय) सुरू केले. १९५४ मध्ये नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांची केंद्रीय परिषद स्थापन करून स्थानिक शासनाच्या संदर्भात निर्णय घेण्यात आले. १९६० पासून प्रत्येक वर्षी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून राज्यांच्या नियोजन मंत्र्यांचे संमेलन भरविले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासकीय सुधारणासंबंधी केंद्र व राज्य सरकारांमध्ये समन्वय साधणे शक्य होते. केंद्रातील नियोजन मंडळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियोजनाचा म्हणजेच नगर नियोजन, गृहनिर्माण, पाणीपुरवठा, आर्थिक काटकसर इत्यादी संबंधी विचार करते. १९७० मध्ये केंद्रीय गृहनिर्माण व नगर विकास मंडळ स्थापन केले असून त्याने नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या कार्याविषयी विविध योजना सुचविल्या आहेत. (उदा. औद्योगिक कामगारांसाठी व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी गृहयोजना) गलिच्छ वस्त्यांच्या निर्मूलनासाठी केंद्र सरकारने गलिच्छ वस्ती अधिनियम १९५६ मध्ये संमत केला आहे. त्यामुळे मुंबई, चेन्नई, कोलकाता, दिल्ली अशा महानगरातील गलिच्छ वस्ती निर्मूलन कार्यक्रम राबविणे सुलभ झाले आहे. तसेच या महानगरातील नगर नियोजनासाठी व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनात सुधारणा करण्यासाठी कायदे करण्यात आले आहेत.

**७४ वी राज्यघटना दुरुस्ती :** देशातील सर्व नागरी स्वराज्य संस्थांच्या रचनेत व कार्यात एकसूत्रता निर्माण करण्यासाठी त्यांना अधिकार व सत्ता देऊन सक्षम करण्यासाठी राजीव गांधी सरकारने ६५ वे राज्यघटना दुरुस्ती विधेयक मांडले. लोकसभेत ते संमत झाले. पण राज्यसभेत नामंजूर झाले. पुढे नरसिंहराव सरकारने या विधेयकात कांही सुधारणा करून ते ७४ वे घटना दुरुस्ती विधेयक म्हणून संमत करवून घेतले आणि २० एप्रिल १९९३ पासून लागू केले. या घटनादुरुस्तीने राज्यघटनेत एक नवीन भाग (भाग ९ क) ज्यामध्ये १८ कलमे व एक नवीन अनुसूची (अनुसूची क्रमांक १२) जोडून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला आहे. या घटनादुरुस्तीनुसार नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांत महिलांना व अनुसूचित जाती व जमाती व नागरीकांचा मागास वर्ग यांच्यासाठी राखीव ठेवल्या आहेत. तसेच त्यांची रचना, कार्यकाल, उत्पन्नाची साधने, राज्य वित्त आयोग, राज्य निवडणूक आयोग इत्यादीबाबतही तरतुदी या घटना दुरुस्ती कायद्यात केलेल्या आहेत.

या कायद्यातील तरतुदीनुसार घटकराज्यांनी आपल्या कायद्यात सुधारणा केल्या. त्यामुळे देशातील नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या विकासास चालना मिळाली आहे.

## ३.३.२ नगर परिषद आणि महानगरपालिका : रचना व कार्ये

**(Municipal Council and Municipal Carporation : Structure and Functions)**

भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास अभ्यासल्यानंतर आता तुम्ही नगर परिषद व महानगरपालिका या दोन प्रमुख नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांची रचना व कार्ये समजावून घेणार आहात.

### नगर परिषद (Municipal Council)

नगर परिषद ही नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांचा एक प्रमुख घटक आहे. लहान नागरी क्षेत्रासाठी राज्य सरकार नगर परिषद स्थापन करते. नगर परिषद हा राज्य सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विषय असल्याने प्रत्येक घटकराज्यात नगर परिषद स्थापण्यासंबंधीचे निकष व नगर परिषद कायदे वेगवेगळे आहेत. या ठिकाणी आपण प्रामुख्याने महाराष्ट्रातील नगर परिषद कायद्याच्या आधारे नगर परिषदेची रचना व कार्ये समजावून घेणार आहोत.

**नगर परिषद स्थापण्याचे निकष :** ''महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक शहर अधिनियम-१९६५'' नुसार नगर परिषदांची स्थापना करण्यासाठी पुढील प्रमुख निकष विचारात घेतले जातात. १) नगरी क्षेत्राची लोकसंख्या किमान २५ हजार असावी. २) नागरी क्षेत्रातील बिगरकृषी व्यवसायातील रोजगाराचे प्रमाण ७५ टक्के वा त्यापेक्षा अधिक असावे.

**नगर परिषदांचे वर्गीकरण :** उत्तर प्रदेश, आंध्र, प्रदेश, बिहार इत्यादी राज्यांत नगर परिषदांचे उत्पन्न विचारात घेऊन तर मध्य प्रदेश व महाराष्ट्र राज्यांत लोकसंख्येच्या आधारे नगर परिषदांचे वर्गीकरण केले जाते. महाराष्ट्रात २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या आधारे अ, ब आणि क असे तीन वर्ग पाडलेले आहेत. १ लाख ते ३ लाख लोकसंख्या असलेल्या शहरात 'अ' वर्ग नगर परिषद, ४०००१ ते १ लाख लोकसंख्या असलेल्या शहरात ब वर्ग नगर परिषद तर २५००१ ते ४० हजार लोकसंख्या असलेल्या शहरात 'क' वर्ग नगर परिषद स्थापण्यात आलेली आहे.

**नगर परिषदेची रचना :** महाराष्ट्रातील नगर परिषदेची रचना आपण अ) परिषद ब) पदाधिकारी क) विषय समित्या ड) मुख्याधिकारी या चार मुद्यांच्या आधारे समजावून घेणार आहोत.

**अ) परिषद :**

नगर परिषदेत लोकांनी प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने निवडून दिलेल्या सभासदांचा म्हणजेच नगरसेवकांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील नगर परिषदेतील **सभासदांची संख्या** पुढीलप्रमाणे असते. (१) 'अ' वर्ग नगर परिषदेत किमान ३८ व कमाल ६५ सभासद असतात. एक लाखानंतर पुढील प्रत्येक आठ हजार लोकसंख्येसाठी एक नवीन सभासद निवडला जातो. (२) 'ब' वर्ग नगर परिषदेत किमान २३ व कमाल ३८ सभासद असतात. ४० हजार नंतर पुढील प्रत्येक पाच हजार लोकसंख्येसाठी एक नवीन सभासद निवडला जातो. (३) 'क' वर्ग नगर परिषदेत किमान १७ व कमाल २३ सभासद असतात. २५ हजारनंतर पुढील प्रत्येक तीन हजार लोकसंख्येसाठी एक नवीन सभासद निवडला जातो.

नगर परिषदेची निवडणूक लढविण्यासाठी व्यक्तीकडे पुढील पात्रता असावी लागते. १) ती भारताची नागरिक असावी, २) तिचे वय २१ वर्षे पूर्ण असावे. ३) तिचे नाव नगर परिषद क्षेत्रातील मतदार यादीत नोंदविलेले असावे. ४) ती नगर परिषदेची कर किंवा बिल थकबाकीदार नसावी, ५) तिला दोन वर्षापेक्षा जास्त कारावासाची शिक्षा झालेली नसावी. ६) ती शासकीय वा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत नसावी. ७) नगर परिषदेच्या करारात भागीदार किंवा ठेकेदार नसावी, ८) ती वेडी किंवा दिवाळखोर नसावी, ९) नगर परिषदेचा सभासद म्हणून गैरवर्तनासाठी शिक्षा केली असल्यास पुढील पाच वर्षापर्यंत ती निवडणूक लढविण्यास अपात्र ठरते. १०) १२ डिसेंबर २००१ नंतर तिला तिसरे अपत्य (मूल) झालेले नसावे.

नगर परिषदेत पुढीलप्रमाणे **राखीव जागा** ठेवल्या जातात १) नगर परिषद क्षेत्रातील अनुसूचित जाती – जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कांही जागा राखीव असतात. या राखीव जागात याच वर्गातील महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव असतात. २) नगर परिषद क्षेत्रातील इतर मागास वर्गातील (O.B.C.) जातींसाठी नगर परिषदेच्या एकूण सभासद संख्येच्या २७ टक्के जागा राखीव असतात. या राखीव जागांत याच वर्गातील महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव असतात. ३) नगरपरिषद क्षेत्रातील महिलांसाठी नगर परिषदेच्या एकूण सभासद संख्येच्या एक तृतीयांश जागा राखीव असतात. या राखीव जागांत अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग व खुल्या प्रवर्गातील महिला या सर्वांचा समावेश असतो.

नगर परिषदेतील निवडून आलेल्या सभासदांचा कार्यकाल निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीपासून पुढे पाच वर्ष इतका असतो. **कार्यकाल** संपण्यापूर्वीच सभासद स्वेच्छेने जिल्हाधिकाऱ्याकडे राजीनामा देऊ शकतात. कर्तव्यपालनातील कसूर वा गैरवर्तन यास्तव राज्य सरकार त्यांना पदच्यूत करू शकते.

नगर परिषदेत निवडून आलेल्या सभासद संख्येच्या १० टक्के किंवा जास्तीत जास्त ५ व्यक्तिंना निवडून आलेले सभासद **नामनिर्देशित सभासद** म्हणून स्वीकृत करतात. नामनिर्देशित सभासद होण्यासाठी व्यक्तिकडे वैद्यकीय व्यवसाय, कामगार कायदा, समाजसेवा, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदाचा, नगरसेवक पदाचा यापैकी एकाचा पाच वर्षाचा अथवा नगर आयुक्त पदाचा दोन वर्षाचा अनुभव ही पात्रता असावी लागते. नामनिर्देशित सभासदांना सभेत भाग घेता येतो पण मतदानाचा हक्क नसतो.

नगर परिषद क्षेत्रातून संसद व राज्य विधीमंडळावर निवडून आलेले सभासद (खासदार व आमदार) हे नगर परिषदेचे **पदसिद्ध** सभासद असतात.

**नगरपरिषदेचा कार्यकाल :** पाच वर्षाचा असतो. नगर परिषदेने आर्थिक गैरप्रकार केल्यास किंवा कर्तव्यपालनात कसूर केल्यास कार्यकाल संपण्यापूर्वी राज्य सरकार नगर परिषद विसर्जित करू शकते. विसर्जित केलेल्या नगर परिषदेची सहा महिन्याच्या आत निवडणूक घेण्याचे बंधन राज्य सरकारवर आहे.

**ब) नगरपरिषदेचे पदाधिकारी :**

नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष हे नगर परिषदेचे पदाधिकारी आहेत. नगर परिषद निवडणुकीनंतर नगर परिषदेच्या नगरसेवकांची पहिली सर्वसाधारण सभा जिल्हाधिकारी स्वतःच्या अध्यक्षतेखाली बोलावते. या सभेत नगरसेवक आपल्यातून एकाची नगराध्यक्ष म्हणून व दुसऱ्याची उपनगराध्यक्ष म्हणून निवड करतात. या दोघांचा कार्यकाल सध्या **अडीच** वर्षाचा आहे. तथापि, कार्यकाल संपण्यापूर्वी नगराध्यक्ष जिल्हाधिकाऱ्यांकडे तर उपनगराध्यक्ष नगराध्याकडे आपला राजीनामा स्वेच्छेने देऊ शकतो. नगर परिषदेचे निवडणून आलेले सभासद त्यांना २/३ बहुमताने ठराव संमत करून पदच्यूत करू शकतात. तसेच गैरवर्तन, कर्तव्यपालनात कसूर, विना परवाना तीन महिन्यापेक्षा अधिक काळ गैरहजर राहणे इत्यादीस्तव राज्यशासन त्यांना पदमुक्त करू शकते. नगराध्यक्ष पद क्रमाने अनुसूचित जाती, जमाती, मागास वर्ग व महिला यांच्यासाठी राखीव असते.

**नगराध्यक्षाची कार्ये पुढीलप्रमाणे :** १) नगर परिषदेच्या सभा बोलावणे व त्यांचे अध्ययक्षस्थान भूषविणे, २) नगर परिषदेचे अभिलेख पाहणे, ३) नगर परिषदेच्या प्रशासकीय कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, ४) नगराचा प्रथम नागरिक म्हणून सभासमारंभात भाग घेणे, ५) नगर परिषदेच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे, ६) मुख्याधिकाऱ्याच्या कार्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे, ७) शासनाने मागविलेले अहवाल पुरविणे व सोपविलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणे, ८) शहराच्या विकासाच्या कार्यक्रमांचे नियोजन करणे व त्यांच्या अंमलबजावणीकडे लक्ष देणे इत्यादी. एकंदरीत नगराध्यक्ष हा नगर परिषदेचा राजकीय प्रमुख असतो. नगराध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपनगराध्यक्ष वरील सर्व कार्ये पार पाडतो.

**क) विषय समित्या :**

नगर परिषदेचे कामकाज विविध समित्यांमार्फत चालते. एक स्थायी समिती व सहा विषय समित्या असतात. स्थायी समिती ही सर्वात महत्त्वाची आहे. कारण नगर परिषदेचे सर्व महत्त्वाचे निर्णय तीच घेते. नगराध्यक्ष हा तिचा पदसिद्ध सभापती असतो आणि विषय समित्यांचे सर्व सभापती हे स्थायी समितीचे सभासद असतात. नगर परिषदेचे कांही सभासद स्थायी समितीवर निवडून घेतलेले असतात. स्थायी समितीशिवाय १) सार्वजनिक बांधकाम समिती, २) पाणीपुरवठा व जलःनिस्सारण समिती, ३) स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती, ४) शिक्षण समिती, ५) नियोजन व विकास समिती, ६) महिला व बालकल्याण समिती ह्या सहा विषय समित्या असतात. प्रत्येक विषय समितीवर कांही सभासद निवडून दिले जातात. प्रत्येक समितीचे सभासद आपल्यातून एकाची सभापती म्हणून निवड करतात. महिला व बालकल्याण समितीत ७५ टक्के सभासद महिला असतात. शिवाय सभापती ही महिलाच असते. प्रत्येक विषय समिती आपल्या विषयानुसार कार्याचे नियोजन करून त्याची अंमलबजाचणी करीत असते.

तीन लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहराचा नगर परिषदेत **प्रभाग समित्या** स्थापन केल्या जातात. नगर परिषदेच्या प्रादेशिक मतदारसंघास प्रभाग (वॉर्ड) म्हणतात. प्रभाग समित्यात प्रभागाचे नगरसेवक, प्रभागातून नामनिर्देशित सभासद व त्या प्रभागाचा नगर परिषदेचा प्रभारी अधिकारी यांचा समावेश होतो. प्रभागातील नगरसेवक व स्थानिक नागरिक यांच्या चर्चेतून प्रभागाच्या समस्या सोडविणे हा या समित्या स्थापण्यामागचा उद्देश आहे.

**मुख्याधिकारी (Chief Officer)**

महाराष्ट्रातील नगर परिषदेच्या प्रशासकीय प्रमुखास मुख्याधिकारी (सि.ओ.) म्हणतात. त्याची निवड राज्य लोकसेवा आयोगाद्वारे स्पर्धा परीक्षेतून केली जाते. तर राज्यसरकार त्याची नेमणूक करते. त्याची बदली, पदोन्नती, वेतन, भत्ते इत्यादीही राज्य सरकारच ठरविते. त्याची नेमणूक प्रथम तीन वर्षासाठी केली जाते. नगर परिषदेने त्याच्या बदलीचा ठराव संमत केल्यास राज्यसरकार त्याची बदली करते. मुख्याधिकाऱ्याची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे १) नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभांना उपस्थित राहणे, २) परिषदेच्या सभासदांना सर्वसाधारण सभेची सूचना देणे, ३) नगर परिषदेने संमत केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे, ४) नगर परिषदेची आर्थिक स्थिती सुधारण्याचे प्रयत्न करणे, ५) नगर परिषदेच्या विकास कार्यक्रमांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, ६) नगराध्यक्षांच्या संमतीने अंदाजपत्रक तयार करणे, ७) नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांत कामाचे वाटप करून त्यांच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, ८) नगर परिषदेच्या राजकीय व प्रशासकीय कार्यात योग्य तो समन्वय साधणे इत्यादी.

**नगर परिषदेची कार्ये**

आपल्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचा तसेच नगराचा विकास करणे हे परिषदेचे प्रमुख कार्य आहे. राज्यघटनेच्या १२ व्या परिशिष्टात नगर परिषदेने करावयाच्या १८ कार्यांची सूची दिलेली आहे. महाराष्ट्र नगर परिषदा, नगरपंचायती व औद्योगिक शहर अधिनियम १९६५ नुसार नगर परिषदेला अनिवार्य व ऐच्छिक अशा दोन प्रकारची कार्ये करावी लागतात.

**अनिवार्य कार्ये :** नागरिकांच्या दैनंदिन मूलभूत गरजा पूर्ण करण्याशी संबंधित असलेल्या कार्यांना अनिवार्य कार्ये म्हणता येईल. ही कार्ये पार पाडणे नगर परिषदेस बंधनकारक असते. ती पुढीलप्रमाणे-

१) नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी पुरविणे

२) सार्वजनिक रस्ते व ठिकाणे यावर दिवाबत्तीची सोय करणे.

३) सार्वजनिक रस्ते बांधून त्यांची देखभाल ठेवणे.

४) सार्वजनिक नळ व नाल्यांची व्यवस्था करणे.

५) प्राथमिक शाळा सुरू करणे व त्यांची देखभाल करणे.

६) धोक्याच्या इमारती ताब्यात घेणे व त्या नष्ट करणे.

७) गलिच्छ वस्त्या आणि अतिक्रमणे हटविणे.

८) सार्वजनिक दवाखाने चालविणे, लस टोचणी कार्यक्रम राबविणे, कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविणे.

९) सार्वजनिक रस्ते, ठिकाणे, स्वच्छतागृहे यांची स्वच्छता ठेवणे.

१०) नगरातील जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे.

११) अग्निशामक दलाची व्यवस्था करणे.

१२) सार्वजनिक रस्ते व चौकांचे नामकरण करणे. त्यांना क्रमांक देणे.

१३) स्मशानभूमीची व्यवस्था करणे.

१४) नगर परिषद क्षेत्रातील दुर्बल घटकांचे कल्याण साधणे

१५) कत्तलखान्याची व्यवस्था करणे

१६) नगराच्या सौंदर्यात वाढ करणे. नगराचे पर्यावरण सुधारणे

१७) सफाई कामगारांच्या सुविधात व राहणीमानात सुधारणा करणे.

१८) नगर परिषदेच्या प्रशासकीय कामाचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करणे.

**ऐच्छिक कार्ये :** ऐच्छिक कार्ये ही नागरिकांच्या दुय्यम गरजांशी संबंधित आहेत. त्यामुळे ती नगर परिषदेवर बंधनकारक नसतात. आपल्या आर्थिक क्षमतेप्रमाणे ती पार पाडावीत अशी अपेक्षा असते. कांही प्रमुख ऐच्छिक कार्ये पुढीलप्रमाणे –

१) नवीन रस्ते बांधणे व त्यासाठी जमीन संपादन करणे.

२) नगरात उच्च शिक्षणाची सोय करणे.

३) नगरातील दारिद्र्य नष्ट करण्याचे उपाय योजणे.

४) ग्रंथालय, वस्तूसंग्रहालय, व्यायामशाळा इ. सुविधा निर्माण करणे.

५) सार्वजनिक बागा, उद्याने बांधणे व त्यांची निगा राखणे.

६) धर्मशाळा व विश्रामगृहे बांधून त्यांची देखभाल करणे.

७) नगरात अंतर्गत सार्वजनिक परिवहन व्यवस्था निर्माण करणे.

८) सार्वजनिक सत्कार, समारंभ, मनोरंजन इ. कार्यक्रम आयोजित करणे.

९) जनावरांसाठी कोंडवाडे बांधणे व त्यांना क्रूरपणे वागविण्यास प्रतिबंध करणे.

१०) शासनमान्य स्वयंसेवी संस्थांना आर्थिक मदत करणे.

११) नगरात दूध व दुधाच्या पदार्थांचा पुरवठा करणे.

**नगरपरिषदेच्या उत्पन्नाची साधने (मार्ग)**

वरील कार्ये पार पाडण्यासाठी नगर परिषदेस पुढील ४ मार्गानी उत्पन्न किंवा पैसा उभारता येतो.

**अ) विविध कर :** नगर परिषद मालमत्ता कर, दिवाबत्ती कर, पाणीपट्टी कर, मनोरंजन कर, यात्राकर, विशेष शिक्षण कर, जलनिस्सारण कर, वृत्तपत्रातील जाहिरातीशिवाय इतर जाहिरातीवरील कर इत्यादींची आकारणी व वसुली करून उत्पन्न मिळविते.

**ब) शासकीय अनुदान :** नगर परिषदेचे उत्पन्न कमी व खर्च जास्त असतो. म्हणून रस्ते विकास, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, आपत्ती निवारण, साथीच्या रोगांचे नियंत्रण इत्यादी विकासात्मक व रचनात्मक कार्यासाठी राज्यसरकार नगर परिषदेस अनुदान देते.

**क) कर्ज उभारणे :** राज्य सरकारच्या संमतीने नगर परिषद जमीन खरेदी, नैसर्गिक आपत्तींचा मुकाबला निर्माण कार्य, जुन्या कर्जाची परतफेड, वाहन खरेदी इत्यादीसाठी कर्ज घेऊ शकते.

**ड) इतर मार्ग :** आपल्या क्षेत्रातील उद्योग-व्यवसायासाठी दिल्या जाणाऱ्या परवाण्याचे शुल्क, विविध फी व दंड, स्वतःच्या मालमत्तेपासून मिळणारा नफा वा व्याज, जीवनावश्यक सेवा सुरू करून त्यांच्यापासून मिळणारे उत्पन्न, स्वतःच्या मालकीची शॉपिंग सेंटर, नाट्यगृहे, विश्रांतीगृहे इत्यादींचे भाडे अशा इतर मार्गानीही नगर परिषदेस उत्पन्न मिळते.

**महानगरपालिका (Municipal corporation)**

महानगरपालिका ही नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थामधील सर्वोच्च संस्था आहे. ब्रिटिश राजवटीत केंद्रसरकारच्या कामाचा भार कमी करण्यासाठी मद्रास (चेन्नई) कलकत्ता (कोलकाता) व मुंबई या महानगरात महानगरपालिका स्थापन करून नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकली.

**महानगरपालिका स्थापण्यासंबंधिचे निकष :**

महानगरपालिका हा विषय राज्यसुचीत असल्याने भारतातील वेगवेगळ्या घटकराज्यात महापालिकेसंबंधीचे निकष वेगवेगळे असल्याचे आढळते. केंद्रसरकारच्या 'ग्रामीण-नागर संबंध' समितीने महानगरपालिका स्थापण्यासाठी दाट लोकवस्ती व पाच लाख लोकसंख्या हे दोन निकष सांगितलेले होते. आज महाराष्ट्रात याबाबतीत पुढील निकष विचारात घेतले जातात. १) नगराची लोकसंख्या तीन लाख वा त्यापेक्षा जास्त असावी. २) नगरातून मिळणारे स्थानिक कराचे उत्पन्न एक कोटी रुपये असावे. ३) नगरातील लोकमत महानगरपालिका स्थापण्यासाठी अनुकूल असावे. ४) विद्यमान नगर परिषदेची आर्थिक स्थिती मजबूत असावी, ५) नगरातील लोकसंख्येची घनता दाट असावी. आज महाराष्ट्रात **२२** महानगरपालिका असून त्यापैकी मुंबई ही पहिली व सर्वात मोठी महानगरपालिका आहे.

**महानगरपालिकेची स्थापना :**

महानगरपालिका स्थापण करण्याचा, तिच्या सीमा निश्चित करण्याचा तसेच त्यामध्ये फेरबदल करण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे. पण केंद्रशासित प्रदेशात महानगरपालिका स्थापण्याचा अधिकार केंद्रसरकारला आहे. महाराष्ट्रात महानगरपालिका संबंधीचे तीन कायदे अस्तित्वात आहेत. १) मुंबई महानगरपालिका अधिनियम - १८८८, २) नागपूर महानगरपालिका अधिनियम - १९४८, ३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम - १९४९. या तिसऱ्या कायद्यानुसार मुंबई व नागपूर सोडून उर्वरीत महानगरपालिकांचा कारभार चालतो.

**महानगरपालिकेची रचना :**

महानगरपालिकेची रचना पुढील चार मुद्यांच्या आधारे समजावून घेता येईल. अ) महानगरपालिकेचे सभासद, ब) महानगरपालिकेचे पदाधिकारी, क) समित्या, ड) आयुक्त.

**अ) महानगरपालिकेचे सभासद :** महानगरपालिकेत दोन प्रकारचे सभासद असतात १) निर्वाचित सभासद, २) नामनिर्देशित सभासद. महानगरपालिकेच्या क्षेत्रातील एकूण लोकसंख्येच्या

आधारे महानगरपालिकेची एकूण सभासद संख्या निश्चित करण्याचा अधिकार राज्य निवडणूक आयोगास आहे. लोकसंख्येच्या आधारे हा आयोग प्रादेशिक मतदारसंघ (प्रभाग वा वॉर्ड) निर्माण करतो. प्रत्येक वार्डातून एक याप्रमाणे प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने महापालिकेचे सभासद निवडले जातात. महानगरपालिकेत किमान ६५ व कमाल २२२ एवढे सभासद असतात. महानगरपालिकेची निर्वाचित सभासद संख्या पुढीलप्रमाणे ठरते.

१) तीन ते सहा लाख लोकसंख्येच्या महानगरपालिकेत किमान ६५ व कमाल ८४ सभासद असतात. तीन लाखानंतरच्या प्रत्येक १५ हजार लोकसंख्येसाठी एक सभासद वाढविला जातो.

२) सहा ते बारा लाख लोकसंख्येच्या महानगरपालिकेसाठी किमान ८५ व कमाल ११५ सभासद असतात. सहा लाखानंतरच्या प्रत्येक २० हजार लोकसंख्येसाठी एक सभासद वाढविला जातो.

३) बारा ते चौदा लाख लोकसंख्येच्या महानगरपालिकेसाठी किमान ११५ व कमाल १४५ सभासद असतात. बारा लाखानंतरच्या प्रत्येक ४० हजार लोकसंख्येसाठी एक सभासद वाढविला जातो.

४) चोवीस लाखापेक्षा अधिक लोकसंख्येच्या महानगरपालिकेसाठी किमान १४७ व कमाल २२१ सभासद असतात. चोवीस लाखानंतरच्या प्रत्येक एक लाख लोकसंख्येसाठी एक सभासद वाढविला जातो.

महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यासाठी व्यक्तीकडे पुढील **पात्रता** असावी लागते. १) ती भारताची नागरिक असावी, २) तिचे वय २१ वर्षे पूर्ण असावे. ३) तिचे नाव महानगरपालिकेच्या मतदार यादीत नोंदविलेले असावे. ४) ती महानगरपालिकेची कर किंवा बिल थकबाकीदार नसावी. ५) तिला फौजदारी गुन्ह्यात शिक्षा झालेली नसावी. ६) ती सरकारी किंवा स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या सेवेत नसावी. ७) ती व्यक्ती मुकी, बहिरी, वेडी, दिवाळखोर नसावी इत्यादी.

महानगरपालिकेत पुढीलप्रमाणे **राखीव जागा** ठेवलेल्या असतात. १) महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती-जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कांही जागा राखीव ठेवल्या जातात. या राखीव जागेत याच प्रवर्गातील महिलांसाठी १/३ जागा राखीव असतात. २) महानगरपालिका क्षेत्रातील इतर मागासवर्गातील (O.B.C.) जातीसाठी महानगरपालिकेच्या एकूण सभासदांमध्ये २७ टक्के जागा राखीव असतात. या राखीव जागात याच प्रवर्गातील महिलांसाठी १/३ जागा राखीव असतात. ३) महानगरपालिका क्षेत्रातील महिलासांठी महानगरपालिकेच्या एकूण सभासदांमध्ये १/३ जागा राखीव असतात. या राखीव जागांत अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्ग व खुल्या प्रवर्गातील महिला यांचा समावेश असतो.

महानगरपालिकेतील निवडून आलेल्या सभासदांचा (निर्वाचित) कार्यकाल निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीपासून पुढे पाच वर्ष इतका असतो. कार्यकाल संपण्यापूर्वी सभासद (नगरसेवक) स्वेच्छेने महानगरपालिकेच्या आयुक्ताकडे राजीनामा देऊ शकतो. तसेच गैरवर्तन वा कर्तव्यपालनात कसूर यास्तव महानगरपालिकेचे निर्वाचित सभासद एखाद्या सभासदास ३.४ बहुमताचा ठराव संमत करून त्यास पदच्युत करू शकतात.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ नुसार महानगरपालिकेवर ५ नामनिर्देशित सभासद घेण्याची तरतूद आहे. त्यांची निवड निर्वाचित सभासद करतात. नामनिर्देशित सभासद

होण्यासाठी व्यक्तीकडे वैद्यकीय व्यवसाय, समाजसेवा, महानरपालिकेचा आयुक्त पदाचा, नगरसेवकपदाचा यापैकी एकाचा अनुभव असावा. नामनिर्देशित सभासदांना महानगरपालिकेच्या बैठकीत भाग घेता येतो पण त्यांना मतदानात भाग घेता येत नाही.

**ब) महानगरपालिकेचे पदाधिकारी :** महापौर आणि उपमहापौर हे महानगरपालिकेचे पदाधिकारी आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर महानगरपालिकेच्या सभासदांची (नगरसेवकांची) पहिली सर्वसाधारण सभा जिल्हाधिकारी स्वतःच्या अध्यक्षतेखाली बोलावितो. या सभेत नगरसेवक आपल्यातून एकाची महापौर म्हणून निवड करतात. त्यानंतर महापौराच्या अध्यक्षतेखाली नगरसेवक एकाची उपमहापौर म्हणून निवड करतात. या दोघांचा कार्यकाल अडीच वर्षाचा आहे. तथापि कार्यकाल संपण्यापूर्वी महापौर स्वेच्छेने विभागीय आयुक्ताकडे तर उपमहापौर महापौराकडे राजीनामा देऊ शकतो. महानगरपालिकेचे निर्वाचित सभासद त्यांच्यावर २/३ बहुमताने अविश्वासाचा ठराव संमत करून त्यांना पदावरून दूर करू शकतात. राज्यातील महापौरांची एकूण पदे लक्षात घेऊन अनुसूचित जात, जमात, इतर मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी कांही पदे राखीव ठेवली जातात.

**महापौराची कार्ये :** महापौर हा महानगरपालिकेचा राजकीय प्रमुख असतो. त्याची कार्ये पुढीलप्रमाणे –

१) महानगरपालिकेची बैठक बोलावून तिचे अध्यक्षस्थान भूषविणे

२) महानगरपालिकेच्या राजकीय व प्रशासकीय कार्यावर नियंत्रण ठेवणे

३) महानगरपालिकेचे सर्व अभिलेख पाहणे

४) नगराचा प्रथम नागरिक या नात्याने सार्वजनिक सभासमारंभात भाग घेणे.

५) महानगरपालिका आयुक्ताकडून आवश्यक तेंव्हा प्रशासकीय कार्याचा अहवाल मागविणे. आयुक्ताचा गोपनिय अहवाल राज्यसरकारकडे पाठविणे.

६) महानगरपालिकांचे ठराव गरजेनुसार चर्चेसाठी विषय समित्यांकडे पाठविणे.

७) नगरसेवकांच्या विनंतीवरून महानगरपालिकेची विशेष सभा बोलाविणे.

महापौराच्या अनुपस्थितीत उपमहापौर त्याची सर्व कार्ये पार पाडतो.

**महापालिकेच्या समित्या :** महापालिकेत वैधानिक व अवैधानिक अशा दोन प्रकारच्या समित्या असतात. वैधानिक समित्या ह्या महापालिका कायद्यातील तरतुदीनुसार स्थापन केल्या जातात. तर अवैधानिक समित्या ह्या महापालिकेची इच्छा व गरज यानुसार स्थापन केल्या जातात. स्थायी समिती, महानगर नियोजन समिती, प्रभाग समित्या इत्यादी वैधानिक समित्या आहेत. तर सार्वजनिक आरोग्य समिती, सार्वजनिक बांधकाम समिती, कायदा–राजस्व व सर्वसाधारण कामकाज समिती, बाजार व बागबगीचा समिती इ. अवैधानिक समित्या आहेत.

**१) स्थायी समिती** : वरीलपैकी स्थायी समिती सर्वात महत्त्वाची आहे. तिच्यात १६ सभासद असतात. त्यांची निवड महानगरपालिकेचे निर्वाचित सभासद करतात. स्थायी समितीचे १६ सभासद

आपल्यातून एकाची सभापती म्हणून निवड करतात. महापालिकेचे सर्व महत्त्वाचे निर्णय स्थायी समितीच घेते. नगरातील समस्या, महापालिकेचे अंदाजपत्रक, हिशोब प्रशासन, बैठकांचे नियम बनविणे, उपसमित्या स्थापन करणे इत्यादीबाबतचे अधिकार स्थायी समितीस असतात.

२) **प्रभाग समित्या :** तीन लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगरातील महापालिकेत गरजेनुसार लोकसंख्येच्या आधारे किमान तीने ते कमाल पंचवीस एवढ्या प्रभाग समित्या स्थापन केल्या जातात. प्रत्येक प्रभाग समितीत त्या प्रभागाचा (वॉर्डचा) नगरसेवक, प्रभागातील नामनिर्देशित सभासद, त्या प्रभागाचा महानगरपालिकेचा प्रभारी अधिकारी यांचा समावेश असतो. प्रभागातील नगरसेवक व नागरिक यांच्या चर्चेतून प्रभागाच्या समस्या सोडविण्याचे काम या समित्यांना करावयाचे असते.

३) **महानगर नियोजन समिती** : महानगराचा विकास नियोजन आराखडा तयार करण्याची जबाबदारी या समितीवर असते.

४) **परिवहन समिती :** अंतर्गत परिवहन सेवा देणाऱ्या महानगरपालिकेत १३ सभासदांची ही समिती असते. महापालिकेचे निर्वाचित सभासद हे परिवहन, अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्य, सेवक वा आर्थिक प्रशासन इत्यादी क्षेत्रातील १२ तज्ज्ञांची – मग ते महापालिकेचे सभासद असोत वा नसोत. परिवहन समितीचे सभासद म्हणून निवड करतात. स्थायी समितीचा अध्यक्ष हा परिवहन समितीचा १३ वा पदसिद्ध सभासद असतो. या समितीच्या सभासदातून एकाची सभापती म्हणून एका वर्षासाठी निवड केली जाते.

५) **शिक्षण समिती :** महानगरपालिका क्षेत्रात शिक्षण प्रसार करण्यासाठी ही समिती असते. तिच्यात १६ सभासद असतात. त्यापैकी १२ सभासद महापालिकेचे निर्वाचित सभासद आपल्यातून निवडतात. तर ४ सभासद विविध क्षेत्रातील अनुभवी व्यक्तीतून नामनिर्देशित केले जातात. प्रत्येक सभासदाचा कार्यकाल १ वर्षाचा असतो. याशिवाय सार्वजनिक आयोग्य समिती, सार्वजनिक बांधकाम समिती, महिला व बाल कल्याण समिती, गलिच्छ वस्ती सुधार समिती अशाही समित्या स्थापन केलेल्या असतात.

**ड) महापालिका आयुक्त** – हा महापालिकेचा प्रशासकीय वा कार्यकारी प्रमुख असतो. भारतीय प्रशासन सेवेतील (आय. ए. एस.) किंवा राज्य प्रशासन सेवेतील अनुभवी अधिकाऱ्याची आयुक्त म्हणून नेमणूक राज्यशासन करते. त्याचा कार्यकाल तीन वर्षाचा (महाराष्ट्रात) आहे. तथापि त्यापूर्वीही राज्यशासन त्यास परत बोलावू शकते. महापालिकेने विशेष सभेत आयुक्त हा असमर्थ/ अकार्यक्षम/ बेजबाबदार/ गैरव्यवहार करणारा आहे असा ठराव ५/८ बहुमताने संमत केल्यास राज्यशासन आयुक्तास परत बोलावू शकते. आयुक्ताच्या प्रशासकीय कार्यावर महापौर व स्थायी समितीचे नियंत्रण असते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार आयुक्ताचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे –

१) महापालिकेच्या सर्वसाधारण व विशेष सभेत सहभागी होऊन आपले मत मांडणे, सल्ला देणे, मार्गदर्शन करणे.

२) महापालिकेच्या सर्वसाधारण व विशेष सभेत घेतलेल्या निर्णयांची, धोरणांची अंमलबजावणी करणे आणि त्याची माहिती महापौर व नगरसेवकांना देणे.

३) स्थायी समिती, परिवहन समिती किंवा तिच्या उपसमित्या यांच्या बैठकीस उपस्थित राहून चर्चेत भाग घेणे.

४) महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी वर्गावर देखरेख व नियंत्रण ठेवणे, त्यांच्यात कामाचे वाटप करणे, कामात कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणे. त्यांचे वेतन, भत्ते, बढती इत्यादी बाबतचे प्रश्न सोडविणे.

५) महापालिकेतील वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.

६) महापालिकेचे अंदाजपत्रक तयार करून मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर ठेवणे व मान्य झालेल्या अंदाजपत्रकाची अंमलबजावणी करणे.

७) महापालिकेच्या वतीने आवश्यक त्या मालमत्तेची विशिष्ट मर्यादेपर्यंत खरेदी-विक्री करणे. तसेच आवश्यक ते करार करणे व त्यांची माहिती स्थायी समितीस देणे. संकटकाळात महापालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणे.

८) प्रशासकीय कार्याचा वार्षिक अहवाल महापालिकेच्या परिषदेस सादर करणे. तसेच महापालिकेच्या प्रशासन कार्याचा अहवाल राज्यसरकारला पाठविणे. प्रत्येक वर्षी नगरातील पर्यावरणाचा अहवाल ३१ जुलैपूर्वी महापालिकेस सादर करणे.

**महापालिकेची कार्ये**

महानगरातील नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविणे व महानगराचा विकास साधणे या उद्देशाने महानगरपालिकेची स्थापना केलेली असते. या उद्देशाच्या पूर्तीसाठी महापालिकेस विविध कार्ये पार पाडावी लागतात. तिच्या कार्याचे **अनिवार्य** कार्ये व **ऐच्छिक** कार्ये असे दोन भाग पडतात. अनिवार्य कार्ये ही नागरिकांच्या दैनंदिन मूलभूत गरजांशी निगडीत असल्याने ती पार पाडणे महानगरपालिकेस बंधनकारक असते. ती पार न पाडल्यास राज्यसरकार महापालिका बरखास्त करू शकते. ऐच्छिक कार्ये दुय्यम गरजांशी निगडीत असल्याने ती बंधनकारक नसतात. आपल्या आर्थिक कुवतीनुसार ती महापालिकेने पार पाडावीत अशी अपेक्षा असते.

**अनिवार्य कार्ये – पुढीलप्रमाणे आहेत**

१) राज्यसरकारने राजपत्रात दर्शविल्याप्रमाणे नगराच्या सीमा निश्चित करणे, सीमामधील फेरफार दर्शविणारी सीमाचिन्हे उभारणे.

२) नगर विकास आराखड्यासंबंधी नियोजन करणे

३) नगरातील रस्ते व सार्वजनिक ठिकाणी दिवाबत्तीची सोय करणे तेथे स्वच्छता ठेवणे.

४) नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी पुरविणे

५) नगरात प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करणे

६) नगरात जलनिस्सारण व मलनिस्सारणाची सोय करणे. सार्वजनिक शौचालये, मुताऱ्या, स्वच्छतागृहे उभारून ती स्वच्छ ठेवणे.

७) नगरातील गटारे-नाल्यांची साफसफाई करणे.

८) नगरात स्मशानभूमीची व्यवस्था करणे.

९) अग्नीशामक दलाची व्यवस्था करणे.

१०) नगरातील जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे.

११) महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक ठिकाण, चौक, रस्ते यांना नावे देणे, क्रमांक देणे.

१२) सार्वजनिक बाजार व कत्तलखाने बांधून त्यांचे नियमन-नियंत्रण करणे.

१३) नगरात जनावरांसाठी कोंडवाडे उभारणे, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे.

१४) रोगप्रतिबंधक लस टोचणी मोहिम राबविणे. शहरात संसर्गजन्य व साथीचे रोग न पसरण्याची काळजी घेणे. सार्वजनिक दवाखान्याची सोय करणे.

१५) गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन/सुधारणा करणे. शहरातील मोडकळीस आलेल्या इमारती पाडणे. उपद्रवकारक झाडेझुडपे तोडणे.

१६) महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यासाठी घरे बांधणे. शहरातील निराधार, वेडे, कुष्ठरोगी अशांना मदत देणे.

१७) सार्वजनिक रस्ते, पूल, भूयारी मार्ग, उड्डाण पूल इत्यादी बांधून त्यांची निगा राखणे अशा ठिकाणचे अडथळे दूर करणे.

१८) नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे.

१९) मानवी जीवास अपायकारक ठरणाऱ्या उद्योगधंद्यावर बंदी घालणे.

२०) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ अन्वये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार टाकण्यात आलेली जबाबदारी पार पाडणे इत्यादी.

**ऐच्छिक कार्ये :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम-६६ नुसार महानगरपालिकेस पुढील ऐच्छिक कार्ये पार पाडावी लागतात.

१) महापालिका क्षेत्रातील अपंग, आजारी, आंधळे, मुके, बहिरे, अधू विकलांग अशा व्यक्ती व बालके यांची काळजी घेणे. त्यांच्यासाठी प्रशिक्षण संस्था स्थापने व चालविणे.

२) गर्भवती स्त्रिया, मुलांना अंगावर दूध पाजणाऱ्या माता, बालके, शाळेतील लहान मुले यांच्यासाठी दूधाची तरतूद करणे, दूध डेअरीची सोय करणे.

३) प्रसूतीगृहे व बालकल्याण केंद्रे स्थापने, चालविणे, त्यांची व्यवस्था ठेवणे.

४) पोहण्याचे तलाव, सार्वजनिक धुण्याच्या जागा, सार्वजनिक स्नानगृहे, सार्वजनिक पाणपोई, गुरांसाठी पाण्यांचे हौद, बागा, उद्याने, व्यायामशाळा, मनोरंजन केंद्रे, नाट्यगृहे, क्रीडांगणे,

खेळाचे साहित्य, ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये, प्राणी संग्रहालये इत्यादी सुविधा निर्माण करून त्यांची व्यवस्था-निगा राखणे.

५) अन्न, पाणी, औषधी द्रवे यांची तपासणी व आरोग्य संशोधन यासाठी रासायनिक किंवा शास्त्रीय प्रयोगशाळा उभारून त्यांची व्यवस्था ठेवणे.

६) नागरिकांसाठी रुग्णवाहिका, शववाहिका या सुविधा पुरविणे.

७) पशुदवाखाने व पशुपैदास केंद्रे चालविणे, उपद्रवी पशुपक्षी कीटक यांचा बंदोबस्त करणे, भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे.

८) माध्यमिक - महाविद्यालयीन शिक्षणाची सोय करणे. शहरातील शैक्षणिक संस्थांना मदत करणे.

९) निराधार - निराश्रित लोकांसाठी आश्रयस्थाने उभारणे, गरिबांना मदत पुरविणे, शहरातील दारिद्र्य दूर करण्याचे प्रयत्न करणे. गरीबांसाठी घरबांधणी करणे. महापालिका कर्मचाऱ्यांसाठी घरेबांधणे किंवा त्यांना घरासाठी कर्जपुरवठ्याची सोय करणे.

१०) नगरातील लोकांवर कोणतीही आपत्ती ओढवल्यास ती निवारण्याची उपाययोजना करणे. नागरिकांच्या कल्याणासाठी उभारलेल्या निधीस अंशदान देणे. टंचाईकाळात जीवनावश्यक वस्तुंची विक्री केंद्रे सुरू करणे.

११) नागरीकांची व मालाची वाहतूक करण्यासाठी नगरात वाहतूक सुविधा (बस, लोकलट्रेन, ट्रॅमगाड्या इ.) उभारणे, वाहनतळ उभारणे.

१२) नगरातील विवाहाची नोंद ठेवणे.

१३) उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करणे. त्यांना मानपत्र अर्पण करणे.

१४) शहरातील पर्यावरणाचे संरक्षण करणे. त्यासाठी शहरात वृक्ष लावून त्यांचे संगोपन व संवर्धन करणे.

१५) रस्ते व सार्वजनिक बांधकामासाठी भूमी संपादन करणे. जमिनीचे व इमारतींचे भूमापन करणे इत्यादी.

**महापालिकेच्या उत्पन्नाची साधने**

प्रत्येक महानगरपालिका ही स्वतंत्र निगम निकाय (व्यक्तिभूत संस्था) असल्याने तिला स्वतःची उत्पन्नाची साधने उभी करण्याचा व मालमत्ता संपादण्याचा अधिकार आहे. तिच्या उत्पन्नाची प्रमुख साधने पुढीलप्रमाणे आहेत.

**१) विविध कर :** महानगरपालिका आपल्या क्षेत्रात जकात कर, मालमत्ता कर, करमणूक कर, व्यापार-व्यवसायावरील कर, इमारती व भूमीवरील कर, संपत्ती हस्तांतरणावरील कर, पाणीपट्टी, घरपट्टी, सफाई व स्वच्छता कर, जाहीरात कर पथकर इत्यादींची आकारणी व वसुली करून उत्पन्न मिळविते. तसेच महानगरपालिका क्षेत्रातून राज्यशासन कांही कर गोळा करते पण त्यातील कांही हिस्सा महानगरपालिकेस देणे.

**२) परवाना, फी व दंड :** महानगरपालिका क्षेत्रात चालणाऱ्या कांही उद्योग-व्यवसायावर महानगरपालिका परवाना शुल्क आकारते. परवाना नूतनीकरण फी, विविध प्रकारचे दंड याद्वारेही तिला उत्पन्न मिळते.

**३) शासकीय अनुदान :** महानगरांच्या समस्याही मोठ्या असतात. त्या सोडविण्यासाठी खूप खर्च येतो. पण महानगरपालिकेचे उत्पन्न त्यामानाने कमी असते. म्हणून प्रशासकीय खर्च, कर्मचारी वेतन, नैसर्गिक आपत्ती व रोगराई निर्मूलन, रस्ते विकास इत्यादी कामासाठी राज्यशासन महानगरपालिकेस आर्थिक अनुदान देते.

**४) कर्ज उभारणे :** राज्यसरकारच्या संमतीने महानगरपालिका रस्ते व इमारत बांधकाम, नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करणे, जुन्या कर्जाची परतफेड इत्यादीसाठी कर्ज घेऊ शकते.

**५) इतर साधने :** अ) गॅस, दूध, वीज, वाहतूक इत्यादी सेवा पुरवून त्याद्वारे उत्पन्न मिळविते. ब) स्वमालकीची शॉपिंग सेंटर, नाट्यगृहे, विश्रामगृहे उभारून त्यांच्या भाड्याद्वारे उत्पन्न मिळविते. क) विविध व्यक्ती व संस्थाकडून देणग्या मिळविते. ड) स्वतःच्या मालमत्तेपासून नफा व भांडवलावरील व्याज याद्वारेही उत्पन्न मिळविते.

## ३.३.३ महिला आणि दुर्बल घटकांचे सबलीकरण

**(Empowerment of Women and Weaker Sections)**

इ.स. १९९३ मध्ये राज्यघटनेत ७४ वी दुरुस्ती करून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला. तसेच या घटनादुरुस्तीनुसार महिला अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच इतर मागासवर्ग ह्या दुर्बल घटकांना नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये कांही जागा राखीव (आरक्षित) ठेवण्यात आल्या. त्यामुळे लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया महिला व तळागाळातील उपेक्षित घटकांपर्यंत पोहचली असून या त्यांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढण्यास मदत झाली आहे. त्यांना राजकीय सत्तेत वाटा मिळाल्याने त्यांचे राजकीय सबलीकरण किंवा सक्षमीकरण होण्यास चालना मिळाली आहे. येथे आपण प्रथम महिलांच्या व त्यानंतर दुर्बल घटकांच्या सबलीकरणाची चर्चा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात करणार आहोत.

**महिलांचे सबलीकरण :**

जगातील इतर समाजाप्रमाणेच भारतीय समाजही पुरुषप्रधान आहे. प्राचीन काळापासून जीवनाच्या सर्व क्षेत्रातील सत्ता व अधिकार पुरुषाच्या हाती केंद्रीत झाले असून महिलांना मात्र अशा सत्तेपासून व अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार हा प्राचीनकाळापासून पुरुषांच्याच हाती होता. स्त्रियांना त्यामध्ये सहभाग घेण्यास बंदी होती. ब्रिटिश राजवटीत छोट्या शहरांसाठी नगरपालिका व मोठ्या नगरांसाठी महानगरपालिका स्थापन करण्यात आल्या. तथापि या स्थानिक संस्थांमध्ये पुरुषांचेच वर्चस्व होते आणि स्त्रियांचा सहभाग जवळपास नव्हताच या संस्थांचे सदस्य हे बहुतांशी शासन नियुक्त असत व ते प्रामुख्याने पुरुषच असत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटनेने लिंगभेद नष्ट करून महिलांनाही पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय अधिकार दिले. त्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग सुरू झाला. त्या आमदार, खासदार, मंत्री होऊ लागल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकही महिला उमेदवार निवडून न आल्यास महिला सदस्य

स्वीकृत करून घेण्याची तरतूद काही घटकराज्यांत केली. तथापि स्वातंत्र्यानंतर राजकीय अधिकार मिळून देखील सुमारे ५० टक्के लोकसंख्या महिलांची असूनही केवळ मूठभर महिलांनाच सत्तेत वाटा मिळू लागला. महत्त्वाचे म्हणजे अशा महिलांनाही आपल्या सहकारी पुरुषांच्या सल्ल्यानेच वागावे लागे. म्हणजेच महिलांचा राजकीय सहभाग अगदीच नगण्य राहिला. म्हणून त्यांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी व त्यांना राजकीयदृष्ट्या सक्षम/सबल करण्यासाठी १९९३ मध्ये ७४ वी घटनादुरुस्ती करून नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थात महिलांसाठी १/३ जागा राखीव ठेवण्यात आल्या. तसेच नगराध्यक्ष व महापौर ही पदे देखील महिलांसाठी राखीव ठेवण्यात आली. परिणामी या संस्थांमधील महिला प्रतिनिधींची संख्या वाढून त्यांना नेतृत्वाची संधी मिळू लागली. या संस्थांचा पुरुषप्रधान चेहरा बदलला आणि महिलांच्या सबलीकरणाचा पाया घातला गेला.

**महिला आरक्षणाचे (राखीव जागांचे) परिणाम**

**१) राजकीय सहभागात वाढ :** ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर झालेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा लोकप्रतिनिधी म्हणून मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढला आहे.

**२) नेतृत्वाची संधी :** महिलांना नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थेत आरक्षण दिल्याने त्यांना नगराच्या कारभारात व विकास प्रक्रियेत नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. अनेक स्त्रिया ह्या नगराध्यक्ष, महापौर व विषय समितीच्या सभापती अशी पदे भुषवू लागल्या आहेत.

**३) भीती, संकोच व उदासिनता संपली :** ७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्यसंस्थातील राजकारणात पुरुषांचे वर्चस्व होते. नागरी स्त्रिया ह्या राजकारणापासून अलिप्त होत्या. नगरपालिका व महानगरपालिकांच्या निवडणुकीत महिला क्वचितच उभ्या राहत असत. निवडून आल्या तरी पुरुष सहकाऱ्यांच्या कलानेच वागत असत. त्यामुळे राजकारणावर त्यांचा अजिबात ठसा उमटलेला नव्हता. आज मात्र महिलांचा सहभाग १/३ असल्याने त्यांची राजकारणाविषयीची भीती व संकोच कमी झाला आहे. महिला विशेषतः सुशिक्षित महिला मोठ्या हिरीरीने व आत्मविश्वासाने नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थेतील राजकारणात वावरू लागल्या आहेत. पुरुषी वर्चस्वास आव्हान देऊ लागल्या आहेत. परिणामी त्या सबल वा सक्षम बनत चालल्या आहेत.

**४) समस्यांची सोडवणूक :** नगरपालिका व महानगरपालिकेतील सदस्य व पदाधिकारी असलेल्या महिला आपापल्या प्रभागातील तसेच एकूणच शहरातील विविध समस्या सोडविण्यास प्राधान्य देऊ लागल्या आहेत. पिण्याचे पाणी, स्वच्छता, महिलांना रोजगार देणे, बचत गट स्थापन करणे, महिला मेळावे घेऊन त्यांचे प्रबोधन करणे इत्यादीसाठी महिला प्रयत्न करू लागल्या आहेत.

**महिला सबलीकरणाच्या मार्गातील अडथळे**

राजकीय आरक्षणामुळे महिला सबलीकरणास चालना मिळाली असली तरी सबलीकरणाची गती अद्याप खूपच मंद आहे. कारण त्याच्या मार्गात पुढील अडथळे आहेत.

**१. जाणीव जागृतीचा अभाव :** आरक्षणामुळे महिलांना नागरी स्थानिक कारभारात सहभागी होण्याची संधी उपलब्ध झाली असली तरी बहुसंख्य महिलांना या संधिची जाणीव नाही. त्यामुळे त्या

राजकीय प्रक्रियेपासून अलिप्त राहतात. परिणामी आरक्षणाचा फायदा पूर्व प्रस्थापित राजकारणी मंडळींच्या कुटुंबातील महिलांनाच होताना दिसतो.

२. **पुरुषांचे वर्चस्व** : आरक्षणामुळे महिलांना प्रतिनिधित्व व अधिकारपदे मिळाली असली तरी प्रत्यक्षात अशा महिलांच्या कुटुंबातील पुरुष मंडळीच (उदा. पती, दीर, सासरा इ.) कारभार पाहताना आढळतात. अनेक महिला पदाधिकारी केवळ नामधारी असून प्रत्यक्ष अधिकार पुरुषमंडळीच वापरताना दिसतात.

३. **पुरुषांचा असहकार :** महिलांचे आरक्षण हे अनेक पुरुषांच्या डोळ्यात सलते. नगराध्यक्ष व महापौर ही पदे महिलांसाठी राखीव ठेवल्याने आपली संधी हुकली अशी बहुसंख्य पुरुषांची भावना असते. त्यामुळे अशा पदाधिकारी महिलांना त्रास देण्याचा, अडचणीत आणण्याचा, त्यांना सहकार्य न करण्याचा ते प्रयत्न करतात. त्यातच महिला ही जर मागासवर्गीय असेल तर तिचे नेतृत्व पुरुषांनाच नव्हे तर उच्चजातीतील महिलांनाही मान्य होत नाही. मागासवर्गीय महिलांच्या सबलीकरणाच्या मार्गात असा दुहेरी (लिंगभेद व जातीभेद) अडथळा आहे.

४. **दारिद्र्य :** नागरी क्षेत्रातील अनेक कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत. त्यामुळे अशा कुटुंबातील महिलांना रोज मोलमजुरी करावी लागते. त्यामुळे राजकीय क्षेत्रात सहभागी होण्यास त्यांना वेळ नसतो.

५. **निरक्षरता :** महिलांमध्ये पुरुषांपेक्षा निरक्षरता प्रमाण जास्त आहे. त्यामुळे राजकारणात भाग घेण्याची त्यांना संधी मिळाली तरी त्यांना आपले अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कायदेकानून कळत नाहीत. त्यामुळे त्या कार्यक्षमतेने काम करू शकत नाहीत. परिणामी संधी मिळूनही निरक्षर वा अल्पशिक्षीत महिलांना पुरुषांवर अवलंबून राहावे लागते.

६. **परावलंबन :** बहुसंख्य महिला आर्थिकदृष्ट्या पुरुषावर अवलंबून आहेत. शिवाय पुरुषप्रधान संस्कृतीतील रूढीपरंपरांची बंधने त्यांच्यावर आहेत. गृहिणीच्या भूमिकेतून बाहेर पडणे त्यांना सहज शक्य होत नाही. त्यामुळे त्यांच्या मतावर/निर्णयावर पुरुषांचा प्रभाव असतो. त्यामुळे त्या स्वतंत्रपणे राजकीय प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाहीत.

**महिला सबलीकरणासाठी करावयाची उपाययोजना**

महिलांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढवून तो अधिक परिणामकारक करण्यासाठी पुढील उपाययोजना सुचविता येतील.

१. **जागृती :** महिलांना त्यांच्या घटनात्मक अधिकारांची जाणिव करून देण्यासाठी व त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराचे ज्ञान होण्यासाठी विशेष प्रबोधन व प्रशिक्षण उपक्रम राबविले पाहिजेत. तसेच महिला मेळावे, शिबीरे, परिषदा इ. आयोजित करून त्यांच्यात जागृती निर्माण केली पाहिजे.

२. **मनोवृत्तीत बदल :** पुरुषांची मनोवृत्तीही बदलली पाहिजे. स्त्रीपुरुष समानतेचे तत्त्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविले पाहिजेत.

**३. स्त्रीशिक्षणास चालना :** नागरी क्षेत्रातील निरक्षर महिलांना सुशिक्षित करण्यासाठी खास प्रयत्न केले पाहिजेत. त्यामुळे त्यांना आपल्या हक्क व कर्तव्यांची जाणिव होईल.

**४. स्वावलंबन :** महिलांना रोजगाराच्या संधी पुरवून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविले पाहिजे. त्यामुळे त्या स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतील.

**५. रूढीपरंपरापासून मुक्तता :** महिलांवरील अनिष्ट रूढीपरंपरांची बंधने नष्ट झाली पाहिजेत. नवे ज्ञान, नवे विचार, नव्या कल्पना व मूल्ये यांची त्यांना ओळख झाली पाहिजे. त्यासाठी शासन, सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते इत्यादींनी पुढाकार घेतला पाहिजे.

**दुर्बल घटकांचे सबलीकरण**

७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलाप्रमाणेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग या दुर्बल घटकांनाही अनुक्रमे पंचायत राज्यव्यवस्थेत व नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये राखीव जागा (आरक्षण) ठेवण्यात आल्या. तसेच या संस्थांतील पदाधिकाऱ्यांची पदे ही त्यांच्यासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे या दुर्बल घटकांच्या राजकीय सबलीकरणास मोठी चालना मिळाली आहे. या ठिकाणी आपण दुर्बल घटकांच्या राजकीय सबलीकरणाची चर्चा नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या संदर्भात करणार आहोत.

आज वरील दुर्बल घटकांना शिक्षणसंस्था, शासकीय नोकऱ्या, विधीमंडळे यांमध्ये राखीव जागा ठेवलेल्या आहेत. आणि या राखीव जागांना बहुसंख्य उच्च वर्णीयांचा विरोध आढळतो. तथापि हेच उच्चवर्णीय प्राचीन काळापासून राखीव जागांचा फायदा घेत आलेले आहेत हे वास्तव आहे. वैदिककाळापासून चालत आलेल्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेत ब्राह्मणांना अध्ययन-अध्यापन व पौराहित्य हे क्षेत्र १००% आरक्षित होते. तसेच संरक्षण व राज्यकाराचे क्षेत्र क्षत्रियांसाठी तर शेती, पशुपालन व वाणिज्य हे क्षेत्र वैश्यांसाठी १००% आरक्षित होते. याउलट शुद्रांवर सक्तीने अनेक कर्तव्य लादून त्यांना ज्ञान, सत्ता व संपत्तीपासून वंचित ठेवले. त्यामुळे ते दरिद्री, दयनीय व दुर्बल बनले. ब्रिटिश राजवटीत अशा दुर्बल शुद्रांच्या उन्नतीसाठी त्यांना विशेष सवलती देण्याची मागणी सर्वप्रथम महात्मा फुलेंनी केली. तर छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानातील नोकऱ्यांत या दुर्बल घटकांसाठी राखीव जागा ठेवल्या. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दुर्बल घटकांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची स्थापना केली. तथापि महात्मा गांधीच्या विरोधामुळे ही मागणी मागे घेऊन दुर्बल घटकांसाठी कायदेमंडळात राखीव जागा ठेवण्याचे धोरण स्वीकारले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या दुर्बल घटकांतील अनुसूचित जाती व जमातींसाठी केंद्रीय तसेच घटकराज्यांच्या कायदेमंडळात राखीव जागा ठेवल्या. तर कांही घटकराज्यात स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्येही त्यांच्यासाठी कांही प्रमाणात राखीव जागा ठेवल्या. तथापि त्यास घटनात्मक आधार नव्हता. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने मात्र अनुसूचित जाती-जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तर इतर मागासवर्गासाठी २७% राखीव जागा अनुक्रमे पंचायत राज्यात व नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांत ठेवल्या आहेत. तसेच या संस्थांतील पदाधिकाऱ्यांची पदेही त्यांच्यासाठी राखीव ठेवली आहेत. त्यामुळे या दुर्बल घटकांच्या राजकीय सबलीकरणास मोठी चालना मिळाली आहे.

**दुर्बल घटकांच्या आरक्षणाचे परिणाम :**

**१) राजकीय सहभागात वाढ :** ७४ व्या घटनादुरुस्तीने नगर परिषद व महानगरपालिका या संस्थांत दुर्बल घटकांना राखीव जागा ठेवल्यामुळे त्यांचा स्थानिक कारभारातील सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. विकासाचे नवे दालन त्यांच्यासाठी खुले झाले आहे.

**२) नेतृत्वाची संधी :** ७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी या संस्थांत दुर्बल घटकांचे प्रतिनिधित्व अत्यल्प असे व त्यांना या संस्थांची अध्यक्षाची पदे (नगराध्यक्ष व महापौर) चुकूनसुद्धा मिळत नसत. आज मात्र उच्चवर्णीयांची इच्छा असो वा नसो दुर्बल घटकांना ही पदे मिळू लागली आहेत. त्यामुळे त्यांना अधिकार, मानसन्मान व नेतृत्वाची संधी मिळू लागली आहे. परिणामी त्यांच्या सबलीकरणास चालना मिळाली आहे.

**३) समस्यांची सोडवणूक :** आरक्षणामुळे दुर्बल घटकांना नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांत प्रतिनिधित्व व नेतृत्व मिळू लागल्याने त्यांना आपल्या समस्या, प्रश्न, अडचणी यांना वाचा फोडणे शक्य होऊ लागले आहे. त्यांच्यासाठी असलेल्या विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी ते आग्रह धरू लागले आहेत.

**४) राजकीय जागृती :** प्राचीन काळापासून राजकीय क्षेत्रापासून वंचित असलेल्या दुर्बल घटकांचा आरक्षणामुळे नागरी क्षेत्रातील राजकीय प्रक्रियांशीदेखील घनिष्ठ संबंध येऊ लागला आहे. अडाणी, निरक्षर व दरिद्री असलेले हे दुर्बल घटक आज राजकारणावर चर्चा करू लागले आहेत. आपली मते हिरीरीने मांडू लागले आहेत. आपणही देशाचे सन्माननीय नागरीक असून आपल्या मतासही कांहीतरी किंमत आहे याची जाणीव त्यांना होऊ लागली आहे. अर्थात त्यांच्या राजकीय जाणीवा अगदी प्रगल्भ झाल्या आहेत असे अद्याप म्हणता येत नाही. तरीही त्यांच्यात निश्चितपणे राजकीय जागृती होत आहे असे म्हणता येते.

**दुर्बल घटकांच्या सबलीकरणाच्या मार्गातील अडथळे**

७४ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे दुर्बल घटकांच्या राजकीय सबलीकरणास चालना मिळाली असली तरी त्या सबलीकरणाची गती अद्याप मंद आहे. कारण त्याच्या मार्गात पुढील अडथळे आहेत.

**१. जातीभेद :** भारतीय समाजातील जातीभेदाची भावना अद्याप पूर्णतः संपलेली नाही. स्थानिक स्वराज्यसंस्थातील उच्च जातीचे सदस्य दुर्बल घटकांच्या सदस्यांना तुच्छतेने वागतात. त्यांना पाठिंबा व सहकार्य देण्याऐवजी त्यांना विरोध करतात, त्यांची अडवणूक करतात. त्यांच्यावर आपली मते व निर्णय लादतात. त्यामुळे दुर्बल घटकांचा अपेक्षित प्रभाव पडत नाही. नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांवर उच्च जातींचेच वर्चस्व अद्यापही आहे.

**२. राजकीय पक्षांच्या नेत्यांचा प्रभाव :** नगर परिषद व महानगरपालिका यांच्या निवडणुकाही राजकीय पक्षाद्वारे लढविल्या जातात. राजकीय पक्षांचे नेते हे उच्च जातीचे असतात. राखीव जागांवरील उमेदवार निश्चित करणे तसेच नगराध्यक्ष व महापौर ही पदे राखीव झाल्यास ती कोणत्या सदस्यास द्यावयाची याबाबतचे निर्णय हे नेतेच घेतात. त्यामुळे दुर्बल घटकांचे सदस्य व पदाधिकारी

हे उच्च जातीच्या नेत्यांच्या उपकाराच्या ओझ्याखाली वावरतात. ते स्वतंत्रपणे व निर्भयपणे कार्य करू शकत नाहीत. पक्षनेत्यांच्या मतानुसारच त्यांना कारभार चालवावा लागतो. दुर्बल घटकांच्या नगराध्यक्षास व महापौरास नाममात्र ठेवून उच्च जातीचे नेतेच कारभार पाहतात.

३. **निरक्षरता :** दुर्बल घटकात अद्यापही निरक्षरतेचे वा अल्प-शिक्षिततेचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे त्यांना आपल्या राजकीय हक्क व कर्तव्यांची तसेच कायदेकानूची पुरेसी जाण नसते. त्यामुळे ते राजकीय प्रक्रियेतील सहभागाविषयी उदासिन राहतात. अज्ञानामुळे मिळालेल्या संधीचा पुरेपूर फायदा उठवू शकत नाहीत. ते कार्यक्षमतेने कार्य करू शकत नाहीत. उच्च जातीतील सहकाऱ्यांकडून त्यांची फसवणूक होते.

४. **आर्थिक परावलंबन :** दुर्बल घटकांतील बहुसंख्य लोक हे आपल्या निर्वाहासाठी उच्च जातीवर अवलंबून आहेत. कामाच्या ठिकाणी त्यांचे मालक किंवा उच्च अधिकारी हे बहुतांशी उच्च जातीचे लोकच असतात. त्यामुळे दुर्बल घटकांना त्यांच्या विरोधात जाऊन आपले हक्क उपभोगणे अवघड जाते. त्यामुळे त्यांच्या सबलीकरणात अडथळे येतात.

**दुर्बल घटकांच्या सबलीकरणासाठी करावयाची उपाययोजना**

दुर्बल घटकांच्या सबलीकरणास चालना देण्यासाठी पुढील उपाययोजना सुचविता येईल.

१. **जातीभेदाचे निर्मूलन :** जातीभेद व अस्पृश्यतापालन कायद्याने नष्ट केले असले तरी व्यवहारात मात्र टिकून आहे. म्हणून दुर्बल घटकांना सरकार व कायदेव्यवस्थेने पुरेसे संरक्षण दिले पाहिजे. तसेच उच्च जातीच्या लोकांनीही आपली प्रतिगामी मनोवृत्ती बदलली पाहिजे. सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान आचरणात आणले पाहिजे.

२. **शिक्षणप्रसार :** दुर्बल घटकांमध्ये शिक्षणप्रसार वेगाने झाला पाहिजे. म्हणजे त्यांना आपल्यावरील अन्याय-अत्याचाराची जाणीव होईल. तसेच आपल्या हक्क व कर्तव्यांची जाणीव होऊन ते अधिक कार्यक्षमतेने व प्रभावीपणे राजकीय प्रक्रियेत सहभागी होतील.

३. **आर्थिक स्वावलंबन :** दुर्बल घटकांना रोजगाराच्या पुरेशा संधी देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविले पाहिजे. तरच ते आपले राजकीय अधिकार समक्षपणे उपभोगू शकतील. म्हणून दुर्बल घटकांच्या आर्थिक विकासाचे प्रयत्न प्रामाणिकपणे केले पाहिजेत.

४. **प्रशिक्षण :** दुर्बल घटकांत राजकीय जागृती आणण्यासाठी खास प्रशिक्षण कार्यक्रम, मेळावे, शिबीरे, परिषदा इत्यादींचे आयोजन केले पाहिजे. त्यासाठी शासकीय यंत्रणेबरोबरच सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणसंस्था यांनीही पुढाकार घेतला पाहिजे.

५. **संघटन :** राजकीयदृष्ट्या सबल होण्यासाठी दुर्बल घटकांचे मजबूत संघटन घडवून आणले पाहिजे. त्यासाठी त्यांच्यातूनच समर्थ नेतृत्व उदयास आले पाहिजे. तरच उच्चजातींचे वर्चस्व कमी होऊन दुर्बल घटकांना खरीखुरी सत्ता उपभोगता येईल व त्यांचे सबलीकरण घडून येईल.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. भारतात कोणकोणत्या स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन केलेल्या आहेत?

२. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक कोणास मानले जाते.

३. ७४ वी राज्यघटना दुरुस्ती कशाशी संबंधित आहे.

४. नगर परिषदेचा प्रशासकीय प्रमुख कोण असतो?

५. महानगरपालिकेचा राजकीय प्रमुख कोण असतो?

६. नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांत कोणकोणत्या घटकांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

## ३.५ सारांश (Let us sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही प्रथम भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास १) प्राचीन व मध्ययुगीन कालखंड २) ब्रिटिश राजवटीचा कालखंड व ३) स्वातंत्र्योत्तर कालखंड अशा तीन टप्प्यात अभ्यासला आहे. सिंधु संस्कृती व वैदिक संस्कृतीच्या काळातील नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थाविषयी फारसी माहिती उपलब्ध नाही. तथापि मौर्यकाळात लोकनियुक्त समित्या नगरांचा कारभार पाहात असल्याचे पुरावे मिळतात. मोगलकाळात कोतवाल हा अधिकारी नगराचा कारभार पाहात असे. ब्रिटिश राजवटीत भारतात महानगर पालिका व नगरपरिषदा नगरातील स्थानिक कारभारासाठी स्थापन करण्यात आल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ह्या संस्थांचा कारभार लोकशाही पद्धतीने चालविण्यात येऊ लागला. नगरातील लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीद्वारे नागरी स्थानिक कारभार चालविला जातो. यानंतर तुम्ही लहान शहरांसाठी असलेल्या नगर परिषदा व मोठ्या नगरांसाठी असलेल्या महानगरपालिका या दोन स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना आणि कार्ये सविस्तरपणे अभ्यासलेली आहेत. यानंतर तुम्ही ७४ व्या राज्यघटना दुरुस्ती अन्वये नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये महिला व दुर्बल घटकांना दिलेल्या राखीव जागांमुळे त्यांचे राजकीय सबलीकरण कसे घडून आले आहे याचे विवेचन व मूल्यमापन समजावून घेतलेले आहे.

## ३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

१. भारतात महानगरपालिका, नगर परिषद, कटक मंडळ, नगर पंचायत, पोर्ट स्ट्रस्ट इत्यादी नागरी स्थानिक स्वराज्यसंस्था स्थापन केल्या आहेत.

२. लॉर्ड रिपन यास भारतातील स्थानिक स्वराज्यसंस्थांचा जनक मानले जाते.

३. ७४ वी राज्यघटना दुरुस्ती ही नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांची संबंधित आहे.

४. मुख्याधिकारी हा नगर परिषदेचा प्रशासकीय प्रमुख असतो.

५. महापौर हा महानगरपालिकेचा राजकीय प्रमुख असतो.

६. नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि महिला या घटकांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत.

## ३.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise|Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारतातील नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थांचा संक्षिप्त इतिहास लिहा.

२. नगर परिषदेची रचना स्पष्ट करा.

३. महानगरपालिकेच्या कार्यांची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नगर परिषदेची कार्ये

२. महानगरपालिकेची रचना

३. महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण

४. ७४ वी राज्यघटना दुरुस्ती

## ३.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- तुमच्या जवळपासच्या नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्याशी चर्चा करून नगर परिषदेच्या प्रशासकीय कामात येणारे अडथळे समजावून घ्या व त्यांची नोंद करा.
- नगराध्यक्ष व महापौर या पदावर काम केलेल्या किंवा करीत असलेल्या महिलांशी चर्चा करून महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेतील अडथळे जाणून घ्या व त्या आधारे एक टिपण तयार करा.

## ३.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Reading)


१. जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन - प्रा. डॉ. सतीश डोंबरे - कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद-२००७.

२. भारतातील स्थानिक स्वशासन संस्था - प्रा. बिराजदार/घोडके - अंशुल पब्लिकेशन्स - नागपूर-१९९९.

३. सामान्य ज्ञान, प्रा. चंद्रकांत खंडागळे, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली.


❑❑❑

घटक ४

# नगर नियोजन

## (Urban Planning)

**घटक संरचना**

४.१ प्रस्तावना

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय विवेचन

 ४.३.१ नगर नियोजनाचा अर्थ

 ४.३.२ नगर नियोजनाची तत्त्वे

 ४.३.३ भारतातील नगर नियोजन

 ४.३.४ नगर नियोजनातील अडथळे

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ स्वाध्याय/गृहपाठ

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

### ४.१ प्रस्तावना (Introduction)

या शेवटच्या आठव्या अध्ययन घटकात तुम्ही नगर नियोजनाचा अभ्यास करणार आहात. नगर नियोजन ही नागर समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. नगराच्या विस्तार-विकासासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन होय. वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारलेली नगर नियोजनाची प्रक्रिया ही आधुनिक सामाजिक घटना असली तरी ती प्राचीन काळापासून (एण्डर्सनच्या मते इ.स. पूर्व ५००० वर्षापूर्वीपासून) दिसून येते. तथापि आधुनिक काळात तिला अत्याधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. कारण आधुनिक नगरे अत्यंत अनियोजितपणे, अव्यवस्थितपणे विस्तारत असून ती विविध समस्यांनी ग्रस्त आहेत. त्यामुळे नागरी पर्यावरण हे नगरवासीयांच्या दृष्टीने अहितकारक -

अकल्याणकारक बनत चालले आहे. म्हणून आज जगात सर्वत्रच नगर नियोजनास अत्यंत महत्त्व दिले जात आहे. म्हणून नागर समाजाचा अभ्यास करताना नगर नियोजनाचा अभ्यास आवश्यक ठरतो.

## ४.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हास -

- नगर नियोजनाचा अर्थ स्पष्ट करता येईल.
- नगर नियोजनाची तत्त्वे सांगता येतील.
- भारतातील नगर नियोजनाची प्रक्रिया समजावून घेता येईल.
- नगर नियोजनातील अडथळे स्पष्ट करता येतील.

## ४.३ विषय विवेचन (Presentation of Subject matter)

या घटकात तुम्ही नगर नियोजनाचा अभ्यास करणार आहात. विषय विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे चार भाग पाडले आहेत. पहिल्या भागात नगर नियोजनाचा अर्थ, दुसऱ्या विभागात नगर नियोजनाची तत्त्वे, तिसऱ्या भागात भारतातील नगर नियोजनाची प्रक्रिया तर चौथ्या भागात नगर नियोजनातील अडथळे या बाबींची चर्चा केलेली आहे.

### ४.३.१ नगर नियोजनाचा अर्थ (Meaning of Urban Planning)

या ठिकाणी तुम्ही नगर नियोजनाचा अर्थ समजावून घेणार आहात. त्यासाठी प्रथम नियोजन म्हणजे काय हे समजावून घेऊ ''विशिष्ट हेतु किंवा ध्येय साध्य करण्यासाठी करावयाच्या क्रिया, प्रक्रिया व साधने यांची पद्धतशीर केलेली आखणी किंवा मागणी म्हणजे नियोजन'' अशी आपणास व्याख्या करता येईल. **किंबाल यंग** यांच्या मते मनातील हेतू किंवा उद्देश साध्य करण्यासाठी विशिष्ट दिशेने होणारे सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणारा कार्यक्रम म्हणजे नियोजन होय.

नगर नियोजन हा नियोजनाचा एक विशेष प्रकार आहे असे म्हणता येईल. नगराच्या विकासासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन असे स्थूलमानाने म्हणता येईल. नगरात राहणाऱ्या लोकांना आवश्यक त्या भौतिक, सामाजिक व सांस्कृतिक सोयी सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना सुखासमाधानाने राहता येईल असे पर्यावरण निर्माण करणे हे नगर नियोजनाचे उद्दिष्ट असते आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जे नियोजन करावयाचे त्यास नगर नियोजन म्हणतात. नगर नियोजनाचा

अर्थ अधिक सुस्पष्ट होण्यासाठी कांही मान्यवर शास्त्रज्ञांनी नगर नियोजनाच्या केलेल्या व्याख्या अभ्यासणे उचित ठरेल.

**नगर नियोजनाच्या व्याख्या (Definitions of Urban Planning)**

१. **स्टुअर्ट चॅपिन –** नगर नियोजन ही विकास आणि समायोजनाची प्रक्रिया आहे, जिच्यामध्ये लोकांच्या आर्थिक व सामाजिक गरजांच्या आधारे नगरातील पर्यावरणाचा विकास केला जातो.

२. **मेयर –** नगर नियोजन हे नगरातील विभिन्न घटकांना सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त करून देते.

३. **प्रा. जॅक्सन –** नगर तसेच ग्राम नियोजनाचा संबंध हा जमिनीचा किंवा भूमिचा विकास व उपयोग यांच्याशी आहे.

४. **प्रा. स्टॅंप –** नागरिकांचे कल्याण साधणे व त्यांच्या जीवनाचा स्तर उंचावणे हे नगर नियोजनाचे प्रमुख ध्येय आहे.

५. **प्रा. चंद्रकांत खंडागळे –** नगरातील लोकांच्या, वर्तमानकालीन तसेच भविष्यकालीन भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी गरजा विचारात घेऊन त्यांना पुरवावयाच्या सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन होय.

वरील व्याख्यांवरून नगर नियोजनासंबंधी पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

१. नगर नियोजन ही नगराच्या विकासाशी संबंधित असलेली प्रक्रिया आहे.

२. नगरात राहणाऱ्या लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी गरजांची पूर्तता करून त्यांचे कल्याण साध्य करणे व त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे हे नगर नियोजनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

३. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नगरवासियांच्या केवळ वर्तमानकाळातीलच नव्हे तर भविष्यकालीन गरजा विचारात घेऊन त्यांच्या पूर्तीसाठी पद्धतशीर कार्यक्रम व योजना आखल्या जातात.

४. उपलब्ध भूमि, नगराचे भौगोलिक स्थान, त्याची विकास क्षमता, वित्तपुरवठा इत्यादी बाबी विचारात घेऊन नगर नियोजनाची आखणी केली जाते.

५. नगरातील पाणीपुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, वाहतूक व्यवस्था, प्रकाश योजना, प्रदूषण नियंत्रण इत्यादी बरोबरच गृहबांधणी, दवाखाने, शाळा, क्रीडांगणे, उद्याने यासारख्या सुविधा सर्वांना उपलब्ध करून देण्याची योजना नगर नियोजनात आखली जाते.

थोडक्यात, नगरातील लोकांना नगरात सुखासमाधानाने राहता येईल असे भौतिक व सामाजिक पर्यावरण निर्माण करणे हा नगर नियोजनाचा उद्देश असतो.

## ४.३.२ नगर नियोजनाची तत्त्वे (Principles of Urban Planning)

नगर नियोजनाचा अर्थ समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही नगर नियोजनाची तत्त्वे अभ्यासणार आहात. नगरवासियांना जास्तीत जास्त सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना शारीरिक व मानसिक स्वास्थ्य मिळवून देणे हे नगर नियोजनाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनेक गोष्टींची पूर्तता करावी लागते. अनेक गोष्टी विचारपूर्वक ठरवाव्या लागतात. ज्या नियमांच्या किंवा तत्त्वांच्या आधारे हे सर्व करावयाचे त्यांना नगर नियोजनाची तत्त्वे असे म्हणतात. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. परिवहन व्यवस्था पद्धतशीर व नियंत्रित करणे :**

परिवहन (वाहतूक) समस्या ही आधुनिक नगरांची गंभीर समस्या आहे. नगरांमध्ये वाहतूक साधनांची (वाहनांची) प्रचंड गर्दी होऊन वाहतुकीत अडथळा येणे, अपघात होणे असे प्रकार वारंवार घडतात. म्हणून नगरातील वाहतूक व्यवस्था सुव्यवस्थित करणे व तिचे नियंत्रण करणे आवश्यक ठरते. नगरामध्ये अंतर्गत वाहतुकीसाठी सायकल, मोटार सायकल, मोटार, रिक्षा, रेल्वे अशी साधने वापरली जातात. त्यामुळे नगरात रस्ते व लोहमार्ग बांधणे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. व त्यासंबंधीचे नियोजन करावे लागते. नगरांच्या सर्व भागांना जोडणारे रस्ते बांधणे, चौकात वाहतूक नियंत्रक दिवे किंवा ट्रॉफिक सिग्नल यंत्रणा बसविणे, आवश्यक तेथे पूल, उड्डाण पूल व भूयारी मार्ग बांधणे, पायी चालणाऱ्यांसाठी फूटपाथ बांधणे, वाहतुक पोलीस नेमणे, रात्रीच्या वेळी रस्त्यांवर पुरेसी प्रकाश योजना करणे, नदीकाठी वसलेल्या शहरात (उदा. बँकॉक व्हेनिस इ.) अंतर्गत जलवाहतूक व्यवस्था करणे, इत्यादी उपाययोजना कराव्या लागतात. मुंबईसारख्या महानगरात उपनगरी रेल्वेचे (लोकल ट्रेन) जाळे अंतर्गत वाहतुकीसाठी उभारलेले आहे. त्यामुळे अशा रेल्वे गाड्यांची संख्या व वेळापत्रक याचाही विचार नगर नियोजनामध्ये करावा लागतो. कांही महानगरात भूयारी रेल्वेमार्ग असल्याने त्याबाबतही नियोजन करावे लागते. अनेक नगरातील स्थानिक स्वराज्यसंस्थांनी अंतर्गत वाहतुकीसाठी बससेवा सुरू केलेली आहे. उदा. मुंबईतील 'बेस्ट', दिल्लीतील 'दिल्ली परिवहन निगम', 'पुण्यातील 'पीएमटी', कोल्हापुरातील 'केएमटी' इ. त्यामुळे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना अशा बससेवांचेही नियोजन करावे लागते. थोडक्यात नागरिकांना पुरेशा प्रमाणात परिवहन सेवा उपलब्ध करून देणे, वाहतुकीची कोंडी होणार नाही याची व्यवस्था करून अपघात व गैरसोय टाळणे इत्यादींचा नगर नियोजनात विचार करावा लागतो.

## २. वाहनतळ उभारणे :

वाढत्या लोकसंख्येबरोबरच नगरात इमारती, कार्यालये, दुकाने, घरे, बाजारपेठा इत्यादी वाढत जाऊन नगरातील रस्ते अपुरे पडतात. लोक रस्त्यावरच वाहने उभी करतात. परिणामी वाहतुकीस अडथळा येतो. अपघात होतात. म्हणून नगरात वाहने उभी करण्यासाठी (पार्किंगसाठी) खास वाहनतळ (पार्किंग झोन) निश्चित करावे लागतात. म्हणजेच लोकांना आपली वाहने उभी करण्यासाठी ठिकठिकाणी मोकळी जागा उपलब्ध करून द्यावी लागते. दुचाकी-चारचाकी, लहान-मोठ्या अशा वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करावी लागते. अनेक नगरात आज 'पे पार्किंग' (म्हणजे पैसे देऊन वाहन उभे करणे) सुविधा पुरविली जाते. आवश्यक तेथे 'नो पार्किंग'चे फलकही लावावे लागतात.

## ३. जमिनीच्या उपयोगावर नियंत्रण ठेवणे :

नगरामध्ये मर्यादित भूभागावर मोठ्या लोकसंख्येचे केंद्रिकरण झालेले असते. त्यातच सभोवतालच्या प्रदेशातील लोक नगरांकडे स्थलांतर करीत असतात. त्यामुळे नगरात जमिनीची टंचाई निर्माण होते. म्हणून लोक रिकाम्या जागेवर अतिक्रमण करून झोपड्या, दुकाने, स्टॉल, हातगाड्या उभारण्याची शक्यता असते. हे अतिक्रमण टाळण्यासाठी नगरात जमिनीच्या उपयोगावर नियंत्रण ठेवावे लागते. त्यादृष्टीने रस्ते, गटारी, फुटपाथ, शासकीय राखीव जागा इत्यादीवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणे, घरांच्या मजल्यांवर नियंत्रण ठेवणे, रस्त्यापासून किती अंतर ठेवून इमारत बांधावी हे ठरविणे, दोन घरातील अंतर ठरविणे, बगीचे, क्रीडांगणे, दवाखाने, शासकीय कार्यालये, शिक्षण संस्था इत्यादीसाठी नगरातील मोक्याच्या जागा आरक्षित करणे, चटई क्षेत्र ठरवून देणे इत्यादी गोष्टींचा विचार नगर नियोजनात करावा लागतो.

## ४. गलिच्छ वस्तू निर्मूलन/सुधारणा :

आज सर्वच नगरात विशेषतः महानगरात गलिच्छ वस्त्यांची (झापडपट्टीची) समस्या गंभीर बनलेली आहे. नगरात राहत्या जागेची टंचाई निर्माण होऊन जमिनीचे भाव गगनाला भिडल्याने जागा खरेदी करून घर बांधणे गरिबांना शक्य नसते. म्हणून ते वाटेल तेथे झोपड्या उभारतात. तेथे नागरी सुविधा नसतात. सर्वत्र घाणीचे साम्राज्य असते. म्हणून नगरातील प्रदूषण व रोगराई वाढते. त्यामुळे अशा गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करून तेथील लोकांना पक्की घरे व नागरी सुविधा (रस्ते, पाणी, वीज, शौचालय, गटारी इ.) पुरविणे आवश्यक असते. आज बहुतेक महानगरपालिकामध्ये गलिच्छ वस्ती सुधार समिती स्थापन केलेली असून ती याबाबतचे नियोजन करते. त्यानुसार सध्याच्या जागेतच लोकांना पक्की घरे व नागरी सुविधा पुरविल्या जातात. किंवा झोपडपट्टी उठवून तेथील लोकांना अन्य

ठिकाणी घरे बांधून दिली जातात. एखाद्या झोपडपट्टीचे निर्मूलन करावयाचे कि तिच्यात सुधारणा करावयाची याचा निर्णय घ्यावा लागतो.

**५. गृहनिर्माण योजना राबविणे :**

आज नगरात-महानगरात स्वतःचे घर बांधणे हे सामान्य लोकांसाठी अशक्य ठरत चालले आहे. कारण जागेचे दर प्रचंड वाढलेले आहेत. त्यामुळे नगर नियोजन करताना अल्प उत्पन्न असलेल्या लोकांसाठी गृहनिर्माण योजना राबविणे आवश्यक बनलेले आहे. अल्पदरात, अल्प क्षेत्रफळाची घरे बांधून दिल्यास लोकांची निवासाची समस्या सुटू शकते. शिवाय झोपडपट्ट्या उभारण्यास प्रतिबंधही होऊ शकतो. महाराष्ट्रात गृहबांधणीस उत्तेजन देण्यासाठी ''गृहनिर्माण विकास वित्तसहाय्य महामंडळ'' (HDFC) स्थापन करून लोकांना वाजवी दराने गृहबांधणीसाठी कर्जपुरवठा केला जातो. आज गृहनिर्माण योजना हे नगर नियोजनातील एक महत्त्वपूर्ण तत्त्व मानले जाते.

**६. विविध विभाग (Zone) पाडणे :**

नगरातील गर्दी कमी करणे, प्रदूषणास आळा घालणे, वाहतुकीवरील ताण कमी करणे, नगरातील परिसर स्वच्छ, स्वास्थ्यवर्धक व सुंदर ठेवणे इत्यादीसाठी नगराचे विविध विभाग पाडावे लागतात. त्यानुसार अवजड उद्योगधंदे, लघुउद्योगधंदे, बाजारपेठा, निवास, शासकीय कार्यालये, शैक्षणिक व आरोग्य सुविधा, मनोरंजन केंद्रे इत्यादीसाठी वेगवेगळे विभाग पाडून ज्या-त्या विभागात ज्या-त्या सुविधा निर्माण करण्याची तरतूद करावी लागते. थोडक्यात नगरात विशिष्ट ठिकाणी दाटी होणार नाही याचा विचार नगर नियोजनात करावा लागतो.

**७. आवश्यक सेवा-सुविधा पुरविणे :**

नगरातील लोकांना आवश्यक त्या सेवा-सुविधा पुरविण्याचा विचार देखील नगर नियोजनात करावा लागतो. नागरिकांना स्वच्छ, शुद्ध व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी कृत्रिम पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी नगराबाहेरील जलाशयातून (नदी, सरोवर) पाईपलाईन टाकून नळाद्वारे घराघरात पाणी पुरवठा करावा लागतो. तसेच सांडपाण्यासाठी बंदिस्त गटार योजना (ड्रेनेज) तयार करावी लागते. शहराला वीज पुरवठा करण्याची यंत्रणाही उभारावी लागते. कांही महानगरात स्वयंपाकाचा गॅसदेखील बंदिस्त नळाद्वारे पुरविला जातो. या सेवा सुविधा कांही ठिकाणी महानगरपालिका तर कांही ठिकाणी राज्य वा केंद्र सरकार पुरविते.

**८. स्वच्छता :**

शहरात प्रचंड प्रमाणात कचरा तयार होत असतो. त्यामुळे त्याची योग्य-तऱ्हेने विल्हेवाट लावावी लागते. अन्यथा कचरा कुजून प्रदूषणाचा धोका वाढतो. त्यासाठी कचराकुंड्या, कचरा

उचलण्यासाठी वाहने, रस्ता व गटारी सफाई करणारे कर्मचारी, माशा, डास, उंदरे, मोकाट जनावरे यांचा बंदोबस्त इत्यादींची व्यवस्था करावी लागते. एकंदरीत नगरातील परिसर स्वच्छ ठेऊन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागते.

**९. नगराचे सौंदर्य :**

नगर नियोजनात नगराचे सौंदर्य वाढविण्याचा विचारही करावा लागतो. त्यासाठी नगरात ठिकठिकाणी उद्याने उभारणे, वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन करणे, चौकात कमानी व रंगीबेरंगी कारंजी उभारणे, नगराजवळ नदी, तलाव असेल तेथे नौकानयनाची (जलविहाराची) सोय करणे, मुलांसाठी विविध खेळाची मैदाने व साहित्य उपलब्ध करून देणे, मनोरंजनकेंद्रे उभारणे इत्यादी सुविधा निर्माण करून नगराचे सौंदर्य खुलविण्याची तरतूद नगर नियोजनात करावी लागते.

## ४.३.३ भारतातील नगर नियोजन (Urban Planning in India)

नगर नियोजनाचा अर्थ आणि तत्त्वे समजावून घेतल्यानंतर तुम्ही भारतीय समाजातील नगर नियोजन समजावून घेणार आहात. त्यासाठी प्राचीनकाळापासून आजपर्यंत भारतातील नगरनियोजनाचे स्वरूप कसे बदलत आले आहे याचा संक्षिप्त आढावा या ठिकाणी घेणार आहोत.

**अतिप्राचीन काळातील नगर नियोजन :** भारतातील नगर नियोजनाचा इतिहास साधारणपणे हडप्पा व मोहोंजोदडो या सिंधु संस्कृतीतील नगरांपासून सुरू होतो. ही नगरे नद्यांच्याकाठी अत्यंत सुनियोजितपणे वसविलेली होती. नद्यांच्या पुरापासून नगराचे संरक्षण करण्यासाठी नगराभोवती तटबंदी होती. तसेच नगराभोवती खंदक खोदलेले होते. तटबंदीस वक्ररचनेची प्रवेशद्वारे होती. प्रत्येक नगरात पूर्व-पश्चिम असा मुख्य रस्ता होता. मुख्य रस्त्यास काटकोनात छेदणारे उपरस्ते होते. रस्त्यावर दिवाबत्ती व कचराकुंडीची व्यवस्था होती. उपरस्त्यांच्या दोन्ही बाजूस पक्क्या विटांची व दगडमातीची एकमजली, दुमजली क्वचीत तीनमजली घरे होती. घरासमोर अंगण व मागे परसदार होते. घरात स्नानगृह, संडास, शयनगृह, स्वयंपाकगृह इत्यादी स्वतंत्र खोल्या होत्या. नगरात मोठमोठी सार्वजनिक स्नानगृहे, बंदिस्त गटारी, धान्याची कोठारे, समुद्रकिनारी जहाजांची गोदी, सार्वजनिक सभागृह इत्यादी भव्य वास्तू होत्या. वेगवेगळ्या व्यावसायिकांकरीता वेगवेगळी वस्तीस्थाने नगरात होती. अशी ही नियोजनबद्ध नागरी संस्कृती काळाच्या ओघात नष्ट झाली. आज केवळ तिचे अवशेष आढळतात.

**प्राचीन काळातील नगर नियोजन :** त्यानंतरच्या नगरनियोजनाची माहिती आपणास प्राचीन साहित्याद्वारे मिळते. वेद, पुराणे, महाकाव्ये या ग्रंथात प्राचीन नगरींची सुंदर वर्णने आढळतात. कौटिल्याचे अर्थशास्त्र, मानसार, समरांगण, सूत्रधार, शुक्रनीतिसार, अपराजित पृच्छा इत्यादी ग्रंथातून नगररचनेचे सुंदर विवेचन आढळते. या ग्रंथातून नगरांचे त्रिकोणी, चौकोनी, आयताकृती, गोलाकार, अर्धचंद्राकृती, भूजंगाकृती इत्यादी विविध आकार वर्णिलेले आढळतात. चौकोनी रचना उत्कृष्ट

मानली जाई. अयोध्या व द्वारका ही नगरे आयताकृती होती. इंद्रप्रस्थ, नालंदा, तक्षशिला, मथुरा, द्वारका, पाटलीपुत्र इत्यादी प्राचीन नगरे ही नियोजनतंत्रावर आधारलेली होती. नालंदा व तक्षशिला येथील विद्यापीठांची रचना नगर नियोजनाचा उत्कृष्ट नमुना होता. प्राचीन नगर नियोजनाचे पुढील प्रमुख नऊ घटक होते. १) पाणीपुरवठा, २) मंडपरचना, ३) बाजारपेठ, ४) संरक्षण व्यवस्था, ५) शासनव्यवस्था, ६) निवासस्थाने, ७) सांडपाण्याची व्यवस्था, ८) शिक्षणसंस्था, ९) उद्याने व देवालये. प्राचीन नगरात राजमार्ग व वामनमार्ग असे दोन मुख्य रस्ते होते. त्यांचा छेद नगराच्या मध्यभागी होऊन तेथे चौक आखलेला असे. त्यामुळे शहराचे चार विभाग पडत. या चार विभागात व्यवसायानुरूप वसाहती होत्या. एकंदरीत प्राचीनकाळी नगरनियोजनाचा सर्वांगिण विचार केला जाई.

**मध्ययुगातील नगर नियोजन :** मध्ययुगात भारतात इस्लामी राजवट होती. त्यामुळे इस्लामी नगररचनेची तंत्रे भारतात आली. जेरूसलेम व दमास्कस येथील ज्यू व ख्रिस्ती शैलीचा संमिश्र प्रभाव इस्लामी वास्तू व नगरे यांच्या रचनेवर पडला. नगराच्या मध्यभागी मसिद, रोमन जलवाहिन्यांच्या धर्तीवर पाणीपुरवठ्याची योजना, घराभोवती उंची भिंती, अंगणात बगीचा, इमारतीवर घुमट व मनोरे इत्यादी इस्लामी नगररचनेची वैशिष्ट्ये भारतात आली. सम्राट अकबराने वसविलेली **'फत्तेपुर सिक्री'** हे नवे नगर इस्लामी नगर नियोजनाचा उत्कृष्ट नमुना मानता येतो. या नगरात धार्मिक वास्तू विभाग, राजवाडे, मनोरंजन केंद्रे, मशिदी, कबरस्थाने दिवाण-ई-खास, दिवाणी-ई-आम अशा भव्य इमारती बांधल्या. या नगराचा बुलंद दरवाजा अतिभव्य आहे. अशाच धर्तीवर दिल्ली, आग्रा, लाहोर येथील किल्ल्यांची मांडणी केली गेली.

१८ व्या शतकात महाराजा जयसिंग यांनी १७२८ मध्ये वसविलेले जयपूर (राजस्थान) हे शहर प्राचीन हिंदू नगररचनेचा उत्कृष्ट नमूना आहे. येथील सर्व इमारती गुलाबी रंगाच्या आहेत. घरे एकमेकांना खेटून बांधलेली आहेत. नगराची रचना आयताकृती असून नगराभोवती तटबंदी असून आठ प्रवेशद्वारे आहेत. नगराच्या चारी दिशांना मोठे रस्ते आहेत. तर उपरस्ते हे अरुंद आहेत. अशाप्रकारे ब्रिटिशपूर्व भारतातील नगर नियोजनाचे स्वरूप होते.

**आधुनिक काळातील नगर नियोजन :** नगरांचा नियोजनपूर्वक विकास घडवून व त्यासंबंधी कांही कायदे करावेत ही कल्पना तशी पाहता जगात खूप अलिकडील काळातील आहे. नगरनियोजनासंबंधीचे कायदे प्रथम इटली (१८६५), स्वीडन (१८७४) व इंग्लंड (१८७५) या युरोपियन राष्ट्रांत केले. इंग्लंडमधील अशा कायद्यांची सुरुवात आरोग्य व स्थानिक स्वराज्य संस्था याबाबतच्या कायद्यापासून झाली. इंग्लंडच्या कायद्याचा प्रभाव भारतातील कायद्यावर पडला. भारतात नगर नियोजनासंबंधिचा पहिला कायदा मुंबई प्रांताने इ.स. १९१५ मध्ये केला. या कायद्याने नगरपालिकांना नगररचनाविषयक योजना तयार करणे शक्य झाले. पण अशा योजना तयार करणे हे नगरपालिकांच्या इच्छेवर अवलंबून ठेवल्याने मुंबई व इतर कांही थोड्या शहरांनीच फक्त या

कायद्यांचा उपयोग केला; इतरांनी नाही. तसेच अगोदरच विकसित अशा वस्तीच्या विभागांना या कायद्याखालील योजना लागू करता येत नव्हत्या. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आपापल्या क्षेत्रातील सर्व भागासाठी नगरविकास योजना कांही नगरपालिकांनी तयार केल्या. पण त्यांना कायद्याच्या अभावी निर्णायक स्वरूप प्राप्त झाले नाही. हे दोष कमी करणारा व नगरांचा विकास नियंत्रित करण्याचे अधिकार नगरपालिकांच्या हातात देणारा कायदा मुंबई राज्याने १९५४ मध्ये केला. या कायद्यातील तरतुदी सर्व नगरपालिकांना बंधनकारक केल्या. त्यामुळे मुंबई प्रांतात नगर नियोजनास गती मिळाली.

महाराष्ट्र सरकारने १९६६ मध्ये ''महाराष्ट्र प्रादेशिक व नगर नियोजन कायदा'' संमत केला व १९६७ पासून लागू केला. या कायद्यानुसार विशिष्ट क्षेत्रातील प्रादेशिक योजना तयार करण्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करता येते. या मंडळाच्या शिफारसी नगर विकास योजना आखणाऱ्यांनी विचारात घ्याव्यात असे ठरलेले आहे. मंडळाने आखलेले प्रादेशिक नियोजन व नगर नियोजन यामध्ये एकसुत्रता राखण्याचा प्रयत्न केला जातो. भुयारी गटारी, गलिच्छ वस्ती सुधारणा, मास्टर प्लॅननुसार रस्ते व घरे बांधणे इ. उपक्रम राबविले जातात. जमिनीचे संपादन करणे व विकासाचे आराखडे बनविणे यासाठीही खास संस्था स्थापन केल्या आहेत. उदा. नागपूर व इतर कांही शहरातील सुधारणा प्रन्यास (Improvement Trust); नगर व उद्योग विकास महामंडळ, दिल्लीतील दिल्ली विकास प्राधिकरण इ. तसेच कांही नगरात गलिच्छ वस्ती सुधार समित्याही स्थापन केल्या जात आहेत. महाराष्ट्राप्रमाणेच तमिळनाडू, कर्नाटक, गुजरात, प. बंगाल, पंजाब, हरियाणा इत्यादीमध्येही नगर नियोजन कायदे केले आहेत. १९७२ मध्ये गलिच्छ वस्ती पर्यावरण विकासासाठी एक योजना सुरू केली. या योजनेखाली मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, हैद्राबाद, बेंगलोर, कानपूर, लखनौ मद्रास (चेन्नई), नागपूर, पुणे ही १० नगरे समाविष्ट केली. पुढे १९७३-७४ मध्ये आणखीन १० नगरे समाविष्ट केली गेली.

### ४.३.४ नगर नियोजनातील अडथळे (Obstacles to Urban Planning)

नगराच्या सद्याच्या तसेच भविष्यातील गरजांचा व समस्यांचा विचार करून नगराचा क्रमबद्ध विकास घडवून आण्यासाठी नगर नियोजन करावे लागते. नगरवासियांचे आरोग्य, सुरक्षा, कल्याण इत्यादीमध्ये वाढ करणे हे नगर नियोजनाचे उद्दिष्ट असते. स्थानिक स्वराज्यसंस्था (नगरपालिका व महानगरपालिका), राज्य व केंद्र सरकार नगर नियोजनाच्या योजना आखून त्यानुसार नगराच्या विकासाचे प्रयत्न करीत असतात. तथापि नगर नियोजनाच्या या योजनांना अपेक्षित यश लाभत नाही. कारण नगर नियोजनातील अडथळे (किंवा समस्या) पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **लोकसंख्या वाढ (Population growth)** : नैसर्गिक वाढ आणि ग्रामीण लोकसंख्येचे नगरांकडे होणारे स्थलांतर यामुळे नगराची लोकसंख्या सतत वेगाने वाढत आहे. त्यामुळे अनेक

नगरांना अतिरिक्त लोकसंख्येच्या समस्येने ग्रासलेले आहे. वाढत्या लोकसंख्येला नागरी सुविधा पुरविणे स्थानिक स्वराज्य संस्थांना कठीण जाते. त्यामुळे आखलेले नियोजन कोलमडून पडते. किंवा त्यामध्ये मोठे बदल करावे लागतात. भारतातील मुंबई, कोलकोता, दिल्ली, चेन्नई, पुणे इत्यादी महानगरांमध्ये सभोवतालच्या प्रदेशातील लोकांचे रोजगार व अन्य उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी दररोज लोंढेच्या लोंढे येत आहेत. त्यामुळे त्यांची लोकसंख्या सतत वाढत चालली असून तेथील नागरी सुविधांवर प्रचंड ताण पडत आहे. परिणामी त्यांच्या नगर नियोजनात अडथळे येत आहेत.

२. **सदोष नियोजन (Defective Planning)** : सदोष नियोजन हाही नगर नियोजनातील एक महत्त्वपूर्ण अडथळा आहे. निर्दोष व परिपूर्ण नियोजन हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. नगर नियोजन करताना नगराची उपलब्ध भूमी वा जमिनीचा विस्तार व प्रकार, तेथील हवामान, पर्ज्यनमान, पाणीपुरवठा, लोकसंख्या, लोकांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवन इत्यादी अनेक बाबीं विचारात घ्याव्या लागतात. तसेच नियोजनामध्ये नगररचनाकार, इंजिनिअर्स, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, प्रशासक, लोकप्रतिनिधी, इत्यादी लोकांचा सहभाग असावा लागतो. तसेच नियोजन हे अत्यंत शास्त्रशुद्धपणे व निरपेक्षपणे करावे लागते. तथापि बऱ्याचवेळा अशाप्रकारे नियोजन केले जात नाही. नियोजनात तज्ज्ञांचा सल्ला घेतला जात नाही. विशिष्ट स्वार्थी हेतु मनात ठेवून नियोजन केले जाते. तज्ज्ञ नसलेले लोक नियोजनावर प्रभाव टाकतात. परिणामी नियोजन सदोष होते. असे नियोजन कुचकामी ठरते.

३. **स्वार्थी हितसंबंध (Vested interest)** : नगर नियोजनात राजकारणी, प्रशासक, लोकप्रतिनिधी (नगरसेवक), कर्मचारी नागरीक इत्यादी लोकांचे हितसंबंध गुंतलेले असतात. त्यामुळे नगर नियोजनात अडथळे येऊन ते असफल ठरते. उदा. झोपडपट्टीत निवडून आलेले नगरसेवक झोपडपट्टी निर्मूलनास विरोध करतात. व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी म्हणजे नगरसेवक बाजारपेठेतील रस्ता रुंदीकरणास विरोध करतात. त्यामुळे ते नगरनियोजनाच्या नियंत्रक नकाशात (मास्टर प्लॅनमध्ये) फेरफार करावयास लावतात. राजकारणी मंडळी मतदानावर डोळा ठेवून जनतेस अवास्तव आश्वासने देतात व निवडून आल्यावर त्यासाठी आग्रह धरून बसतात. परिणामी नियोजनावर विपरित परिणाम होतो. नगरातील प्रभावशाली व्यक्ती, नेते, उद्योगपती, व्यापारी इत्यादी मंडळी सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करतात आणि अतिक्रम हटाव मोहिमेस विरोध करतात. अशाप्रकारे नगरातील विविध घटकांचे स्वार्थी हितसंबंध हे नगर नियोजनाच्या आखणीत व अंमलबजावणीत अडथळा ठरतात.

४. **राजकारण :** नगर नियोजनामध्ये नगरपालिका-महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. तथापि या संस्था राजकारणाचे अड्डे बनलेल्या आहेत. या संस्थातील सत्ताधारी गट हा विरोधकांच्या विधायक सुचनांकडे दुर्लक्ष करतो तर विरोधक देखील केवळ विरोधासाठी विरोध म्हणून सत्ताधारी गटाच्या चांगल्या योजनासही विरोध करतात. या

संस्थातील नगरसेवकांवर पक्षीय नेतृत्वाचा प्रभाव असतो. आणि ते नागरिकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून पक्षीय दृष्टिकोनातून निर्णय घेतात. परिणाम नगर नियोजनास बाधा येते. एखाद्या नगरपालिकेत वा महानगरपालिकेत विरोधी राजकीय पक्षाची सत्ता असेल तर बऱ्याचवेळा राज्यसरकार नगरपालिकेच्या वा महानगरपालिकेच्या योजनांना मंजूरी नाकारते. यातूनच कांहीवेळा कोर्टकचेऱ्या सुरू होतात आणि नगर विकासाचे काम खोळांबून राहते.

५. **भ्रष्टाचार :** हा देखील नगर नियोजनातील एक प्रभावी अडथळा आहे. नगर नियोजनाची अंमलबजावणी करणारे स्थानिक स्वराज्य संस्थेतील कर्मचारी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करतात. लाचलुचपत घेऊन नियमबाह्य बांधकामाचे परवाने देतात. रस्ते, सार्वजनिक इमारती, उद्याने, मैदाने, पूल इत्यादीचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारांना काम देण्यासाठी पदाधिकारी त्यांच्याकडून पैसे घेतात. त्यामुळे ठेकेदार हीन दर्जाची कामे करतात. साफसफाई, औषधखरेदी, रस्तेबांधणी व दुरुस्ती इत्यादीसाठी जे बजेट मंजूर केलेले असते त्यातील मोठा हिस्सा ठेकेदार, प्रशासक, नगरसेवक इत्यादी हडप करतात. जनतेकडून गोळा करावयाच्या विविध करांतील (घरपट्टी, पाणीपट्टी, बाजारकर इ.) मोठा हिस्सा वसुली अधिकारी आपल्या खिशात घालतात. अशाप्रकारे नगर नियोजनावर जे करोडो रुपये खर्च होतात त्याचा पुरेपूर लाभ नागरीकांना मिळत नाही.

६. **अपर्याप्त निधी :** नगर नियोजनाच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज असते. बऱ्याचवेळा नगरातील स्थानिक स्वराज्यसंस्था किंवा राज्यसरकार आपल्या अंदाजपत्रकात एवढी तरतूद करू शकत नाही. त्यामुळे अनेक योजना, विकास कामे पुढे ढकलावी लागतात. परिणामी अपेक्षित खर्च वाढत जातो. पैशाच्या अभावी अनेक चांगल्या योजना रखडत राहतात.

७. **नागरीकांची उदासिनता :** बहुसंख्य नागरीक हे नगर नियोजनाच्या बाबतीत उदासिन असतात. आपण कर रूपाने दिलेला पैसा नगराच्या विकासासाठी वापरला जातो की नाही याकडे लक्ष देत नाहीत. आपल्या संकुचित स्वार्थासाठी नागरीक म्हणून आपली असलेली कर्तव्ये विसरतात. रस्ते खोदतात, रस्त्यावर गटारीत कचरा टाकतात, वाटेल तेथे थुंकतात, घाण करतात, सार्वजनिक जागेवर आक्रमण करतात, मोर्चे, निदर्शने, संप इत्यादीच्यावेळी नगरातील सार्वजनिक वस्तूंची मोडतोड करतात. लाचलुचपत देऊन नियमबाह्य कामे करून घेतात. नागरीकांची ही उदासिनता व बेफिकीर वृत्ती नगर नियोजनास बाधा आणते.

## ४.४ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

१. नगर नियोजनाची कोणतीही एक व्याख्या सांगा.

२. नगर नियोजनाचे उद्दिष्ट काय असते?

३. नगर नियोजनातील कोणतीही पाच तत्त्वे सांगा.

४. भारतात नगर नियोजनासंबंधिचा पहिला कायदा कोणत्या प्रांताने कोणत्या साली केंला?

५. नगर नियोजनातील प्रमुख अडथळे सांगा.

## ४.५ सारांश (Let us Sum up)

या घटकात तुम्ही प्रथम नगर नियोजनाचा अर्थ व तत्त्वे अभ्यासलेली आहेत. नगर नियोजन ही नागर समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. नगराच्या विकासासाठी-विस्तारासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन होय. नगरवासियांना नगरात सुखसमाधानाने राहता येईल असे पर्यावरण उपलब्ध करून देणे हे नगर नियोजनाचे उद्दिष्ट असते. नगर नियोजनात पुढील तत्त्वे अंतर्भूत आहेत. १) परिवहन व्यवस्था पद्धतशीर व नियंत्रित करणे, २) वाहनतळ उभारणे, ३) जमिनीच्या उपयोगावर नियंत्रण ठेवणे. ४) गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन/सुधारणा करणे, ५) गृहनिर्माण योजना राबविणे, ६) विविध विभाग पाडणे, ७) विविध सेवा-सुविधा पुरविणे, ८) स्वच्छता ठेवणे, ९) नगराचे सौंदर्य वाढविणे. यानंतर भारतातील नगर नियोजनाचा आढावा (सिंधु संस्कृतीपासून ते आजपर्यंतच्या कालखंडातील) घेतलेला आहे. सर्वात शेवटी नगर नियोजनाच्या मार्गातील १) लोकसंख्या वाढ, २) सदोष नियोजन, ३) स्वार्थी हितसंबंध, ४) राजकारण, ५) भ्रष्टाचार, ६) अपर्याप्त निधी, ७) नागरिकांची उदासिनता इत्यादी अडथळ्यांचे स्वरूप समजावून घेतले आहे.

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

१. नगरातील लोकांच्या वर्तमानकालीन तसेच भविष्यकालीन भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी गरजा विचारात घेऊन त्यांना पुरवावयाच्या सोयीसुविधांचा विकास करण्यासाठी केलेले नियोजन म्हणजे नगर नियोजन होय.

२. नगरात राहणाऱ्या लोकांना आवश्यक त्या भौतिक, सामाजिक व सांस्कृतिक सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना सुखासमाधानाने राहता येईल असे पर्यावरण निर्माण करणे हे नगर नियोजनाचे उद्दिष्ट असते.

३. नगर नियोजनातील पाच तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) परिवहन व्यवस्था पद्धतशीर व नियंत्रित करणे

ब) वाहनतळ उभारणे

क) जमिनीच्या उपयोगावर नियंत्रण ठेवणे

ड) गलिच्छ वस्ती निर्मूलन/सुधारणा करणे

ई) गृहनिर्माण योजना राबविणे

४. भारतात नगर नियोजनासंबंधीचा पहिला कायदा मुंबई प्रांताने १९१५ साली केला.

५. नगर नियोजनातील प्रमुख अडथळे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) लोकसंख्या वाढ, ब) सदोष नियोजन, क) स्वार्थी हितसंबंध, ड) राजकारण, ई) भ्रष्टाचार, फ) अपर्याप्त निधी, ग) नागरिकांची उदासिनता

## ४.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नगर नियोजनाची व्याख्या देऊन त्याची तत्त्वे स्पष्ट करा.

२. भारतातील नगर निरोजनाची चर्चा करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नगर नियोजनाचा अर्थ

२. नगर नियोजनातील अडथळे.

## ४.८ चिंतन आणि कार्य

- तुमच्या जवळपासच्या नगरातील स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या एखाद्या पदाधिकाऱ्याची भेट घेऊन तेथील नगर नियोजनाविषयी चर्चा करा आणि त्या आधारे एक टिपण तयार करा.
- एखाद्या महानगरपालिकेच्या आयुक्ताशी चर्चा करून नगर/नियोजनाच्या अंमलबजावणीत कोणते अडथळे येतात हे समजावून घ्या व त्यांची नोंद करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)

१. Urban Sociology - Rajendra K. Sharma - Atlantic Publishers and Distributors, New Delhi-1997.

२. नगरीय समाजशास्त्र – श्रीमती शारदा तिवारी – अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई, दिल्ली–२००४.

३. भारतातील ग्रामीण व नागर समाज – प्रा. चंद्रकांत खंडागळे, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

❑❑❑